म. ग्रं. सं. ठाणें.
विषय चरित्र
सं. क्र. २९२

REFBK-0000422

स्वच्छंद
म. ग्रं. सं. ठाणे

म. ना. श्री. ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नं. 22
ता.
ठाणे.

स्वच्छंद
म. ग्रं. सं. ठाणे

REFBK-0000422



रे० बाबा पद्मनजी.

# अरुणोदय.

## बाबा पद्मनजी यांचें स्वलिखित चरित्र.

ह्यांत पुस्तककर्त्यानें आपलें हिंदु धर्मसंबंधीं जिणें व
ख्रिस्ती होणें ह्या गोष्टींचें वर्णन
केलें आहे.

मराठी ग्रंथ
दा. क्र.
ग्रं. संख्या

"मी जसा असावा तसा नाहीं, मला जसें असण्याची इच्छा आहे तसा मी नाहीं, मला जसें होण्याची आशा आहे तसा मी नाहीं, परंतु मी एकदां जसा होतों तसा आतां देवाच्या कृपेनें नाहीं."

जॉन न्युतन.

मुंबईमध्यें,
'निर्णयसागर' छापखान्यांत छापिला.

सन १९०८.

परात्पर देवानें मला जीं चिन्हें व चमत्कार
दाखविले ते वर्णन करायाला मला बरें वाटलें आहे.
( दा० ४:२. )

# प्रस्तावना.

हा ग्रंथ रचण्यासाठीं मीं जी सामग्री मिळावेली ती येणेंप्रमाणें:—

१ स्मरणांतील गोष्टी. २ स्मरणवहींतील टिपण. ३ पत्रव्यवहारसंबंधीं कागद. ४ दिनचर्यालेख. ५ छांपलेलीं पुस्तकें, रिपोर्ट व वर्त्तमानपत्रें. ६ मित्रांपासून मिळविलेली तोंडची माहिती.

१ **स्मरणांतील गोष्टी.**—माझ्या वयाचा १७।१८ वर्षांचा इतिहास केवळ स्मरणांत असलेल्या गोष्टींवरून लिहिला आहे. स्मरणशक्ति किती चमत्कारिक आहे हें हें पुस्तक रचतेवेळीं जसें माझ्या अनुभवास आलें तसें तिच्याविषयीं विद्वानांनीं लिहिलेले निबंध व ग्रंथ वाचल्यानें पूर्वीं समजलें नाहीं. हें स्मरण पाठ करून ठेवलेल्या गोष्टींचें नव्हतें, तर अंतःकरणानें अनुभवलेल्या गोष्टींचें होतें; त्या गोष्टी जशीं भूमींतील कंदमुळें खणून व उकरून काढतात तशा मनभूमिकेंतून काढाव्या लागल्या. ह्या कामीं बहुत श्रम पडले. रात्रंदिवस त्यांचें चिंतन करावें लागलें, त्यांचाच निजध्यास मनास लावावा लागला, व त्याच काळांत जणूं मी राहत व वर्त्तत आहें, व त्या काळच्या मनुष्यांशीं दळणवळण ठेवीत आहें असें मनांत आणावें लागलें. असें करणें कांहीं सोपें नव्हतें. जसा ऊंस चरकांत घालून पिळावा तसा मेंदु पिळावा लागला. तरी सर्व रस निघाला नाहीं. शेंकडा दहा थेंब गळाला असें ह्मटलें पाहिजे, कारण सर्व गोष्टी यथारूप व यथाक्रम डोळ्यांपुढें उभ्या राहिल्या असें नाहीं. जेव्हां एका गोष्टीचें एक अंग दिसावें तेव्हां दुसऱ्या अंगाचा अगदीं लोप व्हावा. एका बाजूनें तिजवर प्रकाश पडला तरी दुसरी बाजू अंधारांत अगदीं लपून जाई, व ती कांहीं दिवसांनीं, आठवड्यांनीं किंवा महिन्यांनीं एकाएकीं दिसूं लागे, किंवा मुळींच दिसली नाहीं. इतकें करायाला जे मानसिक श्रम लागले ते ज्याचे त्यालाच ठाऊक, त्यांचें वर्णन करून उपयोग नाहीं;

ज्यास असा प्रसंग येतो त्यासच त्याचा अनुभव असतो. येथें इतकेंच सांगतों कीं, हें पुस्तक छापखान्यांत पाठविण्याच्या पूर्वी पुनः पुनः असें पांच वेळ वाचलें, त्याशिवाय प्रुफें तपासतांना ज्या वाचण्या झाल्या त्या निराळ्याच.

**२ स्मरणवहींतील टिपण.**—हें पहिल्यापासून करून ठेविलें नव्हतें हें सांगायास नकोच. एक तर जें टांचून ठेविलें होतें तें पुढें अशा प्रकारच्या ग्रंथांत दाखल करावें असा माझा मुळींच हेतु नव्हता, त्यामुळें तें सविस्तर, किंवा संगतवार झालें नाहीं, तुटक तुटक व दीर्घ काळाच्या अंतरानें लिहून ठेविलेलें होतें.

**३. पत्रव्यवहार.**—ह्यासंबंधीं कागदें एकदां माझ्यापाशीं पुष्कळ होतीं, पण त्यांतून बहुतेक काळाच्या प्रवाहांत वाहून गेलीं, कांहीं ग्रामांतरें व गृहांतरें करण्याच्या धांदलींत गहाळ झालीं, कांहीं कीटकांच्या भक्षीं पडलीं, कित्येकांची पावसापाण्यानें भिजून शाई उडाली, कित्येक अविचारानें, व त्याचा पुढें उपयोग नाहीं अशा समजुतीनें व ठेवायास जागा नाहीं अशा अडचणीनें फाडून टाकलीं, व कित्येक हयगयीमुळें हरवलीं! इतक्या क्रांतींतून निभावलेलीं जीं अस्सल पत्रें राहिलीं तीं सर्व वृत्तांताच्या संबंधानें यथाक्रम नाहींत. तसेंच मी दुसऱ्यांस पाठविलेल्या पत्रांच्या ज्या प्रती राहिल्या त्यांपैकीं कांहीं वेळ नसल्यामुळें, आळसानें व दुसऱ्या कारणांनीं अर्धवट राहिल्या आहेत. मीं आपल्या वडिलांस पाठविलेलीं पत्रें घर सोडल्यावर दुसऱ्यांच्या हातांत गेलीं, अथवा त्यांनींच तीं फाडून टाकलीं असतील, यामुळें त्यांजवरून जो मजकूर जुळतां आला असता तो तसाच राहिला. अशा ठिकाणीं पुनः स्मरणशक्तीवर अवलंबून रहावें लागलें.

या पुस्तकांत "माझ्या काकांचीं कागदपत्रें" असा कित्येक ठिकाणीं उल्लेख आला आहे. त्याचा अर्थ असा आहे कीं, माझे सन्मान्य काकासाहेब रा० रा० नारायणराव माणिकजी हे व आम्ही बहुत वर्षे एकाच ठिकाणीं राहत होतों. मी ख्रिस्ती झाल्यावर माझीं जीं कांहीं लहानपणींचीं थोडींशीं कागदपत्रें घरांत राहिलीं तीं सर्व त्यांच्या हातीं गेलीं. त्यांचा मला १८५४ पासून १८८५ पर्यंत ह्मणजे ३१ वर्षे मुद्दा पत्ता नव्हता! परंतु जेव्हां ते दोन वर्षांमागें निवर्तले तेव्हां माझ्या प्रिय काकीबाईनें त्यांचीं सर्व बुकें, कागदें वगैरे माझ्या घरीं आणून ठेविलीं. त्या वेळीं तीं मीं वरवर

चाळून पाहिलीं, त्यांत मला माझ्या संबंधाचें कांहीं विशेष सांपडलें नाहीं. परंतु ह्या पुस्तकास आरंभ केल्यावर जसजशी मितीची व मजकुराची गरज लागली, तसतशीं तीं कागदपत्रें पुनः तपासून पाहण्याचें अगत्य दिसलें व तीं पाहतां पाहतां कित्येक अगत्याच्या गोष्टींचा निर्णय करण्याजोगे लेख सांपडले, तेणेंकरून फार हर्ष झाला. तरी ह्या पहिल्या शोधांत जीं कागदपत्रें सांपडलीं नाहींत व जीं असतील असें माझ्या स्वप्नींही नव्हतें, तीं ईश्वरी सूत्रानें व मोठ्या चमत्कारिक रीतीनें माझ्या हातीं लागलीं. ह्याविषयींचें एक उदाहरण सांगतों. एकदां माझी एक प्रिय वहीण मला भेटायास आली, तिच्याशीं गोष्टी करीत असतां काकांची गोष्ट निघाली, तेव्हां माझ्या मनांत असें आलें कीं त्यांच्या ज्या पेट्या माझ्यापाशीं आहेत त्यांतून काकूनें मला दिलेली पेटी तिला दाखवून तींत ज्या जिनसा आहेत त्यांपैकीं यादगारीसाठीं एखादी जिन्नस तिला निवडून घेण्यास सांगावें. ह्या हेतूनें ती पेटी तिच्यापुढें आणून उघडली, व तींतील जिनसा पाहत असतां त्या पेटीच्या झांकणाला एक कप्पा होता तोही उघडून दाखवावा असें मला वाटलें. तो पाहतां त्यांत एक कागदाचें पुडकें सांपडलें; त्या पुडक्यांत फार अगत्याचीं पत्रें निघालीं. तीं जर हातीं लागलीं नसतीं तर ह्या पुस्तकांत लिहिलेल्या कित्येक गोष्टी वरोबर समजल्या नसत्या, ह्मणजे कोणत्या कारणानें माझें आदनास परत जाणें झालें नाहीं (प्रकरण ८ वें पाहा), साधनप्राप्तीकरितां मी कोणते मंत्र जपत असें, शक्तिपूजेचे मला कोणते मंत्र येत असत, (प्र० ४) इ० कांहींच माझ्या आठवणींत नव्हतें. हें सर्व त्या पुडक्यांत माझ्या हातचें लिहिलेलें सांपडलें! याशिवाय माझी संध्येची पोथी सांपडली. अणखी मी बारा वर्षांचा असतां आपल्या प्रिय मातोश्रीस लिहिलेलें एक पत्र सांपडलें, त्यावरून त्या वयांत मी व्यंकटेशस्तोत्राची पोथी वाचीत असें व मंत्रताईत यांवर माझा विश्वास होता असें मला समजलें. त्याच पत्राच्या मितीस माझ्या मराठी पंतोजीनें माझ्या वडिलांस लिहिलेलें एक पत्र सांपडलें. याप्रमाणें मोठें घवकें सांपडलें.

**४ दिनचर्यालेख.**—हेही फार तुटक आहेत. मी ख्रिस्ती होण्याच्या अगोदर केवळ एक दोन वर्षांपासून कांहीं कांहीं स्वतांविषयींच्या व दुसऱ्यांविषयींच्या विशेष गोष्टी सहज लिहून ठेवूं लागलों, परंतु त्या नित्य लिहिण्याचा परिपाठ नसल्यामुळें त्यांपासून सरळ व यथाक्रम वृत्तांत रचण्याकरितां

स्मरणशक्तीवर व दुसऱ्या साहित्यावर अवलंबून राहावें लागलें. तरी ह्यापासून बराच फायदा झाला.

५ **वर्त्तमानपत्रें, रिपोर्ट** वगैरे.—हीं जेव्हांपासून मी धर्माचा व सामाजिक सुधारणुकीचा विचार करूं लागलों, व वर्त्तमानपत्रांस निबंध वगैरे लिहिण्याचें मला सामर्थ्य आलें तेव्हांपासूनचीं समजावीं. हा काळ सुमारें १८५० पासून १८५४ पर्यंतचा आहे. हीं साधनें कोणतीं व कशा रीतीनें उपयोगीं पडलीं हें ह्या पुस्तकांत सांगितलेंच आहे, ह्मणून त्यांविषयीं पुनः एथें लिहिणें नको. तसेंच ओरिएन्टल क्रिश्चन स्पेक्टेटर वगैरे मासिक पुस्तकांतून व त्यांत छापलेल्या फ्रिचर्च मिशनाच्या रिपोर्टांपासून बरेंच सहाय्य झालें.

अशा प्रकारच्या ग्रंथास जुन्या मित्रांपासून माहिती मिळविण्याची जी आशा असते ती पूर्ण झाली नाहीं. कारण त्या काळांतील बहुतेक मित्र जगांतरीं गेले आहेत, व जे आहेत त्यांस ज्या गोष्टीची मला आठवण नाहीं त्यांची त्यांसही बहुधा नाहीं, इतकेंच नाहीं, तर ज्या गोष्टींचें मला स्मरण आहे त्या देखील कित्येकांच्या स्मरणांत राहिल्या नाहींत! तेव्हां त्यांच्यापाशीं याचना करायास जाणें ह्मणजे एकादशीच्या घरीं शिवरात्र भोजनास गेल्याप्रमाणें झालें. असो. तरी दोन चार मित्रांनीं कित्येक गोष्टींचें स्मरण दिलें व एका दोघांनीं बरीच माहिती लिहून पाठविली. ह्याविषयीं मी त्यांचा उपकार मानितों. अशी माहिती देणाऱ्या मित्रांपैकीं एकाचें नांव ह्या पुस्तकांत आलेंच आहे, ह्मणजे रेव० जान महंतापा यांनीं माझ्या बातिस्म्याविषयीं माझ्याशीं बोलून मला कित्येक गोष्टींची आठवण दिली, व लंदन मिशनाच्या दप्तरांत मजविषयींचा जो लेख होता त्याची प्रत मागवून दिली. त्यांचे जामात रेव० मि० सुमंत विष्णु करमरकर हे कलकत्त्यास गेले होते तेथून त्यांनीं मुंबईच्या फ्रिचर्च रिपोर्टांतून घेतलेला तशाच प्रकारचा मजकूर ख्रिश्चन अबसर्वर पत्रांत छापला होता त्याची नक्कल माझ्या सांगण्यावरून फार शोध करून आणून दिली, माझ्या पूर्वजांविषयीं पहिल्या व दुसऱ्या पृष्ठावर जें आहे त्यांतील बराच भाग रा० रा० गोपाळराव मुळे यांनीं आपल्या कुटुंबांतील वृद्धांस विचारून लिहिला आहे. तिजबद्दल मी त्यांचा आभारी आहें. मुंबईच्या परमहंस मंडळीविषयीं रा० रा० नारायणराव नवलकर यांनीं व अहमदनगरच्या परमहंसमंडळीविषयीं रेव० कासम महंमदजी यांनीं जें लिहून दिलें तें पुरवणींत घातलें आहे. याप्रमाणें 'दसका लकडी एकका बोजा'

ह्या म्हणीप्रमाणें अनेक मित्रांनीं सहाय केल्याबद्दल त्यांचे मी फार उपकार मानितों.

आतां ह्या पुस्तकांत मीं आपल्या घरच्या खासगत गोष्टी कां घातल्या असा कोणी कदाचित् प्रश्न करितील, तर त्यांस हेंच उत्तर आहे कीं, ज्या कुटुंबांत माझा जन्म झाला व जेथें मी लहानाचा मोठा झालों त्याचा व माझा वेलांत वेल वाढल्याप्रमाणें जो संबंध तो सोडून माझी एकट्याचीच गोष्ट कशी लिहितां आली असती? वाडवडिलांचा जो कुलधर्म तो त्यांच्या लेंकरांचा, त्यांच्या ज्या चाली व रीतिभाती त्या त्यांच्या मुलांच्या, त्यांचे जे विचार ते ह्यांचे विचार; हा प्रकार सर्वत्र आहे.

ह्या पुस्तकांत केवळ माझ्या एकट्याच्या जीवनचरित्राचें वर्णन केलें आहे असें नाहीं, तर सन १८३१ पासून १८५४ पर्यंत ज्या ज्या विशेष गोष्टींशीं व व्यक्तींशीं माझा निकट व दूर, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध होता त्या गोष्टींचें व व्यक्तींचें विषयाच्या योग्यतेप्रमाणें स्वल्प किंवा सविस्तर वर्णन केलें आहे. असें करण्याविषयीं कित्येक सुज्ञ व सन्मान्य मित्रांनीं सूचनाही केल्या होत्या. ह्या सूचनारूप मार्गांत चालतांना फार संभाळून पाऊल टाकावें लागलें; मुख्य विषयाशीं संबंध जोडण्याकरितां उगीच ओढून ताणून आणलेल्या गोष्टींची खोगीरभरती न व्हावी ह्मणून फार जपावें लागलें; तसेंच जें लिहिलें आहे तें बहुतेक स्मरणशक्तीवर अवलंबून लिहिणें प्राप्त झाल्यामुळें त्यांचें यथातथ्य वर्णन व्हावें, व त्यांत अतिशयोक्ति अथवा न्यूनता होऊं नये ह्मणूनही फार जपावें लागलें. ज्यांचा माझा ह्या गोष्टींत अति निकट संबंध होता अशीं जीं माझीं जिवलग मातापितरें व दुसरे कित्येक संबंधी आतां हें जग सोडून गेले आहेत, तेव्हां त्यांच्याविषयीं जें कांहीं लिहिणें तें खरें किंवा खोटें हें पाहण्यास किंवा ठरविण्यास तीं येणार नाहींत, या विचारावरून हें वृत्त लिहिणें फारच नाजूक व जबाबदारीचें काम झालें व तें योग्य रीतीनें बजावलें जावें ह्मणून रात्रंदिवस परमेश्वराचें साह्य मागत असतां चालविलें.

आतां हें पुस्तक लिहिण्याचा मुख्य हेतु सांगितला पाहिजे. तो हाच कीं एका दीन पाप्यावर ईश्वरानें जी परम दया केली तिचें वर्णन करावें, आणि तें वाचून त्याजसारख्या इतर पाप्यांनीं त्या दयेचा अनुभव घ्यावा व ज्यांस असा अनुभव झाला आहे त्यांनीं तिचा महिमा गावा.

ईश्वराचे मार्ग अतर्क्य आहेत, व त्याच्या कल्पना जसें आकाश पृथ्वीपासून उंच आहे तशा आमच्या कल्पनांपेक्षां थोर आहेत. पाप्यास तो आपणाकडे वळविण्याचे जे उपाय योजितो ते फार आश्चर्यकारक आहेत. तो त्याचे संकल्प व कर्मे यांचें स्वातंत्र्य नष्ट न करितां, आपल्या आत्म्याचे कृतीनें, आपल्या शास्त्राच्या प्रकाशानें व आपल्या सूत्राच्या गतीनें आणि मनुष्याच्या विपरीत योजनांनीं देखील त्याला स्वमार्गावर आणितो, आणि जो तारणारा त्यानें नेमिला आहे त्याची ओळख करून देऊन त्याच्या द्वारें त्याचा उद्धार करितो. ह्या गोष्टी ह्या पुस्तकांत सिद्धांतरूपानें स्थापिल्या नाहींत, किंवा सूत्ररूपानें ग्रथिल्या नाहींत, तर इतिहासरूपानें ह्मणजे खरोखर घडलेलें वृत्त कथन करून दर्शविल्या आहेत. जे कोणी हें वृत्त शांत चित्तानें व निःपक्षपातानें साद्यंत वाचतील त्यांस ह्या गोष्टींचें प्रत्यंतर मिळेल.

आतां हें पुस्तक परमेश्वराच्या दयेनें शेवटास गेलें ह्मणून त्याचे मी उपकार मानितों. ह्याला आरंभ केल्यापासून मध्यें अनेक व्यत्यय आले. याचा बहुतेक भाग कन्यागतांतील हिंदूंच्या लग्नांतील धामधुमींत मुंबईत लिहिला गेला, तशीच मनावर माझ्या प्रिय पत्नीच्या आजारीपणामुळें काळजीचा भार आहत असतां ह्याची रचना करावी लागली. कित्येक महिने इगतपुरी, धोंड, पुणें ह्या ठिकाणीं प्रवास करण्यांत गेले. ह्याचें काम चाललें असतां कित्येक प्रिय मित्र परलोकवासी झाले. तेव्हां अशा अडचणींतून पार पडून व ग्रंथकर्त्यास आरोग्य, बल व साहित्य देऊन ज्यानें हा उद्योग शेवटास जाऊं दिला त्या **परमेश्वराची सदा सर्वकाळ स्तुति असो.**

**बाबा पदमनजी.**

---

## विशेष सूचना.

ह्या पुस्तकाची मालकी मुंबईच्या त्राक्ट व बुक सोसैटीकडे आहे. परंतु ह्याचें इंग्लिश भाषांतर करून तें छापण्याचा हक्क त्या मंडळीनें ग्रंथकर्त्यास दिला आहे.

**बा० प०.**

## त्रा० सो० च्या मेंबरांनीं दिलेला अभिप्राय.

I have read with very great pleasure a considerable portion of this MS. and have looked over the whole work. Mr. Baba Padmanji's autobiography will prove a most valuable addition to Marathi Christian Literature. Nothing which the Society has published during recent years has interested me so much as this work and I shall feel impatient till I see it in type and in wide circulation. It is a work fitted to interest alike the Missionary, the Native Christian and the thoughtful non-Christian reader, and I anticipate a wide and varied usefulness for this autobiography. I trust that the example which Mr. Baba has set in the composition of this record will induce other Native Christians to relate the Lord's dealings with them for the encouragement of Christ's children, and for the guidance of those who are seeking Him.

I trust that, notwithstanding the present state of the Society's funds no time will be lost in putting this valuable work to the press.

D. MACKICHAN.

26*th*, *April* 1887.

I have read this autobiography with very great interest. It is well fitted to accomplish the end which the writer had in view and favourably impress thoughtful persons in this country as to the genuineness of the claims of Christianity. I think, Mr. Baba has been very successful in the delineation of his student life and many will be glad to see these pen pictures of those with whom he was associated.

GEO. BOWEN.

*Bombay*, 6*th May*, 1887.

MY DEAR MR. BABA,

I return your MS. with many thanks. I am exceedingly pleased with it, and I am sure it will be of great value. I hope it will run through many editions.

I hope the Society will let us print it soon.

Very Sincerely Yours,
J. E. ABBOTT.

*June* 10*th*, 1887.

*** सबकमिटीचा वरील अभिप्राय ह्या पुस्तकांत घालण्याकरितां टैपांत जुळलेला असतां तो लिहिणारांपैकीं एक गृहस्थ ह्मणजे रेव० जार्ज बोयन हे रविवार ता० ५ फेब्रुआरी रोजीं इहलोकची आयुष्ययात्रा संपवून सार्वकालिक विश्रांति भोगण्यास विश्रामवारच्या प्रातःकाळीं गेले. त्यांचें हें शेवटचें दुखणें केवळ चार दिवसांचें होतें. त्यांनीं आमच्या देशांत एकसारखीं ४० वर्षें प्रभूची सेवा व मनुष्यांचें कल्याण करण्यांत घालविलीं. ते देवाचे प्रेमळ भक्त व मनुष्याचे .खरे मित्र होते. बाप्तिस्मा करणारा पवित्र साधु योहान्न याच्याप्रमाणें पवित्र साधु बोयन हा जगांत पाजळलेला व प्रकाशमान दीप होता. त्याला आतां प्रभूनें आपल्या सेवेकरितां दिव्यलोकीं नेलें. बोयन साहेब सुमारें वीस बावीस वर्षांचे होतपर्यंत नास्तिक मतावलंबी होते. परंतु देवाच्या आत्म्यानें त्यांचे ज्ञानचक्षु उघडल्यावर त्यांस ख्रिस्ताचें दर्शन होऊन त्याच्या तारक कृपेचा असा उत्तम प्रकारचा अनुभव झाला कीं त्यांनीं देहबुद्धि जग व सैतान यांचा उत्सर्ग करून आपलें अंतःकरण प्रभूला वाहिलें, आणि एकनिष्ठेनें त्याची सेवा करण्याचा सुनिश्चय केला. ह्या निश्चयाप्रमाणें ते ईश्वरी सहायानें शेवटपर्यंत कसे वर्त्तले याविषयीं ख्रिस्ती मंडळी व जग सारखीच साक्ष देत आहे. ख्रिस्ती प्रीति, नम्रता, संयमन व जनोपकार हे गुण हिऱ्याप्रमाणें त्यांच्या ठायीं झळकत असून त्यांचें तेज आह्मां जवळच्यांवरच इतकीं वर्षें पडलें असें नाहीं, तर त्यांचीं किरणें दूरवर गेलीं. हें सर्व पुरतेपणीं शेवटच्या दिवशीं समजेल. त्यांनीं जें बॉंबे गार्डियनपत्र बहुत वर्षें एकट्यानेंच चालविलें त्यावरून त्यांचे श्रम कसे अश्रांत होते, व त्यांस जगाचा विरोध किती सोसावा लागला आणि अधर्म, अन्याय, नास्तिकपणा व अनेक प्रकारचीं असत् मतें यांशीं कशी झोंबी करावी लागली हें दिसून येतें. याशिवाय त्यांचीं दुसरीं बहुत नित्य व नैमित्तिक कामें होतीं, तीं आतां आटपलीं. आतां त्यांचें युद्ध संपलें. आणि ते जीवनाचा व गौरवाचा मुगुट पावण्यासाठीं नीतिमान् न्यायाधीश प्रभूपाशीं गेले आहेत.

प्रभूंत मरणारे धन्य आहेत; आत्मा ह्मणतो, होय, ते आपल्या कष्टांचा आतांपासून विसांवा पावतील; त्यांचीं कृत्यें त्यांवरोबर जातात. (प्रग०१४:१३.)

( *The Missionary Herald, Boston ; 1 : 1891.*)

Once Hindu—Now Christian. The early life of Baba Padmanji. An autobiography. Edited by J. Murray Mitchell, A. M., LL.D. London: James Nisbet & Co. 1890.

This is a translation from the Marathi. A prefatory note and occasional footnotes by Dr. Mitchell explain its origin as well as certain terms and incidents in the body of the book. The names of Missionaries of the American Board, as Drs: Allen and Fairbank, Messrs. R. A. Hume and Munger, are met with. A more instructive or more interesting narrative of a human Soul, once held firmly in the grip of Oriental Superstition, idolatry, and caste, gradually emerging into the light, liberty, and peace of regenerate child of God, does not often come to hand. Missionary Magazines frequently give us condensed narrative of individual conversions, with attendant and consequent trials. These are sometimes enlarged into a book form; as, "Brief Memoirs of Four Christian Hindus, (1816);" "Duij : the conversion of a Brahman" ( 1840 ); "Old Daniel: Memoir of a converted Hindu." No one of such recitals, however, with which we are acquainted equals this in value. A personal narrative like that of Mr. Padmanji gives us an altogether more graphic exhibition of the debasing power of Hinduism, and the strength of those satanic toils by which its votaries are held in captivity, than we get from usual descriptions. He is evidently a man of superior endowments and of scholarly attainments. The appendix enumerates fifty or more of his published works, besides Sundry Volumes of periodicals edited by him. The reader of this autobiography will naturally ask, "Does not the story belong to the same category with that of John Newton, Thomas Scott, and many another occidental believer brought out of darkness into God's marvelous light?" It certainly must impress thoughtful minds as a noteworthy phenomenon that our religious literature should begin to be enriched by such contributions from a language of India which till recently contained little besides legends of heathenism.

---

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ति छापून निघाल्यास जवळ जवळ वीस वर्षें झालीं. एक आवृत्तीचा खप होण्यास इतका दीर्घ काल लागल्याचीं अनेक कारणें होतीं, तीं आतां एथें सांगण्याचें प्रयोजन दिसत नाहीं; परंतु परमेश्वरानें दया करून ही दुसरी आवृत्ति तयार करण्यास मला वांचवून शक्ति दिली ह्मणून त्याचे उपकार मानिले पाहिजेत.

ह्या आवृत्तींत विशेष फेरफार करितां आला नाहीं, जे केले आहेत ते येणेंप्रमाणें आहेत:--१ भाषेच्या संबंधानें कांहीं शब्दांचे व वाक्यांचे फेरफार. (२) विषयाच्या किंवा मजकुराच्या संबंधानें कांहीं फेरफार. महत्वाचा विषय गाळला नाहीं, पण कांहीं फाजील विषय वर्ज्य केला आहे. (३) यांत आलेल्या कित्येक मित्रांचीं उपनांवें पूर्वीच्या आवृत्तींत नव्हतीं तीं घातलीं आहेत, कारण आतांच्या काळांत मूळनामापेक्षां उपनामाचें महत्व विशेष वाढलें आहे, तीस ( ) अशा खुणांत जागा दिली आहे. तसेंच कित्येक मित्र पदवीधर झाले आहेत त्यांच्या पदवीचा नामनिर्देश अशाच रीतीनें केला आहे. (४) ह्यांत ज्या कित्येक शास्त्रवचनांचे उतारे नव्या करारांतून घेतले आहेत त्यांची भाषा बैबल सो० टीनें छापलेल्या सुधारलेल्या मराठी भाषांतरावरून घेतली आहे, व त्यांचें स्थल व्यक्त केलें आहे. जुन्या करारांतील उतारे जुन्या भाषांतराप्रमाणें आहेत.

ह्या पुस्तकाच्या १ ल्या आवृत्तीवर वर्त्तमानकर्त्यांनीं जे अभिप्राय दिले व जीं खासगत पत्रें त्याच्या कर्त्यास आलीं त्यांचा उतारा एथें देतां आला नाहीं, कारण त्यांचा एका ठिकाणीं संग्रह केलेला माझ्यापाशीं नाहीं. हे अभिप्राय मराठी मूळावर व त्याच्या इंग्लिश भाषांतरावर पुष्कळ होते. त्यांपैकीं इंग्रेजी भाषांतरावर दिलेला अभिप्राय अमेरिकन मिशन बोर्डाच्या मिशनेरी हेरल्ड Missionary Herald नांवाच्या मासिक पुस्तकांतील अभिप्राय खालीं दिला आहे. ह्या मासिकाची एक प्रत कोणीं ममताळु मित्रानें मला पाठविली होती तिचा शोध करितां ती अचानक सांपडली. तिचा उतारा योग्य ...ीं दिला आहे.

... पुस्तकाचीं अनेक भाषांत भाषांतरें झालीं, त्यांविषयीं थोडें एथें ...हिजे. पहिलें इंग्लिश भाषांतर एका स्वदेशी खिस्ती विद्वानानें

केलें व त्याचें प्रकाशन रेव० डा० मरे मिचल यांनीं स्काटलंदांत असतां केलें व लंदनांतील प्रसिद्ध बुक पब्लिशर जेम्स नेसबीट (James Nesbit & Co.) यांनीं सन १८९० सालीं छापिलें, त्याचें नांव (Once a Hindu, Now a Christian) असें होतें, व त्याची किंमत मुंबईत दीड रुपया पडत होती, त्यानंतर ख्रिश्चयन लिटरेच्युअर सोसायटीनें ह्या बुककंपनीशीं करार करून तिच्या परवानगीनें तें आपल्या संस्थेच्या संबंधानें स्वस्त दरानें मद्रासेंत छापिलें. त्याच्या नामपृष्ठावर शिरोभागीं Babā Padmanji असें छापिलें आहे. ह्याच सोसैटीनें त्याचीं देशी भाषांत ह्मणजे तामील, बंगाली वगैरे भाषांतरें केलीं. पंजाबाकडे उडदू भाषेंतही एक भाषांतर झालें, चीन देशांत चिनी भाषेंत व जर्मनींत जर्मन भाषेंतही झालें. ह्याप्रमाणें ह्या पुस्तकाचा प्रसार झाला. ह्या सर्व गोष्टींबद्दल मी परम कृपाळु देवाचे उपकार मानितों, आणि त्यापाशीं हीच प्रार्थना करितों कीं जसा ह्याचा प्रसार झाला तसा याचा उपयोगही होवो, आणि त्याच्या गौरवार्थ व शुभवर्त्तमानाच्या प्रसारार्थ कांहीं अंशीं कारणीभूत होवो.

ही आवृत्ति माझ्या बाप्तिस्म्याच्या जुबिलीच्या (१९०४) संबंधानें छापण्याची मीं त्राक्टसोसायटीस विनंती केली होती ती मान्य करून तिनें हें प्रसिद्ध केलें आहे तिजबद्दल मी तिचा आभारी आहें.

# अनुक्रमणिका.

प्रस्तावना ... ... ... ... ... ... ... ... ... ... ... ५

**प्रकरण १.** ज्ञाति-कुळ, जन्म-गृहस्थिति-कुलदैवतें इ०. इ०स०१८३१-१८४२. १

**प्रकरण २.** मराठी शाळेंतील विद्याभ्यास, प्राकृत धर्मग्रंथांचा अभ्यास. ... १०

**प्रकरण ३.** इंग्लिश शिकण्यास आरंभ—बेळगांव मिशनस्कुल. १८४३. ... १७

**प्रकरण ४.** बेळगांवच्या मिशनस्कुलांत असतांना माझें धर्मसंबंधी आचरण.... २८

**प्रकरण ५.** माझी मुंबईची पहिली (१८३९) व दुसरी सफर (१८४७) ... ४६

**प्रकरण ६.** मुंबईच्या एल्फिन्स्तन स्कुलांतील माझा विद्याभ्यास (१८४७-४८) ५१

**प्रकरण ७.** माझा आदनाचा प्रवास. ... ... ... ... ... ... ५७

**प्रकरण ८.** मुंबईच्या फ्रिचर्च विद्यालयांत माझें जाणें (मार्च १८४९) ... ६३

**प्रकरण ९.** सिंहावलोकन. ... ... ... ... ... ... ... ७०

**प्रकरण १०.** फ्रिचर्च विद्यालयांत असतां माझ्या सुधारणुकेस कसा आरंभ झाला, व त्या वेळची माझी धर्मसंबंधी स्थिति (१८५०-५३) ... ७८

**प्रकरण ११.** माझा परमहंस मंडळींत प्रवेश. ... ... ... ... ९४

**प्रकरण १२.** परमहंस मंडळीचा बोभाटा झाल्यावरून मला कांहीं वेळपर्यंत मुंबई सोडून जावें लागलें. ... ... ... ... ... १००

**प्रकरण १३.** फ्रिचर्च विद्यालयांतील कालेज डिविजनांत असतां माझ्या धर्मसंबंधी सुधारणुकेची वृद्धि.... ... ... ... ... १०९

**प्रकरण १४.** माझ्या वडिलांचें मुंबईस येणें, व त्या वेळची माझी स्थिति. १८५४ चा आरंभ. ... ... ... ... ... ... ... १२४

**प्रकरण १५.** सिंहावलोकन. ... ... ... ... ... ... ... १३८

**प्रकरण १६.** माझें बेळगांवास जाणें, व तेथील वृत्त. ... ... ... १४७

**प्रकरण १७.** ईश्वरी कृपेचा महादिन (१३ आगस्त १८५४). ... ... १५९

**प्रकरण १८.** बाप्तिस्मा. (३ सप्तेंबर १८५४) ... ... ... ... १७२

**प्रकरण १९.** बाप्तिस्म्यानंतरच्या कित्येक गोष्टी. ... ... ... ... १७८

**प्रकरण २०.** मुंबईस परत येणें. ... ... ... ... ... ... १८१

**प्रकरण २१.** मी ख्रिस्ती झाल्यानंतरचें माझ्या वडिलांचें व इतरांचें वर्त्तन.... १८५

**पुरवण्या.** (अंक १–६) ... ... ... ... ... ... ... १९३

# अरुणोदय.

## प्रकरण १.

### ज्ञाति-कूळ-जन्म-गृहस्थिति-कुलदैवतें, इ०.

इ० स० १८३१—१८४२.

माझीं मातापितरें मुंबईच्या कांसार ज्ञातीचीं असून सुरतकरांच्या घराण्यांतील होतीं. आमचें कूळ सधन व प्रतिष्ठित होतें. माझ्या वडिलांच्या मायआजीच्या कुटुंबांतील पुरुषांकडे शेट्ये-पणाचा अधिकार होता, ( कांसार ज्ञातीच्या मुख्यास शेटे ह्मणतात ) आणि त्यांच्या बापआजाच्या घराण्यांतील पुरुष मोतीं व जवाहिराचा व्यापार करणारे होते. त्यांची मुंबईत मोठी पेढी असून ते सुरतेच्या व्यापाऱ्यांशीं व्यवहार ठेवीत. ते बहुत वर्षे सुरतेस जाऊन राहिले होते ह्मणून त्यांस सुरतकर असें नांव पडलें, परंतु आमचें उपनाम **मुळे** आहे. माझे चुलत चुलत आजे बापुशेट सुरतकर हे कांसार ज्ञातींत मोठे वजनदार व धनवान् गृहस्थ होते. जसे मुंबईच्या सोनार ज्ञातींत श्रीमंत आनरेबल जगन्नाथ शंकर शेट होते तसेच ते कांसार लोकांत श्रेष्ठ मानिले असत. मुंबईसरकारांतही त्यांस बहुमान होता, कारण ते त्या वेळच्या टांकसाळींत रुपें, तांबें वगैरे धातु पुरविण्याचें कंत्राट घेत असत.

हे आमचे पूर्वज व्यापारसंबंधानें बरेच दिवस सुरतेस जाऊन राहिल्या-मुळें त्यांच्या मराठी भाषेंत गुजराथी भाषा मिसळून पुष्कळ पालट झाला; इतकेंच नव्हे तर त्यांच्या पोषाकांतही फरक पडला. ते पारशी किंवा गुज-

राथी लोकांप्रमाणें जामे घालीत, व जुन्या परभु लोकांप्रमाणें बंदरी पगड्या वापरीत. आमच्या कुळांत भाईशेट पेशवे या नांवाचे एक फार वृद्ध पुरुष होते, त्यांस मीं पंधरा सोळा वर्षांचा असतां पाहिलें होतें, त्या वेळीं त्यांचें वय ८०—९० वर्षांचें असेलसें वाटतें. ते पेशवे सरकारांत दुभाष्याचें काम करीत. त्यांस इंग्लिश येत होतें. पेशवाई बुडाल्यावर इंग्लिश सरकार त्यांस पेनशन देऊं लागलें, परंतु ते घेईनात. त्यांच्या चित्तास कांहींसा भ्रम झाला असल्यामुळें ते सरकारापाशीं पेशव्यांच्या राज्याचा हिशेब मागत. त्याकरितां कुंपणी सरकारास पत्रें पाठविण्यासाठीं त्यांनीं आपल्या दारापुढें ओटीवर मेज मांडून नेहमीं लांबलचक इंग्रजींत मजकूर फरकटीत बसावें. आमच्या दयाळु इंग्लिश सरकारानें ही त्यांची स्थिति जाणून त्यांच्या भार्येस कांहीं वेतन देण्याचें कबूल केलें, परंतु तेंही त्यांनीं तिला घेऊं दिलें नाहीं. ते ह्मणत कीं, तूं पेनशन घेतलेंस तर मी विहिरींत जीव देईन. ते आपला चरितार्थ आपल्या ओळखीच्या मोठमोठ्या साहेबलोकांपासून व पारशी गृहस्थांपासून पैसे मागून चालवीत; कधीं कधीं त्यांनीं त्यांची गाडी रस्त्यांतच आडवावी.

**माझे सन्मान्य वडील.**

माझ्या तीर्थरूपांचें नांव **पदमनजी माणिकजी** असें होतें. त्यांचा जन्म सन १८०५ (शके १७२७) सालीं झाला. त्यांची जन्मपत्रिका अद्याप माझ्यापाशीं आहे. त्यांचा अभ्यास प्रसिद्ध व विद्वान् कर्नल टि. बी. जर्वीस साहेब यांच्या इंजिनियरिंग स्कुलांत झाला, आणि त्यांस प्रथम दक्षिण कोंकणांत सब असिस्टंट सरवेयर व बिल्डरची जागा मिळाली. नंतर तेथून लवकरच त्यांची बदली बेळगांवास झाली (७ मार्च १८३१). बेळगांव हें शहर पुण्याच्या दक्षिणेस सुमारें दोनशें मैलांवर आहे. तें दक्षिण महाराष्ट्र देशांतील जिल्ह्याचें मुख्य स्थान असून तेथें कलेक्टर, जज्ज, पोलिटिकल एजंट, इ० सिविल कामदार राहतात. तेथें गोऱ्या व काळ्या लष्करांची मोठी छावणी आहे.

**माझा जन्म.**

माझा जन्म बेळगांवांत सन १८३१ साच्या मे महिन्यांत झाला. ज्या घरांत मी जन्मलों तें ब्राह्मणाचें असून तेथील प्रसिद्ध मारुतीच्या आळींत होतें. त्याच्या मागून एकदोन घरें बदलल्यावर आह्मी त्याच आळींत दुसऱ्या एका घरांत राहायास गेलों. तेव्हां माझें वय

सुमारें ४ वर्षांचें असावें. ह्या घरांत गेल्याची मला बरीच आठवण आहे. हेंही घर ब्राह्मणाचें होतें. तें फार मोठें होतें तरी त्याचें भाडें दरमाहा केवळ दोन रुपये होतें; व तें सालअखेरीस देण्याची चाल होती. माझ्या वडिलांनीं त्याला बंगल्यासारिख्या खिडक्या वगैरे पाडून ओटीवर खुरच्या, बांका मांडून बसण्यासाठीं चांगली सोई व शोभा केली होती. सोप्याच्या दोन्ही बाजूंस बाग लाविला होता. असें शोभायमान घर त्या सगळ्या आळींत नव्हतें इतकेंच नाहीं, तर साहेब लोकांचे बंगले व एकदोन पारशांचीं घरें खेरीजकरून तसें घर त्या सर्व गांवांत क्वचित् दृष्टीस पडे. आमच्या दारापुढें मुंबईच्या रीतीप्रमाणें रात्रीं मोठा कंदील टांगण्याची चाल होती, तो पाहून गांवांतील लोकांस व विशेषेंकरून आसपासच्या खेड्यापाड्यांतून येणाऱ्या लोकांस फार मौज वाटे; कित्येकांस तर हें देऊळच आहे असा भास होई. दारापुढें जो बाग होता त्यांतील झाडांवर फुलें ह्मणून क्वचित् राहत, कारण शेजारपाजारचे राहणारे आह्मांस विचारल्यावांचून तीं आपल्या देवपूजेकरितां रात्रीं, पांहटेस, दोनप्रहरीं काढून नेत. हिंदुमताप्रमाणें अशा कृत्यास चोरी समजत नाहींत!

**ब्राह्मणांची वस्ती व सोवळें.**

आमच्या गल्लींत ब्राह्मणांची वस्ती फार होती; त्यांत उपाध्ये, जोशी, पुराणीक, हरदास, भटभिक्षुक, सराफ, वैद्य, पुजारी हे होते. कोर्टाचे मुनसफ व संस्थानिकांचे वकील, कलेक्टर साहेबांचे दिवाण ( दप्तरदार ), मामलेदार, खजीनदार, मुनशी, चिटणीस, कारकून, इंजनेर खात्याचे सरवेयर असे मोठमोठे सरकारी कामदारही राहत असत. आमच्या शेजारीं एका बाजूस जोशाचें घर व दुसऱ्या बाजूस एक घर सोडून वेदशाळा होती, तसेंच जोशांचे घरीं तिथिपर्वणीचा निश्चय करण्यास वारंवार भटांची मंडळी जमत असे. ह्या वस्तींत ब्राह्मणांच्या मोठमोठ्या समाराधना व्हायाच्या. धनवान् गृहस्थ वारंवार ब्राह्मणभोजनें घालीत. ब्राह्मण जेवले ह्मणजे लोकांच्या दारापुढें रस्त्यांत आंचवायास येत तेव्हां त्यांची एथून तेथून मोठी रांग लागत असे, व त्यांच्या पुढें जवळच म्हार, मांग, डोंबारी, भिकारी हे ब्राह्मणांच्या पात्रांवरील उष्टें मिळण्यासाठीं मोठी याचना करीत व लाळ घोटीत बसलेले दृष्टीस पडत. ब्राह्मणांस यथास्थित तूपपोळ्या कां मिळतात व भिकाऱ्यांच्या पदरीं त्यांच्या उष्ट्या पत्रावळी कां पडतात हें माझ्या लक्षांत त्या वेळीं

आलें नाहीं; आलें असेल तर देवानेंच त्यांस ह्या नीच स्थितींत घातलें आहे असें मात्र वाटलें असेल.

आमच्या घराच्या समोर सोनारांचीं दोन घरें होतीं, त्यांतून एकाच्या विहिरीचें पाणी पिण्याकरितां आह्मांस रोज आणावें लागत असे, कारण आमच्या विहिरीचें पाणी मचूळ होतें. ह्या दोन घरांत माझें व आमच्या घराच्या माणसांचें बहुत जाणें येणें होतें. ब्राह्मणांच्या विहिरीचें पाणी आह्मांस मिळत नसे, मिळालेंच तर तें शेंदण्यास आमच्या शूद्र जातीच्या गड्यास घरचा दोर घेऊन जावा लागत असे. त्याच्या ओल्या दोरास आह्मांला किंवा आमच्या चाकराला शिवूं देत नसत. शिवला तर त्यावर पाणी ओतल्याशिवाय तो वापरीत नसत असें त्यांचें सोवळें होतें. ब्राह्मणांच्या घरीं माझें फारसें जाणें येणें नव्हतें; गेलोंच तर ओटीवर जावें, व घरांत गेलों तर एकदम धांवत परसांत जावें, इकडे तिकडे खोलींत जाण्याची मोकळीक नव्हती. आमच्यांशीं शिवाशीव होऊं नये ह्मणून ब्राह्मणांच्या बायका फार जपत. त्या आमच्या घरीं क्वचित् येत, व आल्याच तर त्यांस वेगळा पाट बसावयास द्यावा लागत असे, आमच्या बिछाइतावर त्या कधीं बसत नसत. त्यांचें सोवळें फारच असे. आमच्या एथलें हळदकुंकू देखील त्या घेत नसत; घेतलेंच तर त्यांस तें कोरडें द्यावें, ह्मणजे सुकी पिंजर व हळदीची बुकणी त्यांच्या हातावर दुरून टाकावी, अथवा करंड्यांत घालून त्यांच्यापुढें ठेवावी. इतर जातींच्या बायका आमच्या घरीं आल्या ह्मणजे असें सोवळें करीत नसत. ब्राह्मणाच्या घरचें आह्मांस वाढून आलें असतां तें सर्व आह्मांला आमच्या भांड्यांत दुरून काढून घालीत. त्यांच्या घरीं एकाद्या वेळीं आह्मांस जेवायास बोलाविलें ( कित्येक भिक्षुक ब्राह्मण दक्षिणेच्या आशेनें असें करीत ) असतां आमच्या उष्ट्या पत्रावळी आमच्या चाकरानें काढून टाकाव्या व शेणसडा टाकून जागा शुद्ध करावी !

आह्मी मांसमासळी खाणारे असल्यामुळें आमचे ब्राह्मण शेजारी आमचा फार कंटाळा करीत. आह्मांस बाजारांतून ते जिन्नस आणण्याची व शिजविण्याची मोठी चोरी व फार अडचण होती. "बाजार" आणायाचा असला ह्मणजे मागल्या दारानें आणावा, अथवा पुढल्या दारानें आणिला तर फडक्यांत चांगला गुंडाळून अथवा टोपलींत झांकून आणावा लागत

असे. आमच्या घरीं एक किरस्तांवीण बाई खारी मासळी विकायास येत असे, ती फार लांबचा फेरा घेऊन मागल्या दारानें फार लपून येई. आमच्या घरांत (मटन) सागुती वगैरे शिजत असलें ह्मणजे त्याचा वास शेजाऱ्याच्या घरांत जाऊं नये ह्मणून चुलींत पीठ जाळावें लागत असे. कोंबड्या पाळल्या तर त्यांस घरांतच ठेवावें व रात्रीं माजघरांत सोडून त्यांस दाणा घालावा. त्यांत कोंबडा असून तो आरवला ह्मणजे शेजाऱ्यांस कळायाचें, ह्मणून त्याला दिवसाचें मोकळें सोडावें, व तो देवीस सोडण्याकरितां आणिला आहे असें आमच्या भट शेजाऱ्यांस अगोदरच सांगून ठेवावें; ह्मणजे ते आह्मांस त्याविषयीं कांहीं बोलत नसत. आमच्या खाण्याच्या मांसाहाराची एक निराळीच परिभाषा होती:—सागुतीस 'मटन' किंवा तांबडी भाजी, माशांस 'फिश' किंवा 'पाणशेंगा', बोंबलांस 'साबळे', सोड्यांस 'रुद्रगांठे', कंवटांस 'सांकोळीं', असें ह्मणायास आह्मां मुलांस शिकविलें होतें. ब्राह्मणांच्या मुलांनीं जर आह्मांस आज काय जेवलां, अथवा तुमच्या एथें काय पदार्थ केले होते असें विचारिलें तर वरणभात, भाजी, पोळी केली होती असें आह्मीं सांगावें. वैष्णव ब्राह्मणांस आह्मी कांदे खातों हें देखील सांगत नव्हतों! साधारण एकादशीस आह्मी मुलें उपास करीत नव्हतों तरी बाहेरून उपास केल्यासारिखें दाखविण्यास व सांगायास आह्मांस शिकविलें होतें. एकादशी वगैरे उपवासाचे दिवशीं व सोमवारीं आमच्या घरांत मांसान्न भक्षण करीत नसत. तसेंच श्रावणमासांत कोणी कोणी मासळी व कोणी सागुती खात नसत.

**कुटुंब.** ज्या वेळेची मला आठवण आहे त्या वेळीं आमच्या घरांत माझे आईबाप, आजा, आजी, पणजी ( बापाकडून ), चुलता, आत व मी इतकीं मनुष्यें होतीं. माझ्या आईला पुष्कळ मुलें ( सुमारें १२ ) झालीं, त्यांपैकीं आतां (१८८७) माझ्यासुद्धां* केवळ ५ जीवंत आहेत.

---

* हे आत्मचरित्रलेखक ता० २९ आगस्त १९०६ रोजीं प्रभूमध्यें निजले. मरणाचे पूर्वीं तीन आठवडे अगोदर ह्या चरित्रनायकांनीं हा सबंध ग्रंथ परिश्रमानें पुनरावृत्तीकरितां बारकाईनें नवीन शोधवगैरे घालून त्याला एक प्रस्तावना जोडून पुरा करून ठेविला होता. ह्मणून परमेश्वराची स्तुति असो.

संसाराचा सर्व बोजा बहुत वर्षेपर्यंत माझ्या वडिलांच्या डोईवर होता. माझे आजोबा कांहीं काम करीत नसत. मी लहान असतां

**संसाराचा बोजा, दानधर्म वगैरे.**

माझे चुलते **नारायणराव माणिकजी** बेळगांवांतील लंदन मिशनच्या इंग्लिश शाळेंत जात असत, त्यांचा अभ्यास पुरा झाल्यावर त्यांस तेथील मिलिटरी पेहपिसांत रायटरची जागा मिळाली ती शेवटपर्यंत त्याच खात्यांत होती. मी ख्रिस्ती होण्याचे पूर्वी कदाचित् एक दोन वर्षांपासून ते विभक्त-राहूं लागले. जसजसा माझ्या वडिलांचा पगार चढत गेला व कुटुंब वाढत गेलें, तसतसा संसाराचा खर्च व डामडौलही वाढला. त्या काळांत अतिशय स्वस्ताई होती, तांदूळ रुपायाला सात पायल्या (मुंबईच्या १४ पायल्या) मिळत; गरीब मनुष्याचे पोटास दरमहा एक रुपया बस होई. आमच्या घरीं गुरेंढोरें, घोडे, गाड्या ( बग्या, दमण्या वगैरे ) होतीं. ब्राह्मणांस दानधर्मही पुष्कळ होई. एकदां माझ्या आजोबानें सदावर्त्त घातलें होतें; जो कोणी अतीत, बैरागी गांवांत येई त्याला आमच्याकडून शिधा मिळे. त्याशिवाय गांवांतील भिकार आमच्या दारापुढें भीक मागण्यास दररोज पुष्कळ येत असे. आजोबानें सकाळीं तोंड धुतल्यावर त्यांस भीक घालण्याचें पत्करलें होतें. ब्राह्मणांस ( स्त्री व पुरुष ) तांदूळ, गोसाव्यांस पीठ व इतरांस जोंधळे किंवा बाजरी असे मूठ मूठ घालण्याचा नित्य क्रम होता. साधुसंत, हरदास वगैरे प्रतिष्ठित भिक्षेकरी आले ह्मणजे त्यांस थाळी भरून तांदूळ घालीत, त्याशिवाय त्यांच्या संभावनेची गांवकऱ्यांकडून पट्टी आली ह्मणजे तिजवर आंकडा घालायाचा तो वेगळाच. तसेंच गारुडी, गोंधळी, डोंबारी, भोरपी, बहुरूपी, मेंढेजोशी, सरोदे, कोल्हाटी यांच्या फेऱ्या आमच्या घरापुढें व्हायाच्या.

आमचीं कुलदैवतें खंडोबा व कालिका हीं होतीं. यांची सणावारीं पूजा वगैरे मोठ्या थाटानें होई. त्याशिवाय लक्ष्मीनारायण,

**कुलदैवतें इ०.**

गणपति, इ० देवांच्या मूर्त्ति आमच्या देव्हाऱ्यांत होत्या. एका चंबूंत कोणी एका तीर्थाचें पाणी फार वर्षांपासून होतें व एक नारळ कोणत्या एका देवस्थानाहून आणिलेला होता; ह्यांची नित्य पूजा करीत. एक चौकोनी तांब्याचा पत्रा होता त्यावर कांहीं यंत्र काढलें होतें. तसेंच एका लहानशा पिंडींत शिवलिंग होतें. बहुतेक मूर्त्ति पितळेच्या होत्या; कांहीं तांब्याच्या व पाषाणाच्या होत्या. अकबरी मोहर, होन वगैरे

सोन्याच्या जिनसांचीही पूजा करीत, परंतु हे मोलवान् देव नेहमीं कुलपांत बंद असायाचे. विशेष प्रसंगीं मात्र कांहीं वेळ पूजेकरितां ते देव्हाऱ्यांत येत!

कर्मठपणा.

घरांतील सर्व मनुष्यें बहुत कर्मठ व अत्याचारी होतीं. हिंदुधर्मांतील व्रतें व उपोषणें आह्मी पुष्कळ करीत होतों. चातुर्मासांत तर पुष्कळ कर्मठपणा चालत असे. माझ्या प्रिय आईनें पुष्कळ उपास व व्रतें करावीं व ब्राह्मणांस पुष्कळ दानें द्यावीं. ह्याशिवाय ती कांहीं दैवतांची पूजा गुप्त रीतीनें करीत असे. हीं दैवतें तिच्या माहेरचीं होतीं. आमच्या घरीं कालिकादेवी होती. तिची पूजा शाक्तांच्या पद्धतीप्रमाणें होत असे. माझे आजोबा शक्तीचे निःसीम भक्त होते. नित्य रात्रीं देवीला मद्य अर्पण केल्याशिवाय ते भोजन घेत नसत. पर्वणीच्या दिवशीं शाक्त ब्राह्मण आमच्या घरीं पूजेस येत, त्या वेळीं दुसऱ्याही जातीचे शाक्तांस बोलावणें होत असे. देवीची पूजा व भोजन फार रात्रपर्यंत चालत असे, त्यांत मद्यप्राशन, मांस व मिष्टान्नभक्षण यांच्यापलीकडे दुसरें कांहीं होत नसे. आम्ही कधीं कधीं सोनार लोकांच्या घरीं 'गुरुमार्ग करायास' जावें; ब्राह्मणांच्या एथें क्वचित् जावें. बेळगांवांत बाळंभट बोकड या नांवाचा एक ब्राह्मण होता त्याच्या घरीं बहुत वेळ गेल्याची मला आठवण आहे. त्याच्यापाशीं एक कुळंबीण होती, तिला पूजेच्या वेळीं शक्ति मानून तिची सर्व जण पूजा करीत ! ह्या भटजीबावास खेड्यापाड्यांतून दारूच्या बाटल्या स्वस्त दरानें कुणबी लोक चोरून आणून देत, त्या तो भिंतींत केलेल्या बिळांत ठेवीत असे. माझ्या आजोबानें गांवांत मोठमोठे शास्त्री, पंडित, ब्रह्मचारी, संन्यासी यांचा शोध करून ते शाक्त आहेत असें समजल्यावर त्यांस केव्हां तरी घरीं पूजेस बोलावून आणावें. तसेंच त्या गांवांत कोणी शंकराचारी आले, ह्मणजे त्यांचाही तपास करून ते जर शाक्त मताचे असले तर त्यांस शक्तीचा नैवेद्य (ब्रांडी, अंडीं, खिमा, पुऱ्या इ०) रात्रीं गुप्त रीतीनें पोंचता करावा.

आमचें सोवळें.

आह्मी जरी ब्राह्मण जातीचे नव्हतों, तरी आमच्याही घरांत सोवळें फार चालत असे. स्नान केल्याशिवाय कोणी जेवीत नसत. हें तर सांगणें नकोच. संध्या, देवपूजा व भोजन करितेवेळीं मुगटा, पितांबर, धाबळी इ० सोवळ्याचीं वस्त्रें आह्मीं वापरावीं. आमच्या देवखोलींत व स्वयंपाकघरांत शूद्र चाकर

येत नसे; शूद्राचे हातचें पाणी आह्मांस चालत असे, तरी त्यानें अंघूळ केल्याशिवाय तें त्यापासून घेत नव्हतों. देवपूजेला आह्मीं स्वतां पाणी आणावें. परिटाकडून वस्त्रें आलीं ह्मणजे त्यांजवर पाण्याचे शिंतोडे टाकल्याशिवाय तीं आह्मी घेत नव्हतों. चर्मी जोडा नवा घेतला तर त्यावर गवताची काडी टाकल्यावर त्याला शिवावें. स्नानानंतर हजामास स्पर्श करीत नव्हतों. बाजारांत महाराचा स्पर्श झाला तर घरीं येऊन सचैल ( वस्त्रांसुद्धां ) स्नान करावें. असें मीं कित्येक वेळ केल्याचें मला आठवतें. महाराची सावली अंगावर न पडावी ह्मणून वाटेंतून चालतांना मीं फार जपावें. माझे वडील गुडगुडी ओढीत, तेव्हां जवळ शूद्र जातीचा मित्र तमाखू ओढणारा असला तर त्यास ते चिलीम देत.

**आईच्या भक्तीचें अनुकरण.**

माझ्या मातोश्रीच्या धर्माचरणावरून मला हिंदु धर्मांतील देवपूजा, व्रतें व उपवास यांची पुष्कळ माहिती झाली व तीं आचरण्याचा परिपाठ पडला. ती जें कांहीं करी तें मीं सर्व जवळ बसून पाहावें व त्याप्रमाणें करावें. तिची गुप्त पूजापद्धति व प्रसिद्ध पूजापद्धति हीं सर्व मी शिकलों. तुळशीची पूजा, गाईची पूजा, पिंपळाची पूजा, भटांची पूजा, सुवासिनींची पूजा, हीं सर्व मला आईपासून समजलीं. तिच्याबरोबर मीं देवळांत जावें, मूर्तीच्या पायां पडावें, पिंपळास व तुळसीस प्रदक्षिणा घालाव्या. तिचे उपासाचे दिवसही पुष्कळ असत त्या मानानें उपाध्यास पुष्कळ दानें मिळत. माझे वडील फारसे कर्मठ नव्हते, त्यांची पूजाअर्चा तांत्रिक होती. त्यांजपाशीं गीतेची (प्राकृत) पोथी होती. तिचा एखादा अध्याय त्यांनीं वाचावा व ती पोथी कोठें बाहेर गांवीं जातांना बरोबर न्यावी. तिची ते पूजाही करीत, व निजतेवेळीं उशास ठेवीत.

**कळवंतणीचा नाच, हरिकीर्त्तन, इ०.**

आमच्या घरीं दसरा, दिवाळी, इत्यादि सणांत कळवंतणींचा नाच व हरिकीर्त्तनें हीं दोन्हीं होत असत. एलमाच्या ( रेणुका ) जोगतिणी व खंडोबाच्या मुरळ्या यांचेंही गाणें व्हावें. तैलंग ब्राह्मण येऊन मोठ्यानें आशीर्वाद देऊन दक्षिणा मागत.*

* ह्या ब्राह्मणांची चाल अशी होती कीं, यजमानाच्या घरीं जाऊन त्यांस प्रथम कांहीं विचारपूस केल्याशिवाय एकदम मोठ्यानें मंत्रघोष करावा व यजमानाच्या मस्तकावर अक्षता टाकाव्या. हें त्यांचें उद्धटपणाचें वर्त्तन माझ्या वडिलांस अगदीं

गांवांत पुराणीक वगैरे यांची बिदागी किंवा संभावना करायाची असली ह्मणजे वर्गणीची याद किंवा ताट आमच्याकडे येत असे. वर्गणीपटावर आंकडा मांडण्याची कित्येकांची अशी युक्ति होती कीं, १० रुपये मांडून १ रुपया द्यावा, ह्मणजे दुसऱ्यानें १० चा आंकडा पाहून ५ तरी घालावे; किंवा आपल्या घरचें मोलवान पागोटें ज्याची संभावना करणें असेल त्याच्या डोईत घालावें, व एखाद्या रेशमी किनारी धोतराचें नवें कोरें पान त्याच्या अंगावर टाकावें, ह्मणजे त्यानें लोकांत सांगत फिरावें कीं, हें मला अमक्यानें दिलें. नंतर तें ज्याचें त्यास परत करावें! हें वर्गणीची याद फिरविणारे किंवा वर्गणी घेणारे यांच्या सूचनेवरून बहुधा होत असे.

आवडत नसे; तरी त्यांनीं त्यांस यथाशक्ति दक्षिणा देऊन त्यांची संभावना करावी. ते थोडक्यांत कधीं तृप्त होत नसत, अगोदर यजमानाची स्तुति करीत, परंतु शेवटीं ( त्यांस पुष्कळ न दिल्यास ) त्यांची निंदा करीत. ह्या ब्राह्मणांचा धिःकार करण्यास ह्या त्यांच्या वर्त्तनावरून मी लहानपणापासून घरांतच शिकलों. इतर ब्राह्मणांस दक्षिणा देतेवेळीं यांस दुप्पट द्यावी लागत असे. हा आह्मांस पेशव्यांनीं दिलेला हक्क आहे असें ते ह्मणत.

# प्रकरण २.

## मराठी शाळेंतील विद्याभ्यास–प्राकृत धर्मग्रंथांचा अभ्यास.

**सरकारी मराठी शाळा.**

माझा मराठी अभ्यास बेळगांवांतील सरकारी मराठी शाळेंत झाला. ही शाळा सन १८३० सांत स्थापली होती. शाळेची जागा गांवांतील आदितवारपेठेंत होती; तींत खोल्या नव्हत्या, केवळ लांबचे लांब घोडसाळ किंवा उतारशाळेप्रमाणें ती होती. तिला एकच दरवाजा असून पायऱ्या मात्र पुष्कळ व उंच होत्या. शाळेंत घड्याळ नव्हतें, सावलीच्या खुणांवरून सुटी देत असत. मुलांकरितां सरकारी पाट्या होत्या, कोणी मुलें आपल्या घरच्या पाट्या आणून तेथेंच ठेवीत. स्लेटीच्या ऐवजीं बहुतेक मुलें टिनाचें तगट वापरीत, त्यावर शाईनें हिशेब मांडीत, व ते ओल्या फडक्याच्या बोळ्यानें पुसून टाकीत. स्लेटपेन्सलीच्या ऐवजीं 'वळू' ( कानडी ) नांवाच्या मातीच्या तुकड्यानें लिहीत. सणांच्या सुट्या फार असत. गांवांत रात्रीं कीर्त्तन किंवा नाटक झालें असतां जर मुलें दुसरे दिवशीं जागरणामुळें शाळेंत आलीं नाहींत, तर त्यांस शिक्षा होत नसे. शिक्षेचे प्रकार जुन्या गांवठी शाळेप्रमाणें होते, ह्मणजे घोडीवर चढविणें, पाठीवर पाट्या ठेवणें, कान धरून उठाबशी करायास लावणें, जमिनीवर हाताचें एक बोट टेंकायास व एक पाय मागें उचलावयास लावून ओणवें करणें, इत्यादि. वेतानेंही मुलांस खूब बडवीत. अभ्यास ह्मटला तर साधारणच, ह्मणजे धूळाक्षर, कित्ते वळविणें, खरडे लिहिणें, मोडी कागद वाचणें, असा होता. संध्याकाळीं मुलें परवचा ह्मणत. वरच्या वर्गांत कांहीं भूगोल, व्याकरण, गणित शिकवीत. वाचनाकरितां बालगोष्टी, मनोबोधकथा, इसापनीति, लघुहितोपदेश, सिंहासनबत्तिशी, वेताळपंचविशी, पंचोपाख्यान, मराठ्यांची बखर, इंग्लंदचा इतिहास, बाळमित्र, बैठकचावडी, जागतीजोत इत्यादि पुस्तकें होतीं.* व्याकरण शिकविण्यासाठीं बालव्याकरण (बाळगंगाधर

* ह्या सर्व पुस्तकांपैकीं लघुहितोपदेश पुस्तकांतील बोध माझे मनांत चांगला ठसला. त्याचा जसा मीं उपयोग करावा तसा बहुत वर्षे केला नाहीं, तरी त्यांतील कित्येक

शा० जांभेकर यांचें) व दादोबांचें व्याकरण (१ली आवृत्ति) हीं होतीं. आमच्या अखवानजीला ( पंतोजीला ) व्याकरण किंवा गणित फार चांगलें येत होतें असें नाहीं; तसेंच त्यांचें मोडी अक्षरही चांगलें नव्हतें, ते ब्राह्मण जातीचे असून त्यांस सही करण्यापुरतें इंग्रजी येत होतें. ते फार लालची होते. मुलांस शाळेंत घालतांना सरस्वतीपूजनाच्या निमित्तानें त्यांस शक्तीप्रमाणें पागोटें वगैरे देण्याची तेव्हां चाल होती; निदान कांहीं दक्षिणा तरी द्यावी लागत असे; शिवाय शाळेंतील मुलांस मिठाई वगैरे वांटीत. आमच्या गुरुपत्नीनें कधींमधीं सधन आईबापांच्या मुलांस घरीं जेवायास बोलवावें. अब्राह्मण मुलांस दूर ओट्यावर बसावें लागत असे; इतकेंच नाहीं तर त्यांस त्यांच्या उष्ट्या पत्रावळी बाहेर उचलून टाकून जेवणाची जागा शेणानें सारवून काढावी लागत असे. माझ्या वांटचें हें काम आमच्या घरच्या गड्यानें करावें, ही जेवणावळ स्वार्थाची असे. मुलांस आमच्या गुरुपत्नीस भोजनाच्या दामदुप्पट दक्षिणा चोळखण वगैरे द्यावें लागत असे. आमच्या गुरुजीस बुदबळें खेळण्याचा फार नाद होता; ते कधीं कधीं मुलांकडे शाळा सोंपून जवळच्या दुकानांत पुष्कळ तास तो खेळ खेळत बसत. एकदां तेथील कलेक्टर साहेब शाळा पाहण्यास आले असतां हे शाळेंत हजर नसून अशा खेळांत गुंतले होते; त्यावरून त्यांस दंड झाला. त्यांस जुगाराचें व गांजा ओढण्याचें व्यसन लागलें होतें, परंतु एका ब्राह्मण सावकारानें त्यांजपासून गीतेवर शपथ घेव-

---

वाक्यें माझ्या स्मरणांतून कधीं गेलीं नाहींत. तीं अशीं होतीं: "तूं पहांटेस आणि रात्रीस परमेश्वराच्या उपकारांचें स्मरण करीत जा." "तूं परमेश्वराचें भय धरीत जा आणि राजाचा सत्कार करीत जा." "परमेश्वर दयाळू आणि सर्व पदार्थांचा दाता आहे. तोच सर्व जगाचा न्यायही करणारा आहे, यास्तव जे लोक वाईट कर्मे करितात त्यांस तो शिक्षा करील."

हें पुस्तक कोणी रचिलें होतें हें मला माहीत नाहीं, परंतु त्याचें नांव किंचित् बदलून—"हितोपदेश" असें ठेवून कोणी सुज्ञ गृहस्थानें हल्लीं त्याची चौथी आवृत्ति छापिली आहे. असें पुस्तक सरकारी शाळेंत आतां शिकवीत नाहींत ही फार दुःखाची गोष्ट आहे. मला हें पुस्तक मुखपाठ मात्र करावयास दिलें होतें. त्याचा अर्थ आमच्या पंतोजीनें आम्हास कधीं सांगितला नाहीं, अथवा त्यांतील बोधाप्रमाणें चालण्याविषयीं उपदेशही केला नाहीं. तरी हीं सुवर्णवचनें व्यर्थ गेलीं नाहींत.

वून तें सोडविलें. तरी ते तंबाखू ओढीत. थंडीवाऱ्याच्या निमित्तानें आमच्या घरीं चहा घेत.*

ह्या पंतोजींचा व माझ्या वडिलांचा फार स्नेह होता, त्यामुळें त्यांनीं माझे फार लाड करावे, व मला शिक्षा वगैरे न करितां व यथापद्धत शिक्षण न देतां लवकरच पहिल्या ह्मणजे अगदीं वरच्या वर्गांत घातलें; तेणेंकरून माझा फार तोटा झाला; मला धुळाक्षर, गणित वगैरे चांगलें आलें नाहीं; मी भांजणी किंवा त्रैराशिक शिकत असतां मला बीजगणित येतें असें त्यांनीं लोकांस सांगावें! ह्याच लाडामुळें माझें मोडी अक्षरही वळलें नाहीं, केवळ मोडीकागद मात्र वाचायास शिकलों. परंतु मराठी बुकें वाचण्यांत माझा नंबर पहिला असे. त्याशिवाय त्या काळांत शाळापुस्तकें थोडकीं असल्यामुळें जीं होतीं तीं बहुतेक मला तोंडपाठ झालीं होतीं.

**शाळेचे सुप्रिन्टेन्डेन्ट छत्रे व जांभेकर.**

मी शाळेंत असतांना एकदां रा० रा० सदाशिव काशिनाथ छत्रे (बालमित्राचे भाषांतरकर्ते) हे मराठी शाळांची देखरेख करायास मुंबईहून आल्याचें मला आठवतें. परंतु त्यावेळीं मी फार लहान होतों. त्यांच्या मागून प्रोफेसर बाळगंगाधर शास्त्री जांभेकर हे मी शाळेंत असतांना दोनदां देखरेखीस आले. त्यांचा लोकांनीं बहुमान केला. त्यांच्या सुधारलेल्या मतांवरून त्यांचा कल ख्रिस्ती धर्माकडे आहे, व ते पावबिस्कुटें खातात व ग्लासानें पाणी पितात अशी लोकांत कंडी उठली होती. त्यांच्याशीं वाद करायास कित्येक वैष्णवांच्या आचार्यांनीं कंबरा बांधल्या होत्या, परंतु त्यांनीं तो प्रसंग टाळला. हे शास्त्रीबावा तेथील मिशनेरींच्या भेटीस वारंवार जाऊन फार वेळ त्यांच्याशीं संभाषण करीत बसत; तसेंच मार्गांतून पालखींत बसून जातांना साहेब लोकांप्रमाणें बुक वाचीत; त्यावरून ते बैबल वाचतात असा लोकांनीं तर्क केला होता.

* ह्या गुरुजीनें माझ्या वडिलांस लिहिलेलें एक बाळबद पत्र माझ्या चुलत्यांच्या कागदपत्रांत सांपडलें. त्यावर तारीख ३ ज्यानेवारी १८४१ आहे. त्याच तारखेचें मी आपल्या मातोश्रीस लिहिलेलें एक पत्र वरील कागदांत सांपडलें. त्यावेळीं माझें वय १० वर्षांचें होतें, व माझीं आईबापें धारवाडास गेलेलीं होतीं. ह्या वयांत मी कोणती धर्मसंबंधी पोथी वाचीत असें हें समजतें; कारण "गडी आल्यास त्याजबरोबर श्री व्यंकटस्तोत्राची पोथी पाठवावी" असें त्या पत्रांत लिहिलें आहे.

ह्यांनीं एकदां आमच्या शाळेची परीक्षा घेऊन मुलांस जीं बक्षिसें वांटलीं, त्यांत मला दादोक्त मराठी नकाशांचें पुस्तक व क्यांडीकृत भूगोलखगोलाचें पुस्तक अशीं दोन बक्षिसें मिळालीं होतीं. त्यांवर माझें नांव मोडींत लिहिलें असून खालीं शास्त्रीबावांची इंग्रजी सही होती, ती मला त्यावेळीं अगदीं समजत नव्हती, परंतु तिचें वळण वारंवार पाहिल्यानें तें माझ्या मनांत अगदीं बिंबून गेलें होतें. हीं पुस्तकें मला ती सही वाचतां येई तोंपर्यंत माझ्यापाशीं होतीं.*

**माझें पहिलें बक्षीस.**

ह्या बक्षिसांचा मला फार अभिमान वाटत असून त्यांचा मीं अभ्यासही चांगला केला होता. भूगोलखगोलाचें पुस्तक "नित्यानंद व परमानंद" यांच्या संवादरूपानें होतें, त्यांत ईश्वराविषयीं जें लिहिलें होतें तें वाचून मला फार आनंद होई. परंतु 'हिंदु लोक अनेक देव व देवी यांच्या मूर्त्ति करून त्यांस भजतात,' असें एक वाक्य त्यांत एका ठिकाणीं होतें तें वाचून मला कसेंचसें वाटत असे. हीं पुस्तकें मीं आपल्या घरीं येणाऱ्या जाणाऱ्या लोकांस वारंवार दाखवून नकाशांतील देश, गांव, नद्या वगैरे सांगाव्या. तसेंच पृथ्वीच्या गोलाकाराविषयीं जीं प्रमाणें त्यांत दिलीं होतीं, तीं मीं अगदीं तोंडपाठ केलीं होतीं, व पृथ्वी वटपत्रासारिखी आहे असें जें हिंदुमत तें मीं अविश्वासलें होतें; व हें नवें मत हिंदु शास्त्रांत नसतें तर बरें होतें असें वाटे. हिंदुस्थानचा नकाशा पाहण्याची व तो लोकांस दाखविण्याची मला फार हौस असे. त्यांत जे निरनिराळीं राज्यें दर्शविण्याकरितां लाल, पिंवळे रंग दिले होते, त्या रंगांत हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या राज्याचा लाल रंग दाखवून "सब लाल हो जायगा" असें जें रणजीतसिंगाचें भाकीत तें वारंवार ह्मणून दाखवावें. हें वाक्य आमच्या घरीं येणाऱ्या गृहस्थांपैकीं एकानें माझें

---

* त्या काळांत ह्या शाळेंतील मुलें बक्षीस मिळविण्याविषयीं फारच आतुर असत. एका सावकाराच्या मुलास बक्षीस मिळालें नसतां त्यानें दोन तीन नवीं बुकें विकत घेऊन त्यांवर बक्षीस मिळालें असें लिहून तीं आपल्या घरीं नेऊन दाखविलीं. एक मुलगा शास्त्रीबोवा बेळगांव सोडून जाण्यास निघाले असतां त्यांच्या मागें धांवत जाऊन त्यांची पालखी उभी करून बक्षीस मागूं लागला. त्याला कशाबद्दल बक्षीस द्यावें असें विचारल्यावरून तो म्हणाला कीं, मी दर शनिवारीं शाळा सारवितों, व रोज सकाळीं संध्याकाळीं झाडून साफ ठेवितों. हें ऐकून शास्त्री मजकूर यांनीं त्यास कांहीं बुक बक्षीस द्यावें असें पेनसलीनें कागदावर लिहून दिलें; तेव्हां त्यानें पालखी पुढें जाऊं दिली!

नकाशाचें पुस्तक प्रथम पाहून ह्मणून दाखविलें असावें. पुस्तकांत युरोप खंडाचा जो नकाशा होता, त्यांतील आस्त्रियाचे राज्याचें नांव पाहून तो हिंदु लोकांच्या समजुतींतला स्त्रीराज्याचा देश* आहे असें मीं आपल्या घरच्या माणसांस सांगावें, व जेव्हां माझ्या वडिलांस आदनास जाण्याचा हुकूम झाला, ( १८४२ ) तेव्हां तें ठिकाण युरोपांतील आथेन्स शहर आहे असें मीं आपल्या आजोबांस सांगितलें, व तें किती लांब आहे हें अक्षांशरेखांशांच्या गणितावरून जेव्हां दाखविलें, तेव्हां इतकें दूर जाण्यापेक्षां चाकरी सोडावी असें सर्वांचें मत पडलें व तीं पराकाष्ठेचें दुःख करूं लागलीं! ह्या वेळीं माझे वडील धारवाडास गेले होते, ह्मणून आदन हें आरबस्थानांत आहे असें सांगायास घरांत कोणी नव्हतें. आणि दादोक्त नकाशांतही तें मांडलेलें नव्हतें. युरोपाच्या नकाशांत आथेन्सच्या वर आस्त्रियाचा देश आहे तो पाहून मीं आपल्या आजोबांला सांगितलें कीं, आदन स्त्रीराज्याजवळ आहे; तेव्हां तर ते फारच घाबरले, आणि हिंवताप घेऊन निजले!

शाळेंत कांहीं अल्पस्वल्प निबंध वगैरे लिहिण्यास मुळींच देत नसत. जे मोडी कागद वाचायास देत त्यांत केवळ किरकोळ व साधारण मजकूर असायाचा. 'गोमांतकी आंबे पाठविले आहेत,' 'संक्रमणाचे तीळ पाठविले आहेत,' अशीं वाक्यें वारंवार वाचण्यांत येत असत. बाकीचे सर्व धडे घोकण्याशीं काम.† दर शनिवारीं धुळाक्षराच्या वर्गांतील मुलें पाटीवर सरस्वती व गणपति काढून त्यांच्या पायां पडत. गणेशचतुर्थीच्या दिवशीं शाळेंत गणपति आणीत. ही चाल मामलेदार कचेरींत व मुनसफ कोर्टांतही होती, परंतु पुढें ती बंद झाली. गणपतीचा खर्च सादिलवार खर्चांत घालीत.

---

* हें स्त्रीराज्य भुतानाकडे आहे असें कित्येकांचें मत आहे. त्या राज्यांत पुरुष मुळींच नाहींत. तेथें केव्हां तरी एकदां सिंहनाद होतो. त्याच्या योगानें स्त्रियांस गर्भ राहतो, व त्यांस स्त्रीसंततीच होते, तेथें कोणी पुरुष गेला असतां त्याला स्त्रिया धरून ठेवितात व बाहेर जाऊं देत नाहींत. अशा ह्या राज्याविषयींच्या लोककल्पना आहेत.

† मामलेदारकचेरींत वगैरे चाकरी मिळण्याकरितां परिक्षेचे कायदे घोकणारीं मुलें वरच्या वर्गांत बरींच होतीं. त्यावेळीं परिक्षेचे मार्क ( गुण ) आण्याच्या हिशेबानें देत ह्मणजे कोणी आठ आणे, कोणी बारा आणे परीक्षा उतरला असें ह्मणत. अशीं कायदे पाठ करणारीं कित्येक गरीब ब्राह्मणांचीं मुलें दिव्याच्या तेलाचा खर्च वांचविण्याकरितां आमच्या घरीं रात्रीं येत असत. एक ब्राह्मणाचा मुलगा झोंप येऊं नये ह्मणून खुंटीस दोरी अडकवून ती आपल्या शेंडीला बांधून अभ्यास करीत असे!

मला घरीं कानडी शिकविण्याकरितां एक जंगम पंतोजी ठेविला होता. तो मी ख्रिस्ती झाल्यावर मला बेळगांवींच पुनः भेटला; त्यावेळीं तो फार म्हातारा झाला होता.

प्राकृत धर्मग्रंथांचा व संस्कृत भाषेचा अभ्यास.

मला प्राकृत ग्रंथ ( रामविजय, पांडवप्रताप, हरिविजय इ० ) वाचायास शिकविण्याकरितां एक हरदास ठेविला होता, व संस्कृत शिकविण्याकरितां एक ब्राह्मण येत असे; त्यानें मला रूपावळी, समासचक्र, अमरकोश व रघुवंश (२ रा सर्ग) इतकें शिकविलें. त्याला केवळ दरमहा दोन रुपये देत असत; त्या दिवसांत शिक्षण इतकें स्वस्त होतें. ह्या ब्राह्मण शिक्षकास मीं कधींमधीं धर्मसंबंधी प्रश्न विचारावे, त्यांपैकीं एका प्रश्नोत्तराचें मला चांगलें स्मरण आहे. स्वर्गलोकीं मनुष्यें काय करितात, असें मी त्याला एकदां विचारिलें. त्याचें त्यानें असें उत्तर दिलें कीं, तीं अमृत पिऊन अशीं गुपचुप बसतात; तसें त्यानें बसूनही दाखविलें. एकदां कित्येक ब्राह्मणांचा व एका मिशनेरीचा धर्मसंबंधी वाद झाला, त्यांतील एका गोष्टीवरील शंकेचें त्यानें निराकरण येणेंप्रमाणें केलें:— पाद्रीसाहेबाचें ह्मणणें पुराणांत वर्णिलेल्या कोणी एका पर्वताच्या शिखरांविषयीं होतें, तें असें कीं त्या पर्वतास अमुक शिखरें आहेत असें सांगितलें असून तितकीं आतां नाहींत हें कसें? त्याला माझ्या शिक्षकानें असें उत्तर दिलें कीं जशीं एखाद्याच्या हाताचीं कांहीं बोटें रोगानें गळून पडतात, तशीं तीं शिखरें गळून पडलीं असतील. हा ब्राह्मण शिक्षक भटपणा करीत असे. त्याचे यजमान पलटणींतील परदेशी शिपाई असत; त्यांची हिंदी भाषा त्यास चांगली येत असे. त्यांस त्यानें पंचांग वगैरे सांगून जोशीपणाही चालवावा, ह्मणजे दहींकवड्या टाकून प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं. या रीतीनें त्याला बरीच प्राप्ति असे. हे भटजीबावा मी ख्रिस्ती झालों तेव्हां जीवंत होते, व मला कधीं कधीं भेटले ह्मणजे, "कां, आतांशीं बंगल्यांतच असतां काय?" इतकेंच त्यांनीं बहुतकरून विचारावें.

पुराण, कीर्तन श्रवण करण्याचा नाद.

मला लहानपणापासून कथा व पुराण ऐकण्याचा फार नाद होता; कथेची तर फारच गोडी होती. कोणत्याही देवळांत व कोणाच्याही घरांत कथा झाली असतां मी तेथें जात असें. आमच्याही घरीं वारंवार बाहेरून आलेल्या हरदासाची कथा होत असे. मीं हरदासबावाच्या पायां मोठ्या भक्तिभावानें पडावें,

त्याच्या गळ्यांत फुलांची माळा घालावी व कपाळीं बुका लावावा. कोणी कोणी हरदास कथा आटोपल्यावर मूर्तीपुढें साष्टांग नमस्कार घाली, तेव्हां त्याच्या मागल्या बाजूस उभें राहून लोक त्याच्या पायांस स्पर्श करीत तसें मींही करावें. कथेच्या समाप्तीस जी आरती होते तींत मीं पैसे टाकावे, व ते आईबापांनीं दिले नसले तर घरांतून चोरून आणावे! तसेंच हरदासबुवा गांवांत भिक्षा मागायास निघाले ह्मणजे त्यांस पुष्कळ तांदूळ ताटांत घालून त्यांच्या झोळींत ओतावे व रस्त्यांतच त्यांच्या पायां पडावें. हरदासाच्या विऱ्हाडींही मीं कधीं कधीं जावें व त्याचीं तयारीचीं गाणीं वगैरे ऐकावीं. पुराणिकाविषयीं माझ्याठायीं इतकी पूज्यबुद्धि नव्हती, तरी पुराण ऐकायास मी वारंवार जात असें. गांवांत कोणी सप्ताह मांडला ह्मणजे तेथें नेमानें जायाचें, आणि शेवटपर्यंत तसाच क्रम ठेवायाचा. तसेंच गांवांत व्यंकोबा, विठोबा इत्यादि देवांच्या उत्साहांत त्यांची पालखी वगैरे निघाली ह्मणजे तिच्या बरोबर मोठ्या हौसेनें जात असें. व्यंकोबाचें वहन आमच्या दारापुढें येऊन उभें राहिलें ह्मणजे त्याला आरती वगैरे करण्यांत पुढारपणा मीच घेत असें.

यात्रा.

वेळगांवांत व आसपासच्या खेड्यापाड्यांत अनेक देवांच्या यात्रा भरत, त्यांपैकीं एका खेड्याच्या यात्रेस फार लहानपणीं गेल्याची मला पक्की आठवण आहे. ती अशी कीं, ती यात्रा पाहण्याकरितां तेथें गेल्यावर माझ्या आईबापांनीं मला गड्याबरोबर देऊन रात्रीच्या वेळीं बाहेर पाठविलें. तेथें प्रथम दारूच्या घागरी रस्त्यांत मांडलेल्या माझ्या दृष्टीस पडल्या. माझा चाकर कांहीं दारू विकत घेऊन प्याला. नंतर कांहीं वेळ मला यात्रेंत फिरवून एका मिठाईवाल्याच्या दुकानांत बसवून आपण कोठें निघून गेला. त्याची वाट पाहत मी रात्रभर तेथें रडत व झोंपत राहिलों, जेव्हां घरचीं मनुष्यें मला शोधीत आलीं तेव्हां पहाटेची वेळ झाली होती!

याप्रमाणें हिंदुधर्माचें ज्ञान संपादन करण्याचीं मला अनेक साधनें व त्याच्या आचाराप्रमाणें चालण्याचे अनेक प्रसंग लहानपणापासून मिळत चालले. त्यांविषयीं पुढें जास्त लिहिण्यांत येईल.

# प्रकरण ३.

## इंग्लिश शिकण्यास आरंभ—बेळगांव मिशन इंग्लिश स्कुल, १८४२.

आतां मराठी शाळा सोडून इंग्रजी शाळेंत गेल्याची गोष्ट सांगितली पाहिजे.

इंग्लिश शाळा-प्रवेश.

मराठी शाळेंत जातांना गणपती व सरस्वती यांचें जसें पूजन केलें, व पंतोजीस पागोटें वगैरे दिलें, तसें या प्रसंगीं कांहीं केलें नाहीं, परंतु तेथील लंडन मिशनचे मिशनेरी रेव. डब्ल्यु. बेनन साहेब यांच्या बंगल्यांत मला माझ्या चुलत्यांनीं नेल्याचें आठवतें. आमच्या बरोबर त्या शाळेचे हेडमास्तर होते. तेथें इंग्रजींत त्यांचें काय बोलणें झालें हें मला समजलें नाहीं, परंतु बंगल्यांतून निघून येते वेळीं मिशनेरी साहेबांनीं मला जवळ घेऊन लडीवाळपणानें माझ्या चुलत्याशीं व हेडमास्तरांशीं कांहीं बोलून माझ्या डोक्यावर हात ठेविला. दुसरे त्याच मिशनाचे रेव० टेलर साहेब हेही शाळेवर मुख्य होते, परंतु त्यांच्या एथें त्या प्रसंगीं गेल्याचें मला आठवत नाहीं.

बेळगांव-मिशन स्कुल.

ह्या मिशन शाळेची सन १८३२ सांत स्थापना झाली होती. तिच्या खेरीज बहुत वर्षेंपर्यंत बेळगांवांत दुसरी इंग्लिश शाळा नव्हती; सरदारस्कुल (जिला जहागीरदार स्कुलही ह्मणत) नांवाची जी इंग्रजी शाळा सरकारानें घातली तिची स्थापना सन १८५० सांत झाली. मिशन शाळेंत श्रीमंतांचीं व गरीबांचीं आणि सर्व जातींचीं मुलें येत असत. मुलांस कांहीं फी द्यावी लागत नसे; परंतु उलटें बहुत गरीब मुलांस दरमहा आठ आण्यांपासून तीन चार रुपयांपर्यंत सहाय मिळत असे. या शाळेंत बेळगांवच्या अगदीं जवळ असलेल्या सांगलीकरांच्या शहापूर नांवाच्या गांवांतून पुष्कळ मुलें येत असत. त्या गांवांत मिशनच्या मराठी व कानडी शाळा व एक भजनालय होतें व अद्यापही आहे.

ह्याच शाळेंत माझ्या चुलत्यांचा इंग्लिश अभ्यास झाला. जेव्हां मी तेथें जाऊं लागलों तेव्हां ते पे-हपिसांत उमेदवारीस जात होते. ह्या शाळेंत मीं सन १८४३ सांत प्रवेश केला.

ही शाळा भरबाजारांत असून तिच्या समोर एका मोठ्या पारशी व्यापाऱ्याचें दुकान व घर होतें. त्या घरचींही मुलें शाळेंत येत असत; याशिवाय बोहरी, मोमीन वगैरे व्यापाऱ्यांचीं मुलें शाळेंत येत. त्यांपैकीं एक केंस पिकलेला बोहरी हें पुस्तक लिहिण्याचें काम चाललें असतां मला एकाएकीं (मुंबईंत) नळाच्या बाजारांत भेटला; त्यानें मला ओळखिलें पण मीं त्याला ओळखलें नाहीं. तेव्हां तो ह्मणाला कीं, आपण बेनन साहेबांच्या क्लासांत नव्हतों काय? यावरून मला फार आनंद झाला. ह्मणजे ही सुमारें ४०–४५ वर्षांनंतरची जुनी भेट!

शाळेची देखरेख वर सांगितलेल्या दोन मिशनेरी साहेबांकडे असे. त्यांपैकीं एक जण (रेव० जोसेफ टेलर) नित्य येत असत, दुसरे मिशनेरी रेव. बेनन साहेब हे आठवड्यांतून दोन किंवा तीन दिवस येऊन शिकवीत. हेडमास्तर मि० आपाजीराव हे होते. हे जातीचे मराठे होते. त्यांस इंग्रजी

**मुख्य शालाध्यापक मिशनेरी व हेड मास्तर असिस्टंट पारशी मास्तर.**

व मराठी शिवाय कानडी, तेलंगी, तामीळ, गुजराथी, उडदु, अशा भाषा येत होत्या, व त्या त्या भाषा बोलणाऱ्या मुलांचे धडे ते घेत असत. ते घरींहून शाळेस येण्याकरितां निघाले ह्मणजे त्यांच्या बरोबर मुलांनीं त्यांचीं शालोपयोगी बुकें मामलेदार वगैरे सरकारी कामदारांच्या दप्तराप्रमाणें रुमालांत बांधून शाळेंत घेऊन जावीं, आणि पुनः तीं संध्याकाळीं परत न्यावीं; असा नित्य क्रम असे. हें काम बहुतकरून शाहापूरचीं मुलें पाळीपाळीनें करीत.

हेडमास्तरांचे हाताखालीं रुस्तमजी या नांवाचा एक पारशी मास्तर होता. ह्याला बैबलाचें व विशेषेंकरून त्यांतील भविष्याचें फार चांगलें ज्ञान होतें. त्या भविष्यांच्या पूर्णतेसंबंधी जे जुने ग्रंथ शाळेंत होते व जे नवे येत त्यांचाही त्यानें चांगला अभ्यास करावा. दोघांही मास्तरांचा विश्वास स्वधर्मावर नव्हता. रा० रा० आपाजीराव कधींही हिंदूच्या देवळांत जात नसत, व कपाळीं गंध लावीत नसत व कोणतेंही धर्मकर्म करीत नसत. त्यांच्या

विद्वत्तेमुळें लोक त्यांस बहुमान देत. बेननसाहेब व टेलरसाहेब त्यांजवर फार प्रीति करीत; कारण ते मिशनाच्या लेंकराप्रमाणें त्यांच्या हाताखालीं लहानाचे मोठे झाले होते. त्यांच्या प्रीतीविषयीं मीं अशी एक गोष्ट ऐकिली होती कीं, एकदां आपाजीराव फार आजारी असतां त्याच्या समाचारास बेननसाहेब मध्यरात्रीं आपल्या बंगल्याहून रात्रींचे कपड्यानिशीं धांवत आले. मास्तरचें घर बंगल्यापासून बरेंच लांब होतें. याच्याविषयीं विशेष मजकूर पुढें येईल.

**शिक्षणपद्धति.**

ह्या शाळेंत शिकविण्याची रीत येणेंप्रमाणें होतीः—मुलांस धडे तयार करण्याकरितां शाळेंत वेळ देत असत; आतां जसें एकसारखे धडे घेतच राहतात तसें नव्हतें. मुलांच्या कापी लिहिण्याकडे फार लक्ष देत; प्रत्येक वर्गाचा मास्तर आपापल्या मुलांस कित्ता (कापी) घालून देई. वरच्या वर्गांतील मुलें दर बुधवारीं कांहीं तरी विषयावर इंग्रजींत स्वल्प निबंध लिहून आणून पत्राप्रमाणें त्याचा लखोटा करून व त्याजवर बेनन साहेबांचें नांव लिहून त्यांच्या मेजावर ठेवीत. नंतर साहेब एकएका मुलास बोलावून त्याचें पत्र वाचून त्यांत ज्या चुक्या असतील त्या शुद्ध करीत. तें वाचतेवेळीं मुलगा त्यांच्यामागें खुर्चीजवळ उभा राही. विद्यार्थ्यांस इंग्लिश भाषेंत मजकूर लिहिण्यास व विचार वाढविण्यास शिकविण्याची ही फार उत्तम पद्धति होती.

**शिक्षेचे प्रकार.**

ह्या शाळेंत मराठी शाळेप्रमाणें मुलांस शिक्षा करण्याचे क्रूर प्रकार नव्हते, तरी मास्तर लोक मुलांस बरीच कडक शिक्षा करीत. त्या प्रत्येकाच्या हातांत छडी असायाचीच. शाळेच्या आसपास अडुळशाचीं झाडें होतीं, त्यांच्या फांद्या मोडून मुलें त्यांस छडी आणून देत व ती त्यांच्याच आंगावर व हातांवर जोरानें पडत असे. 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम' या म्हणीचा वारंवार आह्मांस अनुभव येत असे. मुलांचे कान पिळायाची व गालांवर चपडाका मारण्याचीही चाल होती. त्यांस बांकांवर उभें करीत; चोरी वगैरेच्या अपराधास किंवा फार दिवस धडा न केल्याच्या अपराधास 'डन्सक्याप' नांवाची कागदाची टोपी करून मुलाच्या डोक्यांत घालून त्याला शाळेंत फिरवीत. शाळेंत मुलांचें बुक, स्लेट, चाकू वगैरे जिन्नस हरवली असतां संध्याकाळीं शाळा सुटतेवेळीं दाराशीं प्रत्येक मुलाचा झाडा घेत.

धडा न शिकणाऱ्या मुलांस सुटी झाल्यावर तासभर कोंडून ठेवीत. शाळा सुटण्याचे वेळीं पाद्रीसाहेब प्रार्थना करीत; प्रार्थना झाल्यावर मास्तर मुलांची कापी पाहत. ज्यानें कापी लिहिली नसेल त्याला व वाईट अक्षर लिहिणारास शिक्षा होत असे.

**एक कापी लिहून देणारा रैटर.**

त्या दिवसांत लफांड नांवाचा एक युरेशियन कलेक्टरकचेरींत रैटर होता, तो शेटसावकार व साहेब लोकांच्या मुलांस इंग्लिश वर्णमालेच्या प्रत्येक अक्षराची एक एक कापी पैसे घेऊन लिहून देत असे. त्याला कधीं कधीं त्याबद्दल १५ रुपयेपर्यंत मिळत, इतकें त्याचें अक्षर चांगलें होतें. एकदां ह्या गृहस्थाच्या घरीं आह्मी कांहीं मुलें जमून कापी मागण्याकरितां गेलों होतों; आमच्यांतून कित्येकांच्या वडिलांनीं त्याला कापीकरितां अगाऊ पैसे दिले होते. त्यावेळीं तो घरीं असून घरांत नाहीं असें त्याच्या एका मुलानें आह्मांस सांगितलें, कारण तो हपिसांतून आजारीपणाची रजा घेऊन बाहेरच्या लोकांचीं पिटिशनें ( अर्ज्या ) वगैरे लिहिण्याचें काम करण्यासाठीं राहिला होता. आह्मास ही गोष्ट समजली होती, व त्याच्या दारापुढें ओटीवर आह्मी बसलेलों असतां त्याला एका खोलींतून दुसऱ्या खोलींत जातां आह्मीं पाहिलें. तेव्हां सर्व मुलांनीं मसलत करून मला आंत त्यापाशीं कापी मागायास पाठविलें. परंतु मला आंत कां येऊं दिलें ह्मणून तो आपल्या मुलावर फार रागें भरला. दुसरे दिवशीं त्या मुलानें मला शाळेंत जातांना वाटेंत गांठून आपल्या बरोबरच्या मद्राशी पोराकडून माझ्या कुशींत दोन चार ठोसे मोठ्या जोरानें मारविले. त्यावेळीं तो 'अडी अडी' ( मार, मार ) असे तामिळ भाषेंत चाकराशीं जे शब्द बोलला त्याची अद्याप मला पुरती आठवण आहे, इतकेंच नाहीं तर तो मार पाणथरीस ( स्प्लीन ) लागल्यामुळें त्याची व्यथा अद्याप कधीं कधीं सोसावी लागते. परंतु देवानें दया करून त्यापेक्षां कांहीं जास्ती इजा मला होऊं दिली नाहीं.

**शाळेंतील मुलांची जात.**

ह्या शाळेंत सर्व जातींचीं मुलें घेत असत हें वर सांगितलेंच आहे. माझ्या वर्गांत एका वेळीं जीं मुलें होतीं त्यांच्या जातींची मला चांगली आठवण आहे; ब्राह्मण, ( वैष्णव व स्मार्त ) शेणवी, ( हिंदु ) गोवेंकर, सोनार, कुडाळदेशकर, तेली ( लिंगाईत ), धोबी ( मराठी ), लोहार ( तेलंगी), वडगी ( सुतार ),

चाम्हार ( मद्राशी ), पोर्चुगीस, (गोवेकरी), जिनगार, हजाम, कोष्टी, कोमटी, मुदलीयार, चेट्टी, रजपूत, कलाल, बांदेकर, अशीं अनेक जातींचीं मुलें होतीं; हीं बहुतकरून परस्परांशीं मैत्रीनें व सलुख्यानें राहत. एका पोर्चुगीसाच्या मुलास आह्मीं वारंवार चिडवावें. "तूं आज काय जेवलास?" असें त्याला विचारून त्यानें "डुकराचें मांस खाल्लें" असें उत्तर दिल्यावर त्याला थु! थु! करून "वाण येती, दूर बैस, दूर बैस" असें ह्मणावें. मी आपल्या वर्गांतील बहुतकरून सर्व सोबत्यांच्या घरीं जात असें. लोहार मुलाचा बाप खिळे कसे करितो हें त्याच्या साळेंत बसून पहावें; कोष्ट्याच्या घरीं कापड कसें विणतात हें मी लक्ष लावून पाहत असें. कोष्ट्यांच्या बायका आपल्या पुरुषांस त्यांच्या कामांत फार सहाय करितात हें पाहून मला फार नवल वाटावें. माझ्या रजक जातीय साध्यायीचा ह्मातारा अंधळा आजा धुपट वस्त्रांच्या घड्या कुंदी करून जपून रचून ठेवी हें पाहून मला मौज वाटे. मोची मित्राच्या घरांत मात्र जात नसें; अंगणांत उभें राहून त्याला बाहेर बोलावून खेळायास घेऊन जावें. तेल्याच्या घाण्याचा बैल कसा फिरतो व तेल कसें निघतें व पेंढ कसी जमते हें माझ्या वर्गांतील तेली जातीच्या मुलाच्या सोबतीनें मला समजलें.

**सुटीची वेळ.** शाळेला दोनप्रहरीं सुटी झाली ह्मणजे आंब्याच्या दिवसांत आह्मी जवळच्या अंबराईत जाऊन आंबे पाडून खूप खावे. आमच्या मध्यें दोन ब्राह्मणांचीं मुलें फार दांडगीं व तालीमबाज असत, त्यांनीं आंबराई राखणाऱ्या मुसलमानाच्या पोरांशीं भांडण करून व त्यांस दपटशाई देऊन आंबे जुलमानें पाडावे. ह्या मुलांपैकीं एकास सुपारी खाण्याची फार चट असे, ती त्याला आह्मीं दिली ह्मणजे तो आमचा पुढारी होऊन आह्मांस आंबे पाडून देई. झाडावरील आंब्यावर नेमका दगड मारण्यांत तो मोठा पटाईत होता. आमच्या टोळीमध्यें शहरच्या कोतवालाचा मुलगा होता, त्यामुळें एखादे वेळीं आंबराईवाल्यांनीं आमच्यावर फिर्याद करून चावडीवर खटला नेला तरी आमच्याच तर्फे न्याय व्हायाचा!

त्या काळांत सुटीच्या वेळीं आतांच्या सारखे शाळेच्या आसपास चणेकुरमुरे, मेवामिठाई विकायास कोणी येत नसे, ह्मणून जीं मुलें सुटी झाल्यावर घरीं जात नसत, तीं जवळच बाजारांत जाऊन करवंदें, कालिंगडें,

आंबे, फणस, ऊंस, आवळे, चिंचा, बोरें, कवठ वगैरे जें मिळेल तें यथेच्छ घेऊन खात असत. त्या दिवसांत अतिशय स्वस्ताई असल्यामुळें आह्मांस थोडक्या पैशांत पुष्कळ खायास मिळत असे. कित्येक मुलें घरीं जाऊन जेवून येत, टेलरसाहेबांनीं कधीं कधीं आपल्या बागांतील केळीं व जांब आणून मुलांस वांटावे. जांब वांटतेवेळीं एका हातांत फळ व एक हात रिकामा असे दोन्ही हात मेजाखालीं लपवावे, व मुलास जिंकायास सांगावें. गांवांत कोणी मौज करणारा आला ह्मणजे टेलरसाहेबांनीं त्यास पैसे देऊन शाळेंत आणून मुलांस त्याची मौज दाखवावी. एकदां एक जंगम आला होता तो पशुपक्ष्यांसारिखे आवाज करी.

**घडे शिकण्याची रीत.**

त्या दिवसांत शालोपयोगी पुस्तकें फार थोडीं असल्यामुळें व शाळेंत येणारीं मुलें बहुतेक गरीब असल्यामुळें तीं एकमेकांचीं पुस्तकें घेऊन आपले धडे शिकत. अशीं मुलें माझ्या वर्गात कित्येक होतीं. तीं फार लवकर शाळेंत येऊन सर्व धडे दुसऱ्याच्या पुस्तकांवरून शिकत. तसेंच आतांच्या तळेकरांच्या इंग्रजी–मराठी डिक्शनेरी सारखी स्वस्त डिक्शनेरी नव्हती, ह्मणून मास्तर लोकांचा मुलांस शब्दार्थ सांगण्यांत बराच वेळ जात असे, तो त्यांनीं कागदावर किंवा स्लेटीवर लिहून द्यावा, व त्यावरून आह्मीं सर्वांनीं आपापल्या चोपडीवर उतरून घ्यावा. नोटबुकें व एक्सरसाईज बुकें आमच्या स्वप्नांतही येत नव्हतीं. कित्येक मुलांनीं तर अशा कार्यासाठीं मोठमोठ्या चोपड्या केल्या होत्या; त्यांत एक ब्राह्मण होता, तो वयानें तेथील कित्येक मुलांचा बाप शोभला असता, त्यानें एक मारवाड्याच्या खातेवहीसारखी मोठी चोपडी केली होती, तींत त्यानें हजारों शब्द उतरले असतील असें वाटतें. कांहीं वर्षांनीं मुंबईस क्यांडी साहेबांची इंग्रजी–मराठी डिक्शनेरी छापण्यास सुरवात झाली, तिचीं सुटीं पानें नियमित काळानें आमच्या शाळेंत येत. ती डिक्शनेरी पाहून आह्मांस मोठें आश्चर्य वाटे, व आमच्या शिक्षकांनीं तिच्यांतील शब्द पाठ करण्याचे धडेच आह्मांस लावून दिले होते! ते उतरून घेण्यास आह्मांस बराच वेळ शाळा सुटल्यावर राहावें लागत असे. हा मोलवान व उपयुक्त ग्रंथ सन १८४७ सांत संपूर्ण छापून तयार झाला. मोलस्वर्थ साहेबांची मराठी–इंग्रजी डिक्शनेरीची (पहिली आवृत्ति) एक प्रत आमच्या हेड मास्तरापाशीं होती, व कदाचित दुसरी प्रत कलेक्टर हपिसांत

असेल; अशा केवळ दोनच प्रती सगळ्या बेळगांवांत त्या काळीं होत्या असें मला वाटतें.* वरच्या वर्गांतील सर्व मुलांपाशीं व सर्व मास्तरांपाशीं जानसनची इंग्लिश डिक्शनेरी असायाची; एका मुलापाशीं मात्र शेरिडनची डिक्शनेरी होती, ती पाहून आह्मांला आश्चर्य वाटावें. तिला तो आह्मांस हात लावूं देत नसे! ह्या शाळेंत माझ्यापूर्वीं एक मुलगा होता त्यानें जानसनची डिक्शनेरी तोंडपाठ करायाचें आरंभून आपली दृष्टि गमाविली!

**माझे हिंदु शिक्षक.**

मिशनेरी साहेब खेरीजकरून माझे सर्व शिक्षक हिंदु होते, त्यांपैकीं रा० रा० भवानसिंग यांच्या हाताखालीं मी बहुत दिवस शिकलों. हे आतां वृद्ध झाले असून शहापुरास सुखवस्तु राहतात. त्यांस इंग्लिश सरकारांतून कांहीं इनाम आहे. बेळगांवचे प्रसिद्ध सावकार रा० रा० रावजी खरे यांचे चिरंजीव रा० रा० तात्या खरे हेही माझ्या शिक्षकांपैकीं होते. ह्या शाळेंत कांहीं दिवस खालच्या वर्गांतील शिक्षकाचें काम मींही केलें. माझ्या वर्गांत भुजंगराव जहागीरदार नांवाचे वैष्णव विद्यार्थी सधन व अब्रूदार घराण्यांतील होते. ते पुढें मीं ख्रिस्ती झाल्यावर मला बेळगांवीं भेटले. त्यांनीं ती जुनी ओळख धरून व जुना गुरुशिष्य धर्म आठवून माझा चांगला आदरसत्कार केला. हे त्यावेळीं ‘सुधारणुकेच्या’ कळसास जाऊन पोंचले होते. ह्यांनीं आपल्या एका मुलास आपल्या वैष्णव उपाध्याविरुद्ध एक प्रश्नोत्तरावळी शिकविली होती, ती तो उपाध्या जवळ बसला असतां त्यास (मुलास) मला बोलून दाखवायास लाविली!

**अभ्यासाचीं पुस्तकें.**

माझ्या अभ्यासाच्या सर्व बुकांची मला आठवण नाहीं. मी जें पहिलें पुस्तक शिकलों त्याचें नांव मुलांनीं ‘बाय मी’ ( By me ) ठेविलें होतें, कारण त्याच्या आरंभीं हे शब्द होते. ह्या पुस्तकाच्या शेवटीं दोन तीन अल्प प्रार्थना होत्या, त्या आह्मांस पाठ करायास लावीत. ह्याशिवाय चेंबर्सकृत क्लास बुकें होतीं, त्यांतील ‘मारल क्लास बुक’ भाषांतरसहित, आह्मांस शिकवत. अमेरिकन मिशनाचें हाल्स ग्रामर, मरेस ग्रामर ( भाषांतरसहित ), पिनाक्स क्याटि-

* सरकारी मराठी शाळेंत जीं थोडीं बुकें होतीं त्यांत मराठी भाषेचा कोश होता. तो १८३१ त छापला होता, त्याची अद्याप दुसरी आवृत्ति निघाली नाहीं. दैव त्या कोशाचें!

किजम, गोल्डस्मिथ्स जाग्रफी, यूस आफ दि ग्लोब, महाराष्ट्र देशाच्या इतिहासाचें क्याटिकिजम (पुण्याचे प्रोफेसर इसदेल साहेबांनीं केलेलें), दाक्तर विलसन यांचें इडियोम्याटिकल एकसरसैज्स, फर्स्ट डायलाग (किती तास वाजले इ० वाक्यें), सेकन्ड डायलाग (ह्यांत व्याकरणसंबंधी वाक्यें होतीं, पण त्याला हें नांव पडलें होतें), लेटर हिस्टरी आफ इंग्लंद (भाषांतरसहित), अशीं बुकें खालच्या वर्गांत होतीं, वरच्यांत हिस्टरी आफ रोम, ग्रीस व इंग्लंद, रोलीन्स एन्शंट हिस्टरी हीं शिकवीत. त्याच ह्मणजे पहिल्या व दुसऱ्या वर्गांस पाद्रीसाहेब स्वतां बैबल शिकवीत. शनिवारीं सर्व वर्ग एकत्र बसवून ज्यास चांगलें वाचतां येई अशा मुलांपासून शास्त्राच्या एका अध्यायांतील एक एक ओवी वाचून घेत.

**शाळेच्या लायब्ररींत कोणकोणतीं पुस्तकें माझ्या वाचण्यांत आलीं.**

शाळेच्या संबंधानें लहानशी लायब्ररी होती, तिचा बहुतकरून कोणी उपयोग करीत नसत. एका कपाटांत मराठी, कानडी, तेलंगी वगैरे देशभाषांचीं पुस्तकें होतीं, तीं तेथल्या पारशी मास्तराच्या धाकट्या भावाच्या स्वाधीन असत. तो माझा मित्र असल्यामुळें त्याजपासून त्यांतून कांहीं घेऊन सुटीच्या वेळीं मीं तेथेंच वाचीत बसावें. यात्रिकक्रमणाचें मराठी भाषांतर प्रथम मीं त्याच कपाटांत पाहिलें, तसेंच भरतखंडांतील यात्रेकरू व मराठी नवा करारही तेथेंच माझ्या पाहण्यांत आला; नव्या करारांतील प्रेषितांचीं कृत्यें व प्रगटविणें हीं मी फावल्या वेळीं वाचत असें. यात्रिकक्रमणही सर्व तेथेंच वाचलें. तेथें संस्कृत मात्थीचें पुस्तक पाहून मला फार आश्चर्य वाटलें. तें मी त्या मुलापासून मागून घरीं नेलें, तें परत केल्याची मला आठवण नाहीं. बहुत वर्षें माझ्यापाशीं तें होतें, व कधीं कधीं गमतीकरितां तें काढून वाचावें. त्याचा मला कांहीं अर्थ समजत नसे. त्या पारशी मित्रापाशीं मीं तेथील गुजराथी पुस्तकें वाचायास शिकलों. तो मला गुजराथी वर्त्तमानपत्रें घरीं वाचायास देई. शाळेंत इंग्लिश बैबल मुलांस वर्गांत वाचावयास देत, परंतु घरीं नेऊं देत नसत. मला इंग्रजी बरेंच समजूं लागल्यावर मी बैबलांतील आब्राहामाची गोष्ट, नीतीचें पुस्तक व गीतें हीं माझ्या काकाच्या बैबलांतून घरीं थोडीं थोडीं वाचावीं; परंतु नव्या करारांतील शुभवर्त्तमान वाचावयाची इच्छा होत नसे, कारण त्यांत येशू ख्रिस्ताचें नांव आहे असें मला समजलें होतें!

शाळेंत नकाशाचीं पुस्तकें व खगोल भूगोलाचे मोठे गोल होते, त्यांवरून मला देशांची व नक्षत्रें वगैरेची बरीच माहिती झाली.

मिशनस्कुलांत जीं धर्मसंबंधी पुस्तकें मीं वाचलीं त्यांखेरीज दुसरीं घरीं फारशीं वाचावयास मिळालीं नाहींत, तरी जीं पाहण्यांत किंवा वाचण्यांत आलीं, त्यांपैकीं "त्रिभुवनांची गोष्ट," व 'पृथ्व्यादि पंचभूतांची भक्ति' व 'ब्राह्मणांचें महत्व' यांची बरीच आठवण आहे. हेन्री व त्याचा संभाळणारा गडी याचें पुस्तक मीं पुष्कळ वेळ वाचलें. एकदां मी एक ख्रिस्ती त्राक्ट वाचत असतां त्यांत हिंदूच्या देवाविषयीं कांहीं लिहिलें होतें, त्यावरून मला इतका राग आला कीं, तें मीं फाडून त्याच्या चिंध्या चिंध्या केल्या!

**नवीन कानडी त्राक्टें.**

रेव० टेलर साहेबांस कानडी व तामील भाषा चांगली येत असे. त्यांनीं छापण्याकरितां जीं लहान लहान कानडी त्राक्टें तयार करावीं त्यांची स्वच्छ प्रत उतरण्यास एक ह्यातारा कानडी लेखक ठेविला होता, त्याला मुनशी ह्मणत. तो नेहमीं शाळेंत वसून आपलें काम करीत असे. त्याजपाशीं मीं कधीं कधीं जाऊन उभें राहावें, पण तुह्मी काय लिहितां व ह्यांत काय आहे हें मीं त्याला कधीं विचारलें नाहीं. तोही मुलांशीं बोलत नसे. फार थकला ह्मणजे नाकावरील चश्मा उतरून आमच्या तोंडाकडे मात्र पाही, व तपकिरीची एक चिमुट ओढून पुनः आपल्या कामाचा गाडा हाकूं लागे. त्याचें काम फार जिकिरीचें व कंटाळवाणें असें वाटून मला त्याची कींव येई.

**श्रीमंत चिंतामणराव आपासाहेब यांचें आमच्या शाळेंत आगमन.**

मी इंग्रजी शाळेंत असतांना मराठ्यांच्या इतिहासांतून प्रसिद्धीस आलेले श्रीमंत चिंतामणराव आपासाहेब सांगलीकर हे एकदां आमची शाळा पाहण्यास आले होते.. ह्या गोष्टीची मला चांगली आठवण आहे, कारण शाळेंतील सर्व मुलांस सकाळीं दाहा वाजल्यापासून ते येतपर्यंत कोंडून ठेविलें होतें. आपासाहेबांची स्वारी बारा किंवा एक वाजतां येणार होती ती संध्याकाळीं पांच वाजतां आली, तोंपर्यंत दोघे मिशनरी साहेब, मास्तर व मुलें, त्यांची वाट पाहतां पाहतां कंटाळून गेलीं. एक साहेब [ टेलर साहेब ] तर फार थकून घरीं गेले. स्वारी आल्यावर घाईघाईनें आमचें वाचन वगैरे ऐकिलें. शाळेंतील खगोलभूगोलाचे ग्लोब होते ते पाहून त्यांस व त्यांच्या स्वारींतील लोकांस फार आश्चर्य वाटलें. त्यांवरून

आह्मीं त्यांस कांहीं प्राब्लेम [ सिद्धांत ] करून दाखविले. पृथ्वीच्या अमुक एका ठिकाणीं अमुक एका वेळीं ग्रहण लागलें असतां तें कोणकोणत्या देशांत व कोणत्या वेळीं दिसेल, हें मीं त्यांस त्या ग्लोबावरून दाखविल्याची मला आठवण आहे. आपासाहेबांनीं जरीची इजार घातली होती, ती पाहून ब्राह्मणानें इजार नेसावी याचें मला आश्चर्य वाटलें. त्यांचा सर्व पोशाक लष्करी बाण्याचा होता. ते फार वृद्ध झालेले असून त्यांच्या तोंडावर तरवारीचा वार होता, त्यांस सरकारानें नजर केलेली तरवार आह्मीं पाहिली. तिच्या पानावर त्यांचे नांवाचीं सोनेरी अक्षरें कोरलेलीं होतीं.* त्यांचें नांव मराठ्यांच्या बखरींत होतें हें आह्मांस ठाऊक असल्यामुळें त्यांस पाहून आह्मांस मोठा आनंद झाला. त्यांच्या स्वारीचा थाटही फार भव्य होता. ह्या भेटीपासून शाळेस शंभर रु० बक्षीस मिळाले.

**वार्षिक परीक्षा.** ह्या शाळेच्या वार्षिक परिक्षेस पुष्कळ साहेब लोक व मडमा येत असत, त्यांच्या पोशाकांत पक्षांच्या लवेची पांढऱ्या निळ्या रंगाची गजऱ्याप्रमाणें गोंडस व फार लांब माळ असे ती पाहून मला मोठें आश्चर्य वाटावें. अशा एका परीक्षेंत एका मडमेनें शाळेंतील कित्येक मुलांचीं चित्रें पेनसलीनें काढून नेलीं, व कांहीं दिवसांनीं त्यांत रंग भरून तीं आह्मांस पाहण्यास पाठविलीं, त्यांत माझेंही चित्र होतें. तीं दाखवितांना टेलरसाहेब ही मूर्तिपूजकाची मूर्ति असेंच कांहीं ह्मणाले, तें ऐकून मला लाज वाटली. ही चित्रलेखा मडम तेथील कलेक्टर रिविस*साहेबांची बहीण होती. ती ह्मातारी असून अविवाहित होती, हें ऐकून आह्मा मुलांस फार नवल वाटलें.

---

*ही तरवार आपासाहेबांस १८४७ साच्या मे महिन्याच्या २४ व्या तारखेस बेळगांव मुक्कामीं मोठा समारंभ करून कलेक्टर रिविस साहेब यांनीं सरकारमार्फत दिली. तिची किंमत २००० रु० होती, असें एका जुन्या वर्तमानपत्रावरून समजतें.

*हे गृहस्थ फार धार्मिक असून मिशनाच्या कामाला द्रव्यद्वारें पुष्कळ सहाय करीत. ते दरमहा चर्च मिशनाला ३०० रु० देत असें तेव्हां माझ्या ऐकण्यांत येत असे. त्यांनीं बेळगांवच्या कानडी ख्रिस्ती मंडळींच्या पहिल्या पाळकाला आपल्या खर्चानें चांगलें घर बांधून दिलें होतें. ह्याशिवाय लंडन मिशनाला अनेक प्रकारें मदत करीत. ते पुढें मुंबईसरकारचे कौन्सलर ( Hon'ble H. W. Reeves ) होऊन विलायतेस गेले.

ह्या शाळेंत मिशनेरी साहेब जी प्रार्थना करीत, ती पाहून तिच्याप्रमाणें

**मिशनेरी साहेबाच्या प्रार्थनेचें अनुकरण.**

मीं उगीच मौजेकरितां घरीं मेज मांडून "त्यांचेरें बायमीचें" पुस्तक ठेवून त्यांत जी शेवटीं प्रार्थना होती ती वाचावी. हें पाहून माझ्या वडिलांस क़ांहीं वाईट वाटत नसे, परंतु कोणी बाहेरचा गृहस्थ त्यांस भेटायास आला व माझ्या अभ्यासाच्या गोष्टी निघाल्या ह्मणजे मला कधीं कधीं पाद्रीसाहेब प्रार्थना करितात तशी करून दाखवायास सांगत. तेव्हां मी तें बुक मेजावर ठेवून त्यासमोर उभें राहून व मेजावर दोन्ही हात टेंकून खालीं मान करून ती प्रार्थना वाचून दाखवीत असें.*

**लोकवार्त्ता.**

आतांच्या काळांत दहा पंधरा वर्षांच्या मुलांस देशसुधारणुकेसंबंधी पुष्कळ लोकवार्ता माहीत होतात. तसें त्यावेळीं नव्हतें. मी आडांतील मंडुकाप्रमाणें आपल्या आळींत होतों. ज्या लोकवार्ता माझ्या कानीं पडत त्या अशा होत्या कीं, आज अमक्याच्या घरीं अमुक ब्राह्मणांची समाराधना झाली अथवा अमक्यानें आपल्या मुलाच्या मुंजींत किंवा मुलीच्या लग्नांत अमुक संख्या ( ५००, २००, ) ब्राह्मणांस चार चार आणे, आठ आणे, चवली चवली दक्षिणा वांटली. आज अमक्याचे घरीं पुराण झालें, कीर्तन झालें, नाच झाला, अशीं वर्त्तमानें माझ्या कानीं पडायाचीं. दुसरीं वर्त्तमानें अशीं होतीं कीं, ब्राह्मणाच्या अमुक विधवेनें....पाडलें किंवा तिला सरकारानें कैदेंत ठेविलें. तिनें अमक्याचें नांव सांगितलें. लोकसुधारणुकेची कोणतीही गोष्ट आमच्या आळींतील लोकांमध्यें कधीं निघालेली माझ्या आठवणींत नाहीं.

---

* सन १८५४ नांत माझा बाप्तिस्मा झाल्यावर बेळगांवाहून मुंबईस परत जातेवेळीं मी आपल्या वडिलांस एक पत्र लिहिलें, त्यांत पूर्वीच्या गोष्टींची त्यांस आठवण देत असतां ह्या प्रार्थनेचा उल्लेख आला आहे, तो येणेंप्रमाणें:—"मी इंग्रजी शाळेंत जाऊं लागल्यावर तेथें पाद्रीसाहेब ( हेच टेलरसाहेब ) देवाची प्रार्थना कशी करितात ती करून दाखविण्यास आपण मला सांगावें व म्हणावें कीं, "सुंगटणकरांचा मुलगा हुबेहुब तसें ध्यान धरून तुझ्यापेक्षां चांगली करितो." हा मुलगा एका मोठ्या सावकाराचा असून माझ्या वर्गांत होता. तो आपल्या बापाच्यामागून दौलतीचा धनी झाल्यावर अतिशय उडावपणा करून अल्पवयांतच मरण पावला. त्यानें एक मोठी अवाढव्य हवेली बेळगांवांत बांधिली होती तिला सोल्जर लोकांनीं 'सबास्टिपोल' असें नांव दिलें होतें.

# प्रकरण ४.

## वेळगांवच्या मिशन स्कुलांत जात असतां माझें हिंदुधर्मसंबंधी आचरण.

मिशन शाळेंत जें ख्रिस्ती धर्मसंबंधी शिक्षण मला मिळत असे तेणेंकरून माझें मन हिंदु धर्मावरून तेव्हांच उडालें असें नाहीं, उलटी माझी श्रद्धा त्या धर्मावर अधिकाधिक वसत गेली व माझा कर्मठपणाचा आचारही विशेष वाढत गेला, कारण मीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल.

**मारुतीचें देऊळ.**

आमचें घर मारुतीच्या आळींत होतें व त्या आळींत पुष्कळ ब्राह्मण लोक राहत असत हें मागें सांगितलेंच आहे. हा मारुती त्या गांवांतील इतर सर्व देवांमध्यें फार प्रसिद्ध असून ग्रामरक्षक मानिला आहे. त्याला सरकारांतून वर्षासन आहे. ह्या देवळाच्या जीर्णोद्धाराकरितां जेव्हां वर्गणी झाली, तेव्हां माझ्या वडिलांनीं त्यास द्रव्यद्वारां सहाय केलें इतकेंच नाहीं, तर एक चांगला नकाशा काढून दिला. त्याप्रमाणें पुढें त्याच देवालयाचीच दुरस्ती झाली असें नाहीं, तर त्याच्या आवारांतील दुसरेंही एक देऊळ बंगल्याप्रमाणें टुमदार उठलें. त्याच्यापूर्वीं मारुतीच्या कंपौंडांत फार कचरा व घाण जमून राहत असे. इंग्लिश विद्येच्या योगानें हिंदूंच्या देवालयांचीही सुधारणूक होते! मारुतीचें पुजारीपण पुष्कळ शूद्र भाऊबंदांकडे होतें. ते सर्व पाळीपाळीनें पुजारीपणा करीत व देवळाचें उत्पन्न वांटून घेत. यांचीं आपसांत भांडणेंही पुष्कळ होत. ह्या देवळांत इतर देवळांपेक्षां बहुत लोक दर्शनास येत असत. ह्याच्या आवारांत दुसऱ्याही देवांचीं लहान लहान देवळें होतीं; शिवाय पिंपळाचीं झाडें होतीं, त्यांस पुष्कळ बायका प्रदक्षिणा घालीत. ह्या पुजाऱ्यांपैकीं एकाचा मुलगा आमच्या शाळेंत येत असे. त्याचें नांव मसणा होतें. *असें नांव ठेवण्याचें

---

*हा मसणापा अद्याप जिवंत असून डोळ्यांनीं अंध झाला आहे. त्याला मी हें पुस्तक लिहीत आहें असें समजल्यावर त्यानें मला एका मित्राच्या पत्रांत सलाम पाठविला.

कारण त्याच्या बापाचीं मुलें जगत नसत ह्मणून कांहीं तरी भलतें सलतें नांव ठेवल्यानें तरी हा जगेल अशा समजुतीनें तें ठेविलें होतें. कोंड्या, दगड्या अशीं नांवें ठेवण्याचें बहुधा असेंच कारण असतें. त्याच्या सोबतीनें किंवा दुसऱ्या कारणानें मी मारुतीच्या देवळांत वारंवार जात असें. देवळाची पायरी चढल्यावर सभामंडपांत तोंडाशींच पुष्कळ घंटा टांगलेल्या असत, त्या हात पोंचत नसल्यामुळें उड्या मार मारून पुष्कळ वेळां मी वाजवाव्या. ह्या घंटांत माझ्या वडिलानें दिलेली एक मोठी घंटा होती. नंतर मूर्तीच्या गाभाऱ्याच्या दाराबाहेर जी जागा असे तेथें मारुतीला साष्टांग नमस्कार घालावे, व त्याच्यापुढें हात जोडून उभें राहून त्याच्या स्तुतीचा श्लोक ह्मणून व त्याचा अंगारा कपाळास लावून कांहीं भक्षण करावा. ज्या दिवशीं माझ्या सोबत्याच्या बापाची पाळी येई त्या दिवशीं मला मारुतीस लोकांनीं वाहिलेलीं केळीं, नारळ, खारीक इ० पदार्थांतून 'प्रसाद' मिळावा. दर्शन घेतल्यावर देवळास पुष्कळ प्रदक्षिणा कराव्या, कधीं कधीं एकशें आठ प्रदक्षिणा घालाव्या. देवळाचें आवार बरेंच मोठें होतें, तेव्हां इतक्या फेऱ्या घालण्यास पुष्कळ श्रम होत, परंतु नित्याचा क्रम थोडक्याच प्रदक्षिणा घालण्याचा होता. त्या झाल्यावर मारुतीच्या दर्शनास येणाऱ्या लोकांचीं तोंडें व वस्त्रालंकार पाहत उभें राहावें. नंतर सोबतीचीं मुलें घेऊन देवळाच्या अंगणाभोंवतीं व माडीवर खूप भटकावें. अंगणांत कांहीं खेळ खेळावे. एकदां आह्मीं पोरांनीं देवळाच्या घुमटांत एक गरीब बिचारें घुबड बसलें होतें, त्यास धोतराच्या तोब्यांनीं जीवें मारून त्याचे पंखास दोरी बांधून तें मोठ्या थाटानें सगळ्या आळींत फिरविलें! ह्या क्रूर कर्माबदल आह्मांस कोणी दोष लावला नाहीं, कारण घुबड हा अशुभ पक्षी मानिला आहे. तसेंच मीं व माझ्या सोबतीच्या मुलांनीं सोमवारीं शिवाच्या देवळांत जाऊन तेथें जितके सांपडतील तितके भुंगे मारावे असें केल्यानें पुण्य मिळतें असें सांगत. पुराण कीर्त्तन होत असलें तर तें ऐकत बसावें. देवळाच्या धर्मशाळेंत उतरलेल्या गोसावी बैराग्यांजवळ असलेलीं नल, नील इ. वानरें पाहावीं. ते कोठून आले, कोठें जातात हें त्यांस विचारावें. त्यांस कांहीं पैसे द्यावे. त्यांची पूजा पाहत बसावें, व शंखनाद ऐकत व त्यांच्या गांजाच्या चिलमीचा वास घेत राहावें. ह्या ठिकाणीं कधीं कधीं नागवे गोसावीही येऊन राहत. देवळाच्या भिंतीवर

एका कुशळ चित्रकारानें राम व कृष्ण यांच्या अवतारचरित्रांचीं फार सुंदर रंगीत चित्रें काढलीं होतीं, व त्यांच्या खालीं थोडक्यांत वर्णन बालबोध अक्षरांनीं लिहिलें होतें, तीं वाचण्यांत व पाहण्यांत मी बराच वेळ घालवावा; तेणेंकरून मला पुराणांतील कथांची बरीच माहिती झाली. ह्या देवळांत दशावताराचे खेळ होत, ते पाहण्याचा मला फारच नाद असे, तेणेंकरून मला हिंदु धर्माचें बरेंच ज्ञान झालें. हे दशावतारी कर्नाटकी ब्राह्मण असून, ते स्त्रियांचीं सोंगें वगैरे घेतात ह्मणून नीच मानिले असत; परंतु आतांच्या नाटककारांविषयीं लोकांस तसें वाटत नाहीं, व अशीं नाटकेंही तेव्हां नव्हतीं. नाटकगृहें तर मुळींच नव्हतीं. देवळाच्या आवारांत जागा न मिळाली तर गांवांतील चवाठ्यांत तीं होत.

**इतर प्रस्थें, ब्रह्मचारी, शंकराचारी, इ०.**

आमच्या गल्लींत मारुतीच्या देवळाखेरीज आणखीही कांहीं धर्मसंबंधी प्रस्थें होतीं. एक तैलंग ब्रह्मचारी बहुत वर्षें एका सावकाराच्या घरीं भाड्यानें खोली घेऊन राहिला होता, त्यानें नित्य मोठ्या पाहटेस ( सुमारें ४ वाजतां ) उठून रस्त्यांत "राधे गोविंद, गोविंद राधे" असें मोठ्यानें ह्मणत फिरावें; तेणेंकरून लोकांची साखरझोंप मोडून त्यांस बराच त्रास होत असे. त्या आळींत कोणी नवा मामलेदार आला ह्मणजे त्याला तो त्रास न सोसून त्यानें त्याचें ओरडणें बंद करण्याचा हुकूम करावा, तरी तो आपला क्रम सोडीत नसे. आमच्या वरच्या मनुष्यांस "देवाचें नांव" सकाळच्या प्रहरीं कानीं पडतें ह्मणून आनंद वाटत असे. दुसरें प्रस्थ एका वैष्णव ब्राह्मणाचें होतें. तो सरकारी कामदार होता. त्यानें देवीची पूजा फार माजविली होती. दर शुक्रवारीं पुष्कळ लोक त्याच्या घरीं पूजेस व प्रसादास येत. त्याच्या पूजेचीं भांडीं बहुतेक चांदीचीं असून देव्हारा फार मोठा होता. त्यानें पायांत घागऱ्या बांधून व हातांत विणा घेऊन देवीपुढें नाचावें व गाणीं गावीं. पुष्कळ वैष्णव ब्राह्मण, भट भिक्षुक व सरकारी कामदार ह्या पूजेला येत. मीही तेथें जात असें. ह्यानें दोन अंगवस्त्रें बाळगिलीं होतीं, त्यांविषयीं ब्राह्मणांस कांहीं वाटत नसे! हा कमिसेरी खात्यांत नोकर होता. त्यानें सरकारचा पुष्कळ पैसा खाल्ल्याचा जेव्हां त्याजवर आरोप आला, तेव्हां तो तेथून पळून एका डोंगरांत गोसावी बनून राहिला!

बेळगांवीं शंकराचार्य आले ह्मणजे ते बहुधा मारुतीच्या देवळांत उतरत. श्रावणमासीं त्यांचें तेथें राहणें झाल्यास कोटि शिवलिंगें करण्याचा धडाका चालायाचा. स्मार्त ब्राह्मण हीं लिंगें करण्याचा मखता घेत. ते सुपारी एवढालीं लहान लहान लिंगें करून वस्त्रावर लावून ठेवीत. संध्याकाळीं शंकराचार्यांचा कारकून येऊन त्यांचें माप घेई, ह्मणजे इटांचें किंवा कवलांचें जसें माप घेतात तसें तीं मोजून त्यांस ठरविलेल्या दराप्रमाणें पैसे देई! ह्या कामांत पुष्कळ पक्षपात व लबाडी होत असे. सर्व लिंगें मोजत नसत, चारी बाजूंच्या रांगेंतील लिंगें व सर्व रांगा मोजून त्यांचें क्षेत्रफळ काढीत. लिंग करणारे मधून मधून कमी लिंगांच्या रांगा लावीत. वैष्णव ब्राह्मणांस ही लिंगपूजा अगदीं आवडत नसे. पार्थिव ( मातीचें लिंग ) करणें व त्याचा विक्रय करणें व तें मोडणें हें महापातक आहे असें ते ह्मणत. बेळगांवीं बहुतकरून संकेश्वरचे शंकराचारी येत. त्यांचा इतमाम फार मोठा असे. त्यांस ३० गांवांचें इनाम असून त्यांचें उत्पन्न ३० हजार रु० आहे. शिवाय लोकांपासून जें मिळतें तें निराळें. ते प्रतिवर्षी १० हजार ब्राह्मणभोजन घालतात. त्यांची पालखी आडवी चालते व तिच्या बरोबर दिवसा मशाली पेटविलेल्या असतात!

ह्या " जगद्गुरूस " कोणीं आपल्या घरीं बोलाविणें झाल्यास मोठ्या खर्चाचें काम असे. निदान शेंदीडशें रु० तरी खर्च लागावयाचा. साधारण लोक त्यांच्या दर्शनास जाऊन यथाशक्ति कांहीं दक्षिणा त्यांस देत. आमच्या घरचीं माणसें त्यांच्या प्रसादास गेल्याची मला आठवण आहे. तेथल्या पोळ्या बाजरीच्या भाकरी सारिख्या रटाल्या व भटाऱ्याच्या भाकरी एवढाल्या मोठ्या होत्या. पुरण वांटण्याबद्दल तें पायांनीं तुडवीत. स्वयंपाकाच्या चुली ऐवजीं मोठाले चर खणून त्यांजवर लांकडाच्या फळ्याप्रमाणें लांबट लोखंडी तवे टाकले होते. ह्या जेवणाची मीं घरीं आल्यावर चर्चा केली, तेव्हां स्वामीच्या प्रसादास नांव ठेवूं नये असें मला सांगितलें. भोजनसमयीं दर पात्रीं एक एक रुपाया आह्मीं दक्षिणा दिली. त्याशिवाय आणखीही द्रव्य स्वामीपुढें ठेविलें.

**प्राकृतग्रंथपठन.**

मला प्राकृत ग्रंथ शिकविण्याकरितां एक हरिदास ठेविला होता. जेव्हां माझी त्यांत गति होऊं लागली तेव्हां मी घरांतील बायांस ते वाचून दाखवूं लागलों; शेजारपाजारच्या सोनार वगैरे अब्राह्मण जातीच्या आयाबायाही माझें पुराण ऐकायास येऊं लागल्या.

मी त्या आळींत एक छोटेखानी पुराणिक बनलों. चौरंगावर ग्रंथ ठेवून व मी पाटावर बसून हातांत त्याचीं पानें धरून वाचीत असें. ग्रंथारंभीं मंगलाचरणाचा संस्कृत श्लोक ह्मणावा, व समाप्तीस दुसरा एक श्लोक ह्मणून आरती करावी. कोणी वाया साखर, केळीं वगैरे पोथीपुढें ठेवीत, आणि माझ्या गळ्यांत फुलांची माळ घालीत. हे ग्रंथ वाचण्याचे दीर्घकाळ चातुर्मासांतील रात्री असत, त्याशिवाय वर्षातील अनेक पर्वणीचे दिवशीं ह्मणजे रामनवमी, जन्माष्टमी, महाएकादशी, महाशिवरात्र इ० दिवशीं मी प्राकृत धर्मग्रंथ वाचीत असें. ते ग्रंथ येणेंप्रमाणें होते:—हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, भक्तविजय, संतलीलामृत, शिवलीलामृत, अश्वमेध कथाकल्पतरु, पंढरीमहात्म्य, रुक्मिणीस्वयंवर, गुरुचरित्र इ० हे ग्रंथ त्या काळांत छापले नव्हते व ते मिळविणें कठीण पडे. आमच्या घरीं ज्या पोथ्या नसत त्या आह्मीं दुसऱ्याच्या मागून आणाव्या. समग्र ग्रंथ कोणी एकदम देत नसत, थोडे थोडे अध्याय आणून वाचून परत करावे अशी चाल होती. आमच्यापाशीं हरिविजयाचा ग्रंथ होता तो पंधरा रुपायांस घेतला होता. त्याचें अक्षर फार सुंदर होतें. ( आतां छापील प्रत १ रुपायास मिळते ! )

मुंजीच्या संबंधानें मला जी संध्या वगैरे शिकविली होती, तींत गायत्री

**पाठांतर.**

मंत्र तर नव्हताच, कारण तो कांसार ज्ञातीस जपण्याचा अधिकार नाहीं, असें ब्राह्मण सांगत. तरी मी गोमुखींत हात घालून कांहीं जप करीत असें, त्याची आतां मला आठवण नाहीं. मुंजीच्या वेळीं मला गुरूनें कित्येक गोष्टी शिकविल्या होत्या, त्या अशा कीं, कुत्र्यावर बसूं नये, दोन गाढवांच्या मधून जाऊं नये, उभ्यानें व सूर्यापुढें लघुशंका करूं नये, पाण्यांत पाहूं नये, झाडावर चढूं नये, रात्रीं आरशांत पाहूं नये, इ०. मी व्यंकटेशस्तोत्राचा नित्य पाठ करीत असें, तो केल्याशिवाय जेवीत नसें. तें मला अगदीं मुखपाठ झालें होतें; शिवाय कांहीं पूजापद्धति संस्कृत भाषेंत मला शिकविल्या होत्या, त्यांत शाक्तमताची देवीची पूजापद्धतिही शिकलों होतों.* संस्कृत भाषेंत महिम्न नामक शिवस्तोत्र

* मीं शाक्तमताचा उपदेश घेतला तेव्हां मी बराच मोठा होतों; तो मला एका ब्राह्मण हरिदासानें दिला. त्यानें लिहून दिलेली पूजापद्धति व मंत्र माझ्या चुलत्याच्या कागदपत्रांत मला सांपडले, त्यांतून "श्रीबालामंत्र" जो मी पुष्कळ वर्षें जपत असें तो येणेंप्रमाणें होता:—

आहे, तेंही मला पाठ येत होतें, परंतु त्याचा अर्थ समजत नव्हता. ह्याशिवाय शिव, विष्णु, गणपति यांच्या स्तुतीचे श्लोक, देवीकवच, रामरक्षा, कांहीं आर्या, अभंग, आरत्या इ० पाठ केलीं होतीं.

घरांतील "देवपूजा."

मुंज झाल्यावर मला धर्मसंबंधी क्रियाकर्मे करण्याचे विशेष अधिकार प्राप्त होऊन प्रसंगही मिळूं लागले. घरांतील देवपूजा ह्मटली ह्मणजे दररोज मूर्त्तीस राख, लिंबू वगैरे चोळून घांसून पुसून त्या धुणें; त्यांस गंध, अक्षता, फुलें वगैरे वाहणें; धूपदीप, नैवेद्य दाखविणें हें सर्व मी करीत असें. कधीं कधीं माझे चुलतेही करीत. ही पहिली पूजा झाल्यावर घरचीं दुसरीं माणसें आपापल्या इच्छेप्रमाणें व संकल्पाप्रमाणें कमीजास्त वेळ देवघरांत बसून पूजा, जप वगैरे करीत, परंतु त्याच दिवशीं मूर्त्तीस पुनः स्नान घालीत नसत.

माझीं उपोषणें व व्रतें.

आमच्या घरांत शक्तिउपासना चालत असे हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. त्याशिवाय माझ्या आजोबानें श्रावण मासांतील सोमवारीं व बारा मासांतील प्रदोष शिवरात्र इ० पर्वकालीं शिवालयांत शिवपूजा मोठ्या थाटानें करावी, ती मीं सायंत पाहत बसावें; मुलांस अशी पूजा करूं देत नसत. मंत्रपुष्पांजलीच्या वेळीं मात्र त्यांच्या हातून शिवावर फुलें, बिल्वपत्र वगैरे टाकवीत. मुंज झाल्यावर व्रतें व उपवास करूं लागलों. संकष्टी, विनायकी, बारा मासांतील एकादशा ह्या सर्व मी करीत असें. माझ्या मातोश्रीनें शिवरात्रीस शिवालयांत लक्ष वाती तुपांत जाळाव्या, त्या सर्व जळत पर्यंत मीं तिच्या बरोबर बसावें. आमच्या घरीं कांहींना कांहीं व्रताच्या

"अस्य श्री बालामंत्रस्य ब्रह्माऋषिः निचृद्गायत्री छंदः। श्रीबालांबादेवता ऐं बीजं सौः शक्तिः क्लीं कीलकं श्रीबालांबाप्रसादासिध्यर्थे जपे विनियोगः॥ ध्यानं॥ अरुणकिरणजालै रंजिता सावकाशा विधृतजपवटीका पुस्तका भित्तिहस्ता॥ इतरकरवराढथा फुल्लकल्हारसंस्था निवसतु हृदि बाला नित्यकल्याणशीला॥ १॥ ऐं स्वगुरुगजाननाथ श्रीपादुकां पूजयामि नमः तर्पयामि नमः॥ परमगुरुसदानंदनाथ श्रीपादुकां पूजयामि तर्पयामिनमः॥ परात्परगुरु गणपतिनाथ श्रीपादुकांपूजयामितर्पयामिनमः॥ ऐं क्लीं सौः १०८.॥ मला जी संध्या लिहून दिली होती तिची पोथी वरील कागद पत्रांत सांपडली, ती पुरवणींत दिली जाईल. अब्राह्मण जातीशीं ब्राह्मण लोक धर्माच्या बाबतींत कशी कलम कुचराई करितात याचा ती उत्तम मासला आहे.

व पूजेच्या निमित्तानें बाराही मास ब्राह्मण यायाचेच; त्यांची पूजा, दानें, दक्षिणा ह्या सर्व माझ्या ध्यानांत येत असत. ब्राह्मणाची पूजा केल्यावर त्याचें पादांगुष्ठतीर्थ ( पायाच्या अंगठ्याचें पाणी ) आह्मां सर्वांस प्राशन करायास देत. ब्राह्मणाचा आशीर्वाद ह्मणजे फार मोठ्या मोलाचा वाटत असे, तो घेतेवेळीं घरांतील मुख्यानें पदर पसरून त्याजपुढें बसावें, त्यांत ब्राह्मण आशीर्वादाच्या अक्षता घाली, व आह्मां सर्वांच्या मस्तकांवरही टाकी. एक ब्राह्मण दर शनिवारीं मारुतीची पूजा करायास ठेविला होता, तो आमच्याकरितां एकादशण्या, महारुद्र वगैरे करीत असे.* हा कऱ्हाडा होता. तो जेव्हां आह्मांस कांहीं नैवेद्य वगैरे आणी, तेव्हां आह्मीं ( त्याला न कळूं देतां ) तो फार तपासून घ्यावा, ह्मणजे त्यांत विष घातलें असेल अशा भयानें मीठ वगैरे कांहीं परीक्षा पाहण्याचे पदार्थ टाकून पाहावें, अथवा कुत्र्यामांजरास त्यांतून कांहीं घालावें!! ह्या पूजेबदल त्या ब्राह्मणाची आमच्यावर वारंवार बरीच बाकी चढावी व ती चुकवितांनां त्यापाशीं आह्मांस सूट मागून घेणें पडत असे! तथापि ब्राह्मणाशिवाय कोणतेंही धर्मकृत्य आमच्या एथें चालत नसे.

**जोशी.**

उपाध्याशिवाय जोशाचेंही आमच्या घरीं येणें जाणें होतें. त्यानें एकादशी, अमावास्या इ० तिथींस येऊन आह्मांस पंचांग सांगावें,† ग्रहांचीं दानें सांगावीं, आमच्या घरीं लेंकरूं जन्मलें ह्मणजे त्याचें यादवान लिहावें; कांहीं शुभकार्य असलें तर तें

---

* ब्राह्मणाच्या अनुष्ठानांवर त्या काळीं हिंदूंचाच काय पण पारशी लोकांचा देखील मोठा भरंवसा असे. एकदां वेळगांवांतील एका प्रख्यात पारशी व्यापाऱ्यावर कांहीं संकट आलें असतां तें निवारणार्थ त्यानें माझ्या वडिलांच्या मार्फत २५-३० ब्राह्मण जवळच्या वैजनाथाच्या डोंगरांत अनुष्ठानास बसविलें होते; त्यांस नित्य खीरपुरीचें भोजन व आठ आठ आणे दक्षिणा मिळत असे. आमच्याकरितांही वारंवार ब्राह्मण अनुष्ठानें करीत.

† त्या काळीं छापील पंचांगें मुंबईंत नुकतींच निघालीं होतीं, परंतु तिकडे त्यांचा फारसा उपयोग करीत नसत. आमच्या जोशाचें पंचांग लहानशी गुंडाळी असे, तींत तिथी, वार, नक्षत्रें इ० अंकांनीं दर्शविलेलीं असत. दरवर्षी पुष्कळ ब्राह्मण आमच्या एथून पंचांगाकरितां एक एक फुलसकेपाचा ताव मागून नेत, तेवढा त्यांच्या पंचांगास बस होत असे. पंचांगाची गुंडाळी जोशीबुवा पागोट्यांत खोंचून ठेवीत.

करण्याविषयीं मुहूर्त सांगावे. जोशाच्या बोलण्यावर माझा पूर्ण विश्वास बसला होता. शनीचें व साडेसातीचें मला फार भय वाटे. माझ्या आईनें वारंवार मजवरून तेल उतरून मांगणीस द्यावें. मीं स्वतां पंचांग पाहण्यास शिकलों होतों, कोणाचीही रास किंवा जन्मनाम विचारून त्याच्या ग्रहांचें बलाबल मला सांगतां येत असे. एका ज्योतिष्यानें मला पंचांग करण्याचे कांहीं श्लोकही शिकविले होते, परंतु तें शेवटास गेलें नाहीं.*

भूतबाधा, पंचाक्षरी, मंत्री; ब्रह्मदेव; साठ वारीं.

जोशीबुवाशिवाय पंचाक्षरी व मंत्री यांचीही आह्मांस गरज लागत असे. मुलेंमाणसें अजारी पडलीं, संसाराच्या किंवा चाकरीच्या संबधानें कांहीं अरिष्ट आलें ह्मणजे भगतांस व पंचाक्षऱ्यांस बोलावणें होत असे. हे लोक बहुधा कोंकणी असत. त्यांच्या अंगांत कोंकणी देवांचीं वारीं येत. त्यांनीं सांगावें कीं, तुमचें मूल झपेटलें आहे, अमक्या भूतांचा अमक्या ठिकाणीं

---

* आमच्या घरांत जन्मपत्रिकेचीं कित्येक मोठमोठीं भेंडोळीं होतीं. ह्या पत्रिका करण्यास पुष्कळ खर्च लागतो. मुंबईंत गुजराथी जोशी निदान शें पन्नास रुपये तरी घेतात. त्यांत मनुष्याच्या जन्मापासून मरणापर्यंत प्रत्येक वर्षीं अथवा प्रत्येक ग्रहदशेच्या काळीं काय काय होईल हें लिहिलें असतें. ग्रहांचीं रंगित चित्रें असतात. अशी एक माझ्या वडिलांची पत्रिका माझ्यापाशीं अद्याप आहे, तिची लांबी चाळीस हात आहे. परंतु माझी कोठें गेली हें ठाऊक नाहीं. एथें एक गोष्ट विशेषेंकरून सांगितली पाहिजे, ती अशी कीं, जरी मी फलज्योतिषावर पूर्ण विश्वास ठेवीत असें, तरी कांहीं काळानें माळव्यांतील सिहोरनगरस्थ सुभाजी बापू यांनीं केलेला एक छापील ग्रंथ माझ्या हातीं आला, त्यांत भास्कराचार्य व कोपरनिकस् यांच्या ज्योतिषाचा मेळ घालून दिला होता व पौराणिक ज्योतिष, आणि शकुन, मुहूर्त इ० चें युक्तीनें व हिंदु धर्मग्रंथांच्या आधारानें खंडण केलें होतें. तें वाचून माझा विश्वास बराच ढळला, आणि ग्रहादिकांचें भय माझ्या मनांतून कमी कमी होत गेलें. त्यांत एक संस्कृत श्लोक होता तो आतां सर्व मला आठवत नाहीं, परंतु त्याचा आरंभ असा होताः—" एकादशस्थे गोविंदे " आणि शेवट " किंकुर्वंति ग्रहाःसर्वे शनिरंगारको गुरुः " ह्मणजे अकरावे इंद्रियाचे ठाईं ( वेदांत मताप्रमाणें अंतःकरण हें इंद्रिय आहे ) ईश्वर असला तर शनि, मंगळ इत्यादि ग्रह काय करणार आहेत ! हा श्लोक मी पाठ करून वारंवार म्हणावा व दुसऱ्यासही ह्मणून दाखवावा. हें पुस्तक आतां कोठें दृष्टीस पडत नाहीं; तें कोणापाशीं असलें तर पुनः छापलें असतां फार उपयोगीं पडण्याजोगें आहे.

भक देणें राहिलें आहे; अथवा तुमच्या हपिसांतील अमक्यानें तुह्मांला करणी केली आहे, तर तुह्मी उलट करणी करा; मग त्यांच्या सांगण्याप्रमाणें बळी व उतारे व अंगारे यांची एकच गर्दी उडत असे. एकदां आमच्या दारापुढें रात्रीस कोणी कांहीं लिंबें, सुया, उडीद, गुलाल वगैरे आणून ठेविला, तेव्हां घरांतील माणसें फारच घाबरलीं.

आमच्या घराच्या मागल्या सोप्यांत ब्रह्मदेव या नांवाचे दोन तीन वाटोळे दगड मांडलेले असत, [ हे दगड बेळगांवांत पुष्कळांच्या घरीं आहेत. ] त्यांस महिन्यांतून एकदां नारळ फोडावा लागत असे. याशिवाय दर अमावास्येस माझ्या चुलत्यानें आसपासच्या भूतांस शेरणी द्यावी; ह्मणजे लाह्या, खारीक, खोबरें, बतासे यांचे तुकडे एकत्र करून परसांत फेंकावे.

हीं खटलीं बहुत दिवस चालत, तेणेंकरून द्रव्यक्षय होई इतकेंच नाहीं, तर ज्यांचीं नांवें हे भगत घेत त्यांच्यावर संशय येऊन द्वेष, वैर व भांडणें वाढत. कधीं कधीं हेच भगत आमच्या विरुद्धपक्षास मिळून व चाहड्या सांगून आगीवर तेल ओतून भांडण चेतवीत. हा प्रकार बाहेरच्या लोकांविषयीं मात्र चालत असे असें नाहीं, तर घरांतल्या घरांत देखील ह्या भगतांनीं भांडण लावून द्यावें व तें कधीं कधीं फार माजावें.

एकदां माझ्या मायआजीच्या घरची एक बाई मुंबईहून आमच्या घरीं बरेच दिवस येऊन राहिली होती, तिच्या आंगांत साठ वारीं येत ! त्या सर्वांची नांवें मला आतां आठवत नाहींत, परंतु कित्येकांचीं येणेंप्रमाणें होतीं; पद्मावंती, मोकासनी, बापदेव, चेड्या इ० ह्या वाऱ्यांस बकऱ्याची सागुती, कोंबडें, दारू, अंडीं, वगैरे लागत. ह्या बाईला आह्मी वारंवार “ देवाशीं बसवावें ” [ ह्मणजे तिला अंगांत वारें आणायास सांगावें ] व अडलेल्या गोष्टींची विचारपूस करावी, ती अशी कीं, बाप गांवीं गेले आहेत ते केव्हां येतील; अमुक मनुष्य आमचा वैरी आहे त्याला काय करावें, ह्मणजे त्याचा नाश कसा करावा ? अमुक जिनस हरवली ती कोणीं नेली ? गांवीं गेलेल्या मनुष्यांचें पत्र कां येत नाहीं. अशा प्रश्नांस जीं उत्तरें मिळत तीं सर्व खरीं असत असें नाहीं. कधीं कधीं बोलाफुलास गांठ पडे, व कधीं कधीं काहींच अनुभव येत नसे; तरी त्या सर्व वाऱ्यांवर आमचा पूर्ण विश्वास असून त्यांजविषयीं आमचे मनांत मोठी पूज्यबुद्धि होती.

ह्या बाईच्या आंगांत हीं वारीं येण्याचा प्रकार फार सोपा होता. तिनें आपले केश मोकळे सोडून उकड बसावें [ ती सकेशा विधवा होती ] व हात जोडून ते कपाळाशीं धरावे. तिचे डोळे झांकलेले व श्वासोच्छ्वास कांहीं वेळ स्तव्ध झालेला दिसे. अशा अवस्थेंत क्षणभर राहिल्यावर तिचें अंग मागें पुढें डुलूं लागावें व श्वास प्रथम घोगरा नंतर मोकळा होऊन तिनें आसन बदलून खुरमांडी घालून बसावें. हात मात्र गुडध्यावर टेंकलेले व त्यांचीं अंगठ्याजवळचीं दोन बोटें लांबविलेलीं व बाकीचीं मुठींत वळून घेतलेलीं असत. वारें फार बोलत नसे. आह्मी विचारलेल्या प्रश्नांस मात्र उत्तरें देऊन बाकीचा वेळ घुमत राही. अंगांत वारें येण्याच्यापूर्वीं त्याच्यापुढें ऊद किंवा कापुर जाळावा लागत असे. तें आल्यावर त्यानें स्वतांही बराच कापुर जाळावा. एका प्याल्यांत पाणी घालून त्यावर कापुर पेटवून तरंगत ठेवावा, व त्या कापराच्या बाजुबाजूनें पाण्यांत चिमूटभर तांदूळ किंवा राख हळु हळु सोडावी आणि तरंगत राहिलेल्या तांदळांच्या व राखेच्या चित्रविचित्र आकृतींकडे पाहून आमच्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं, कधीं कधीं नागवेलीचें पान कापराच्या वातीवर धरावें, व त्याजवर उठलेल्या वेड्यावांकड्या आकृतींवरून उत्तरें द्यावीं, तीं अशीं: "अरे, कागद वाटेंत आहे," "लेंकरूं चिंचेच्या झाडाखालीं झपेटलें," "वैऱ्यानें देव उठविले आहेत," "अमका देव रुसला आहे." वारें जातेवेळीं तें भूमीवर अंग टाकून जात असे. जर दुसरें वारें यायाचें नसलें तर त्याच्या अंगावर आह्मीं पाणी शिंपडावें, ह्मणजे अंग झटकून झाड मोकळें होई, पण येणार असलें तर पूर्वीप्रमाणें आसनावर बसून येई. कित्येक वारीं येतांना जमिनीवर लोळत, कित्येक उठून नाचत, कित्येकांस हातांत नाचतेवेळींतरवार किंवा छडी द्यावी लागत असे. देवीचीं वारीं आलीं ह्मणजे त्या विधवा बाईनें आपल्या कपाळास मळवट भरावा, व डोक्यांत फुलें घालावीं आणि वारें गेल्यावर तीं काढून टाकावीं व मळवट पुसून काढावा.

अंगांत वारीं येण्याची रीत.

अंगांत वारीं येण्याचा व खेळण्याचा हा साधारण प्रकार सांगितला. कित्येक पर्वणींच्या काळीं व विशेष प्रसंगीं त्यांच्यासाठीं मोठी तयारी करावी लागत असे. त्यांत कोंबडीं, बकरीं, अंडीं, दारू, मेवामिठाई, पक्कान्नें, पुष्कळ फुलें व सुवासिक द्रव्यें आणावीं लागत. ह्या प्रकाराला मांड किंवा मंडळ भरणें

ह्मणत. तेव्हां पुष्कळ वारीं एका मागून एक अशीं येऊन खाऊन पिऊन, खेळून आह्मांस प्रसाद ह्मणजे त्यांच्या पुढें ठेविलेल्या नैवेद्यांतून कांहीं पदार्थ देऊन जात. ह्या खेळांत संबळ, सनई, ताशे, ढोल वगैरे वाद्यें वाजवावीं लागत.

असे प्रकार पाहून मलाही कधीं कधीं अंगांत वारीं येतील तर बरें असें वाटावें, परंतु मी बेळगांवांत असतांना ही इच्छा पूर्ण झाली नाहीं.

**सर्पभक्ति.** आमच्या घरांत माळ्यावर एक सर्प होता, तो कधीं खालीं येत नसे. वरच्यावर त्यानें उंदीर खाऊन रहावें. उंदरांच्या मागें लागला ह्मणजे त्यांचा धुडकूस व ह्याचें सरपटणें किंवा उड्या टाकणें आमच्या ऐकण्यांत बहुधा रोज रात्रीं येत असे. त्यास माझ्या पणजीनें व आजीनें हात जोडून अशी विनंती करावी कीं, आह्मी तुझ्या पोटापाखांत आहों, आमचा परतपाळ कर. त्याला नागपंचमीच्या व दुसऱ्या कित्येक दिवशीं दूध भात वगैरे वर ठेवीत असत.

**चेटकिणी.** वारीं, पंचाक्षरी, मंत्री यांच्या खेरीज कित्येक चेटकिणी बायका घरांत पुरुष नसले ह्मणजे चोरून भिक्षा मागण्याच्या मिषानें किंवा झाडपाल्याचीं ओषधें विकण्याच्या मिषानें आमच्या-कडे येत, त्यांजपासून आह्मीं कोल्ह्याचें शिंग, कांहीं भारलेली वनस्पति, मणी, दोरे, अंजन, वाघनखें वगैरे विकत घ्यावीं. आणि त्यांनीं सांगितलेले मंत्र प्रयोग करून पहावे.

**हिंदु धर्मावि-रुद्ध संशय.** आमच्या घरीं जे ब्राह्मण पूजा वगैरे सांगावयास येत ते आमच्याकडून संकल्पाचा मंत्र ह्मणवीत असतां सर्वदां "पुराणोक्तफल-प्राप्त्यर्थं" (पुराणानें सांगितलेले फलप्राप्तीसाठीं) असें आह्मांस ह्मणावयास लावीत, जेव्हां मला ह्याचा अर्थ समजूं लागला, तेव्हां हे उपाध्ये आह्मांला "वेदोक्तफलप्राप्त्यर्थं" (वेदानें सांगितलेलें फल मिळविण्यासाठीं) असें कां ह्मणायास लावीत नाहींत अशी माझ्या मनांत शंका येऊं लागली, व मागें सांगितल्याप्रमाणें मी जेव्हां घरच्या बाया मनुष्यांस पूजा सांगूं लागलों, तेव्हां कधीं कधीं वे० फ० प्रा० असें ह्मणावें!

याप्रमाणें हिंदुधर्माचरणाच्या घमेंडींत असतां माझ्या कानीं त्याविरुद्ध

कांहींच गोष्ट पडली नाहीं असें नाहीं. मिशन स्कुलांत असतांना तेथील नियमाप्रमाणें आठवड्याच्या एका इंग्लिश निबंधांत मी एकदां महाएकादशीची गोष्ट लिहिली होती, ती पाद्री साहेबानें वाचून पाहिल्यावर ती फार वाईट आहे असा शेरा तिजवर लिहिला, तो माझ्या मनाला फार वाईट लागला. तसेंच आमच्या वर्गांतील एक मुलगा शिमग्याचीं कापडें अंगावर घालून शाळेस आला होता, त्याचा त्याच साहेबानें खडसून निषेध केला, तेव्हां मला फार वाईट वाटलें व भयही वाटलें. तसेंच तर्कशास्त्र या नांवाचें एक पुस्तक अमेरिकन मिशनानें १८४७ सांत छापलें होतें, तें त्याच वर्षीं माझ्या वाचण्यांत आलें. त्यांत हिंदुधर्माविरुद्ध सूत्रप्राय कित्येक वाक्यें होतीं, तीं वाचून मला फार राग आला, आणि त्या वाक्यांप्रमाणें ख्रिस्तीधर्माविरुद्ध वाक्यें उपदेशचंद्रिका नामक मासिकपुस्तकांत जेव्हां माझ्या दृष्टीस पडलीं तेव्हां मला समाधान वाटून चंद्रिकेच्या सूचनेप्रमाणें मी तीं एका कागदावर उतरून घेऊन तो कागद त्या पुस्तकांत चिकटून दिला! याप्रमाणें मी ख्रिस्तीधर्माचा विरोध करीत असतांही प्रभु त्या काळीं माझ्या अंतःकरणांत जीवनाचें बीज पेरित होता, व तें यथाकाळीं उगविण्याची सर्व सिद्धताही करीत होता, असें मला आतां समजतें.

**सिद्धि प्राप्त होण्याकरितां मंत्रादि साधनें.**

वर सांगितलेलीं धर्मकृत्यें व धर्माचरणें करीत असतांही माझी तृप्ति झाली नाहीं, तर आणखीही कांहीं साधनें करण्याची मला इच्छा उत्पन्न झाली. कांहीं अमानुष सामर्थ्य प्राप्त करून घ्यावें ह्या हेतूनें कोणापासून मीं मंत्र लिहून घेतले, त्यांत अन्नाची वृद्धि करण्याचे कित्येक मंत्र होते. ह्यांचा अर्थ असा आहे कीं, हे मंत्र अमुक लक्ष जपल्यानें थोडक्या स्वयंपाकांत पुष्कळ मनुष्यांस भोजन घालतां येतें, अथवा घरांत थोडकें धान्य असतां तें पुष्कळ दिवस चालतें. दुसरेही कित्येक सिद्धीचे मंत्र मी जपत असें, हे मंत्र घरांतील सर्व मनुष्यें निजल्यावर खोलींतच स्नान करून जपास बसावें. अन्नवृद्धीचे मंत्र जपतांना पुढें अन्नपूर्णेची मूर्ति मांडलेली असे. हें माझ्या आईला मात्र ठाऊक होतें. कित्येक मंत्र चंद्रसूर्यांच्या ग्रहणसमयीं जपण्याचे होते. परंतु त्यांपासून कांहीं लाभ झाला नाहीं. तरी ते खोटे आहेत असें मला वाटलें नाहीं; जपांत कांहीं चूक झाली असावी असें वाटे, कारण त्याची संख्या लक्षावधि असून त्यासंबंधीं कित्येक कडक नेमही पाळले पाहिजेत असें ते

मंत्र लिहून देणारानें सांगितलें होतें.* एक नेम असा होता कीं, मंत्र जपतांना रजस्वला स्त्रीचा शब्द कानीं पडूं नये.

आमच्या कुटुंबास औषध देणारा एक रमण शेटी नांवाचा कोमटी जातीचा ह्मातारा वैद्य होता, तो रोग्यास औषध उपचार करीत असून मंत्रोपचारही करीत असे. ह्याजपासून माझ्या वडिलांनीं एकदां घरांतील सर्व मुलांकरितां ताईत करून घेतले होते; ते पुतळीच्या सोन्याचे पत्र्यावर कांहीं मंत्र (अक्षरें) लिहून केले होते. ह्या पत्र्याची वळकटी करून चांदीच्या भूषणांत बंद करून आमच्या गळ्यांत किंवा बाहूला बांधली असे. एकदां पैशाची फार गरज लागली तेव्हां माझ्या वडिलांनीं हे सर्व ताईत मोडून त्यांचे टके केले!

ताईत.

किमयेच्या योगानें हलक्या धातूचें सोनें करावें असें मला वारंवार वाटत असे, व तें करण्याचे कित्येक प्रयोगही मी करून पाहिले. परंतु ईश्वरकृपेनें मला कोण्या धुताऱ्याची सोबत लागली नाहीं, ह्मणून बरें झालें. तर ह्या भूलीविरुद्ध माझ्या वाचण्यांत एक इंग्रजी लेख आला, तो असा कीं, ईश्वरानें जी मूळ वस्तु

किमया; परिसाचा शोध.

---

* हे मंत्र माझ्या चुलत्याच्या कागदपत्रांत शोध करून पाहतां सांपडले. ते माझ्या हातचे असून अक्षराच्या वळणावरून ते सुमारें १८४६ सांत ह्मणजे मी १५–१६ वर्षांचा असतांनां लिहिलेले आहेत असें अनुमान होतें.

१ मंत्र अन्नपूर्णेचा—

ॐ अन्नपूर्णा अन्न पुरे, घृत पुरे गणेश–जलदेवता ब्रह्मा पुरे रक्षाकरे गुरूदेव महेश- एक लक्ष जप.

२ ॐ फाटी पोहोप भय प्रकाश बीजरली आया हात पांच लड्डू शेर शेंदूर रिद्धिसिद्धि लेआ व माता गंगा. संपूर्ण भरपूर. नमो लक्ष्मी नारायणा. जप १२५०००.

३ ॐ हरियंग हरियंग धं करण महावीरा सर्व व्याधी विनाशक वीर व फुटक भयं- नास्ती खोरंका महावळा जत्र तिष्टतिसार देवलीस्त असूर पुस्तक भय रोग अस्तत्रं प्रणीसती बात पित्त कपोतभयत तर राजभय नास्ती ॥ अंती करण जपा करे स्तखिनी भूत वेताल राखसी प्रभुवत्ति नानाकाले मरणश्चैव व सर्पोंचा दर्शतेचा अग्निचोरो भय नास्ती घंटा करण नमोस्तुते ॥ इती श्री हनुमान बीज मंत्र राजकेतज पंथके घोर मेचोरके बंधमे जिसके बीचमे श्रीहनुमान देव त्राण कीर छी हनुमान तारे बीद मही अंजनीसुताय धी मही. तनो हनुमान प्रचोदयात. हनुमान जप संपूर्ण ॥

उत्पन्न केली आहे तिचें द्रव्यांतर मनुष्याला कधीं करितां येणार नाहीं; जसें गव्हांचे तांदूळ कधीं होणार नाहींत तसें तांब्याचें सोनें कधीं होणार नाहीं. ह्या गोष्टीवर माझा एकदम इतका दृढ विश्वास बसला कीं, मी किमयेचा नाद अगदीं सोडून दिला व ज्याला त्याला ही गोष्ट सांगूं लागलों. तरी परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें ह्या कल्पनेवरून माझा विश्वास बहुत वर्षें उडाला नाहीं. याचें एक कारण हिंदु ग्रंथांत वारंवार ही गोष्ट दाखल्यासाठीं घेतलेली माझ्या वाचण्यांत आणि अशा प्रकारें सोनें झाल्याच्या कल्पित गोष्टी वडील पुरुषांच्या तोंडच्या ऐकण्यांत याव्या. परीस शोधण्याचें मला इतकें वेड लागलें होतें कीं मी लोखंड जवळ बाळगून रानांत डोंगरांत जाऊन तें तेथील दगडांस लावीत फिरावें !

**पीरांची भक्ति.**

आमच्या घरचीं मनुष्यें हिंदु धर्मातील दैवतांशिवाय मुसलमानांच्या पीरांची भक्ति करीत असत. बेळगांवांत असतखान नांवाच्या पीराचा प्रसिद्ध दर्गा आहे, त्यास माझे चुलते दर आठवड्यास एकदां नेमानें जात असत, *तेव्हां मुलांसही बरोबर नेत. पीराला साखर,

ॐ पेत प्याला भयप्रकाश नमरे जोगी न आवे अवतार । गलेमे गोदडी गजेंदरकी माला. सारकी कोठरी. वज्रकाला. सारका धागा. अमृत प्याला भरभर पीया. गुरूदेवदत्त अवघड मतवाला. पाल पाल चार पाल रस्त पाल. कोण कोण बीर. नारायण बीर नरसींग वर कालकाभवानी बीर अजयपाल चकवाबीर महाकालभैरव वीर. जो कोई हमारी कथनी करे निंदा करे तुरूत मरे. महाकाल भैरवका चक्र चले—फटस्वाहा. । या मंत्राचें प्रमाण ७०००.

यांतून पहिला मंत्र अन्नाचा पुरवठा होण्याकरितां अन्नपूर्णा नामक देवीचा आहे. दुसरा त्याच विषयाचा आहे परंतु तो कोणाचा आहे हें आतां सांगवत नाहीं. तिसरा हनुमंताचा आहे, व चौथा कालभैरव वगैरे देवतांचा आहे, परंतु त्याचा जप करण्याचा हेतु काय असेल हें आतां समजत नाहीं.

अशा मंत्रांचा कांहीं अर्थ लागतो, कांहीं लागत नाहीं. कित्येक शब्द उगीच घातलेले असतात. याशिवाय मी त्या वेळीं जें गोंसाव्याच्या तोंडचें ऐकून लिहून घेतलें त्यांत बऱ्याच चुका पडल्या असतील.

* ह्या असतखानासही मारुतीप्रमाणें ग्रामरक्षक समजतात् याची एक मशीद बेळगांवच्या किल्ल्यांत आहे. ह्याला हा किल्ला विजापूरसरकाराकडून जहागीर मिळाला होता. तो सन १५४९ सांत मरण पावला. त्यानें हत्तीस लगाम घालून चालविण्याचा

सबजा, फुलें, खिचडी, मलिदा असे पदार्थ द्यावे. तेथल्या फकिरांस खैरात द्यावी, साखर वांटावी, व सर्व मलिदा पीरापुढें ठेवून प्रसाद ह्मणून कांहीं साखर मात्र परत आणावी. ह्या पीरास व दुसऱ्या पीरांस आमच्या घरांतील मनुष्यें नवस करीत. माझ्या भावाचे देवीनें डोळे गेले होते ते बरे होण्याकरितां बेळगांवाजवळ मुगुटखान हुबळी नांवाच्या एका खेड्यांत एक नवीन पीर उत्पन्न झाला होता त्याकडे दर आठवड्यास त्याला घेऊन जात, परंतु त्यापासून कांहीं झालें नाहीं, श्रम व पैसे मात्र फुकट गेले. ( ह्या भावाच्या डोळ्यांकरितां अशा प्रकारचे मांत्रिक उपाय पुष्कळ केले, व त्यांत सुमारें ५०० रु० खर्चही आला, परंतु तो सर्व व्यर्थ गेला. ) तसेंच घरांत कोणी रोगी पडलें अथवा कोणास भूतबाधा झाली, असें वाटलें तर एखाद्या नामांकित सैयद किंवा फकिरापासून कागदावर कांहीं मंत्र लिहून आणून त्याची वळकटी गळ्यांत बांधीत किंवा तो कागद पाण्यांत बुचकळून तें पाणी प्यायास देत. *

---

यत्न केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. त्याच्या मशिदींत त्याचें चिलखत, तलवार व शिशाचे जोडे आणि कुराण ह्या जिनसा अद्याप आहेत. त्याचे जोडे एका मनुष्यास उचलतां येणार नाहींत इतके जड आहेत. ते घालून तो किल्ल्याच्या खंदकावरून उडी मारीत असे अशी दंतकथा आहे. असतखानाच्या सांप्रतच्या पराक्रमाविषयीं असें ह्मणतात कीं, त्याच्या भयानें गांवांत जरीमरी येत नाहीं! पण ही गोष्ट अनुभवसिद्ध नाहीं, इतकेंच मात्र.

* माझ्या चुलत्याच्या कागदपत्रांत पुष्कळ यंत्रें लिहिलेलीं सांपडलीं, त्यांपैकीं कित्येकांचे उपयोग मात्र येथें सांगतों. "डोळ्यांची व्यथा दूर होण्याचें यंत्र."—"हें यंत्र बांधणें चिंता जाईल."—"हें यंत्र बांधलें असतां विष उतेरल."—"हें यंत्र ताईत घालून गळ्यांत बांधिजे, सर्व जन वश्य होईल."—"हें यंत्र रडते लेंकरास बांधिजे, उगें राहील."—"हें यंत्र तुळसीपत्रावर लिहून रोज मुलास खाण्यास देणें, विद्या लवकर येईल." हीं यंत्रें कांहीं अक्षरांचीं व कांहीं अंकांचीं आहेत. त्ीं येणेंप्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| ऱ्ही | ही | द्री |
| ग | जी | ग |

| | | |
|---|---|---|
| ३ | ११ | ६ |
| ९ | ७ | ४ |
| ८ | २ | १० |

कांहीं यंत्रें वाघ वगैरे जनावरांच्या आकृतीचीं असून त्यांत अक्षरें व शब्द लिहिलेले आहेत. दुसरीं कित्येक यंत्रें जारण मारण, वशीकरणसंबंधी आहेत.

**मारुतीस विनंति लावणें.** आईला कांहीं संकट पडलें ह्मणजे तिनें मारुतीस विनंति लावायास रात्रीचें जावें, तेव्हां तिच्या बरोबर मीही जात असें. पुजाऱ्यानें मारुतीच्या अंगाला सुपाऱ्या किंवा नागवेलीच्या पानांचे तुकडे चिकटवावे; कधीं कधीं तांदूळही लावावे. नंतर डावी किंवा उजवी दे असें मागून त्यांतून कांहीं सुपाऱ्या वगैरे पडत तोंपर्यंत गाऱ्हाणें घालीत व वाट पाहत बसावें. ह्याबद्दल पुजाऱ्यास दरखेपेस एक दोन रु० द्यावे लागत.

**धनगरी देवास विचारायास जाणें.** बेळगांवांत कोणी एक धनगर होता त्याच्या घरीं कांहीं दैवत असे, त्यापाशींही आमच्या घरचीं मनुष्यें विचारपुस करायास जात. मीही एकदां आपल्या चुलत्याबरोबर रात्रीं गेलों होतों. वाटेंत आमच्या पुढें एक उंच मराठा शिपाई हातांत छडी घेऊन चालला होता, धनगराचें घर गांवाबाहेर असून बरेंच दूर होतें, त्या वेळीं चांदणें टिपूर पडलें होतें. अंगणांत पुष्कळ मेंढरें बसलीं होतीं, त्यांच्या मधून आह्मीं झोंपडींत शिरलों. तेथें एक पितळेचा मुखवटा होता, त्यापुढें धनगर बसलेला होता. त्याच्या हातांत एक वेतकाठी होती. त्यानें आमचें बोलणें ऐकून घेतल्यावर धूप जाळून त्याच्या धुरावर ती काठी आडवी धरली व ती वाटोळी फिरवीत व तिच्याकडे पहात असतां आमच्या प्रश्नांस उत्तरें दिलीं. त्याच्या अंगांत वारें आलें होतें किंवा नाहीं हें मला समजलें नाहीं, परंतु तो सर्व देखावा आठवण केली असतां माझ्या डोळ्यांपुढें अद्याप येतो व पवित्र शास्त्रांत सांगितलेली शौलाची एनदोरच्या चेटकिणीच्या घरीं जाण्याची गोष्ट कांहीं प्रकारें अशीच असेल असें वाटतें.

**सण पाळण्याची हौस.** ही माझ्याठायीं अतिशय होती. जरी आमच्या घरीं गणपति आणण्याची रूढि नव्हती, तरी गणपतीचा सण आला ह्मणजे मी पुष्कळ मुलांस बरोबर घेऊन गांवांतील गणपति पाहण्यास घरोघर जावें, व त्यांच्या रंगारूपावर टीका कराव्या. गरीबाच्या घरीं कोनाड्यांत बसलेला गणपति पाहून त्याची आह्मास दया यावी, तरी त्यालाही नमस्कार करून चालतें व्हावें, कसबिणींच्या एथील गणपतीची आरास पाहण्यास आह्मांला कांहीं लाज वाटत नसे, तेथें तर आह्मी अधिक वेळ उभें राहावें. दसऱ्याच्या सणांत सोनें वांटण्याविषयीं मी

फार आवेशी होतों. शमीचा श्लोक मला येत असे. तसेच संक्रांतीचे तिळ-गूळ चित्रविचित्र कागदाच्या पेटींत घालून मित्रांस द्यावे, व मुंबईस टपालांतून इष्टमित्रांस पाठवावे. होळीचा सण जरी मला आवडत नव्हता, तरी एकदां मित्रमंडळीनें मला घरांतून जबरीनें ओढून काढल्यावर त्यांच्या बरोबर होळीचा होळकर बनण्यास मला लाज वाटत नसे. तसेंच मोहरमाच्या सणांतही मी गांवांत फार हिंडावें. वाघांचें नाचणेंउडणें व कुस्त्या पाहण्यांत माझा वेळ फार जात असे. रात्रीं ताबूत पाहत फिरावें. दर वर्षीं मोहरमांत माझ्या आईचा कोणत्या तरी पिरास केलेला नवस फेडावयाचा असायाचाच. त्याकरितां मला व दुसऱ्याही मुलांस फकिरी देत, ह्मणजे आह्मी फकिराचा पोषाक करून व गळ्यांत नाडे घालून हातांत झोळी व तवक घेऊन पांच घरें भिक्षा मागून आणावी. हीं आमचीं सोंगें माझ्या ब्राह्मण मित्रांस आवडत नसत. त्यांनीं "तुझी सुंता झाली कायरे?" असें ह्मणून मला चिडवावें. बेळगांवाकडील ब्राह्मण मोहरमांत आपल्या मुलांस फकिरी देत नाहींत. अहमदनगराकडे कोणी कोणी ब्राह्मण नवस फेडण्याकरितां मोहरमांत फकीर होतात. शूद्र जातीचे लोक तर चहुंकडे फकीर होतात, व कित्येक जण तर डोले ( ताबूत ) देखील करितात.

**जैनधर्मावरील अश्रद्धा; वैष्णवांचें पाखांड.**

याप्रमाणें मी हिंदुधर्माचें अनेक प्रकारें व मुसलमानी धर्माचें कांहीं प्रकारें आचरण करीत असतां जैनधर्माकडे माझें किंवा माझ्या घरच्या मनुष्यांचें मन कधींच वळलें नाहीं. लिंगाईत धर्माचे जंगम आमच्या दाराशीं भिक्षेस येत त्यांस आह्मीं भिक्षा घालावी, पण जैन धर्माचे जती कधीं येत नसत. हें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, बेळगांवांत पुष्कळ जैन असून तेथें पारसनाथाचें देऊळही आहे. परंतु त्याची मूर्त्ति दिगंबर (नग्न) आहे, ह्मणून तिचें दर्शन घेऊं नये असें मला जो ब्राह्मण शिकवायास ठेविला होता त्यानें सांगितलें होतें. त्यामुळें त्याच्या देवळांत मी किंवा माझ्या सोबतीचीं मुलें कधीं जात नसत. केवळ एकदां त्याच्या अंगणांत गेल्याचें मात्र मला आठवतें. जैनाचे दिगंबर जति त्या काळांत गांवांतून फिरत. त्यांच्या हातांत मोराच्या पिसांचा कुंचा, कमंडलु व खाकेस झोळी असायाची. त्यांस पाहून आह्मीं मुलांनीं हंसावें. पण ते आह्मांशीं बोलत नसत. ह्या जतींस कोणी जैनानें घरीं भोजनास बोलाविलें असतां घरच्या बायकांनीं दिगंबर होऊन विहिरीचें पाणी आणावें

व त्याच स्थितींत असतां स्वयंपाक करावा, व सूप आड धरून तो त्यांस वाढावा, अशा गोष्टी आमच्या कानीं पडत. एकदां बेळगांवांत जैनांचा गुरु आला होता, त्याची पालखी हिंदुलोकांनीं आपल्या देवळावरून जाऊं नये ह्मणून तिला अटकाव केला, तेव्हां मोठी गडबड होऊन ती एक रात्र रस्त्यामध्यें राहिली. मग सरकारच्या लोकांनीं येऊन बंदोबस्तानें तिची पुढें रवानगी केली.

वैष्णवमताविषयीं मला संस्कृत शिकविणाऱ्या स्मार्त ब्राह्मणानें तें पाखांड आहे व ५०० वर्षांनीं आपोआप मोडेल असें सांगावें. वैष्णवांच्या देवळांत मी क्वचित जात असें. व्यंकोबा व अनंतशयन ( शेषावर निजलेला ) अशीं दोन वैष्णव देवळें बेळगांवांत प्रसिद्ध आहेत. वैष्णव ब्राह्मण स्मार्त ब्राह्मणांपेक्षां फार कर्मठ व सोवळ्याओवळ्याचा विशेष विचार करणारे असल्यामुळें त्यांच्या देवळांत ब्राह्मणेतर जातींस जाण्याची फारशी मोकळीक नसते, व मारुतीच्या देवळांत मुलांस जशी फिरण्याची व खेळण्याची रगड मोकळीक मिळत असे, तशी तेथें मिळत नसे ह्मणून मला व्यंकोबा किंवा अनंतशयन हे देव फार प्रिय वाटले नाहींत.

# प्रकरण ५.

## माझी मुंबईची पहिली ( १८३९ ) व दुसरी सफर ( १८४७ ).

मी आठ नऊ वर्षांचा असतां आपल्या आईबापांबरोबर माझ्या चुलत्याच्या व आतेच्या लग्नासाठीं मुंबईस गेलों ( १८३९ ). घर सोडण्यापूर्वीं जोशास बोलावून प्रयाणाचा मुहूर्त पाहिला होता व प्रस्थान काढून ठेविलें होतें. घरांतून चांगल्या शकुनावर निघालों तरी मार्गांत आमच्यावर विघ्नें आलीं व आमचे फार हाल झाले. आमच्याबरोबर पुष्कळ चाकर, गाड्या, बैल, घोडीं वगैरे होतीं. याकोबाच्या खटल्याप्रमाणें बायका व लेंकरें हीं होतीं, पण याकोबाचा देव आमच्या संगतीं नव्हता, ह्मणजे आह्मी त्याला ओळखत नव्हतों, व त्याच्या रक्षणाखालीं आह्मी निघालों नव्हतों, व 'तूं जर आमच्या संगतीं येत नाहींस तर आह्माला एथून नेऊं नको,' अशी मोशेप्रमाणें आह्मी त्याची प्रार्थना केली नव्हती. बेळगांवापासून थोडक्याच अंतरावर गेल्यावर आमच्या एका गाडीचा आंस मोडला, तो नीट करण्यासाठीं एका खेड्यांतील लोहारापाशीं दिला तो तो तापवून ठोकीत असतां त्याचें कीट उडून जवळच्या एका गवताच्या झोंपडीवर पडून ती पेटली, व तिच्या योगानें दुसऱ्याही झोंपड्या पेटल्या, तेव्हां गांवांतील लोक ज्या देवळांत आह्मी उतरलों होतों, तेथें आश्रयास धांवत आले. त्यांची धांदल, दुःख व आक्रोश जो त्या प्रसंगीं माझ्या पाहण्यांत आला त्याचा देखावा माझ्या मनांतून अद्याप गेला नाहीं. दुसरें अरिष्ट आम्हांवर असें आलें कीं, मार्गांत माझ्या धाकट्या भावास देवी आल्या त्यामुळें कोल्हापुरास आमचा बरेच दिवस मुकाम झाला, व त्या रोगानें त्याचे डोळे गेले, असें आह्मांस तेथेंच समजलें. पुण्याच्या वाटेनें आह्माला दोन महिने लागले; तेवढीच माझ्या वडिलांची रजा होती. रजेच्या शेवटल्या दिवशीं आह्मी मुंबईस पोंचलों. मार्गांत पावसापाण्यानें आमचे फार हाल झाले व जो पैसा लग्नाकरितां बरोबर होता तो सर्व खर्चून गेला. मग घरां-

तील सर्व डागिने मोडून दोन लग्नें केलीं. आह्मी भुलेश्वराजवळच्या एका गल्लींत बारा रुपयांचें घर भाड्यानें घेऊन राहिलों होतों. तेथें शेजारीं एक गांवठी शाळा होती तींत मीं जाऊं लागलों. तेथें लिहिणेंवाचणें खेरीज करून भूपाळ्या, आरत्या, गणपतीचे श्लोक वगैरे शिकवीत. मुंबईत माझ्या वडिलांचा एक कांसार जातीचा मित्र होता, हा पुढें १८५४ त्याच्या हकीकतींत 'जुना वेदांती' या नांवानें आला आहे. त्याची भांड्यांची पेढी मुंबादेवीच्या रस्त्यावर होती, तेथें मीं कधींकधीं जाऊन रस्त्यांतील मौज पाहत बसावें. त्यावेळचे शिग्राम, बग्या, फैटणी, रेखले पाहून मला फार आश्चर्य वाटावें, कारण बेळगांवांत तसें कांहीं माझ्या पाहण्यांत येत नसे.

**वाणी लोकांचा क्रूरपणा.**

त्यावेळीं माझ्या पाहण्यांत एक गोष्ट आली, तिचा मला अद्याप विसर पडला नाहीं. ती अशी कीं, आमच्या मागें जीं वाणी लोकांचीं मोठमोठालीं घरें होतीं त्यांतील एका घरांत एकदां चोर शिरला. त्याला तेथेंच घरांतील माणसांनीं धरिला, व ओरडाओरड करून आसपासचीं पुष्कळ माणसें मिळविलीं. त्या सर्वांनीं प्रथम त्याला लाथाबुक्यांनीं अर्धमेला केल्यावर मग पोलिसास बोलावून आणिलें. हें सर्व मीं माडीवरून पाहिलें. त्या बिचाऱ्यानें एक लहानशी लोटी चोरली होती; तो लाथांच्या माराखालीं वांचला हेंच मोठें आश्चर्य! तरी हेच वाणी लोक ढेंकणाचा जीव घेत नाहींत!

**हिंदुधर्माची विशेष माहिती.**

मुंबईच्या ह्या माझ्या पहिल्या खेपेस कोणकोणत्या धर्मसंबंधी गोष्टींची मला विशेष माहिती झाली याची मला फारशी आठवण नाहीं, तरी अंगांत वारीं येण्याचा विशेष प्रकार माझ्या पाहण्यांत आला असें मला वाटतें. त्याशिवाय भुलेश्वर वगैरे देवळांतील पूजा देशावरील पूजेच्या प्रकाराहून वरीच वेगळी आहे असें दिसलें. ह्या मुंबापुरस्थ देवांच्या दर्शनास लोकांची फार गर्दी व त्यांची पूजा वगैरे फार जलदीची, याशिवाय प्रत्येक देवळांत गुजराथी भट ताटांत पूजेचें साहित्य घेऊन उभेच; तसें देशावर नाहीं. जो तो आपापल्या घरची पूजापत्री घेऊन देवळांत जातो, व स्वतां पूजा करितो, किंवा तेथें गुरव किंवा ब्राह्मण असला तर त्याकडून ती करवितो, असे कांहीं भेद त्यावेळीं माझ्या पाहण्यांत आले. मुंबईतील देवांच्या मूर्ती वस्त्रालंकारांनीं चांगल्या नटविल्या असत, व देवळांत आरसे, हांड्या, गलासें यांची विशेष शोभा

फार आवेशी होतों. शमीचा श्लोक मला येत असे. तसेच संक्रांतीचे तिळगूळ चित्रविचित्र कागदाच्या पेटींत घालून मित्रांस द्यावे, व मुंबईस टपालांतून इष्टमित्रांस पाठवावे. होळीचा सण जरी मला आवडत नव्हता, तरी एकदां मित्रमंडळीनें मला घरांतून जबरीनें ओढून काढल्यावर त्यांच्या बरोबर होळीचा होळकर बनण्यास मला लाज वाटत नसे. तसेंच मोहरमाच्या सणांतही मी गांवांत फार हिंडावें. वाघांचें नाचणेंउडणें व कुस्त्या पाहण्यांत माझा वेळ फार जात असे. रात्रीं ताबूत पाहत फिरावें. दर वर्षीं मोहरमांत माझ्या आईचा कोणत्या तरी पिरास केलेला नवस फेडावयाचा असायाचाच. त्याकरितां मला व दुसऱ्याही मुलांस फकिरी देत, ह्मणजे आह्मी फकिराचा पोषाक करून व गळ्यांत नाडे घालून हातांत झोळी व तवक घेऊन पांच घरें भिक्षा मागून आणावी. हीं आमचीं सोंगें माझ्या ब्राह्मण मित्रांस आवडत नसत. त्यांनीं "तुझी सुंता झाली कायरे?" असें ह्मणून मला चिडवावें. बेळगांवाकडील ब्राह्मण मोहरमांत आपल्या मुलांस फकिरी देत नाहींत. अहमदनगराकडे कोणी कोणी ब्राह्मण नवस फेडण्याकरितां मोहरमांत फकीर होतात. शूद्र जातीचे लोक तर चहुंकडे फकीर होतात, व कित्येक जण तर डोले ( ताबूत ) देखील करितात.

**जैनधर्मावरील अश्रद्धा; वैष्णवांचें पाखांड.**

याप्रमाणें मी हिंदुधर्माचें अनेक प्रकारें व मुसलमानी धर्माचें कांहीं प्रकारें आचरण करीत असतां जैनधर्माकडे माझें किंवा माझ्या घरच्या मनुष्यांचें मन कधींच वळलें नाहीं. लिंगाईत धर्माचे जंगम आमच्या दाराशीं भिक्षेस येत त्यांस आह्मीं भिक्षा घालावी, पण जैन धर्माचे जती कधीं येत नसत. हें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, बेळगांवांत पुष्कळ जैन असून तेथें पारसनाथाचें देऊळही आहे. परंतु त्याची मूर्त्ति दिगंबर (नग्न) आहे, ह्मणून तिचें दर्शन घेऊं नये असें मला जो ब्राह्मण शिकवायास ठेविला होता त्यानें सांगितलें होतें. त्यामुळें त्याच्या देवळांत मी किंवा माझ्या सोबतीचीं मुलें कधीं जात नसत. केवळ एकदां त्याच्या अंगणांत गेल्याचें मात्र मला आठवतें. जैनाचे दिगंबर जति त्या काळांत गांवांतून फिरत. त्यांच्या हातांत मोराच्या पिसांचा कुंचा, कमंडलु व खाकेस झोळी असायाची. त्यांस पाहून आह्मीं मुलांनीं हंसावें. पण ते आह्मांशीं बोलत नसत. ह्या जतींस कोणी जैनानें घरीं भोजनास बोलाविलें असतां घरच्या बायकांनीं दिगंबर होऊन विहिरीचें पाणी आणावें

व त्याच स्थितींत असतां स्वयंपाक करावा, व सूप आड धरून तो त्यांस वाढावा, अशा गोष्टी आमच्या कानीं पडत. एकदां बेळगांवांत जैनांचा गुरु आला होता, त्याची पालखी हिंदुलोकांनीं आपल्या देवळावरून जाऊं नये ह्मणून तिला अटकाव केला, तेव्हां मोठी गडबड होऊन ती एक रात्र रस्त्यामध्यें राहिली. मग सरकारच्या लोकांनीं येऊन बंदोबस्तानें तिची पुढें रवानगी केली.

वैष्णवमताविषयीं मला संस्कृत शिकविणाऱ्या स्मार्त ब्राह्मणानें तें पाखांड आहे व ५०० वर्षांनीं आपोआप मोडेल असें सांगावें. वैष्णवांच्या देवळांत मी क्वचित जात असें. व्यंकोबा व अनंतशयन ( शेषावर निजलेला ) अशीं दोन वैष्णव देवळें बेळगांवांत प्रसिद्ध आहेत. वैष्णव ब्राह्मण स्मार्त ब्राह्मणांपेक्षां फार कर्मठ व सोवळ्याओवळ्याचा विशेष विचार करणारे असल्यामुळें त्यांच्या देवळांत ब्राह्मणेतर जातींस जाण्याची फारशी मोकळीक नसते, व मारुतीच्या देवळांत मुलांस जशी फिरण्याची व खेळण्याची रगड मोकळीक मिळत असे, तशी तेथें मिळत नसे ह्मणून मला व्यंकोबा किंवा अनंतशयन हे देव फार प्रिय वाटले नाहींत.

असे, हेंही त्यावेळीं माझ्या लक्षांत आलें. मुंबादेवीच्या तळ्याजवळ कांहीं कांसवें माझ्या पाहण्यांत आलीं, त्यांची लोक पूजा करीत व त्यांस लाह्या वगैरे खावयास घालीत, हा प्रकार बेळगांवीं नव्हता. तेथें पूजेकरितां देवळांत दगडी कांसवें मात्र दृष्टीस पडत.

मुंबईतील मुंबादेवीचें तळें हें हिंदुधर्माचें मोठें स्वरूपदर्शक स्थान आहे, तेथील बहुतेक गोष्टी त्या अल्पवयांतच माझ्या पाहण्यांत येऊन त्यांचा ठसा माझ्या मनावर उठला. तळ्यांत स्नान करणारांची गर्दी, त्यांस संकल्प सांगणाऱ्या ब्राह्मणांची वडबड, पुण्यप्राप्तीसाठीं शेकडो कबुतरांस दाणा घालणें, गोसाव्या वैराग्यांस पैसे व पुऱ्या वांटणें, मृत मनुष्यास दहन करून आलेले वाणी वगैरे यांचीं स्नानें व मोठ्यानें रडत घरीं जाणें, हें सर्व मी प्रथमच तेथें पाहिलें. त्यांचें रडणें व गुजराथी वायकांचें ऊर बडविणें पाहून मला भय वाटावें. तळ्याच्या मध्यभागीं एक खांब असे त्यावरून तरूण मुलें पाण्यांत उड्या टाकीत तें पाहूनही मला भय वाटावें. मुंबादेवीच्या आसपास व भुलेश्वराच्या रस्त्यावर त्या काळांत देवास सोडलेले वसू ह्मटलेले गोऱ्हे पुष्कळ फिरत व त्यांजपासून लोकांस व दुकानदारांस फार त्रास होई. गोमूत्र मिळविण्यासाठीं वाटी किंवा लोटी घेऊन गाईच्या मागें लागण्याचा प्रकार मुंबईच्या हिंदु लोकांत त्यावेळीं फार होता त्याचीही मला फार मौज वाटे. पांजरपोळ हें मोठें धर्मखातें आहे, व तेथें वाणी लोक पिसु व ढेंकूण यांस देखील पोसतात, ह्मणजे एखाद्या माणसास एक रुपाया देऊन एक रात्र त्यांजमध्यें निजवितात; असें करणें मोठें पुण्यकर्म आहे असें माझ्या आजीनें मला सांगावें.

सुतकें; ग्रंथवाचन.

मुंबईत आल्याबरोबर आमच्या मागें सुतकें लागलीं; मला अगोदर त्यांचा अनुभव नव्हता. आमच्या गोत्रांतील कोणी मनुष्य मरण पावला असतां आह्मांस बेळगांवीं त्याची बातमी क्वचित येत असे, कारण त्या काळांत पत्राचें टपाल हांशील फार होतें; पावलीच्या वजनाच्या पत्रास मुंबईहून बेळगांवास तीन आणे पडत; शिवाय पत्र लिहिणारेही थोडे असत. केवळ एकदां एका जवळच्या नातलगाच्या मरणाची खबर आल्याचें मला आठवतें. परंतु मुंबईस आल्यावर अशा खबरा वारंवार कानीं पडूं लागल्या, तेणेंकरून घरांत

सुतकाच्या विटाळामुळें वारंवार अडचणी भोगणें प्राप्त होत असे. सुरतकरांच्या कुटुंबांचीं सुमारें ५०० मनुष्यें त्यावेळीं मुंबईंत होतीं असें सांगत. मग सुतकाचा सुकाळच असायाचा! यांत काय नवल?

त्यावेळीं मी आठ नऊ वर्षांचा असतां मला प्राकृत ग्रंथ वाचतां येतात (ह्मणजे ते नुस्ते वाचतां येत होते) अशी माझी आख्या माझ्या नातलगांत झाली असल्यामुळें मला घरोघर ग्रंथ वाचायास बोलावून नेत. त्या काळांत मुंबईच्या कांसार लोकांत विद्या शिकणारीं मुलें फारच थोडीं होतीं, या कारणास्तव माझी इतकी चहा त्यांजमध्यें झाली. याशिवाय माझी मराठी भाषा मुंबईच्या कांसारी भाषेहून बरीच निराळी होती तिचें लोकांस कौतुक वाटे.

दुसरी खेप.

मुंबईहून परत बेळगांवीं आल्यावर मी मिशन इंग्लिश शाळेंत जाऊं लागलों, त्याचा वृत्तांत मागें सांगण्यांत आलाच आहे. ह्या वेळेस माझें वय सोळा वर्षांचें होतें. ह्या वयांत माझें नीतिसंबंधी आचरण फार बिघडलें होतें. हिंदु धर्माचरणाच्या भरांत असतांही कित्येक दुष्ट संवयी मला लागल्या, त्यांचा उल्लेख देखील एथें करणें योग्य नाहीं; व देवानें दया करून वाईट सोबतीपासून मला सोडविलें नसतें तर मी अधिकाधिक वाईट होत गेलों असतों. ह्या वयाच्या सुमारास मीं लिहून घेतलेल्या शृंगाराच्या दोन लावण्या एक मराठी व एक कानडी माझ्या चुलत्याच्या कागदपत्रांत मला सांपडल्या, (त्या आतां फाडून टाकल्या). सन १८४७ त पुनः एक वेळ मुंबईस गेलों. ह्या खेपेस आमचा प्रवास रामघाटावरून, आमची सफर वेंगुर्ल्यावरून समुद्राच्या वाटेनें होती. आमच्या फत्तेमारीस वारा उलटा असल्यामुळें मुंबईस पोंचण्यास १४ दिवस लागले; मार्गांत दोन तीन ठिकाणीं ओरवा करावा लागला. नित्य फराळ खाऊन आमचा जीव अगदीं शोषून जात असे. बंदरांत उतरून स्वयंपाक केला ह्मणजे तो अमृतासारखा गोड लागे. माझ्या आईनें गलबतावर देखील तांदूळ भाजून त्यांचा भात शिजवून आह्मांस घालावा. अशा भातास बाट नाहीं, अशी कित्येक हिंदू जातीची समजूत आहे, तशीच आमचीही होती. मुंबईच्या बोरीबंदरांत येऊन पोंचल्यावर धक्क्यावर

कस्टमखात्याच्या लोकांनीं आमच्या सामानाचा झाडा घेतला, त्यांत कांहीं जुने डागिने व कपडे होते ते नवे ठरवून त्यांची जकात घेतली. या अन्यायाच्या गिल्याचें पत्र मीं प्रभाकर नामक त्या वेळचे प्रसिद्ध वर्त्तमानपत्रास पाठविलें तें त्याच्या कर्त्यांनीं मेहरबानी करून आपल्या ३ एप्रिल १८४७ च्या अंकांत छापिलें. वर्त्तमानपत्रास लिहिण्याचा हा मला पहिलाच प्रसंग. हें पत्र अद्याप माझ्या संग्रहीं आहे.

# प्रकरण ६.

## मुंबईतील एल्फिन्स्तन स्कुलांत माझा अभ्यास.

( १८४७-४८. )

ह्या खेपेस बरेच दिवस माझें राहणें मुंबईस झालें. आह्मी फणसवाडीच्या नाक्यावर सुंदर बाबाजीच्या वाडींत उतरलों होतों. तेथें रा० रा० महादेव शास्त्री कोल्हटकर हे राहत असत. ते एज्युकेशन सोसैटीच्या एल्फिन्स्तन विद्यालयांत शिक्षक होते. त्यांच्या बरोबर मी तेथें जाऊं लागलों. तेथील प्रिन्सिपाल डाक्तर हार्कनीस होते, त्यांपाशीं शास्त्रीबोवांनीं मला प्रथम नेलें. त्यांनीं माझी जात विचारिली; व मी कांसार आहें, हें त्यांस खरें वाटेना. ते ह्मणाले कीं, तूं ब्राह्मण आहेस. मीं त्यांस माझें मिशनस्कुलाचें सर्टिफिकिट* दाखविल्यावर त्यांनीं मला प्रोफेसर दादाभाई (आनरेबल दादाभाई नवरोजी एम. पी.) यांच्या स्वाधीन केलें. ह्या गृहस्थांनीं मला खालच्या डिविजनांतील दोनचार वर्गांत फिरवून व तेथील अभ्यासाचें एक एक पुस्तक वाचायास लावून शेवटीं (वरून) तिसऱ्या क्लासांत बसविलें. त्या वर्गाचे मास्तर रा० रा० बाबाजी अमृत हे होते. हे गृहस्थ स्वभावानें फार शांत असून मुलांस फार प्रिय असत. त्यांची शिकविण्याची हातोटी चांगली होती. मी नित्य शास्त्रीबोवांच्या बरोबर

---

* हें सर्टिफिकिट अद्याप माझ्यापाशीं आहे तें येणेंप्रमाणें:—

This is to certify that the bearer Baba Pudmanjee commenced his studies in the English language and has been a student in the Belgaum Mission School for about four years. His general conduct has been exemplary and his assiduity and progress in learning has been very creditable to himself and satisfactory to his teachers. He is cordially recommended for admission into any one of the seminaries of learning in Bombay and it is hoped he will secure the esteem and good will of all under whom he may in that place prosecute his studies.

JOS. TAYLOR.
Missionary.

Belgaum, 3rd March 1847.

शाळेस जावें. त्यांची जाण्याची वाट काळबादेवीच्या रस्त्यावरून होती, ते देवळाजवळ आले ह्मणजे उभे राहून देवीस नमस्कार करीत, तसें मीही करीं. हीच सवई जोंपर्यंत मी शाळेंत होतों तोंपर्यंत मला लागली होती. एल्फिन्स्तन स्कूल पाहून मला फार आश्चर्य वाटलें. शाळेची इमारत, मुलांची संख्या, त्यांचे मुंबईशाई पोषाख, पारशांच्या मुलांची दांडगाई, धिंगाणा व मारामारी, वर्ग बसायाच्या मोठमोठाल्या खोल्या वगैरे पाहून मी फार भयचकित झालों. तशांत वेळगांवच्या शाळेंत असतांनां एक ह्याच स्कुलांतील मुलगा तेथें आला होता, त्यानें अशी गप्प झोंकली होती कीं, एल्फिन्स्तन स्कुलांत मुलांस जबर शिक्षा करितात, व त्याकरितां ५० रु० पगाराचा एक मास्तर ठेविला असतो. त्याचें काम मुलांस हातावर चाबकानें फटके मारावयाचें! परंतु असा दंडाधिकारी मला तेथें दृष्टीस पडला नाहीं, तेणेंकरून माझी भीति बरीच कमी झाली. तरी मुलांस वेतकाठीनें झोडपणें, कानसळावर चपडाका मारणें, बांकांवर उभे करणें, शाळा सुटल्यावर अटकेंत ठेवणें इ० शिक्षेचे प्रकार चालू होते. प्रिन्सिपाल साहेब तर कधीं कधीं मुलांवर विलायती बुटांची लाथ उचलीत. पारशांच्या मुलांस दोनप्रहरीं सुटीच्या वेळीं जें जेवण येत असे तें पाहून मला आश्चर्य वाटावें, तसें मीं वेळगांवांत कधींच पाहिलें नव्हतें. तीं मुलें पिवळ्याधमक खिचडीचे घांस तोंडास हात न लावितां फकी मारून खात, व लोटा तोंडास न लावितां पाणी पीत. अन्नाचा तर फार नाश करीत, एकमेकांच्या अंगावर खिचडी फेंकीत, आणि जेवायाच्या जागीं सर्व खरकटें पसरीत, तें पाहून मला फार किळस येई.

महादेवशास्त्री यांचा मजवर फार लोभ असे; ते आमचा वर्ग आणि दुसरे एक दोन वर्ग एकत्र करून मराठी शिकविण्यास वेळोवेळ येत असत. त्यांची शिकविण्याची शैली फार चांगली असे. त्यांची मराठी भाषा मला फार गोड लागे, कारण आमच्या वर्गांतील सोनार, परभु, शेणवी यांच्या मराठी भाषेला मीं हसावें. ते आह्मांस बाळगंगाधर शास्त्री यांनीं केलेल्या एल्फिन्स्तनकृत हिंदुस्थानच्या इतिहासाचें मराठी भाषांतर शिकवीत. त्यांचे दुसरेही विषय शिकविण्याचे वर्ग होते. आमच्या इंग्लिश वर्गास मकलककृत व चेंबर्सकृत शालोपयोगी पुस्तकें होतीं. प्रो० दादाभाई हे केव्हां केव्हां आमचा वर्ग पाहण्यास येत, त्यांचें इंग्लिश भाषण ऐकून मला फार आश्चर्य वाटे. त्यांच्या सारखा अस्खलित इंग्लिश बोलणारा एतद्देशीय गृहस्थ त्या शाळेंत

त्या काळीं दुसरा कोणी नव्हता. प्रिन्सिपाल हार्कनेस साहेब कधीं मधीं येऊन आह्मांस धड्यांची विचारपूस करीत. त्यांस मास्तर व मुलें फार भीत.

माझ्या वर्गांत त्यावेळीं जे विद्यार्थी होते त्यांजमध्यें मुकुंदराव भास्करजी व गणपतराव भास्करजी असे दोघे बंधु होते ते फार सुशील असून परस्परांवर फार प्रीति करीत आणि आपल्या वर्गांतील मुलांशीं स्नेहानें वागत. तसेंच ते बुद्धिमान असून शिकण्याकडे त्यांचें फार लक्ष असे. त्यांचा अभ्यास पुरा झाल्यावर त्यांपैकीं रा० रा० मुकुंदराव हे मुनसफीच्या हुद्यापर्यंत पोंचून निवर्तले, व रावबहादूर गणपतराव भास्करजी हे हल्लीं (१८८७) मुंबईच्या स्मालकाज कोर्टांत एक बहु सन्मान्य जज्ज आहेत. (त्यांचें उपनाम कोठारे असें होतें, तें मला त्यावेळीं ठाऊक नव्हतें)! ह्या उभयतांचा मजवर फार लोभ असे, तो मी ख्रिस्ती झाल्यावर कमी झाला असें मला दिसून आलें नाहीं. आमच्या वर्गांत एक ठेंगणा ब्राह्मणाचा मुलगा होता तो फार चपळ बुद्धीचा होता. त्यानें वर्गांत कांहीं तरी संस्कृत श्लोक किंवा मंत्र पुटपुटत राहावें. आणि त्याची पाळी आली ह्मणजे पटकन इंग्रजींत बरोबर उत्तर द्यावें. एक परभु ज्ञातीचा मुलगा फार गमती असे, त्यानें आह्मां सर्वांस नानाप्रकारचीं भाषणें व हावभाव करून हंसवावें, मास्तरचा मारही बराच खावा, पण थट्टा मस्करी करण्याचें सोडूं नये. जेव्हां आमचा वर्ग दुसऱ्या वर्गाशीं मिळे, तेव्हां त्यांत आमच्या बरोबर श्रीमंत आनरेबल जगन्नाथ शंकर शेट यांचे चिरंजीव श्रीमंत विनायकराव हे येत असत. त्यांचा माझा बराच स्नेह जमला होता. आमच्या वर्गांतील दुसऱ्या मुलांपैकीं जे पुढें प्रसिद्धीस आले, आणि ज्यांची माझी पुढें पुष्कळ दिवस ओळख राहिली, त्यांपैकीं रा० रा० भवानी विश्वनाथ कानविंदे हे एक होते. यांनीं पुढें जनरल आसेंब्लीच्या विद्यालयांत शिक्षकाची जागा पत्करल्यावर मोठ्या परिश्रमानें नेटिव बुकक्लब नांवाचें पुस्तकालय स्थापिलें, तें पुष्कळ दिवस चाललें. याशिवाय त्यांनीं वर्तमानदीपिका नामक पत्र काढलें होतें, तेंही बरेच दिवस चाललें. रा० ब० दादोबा पांडुरंग यांच्या नातलगांपैकीं बाळाजी नारायण नांवाचे तरुण विद्यार्थी माझ्या वर्गांत होते त्यांचा माझा फार स्नेह होता. मीं त्यांच्या घरीं वारंवार जावें, त्यांच्या घरचीं मनुष्येंही मजवर लोभ करीत. रा० रा० बाळाजीच्या योगानें रा० रा० दाक्तर आत्माराम पांडुरंग ह्यांची माझी प्रथम ओळख झाली.

**सरकारी शाळेंत असतेवेळचीं माझीं धर्ममतें.**

सरकारी शाळेंतील शिक्षणानें माझी हिंदु धर्मावरील श्रद्धा कांहीं कमी झाली नाहीं. मी सुधारलेल्यांच्या मंडळींत मिळालों नाहीं. सुधारणूक ह्मणजे काय हें मला ठाऊकही नव्हतें. आमचे मास्तर आह्मांस धडे शिकविण्याशीं काम ठेवीत, त्याशिवाय दुसऱ्या गोष्टी क्वचित काढीत. वर्गांतील मुलांचेंही लक्ष केवळ धड्यांकडे असे. आमच्यावर जें कालेज दिविजन होतें, तेथें कशी काय स्थिति होती हें मला ठाऊक नाहीं. शाळेच्या जवळच मारुतीचें देऊळ होतें (ही शाळा त्या वेळीं पिकिट रोडाच्या नाक्यावर होती) तेथें मीं वारंवार जावें, व वर्गांत वरची जागा मिळावी ह्मणून मारुतीस नवस करावा. शाळा सुटली ह्मणजे घरीं येतांनां रामवाडींतील रामाच्या देवळांत जावें, व तेथें पुराण होत असलें तर तें ऐकायास बसावें, रामास पुष्कळ प्रदक्षिणा घालाव्या. तसेंच भुलेश्वरीं जाऊन कीर्त्तन ऐकायास उभें राहावें. अशीं "देवदर्शनें" करीत घरीं यावें. ह्या कीर्त्तनांत एका हरदास बावांनीं विषयलुब्ध मनुष्य आपली हानी कशी करून घेतो याविषयीं एक उत्तम दाखला दिला, तो मीं अद्याप विसरलों नाहीं. ते ह्मणाले कीं जसा कुत्रा एखादें सुकलेलें हाडूक चघळीत असतां त्याला त्यापासून कांहीं मिळालें नाहीं तरी त्याच्या दांतांचें रक्त त्या हाडास लागलेलें पाहून, तें त्या हाडांतूनच निघालें असें समजून तें चाटतो, पुनः तेंच हाड तो चघळीत बसतो; तद्वत् विषयलुब्ध प्राणी आपली हानि काय होते हें न समजतां त्याच्या नादीं लागतो.

**हिंदुधर्मसंबंधीं ज्ञानाची वृद्धि.**

मुंबईंत हिंदुधर्मसंबंधीं प्राकृत पुस्तकांची मला बरीच माहिती होत चालली. कोणतेंही नवीन पुस्तक निघालें कीं तें बहुधा मी घेते असें. हीं पुस्तकें विकणारे ब्राह्मण त्या दिवसांत भुलेश्वरच्या देवळाच्या आवारांत दुकानें मांडून बसत असत, त्यांपैकीं एक वृद्ध ब्राह्मण [ब्रह्मपंथानुयायी रा० रा० बाबाजी नवरंगे यांचे तीर्थरूप] माझ्या घरीं भलें मोठें पुस्तकें व पोथ्या यांचें गांठोडें घेऊन येत असत. बेळगांवांत जीं पुस्तकें माझ्या दृष्टीस पडलीं नाहींत तीं तेथें मिळूं लागल्यावरून मला फार आनंद होई. तुकारामाचे अभंग, रामदासी श्लोक, मोरोपंती आर्या, भक्तलीलामृत, भक्तविजय, गुरुचरित्र इ० अनेक ग्रंथांचा मीं संग्रह केला.

मुंबईंत अनेक देवांच्या यात्रा होतात,त्या सर्वांस बहुधा मीं जावें. वाळुकेश्वराची यात्रा, गांवदेवीची यात्रा, भवानीशंकराची यात्रा, मुलेश्वराची यात्रा, माजगांवच्या माणकेश्वराची यात्रा, रामवाडीची यात्रा, माहीमचा उरूस, ह्या सर्वांस माझें जाणें होत असे. त्याशिवाय बाहेर गांवीं एकदां वज्रावाईस व निर्मळच्या यात्रेस गेलों होतों, पण तेणेंकरून मन निर्मळ झालें नाहीं. वज्राबाईस जीं उन्हाळीं आहेत त्यांत स्नान केलें, पण त्याकडून पापरोग गेला नाहीं.

**मुंबईंतील यात्रा व उरूस.**

मुंबईंत निरनिराळ्या जातींचे निरनिराळे ब्राह्मण उपाध्ये आहेत, व त्यांसच त्यांच्या जातीनें बोलावल्याशिवाय लग्नादि कार्यें व धर्मकृत्यें होत नाहींत हें मला पूर्वीं माहीत नव्हतें. पळशे नांवाचे ब्राह्मणांविषयीं मीं प्रथम येथेंच ऐकिलें, व ते चोरून मत्स्य भक्षण करितात हें समजल्यावर मला आश्चर्य वाटलें. सरकारी शाळेंत असतांना माझ्या वर्गांतील परभु, सोनार इ० जातींचीं मुलें पळशांच्या मुलांची फार टवाळी करीत, व खेंगट कसें लागतें, सुके बोंबील कसे लागतात असें त्यांस थट्टेनें विचारीत. आमच्या जातीचे ब्राह्मण उपाध्ये फार धनवान होते, ते कांसार लोकांस लग्नमुंजेकरितां व्याजानें कर्ज देत. एक वेळ मी त्यांच्या घरीं गेलों असतां तेथें कर्ज काढण्याकरितां कित्येक कांसार लोक आले होते. व उपाध्यापैकीं एक जण मोठी मारवाडी चोपडी घेऊन हिशेब तपासत बसला होता असें पाहिलें.

**कांसारांचे उपाध्ये.**

ही शाळा सोडण्यास निमित्त माझें हिंदु धर्मांतलें लग्न झालें. तें होण्याचे पूर्वीं कांहीं देवकार्याकरितां थोडी रजा मला पाहिजे होती ती मिळाल्यावर तें कार्य उरकून लग्नाला अवकाश होता ह्मणून मी शाळेंत जाऊं लागलों, आणि लग्नाची तीथ जवळ आल्यावर दुसरी रजा मागितली, परंतु ती शाळेचे प्रिन्सिपाल कांहीं केल्या देईनात. त्यांला लग्नाच्या पूर्वीं करायाचीं धर्मकृत्यें व लग्नविधी यांचा भेद समजेना. माझ्या शिक्षकानें त्यांस समजून सांगितलें, पण ती गोष्ट त्यांच्या मनांत भरली नाहीं. शेवटीं शिक्षकानें मला आजारीपणाची चिठ्ठी पाठविण्याची मसलत दिली! तसें करून घरीं राहिल्यावर पुनः त्या शाळेची पायरी चढण्याचा प्रसंग आलाच नाहीं, कारण लग्न झाल्यावर थोडक्या अवकाशानें आह्मी सर्व जण ( आजा, आजी व चुलता खेरीजकरून आद-

**सरकारी शाळा सोडण्याचें कारण.**

नास गेलों. तेथें पूर्वीं माझे वडील गेलेले होते, ते माझ्या लग्नाकरितां ह्मणून मुंबईस आले होते, त्यांनीं आह्मां सर्वांस नेण्याचा बेत केल्यावर आह्मी त्यांच्या बरोबर एकंदर दाहा मनुष्यें आदनास गेलों.

**माझें हिंदु लग्न.**

आदनाकडील माझा वृत्तांत सांगण्यापूर्वीं माझ्या हिंदु लग्नाची थोडीशी हकीकत सांगतों. हें लग्न सन १८४८ सांत मोठ्या डामडौलानें झालें. त्याच्या ठोकळ खर्चाची याद अद्याप माझ्यापाशीं आहे, तींत कळवंतणींच्या नाचाबद्दल जी रकम मांडली आहे ती व्यर्थ खर्चाची असें तेव्हां देखील मला वाटलें. मग ती त्या नाचाच्या अनीतीपणामुळें किंवा पैशाच्या विनाकारण खर्चामुळें माझ्या दोषास पात्र झाली, हें माझ्यानें आतां सांगवत नाहीं. जी मुलगी मला पाहिली होती ती मला आवडते किंवा नाहीं, याविषयीं मला माझ्या तीर्थरूपांनीं प्रथम विचारिलें. ही त्या काळांत विशेष गोष्ट मानिली पाहिजे. तिचें वय दहा वर्षांचें होतें, व माझें वय सत्रा वर्षांचें होतें. तिला त्या काळीं कांहीं लिहितां वाचतां येत नव्हतें. तिचे आईबाप घरचे सुखी होते. लग्नाच्या पूर्वीं जोशानें आह्मा उभयतांच्या जन्मपत्रिका पाहिल्या होत्या, परंतु आमचा जीवंतपणींच वियोग होणार हें त्याला समजलें नाहीं! लग्नांत आमच्या जातीच्या कित्येक कुटाळखोर लोकांनीं घोंटाळा घालण्याचा यत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. तो असा कीं, माझे वडील आदनास असतांना त्यांनीं आरबाच्या हातचें पाणी वापरलें, ह्मणून त्यांस वाळीत टाकावें. हें खुसपट लग्नाच्या अगोदर जीं जातीस एक दोन लहानशीं जेवणें द्यावीं लागतात, त्यांपैकीं एका जेवणाच्या दिवशीं आमंत्रण वगैरे पाठविल्यावर निघालें. विरुद्ध पक्षाच्या लोकांनीं जातीची सभा मिळविली; परंतु तेथें माझ्या वडिलांनीं असा पुरावा दिला कीं, सर्व इंजनेरखात्यास ह्मणजे सुमारें हजार बाराशें माणसांस पाणी पुरविण्याचें काम त्यांच्याच स्वाधीन होतें, तेव्हां त्यांस आरबाचें पाणी घेण्याचें कारणच पडलें नाहीं. ह्या कामासंबंधीं सरकारी हुकमाचीं कागदपत्रें सभासदांस दाखविल्यावरून त्यांची खातरी झाली, आणि त्या दिवसाचा भोजनसमारंभ निर्विघ्नपणें सिद्धीस गेला.

# प्रकरण ७.

## माझा आदनाचा प्रवास.

आगबोट चुकली.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें आह्मां सर्वांस आदनास नेण्याचा माझ्या वडिलांनीं बेत केल्यावर व सर्वांसाठीं सरकारी पास मिळाल्यावर ज्या आगबोटींतून जाण्याचा हुकूम मिळाला होता ती चुकली. त्याचें कारण असें झालें कीं, ज्या दिवशीं आगबोट जाणार त्या दिवशीं आमचें सर्व सामान तिजवर पोंचविल्यावर आह्मी सर्व जण अंगावरील वस्त्रानिशीं मात्र घरांतून बाहेर निघण्याच्या बेतांत होतों. परंतु पुष्कळ लोक भेटीस येऊं लागल्यामुळें, व त्यांत विशेषेंकरून बायकांच्या भेटी व रडारडी आटपण्यांत वेळ होऊन गेली. आम्ही कापाच्या मैदानांत ( पूर्वींच्या ) वेलसलीच्या पुतळ्याजवळ जाऊन पोंहोचलों तों तिकडे आगबोट चालती झाली, तिच्या बंबांतून निघत असलेला धूर मात्र आह्मांस दिसला. ह्या चुकीमुळें आमचें फार नुकसान झालें. गलबतावर चढविलेलें आमचें कपडे वगैरे सामान आदनास पोंचेपर्यंत खाऱ्या पाण्यानें भिजून खराब झालें. आह्मांस सरकारांतून भत्त्यादाखल पोहे, चणे, साखर, तूप मिळालें होतें, त्याखेरीज आह्मीं स्वतांच्या खर्चानें फराळाचें सामान पंधरा दिवस पुरे इतकें घेतलें होतें तें सर्व आगबोटीवर आमचे मित्र आदनास जाणारे होते त्यांनीं आमच्या पेट्या उघडून स्वतां खाल्लें व दुसऱ्यांसही वांटलें; परंतु आमच्या कपड्यांच्या व बुकांच्या पेट्यांची कांहीं काळजी केली नाहीं; त्या जेथें समुद्राचें पाणी जहाजावर मारतें, व वरून पावसाचें पाणी पडतें अशा ठिकाणीं खुशाल पडूं दिल्या!

ह्या कारणामुळें आमचें दोन महिने मुंबईस राहणें झालें. बिछाने, भांडीं वगैरे दुसऱ्याचीं मागून आणून त्यांवर गुजराण करावी लागली. कपडेही

नवे करावे लागले. त्या काळांत सरकारानें माझ्या वडिलांस जनरल आसें-ब्लीच्या इंग्रजी शाळेचा कांहीं भाग बांधण्याचें काम दिलें.

आदनांतील इं-जनेर खातें.

आदनांत त्या वेळीं इंजनेर खातें फार मोठें होतें, त्यांत तीन इंजनेर असून त्यांजवर चीफ इंजनेर कर्नल वाडिंगटन हे होते. किल्ले, तट, मोर्चे, बंदर वगैरे बांधण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चाललें होतें; माझ्या तीर्थरूपांच्या हातीं मोठा कारभार होता; हजारों बिगारी, सुतार, गंवडी इ० च्या कामांची देखरेख त्यांजकडे होती. त्या वेळीं तेथें क्यापटन हेन्स नांवाचे पोलिटीकल एजंट होते, त्यांच्या स्वाधीन गवरनर साहेबाप्रमाणें कुलअखत्यार होता. आमचें घर त्यांच्या बंगल्याच्या जवळच होतें. आमच्या शेजारीं कित्येक बेनी इस्राएल राहत होते, ते मिशनेरींनीं शिकविलेलीं दावीदाचीं गीतें मराठींत गात. तीं ऐकून मला मोठें आश्चर्य वाटावें, व हे हिंदु नसतां यांच्यापाशीं अशीं चांगलीं मराठी गीतें कोठून, असा प्रश्न वारंवार माझ्या मनांत यावा. परंतु त्या वेळीं इस्राएल कोण कोठले हा मीं कांहीं शोध केला नाहीं. ही एक जात आहे एवढें मात्र मला ठाऊक होतें.

आदनांतील माझा उद्योग.

आदनास त्या काळीं इंग्रजी शाळा नसल्यामुळें माझा इंग्रजी अभ्यास पुढें चालणें अगदीं बंद पडलें. वरींही कोणी शिकविणारा नव्हता. माझ्या वडिलांनीं मला इंजनेर हपिसांत रैटर्ची चाकरी धरायास सांगितलें, व त्याप्रमाणें ३० रु० च्या जाग्यावर माझी नेमणूकही झाली. परंतु मला तें काम अगदीं आवडत नसे. मोठ्या जबरीनें मी हपिसांत जाईं, परंतु तेथें कांहींच मला करतां येईना. साहेबानें मला आपल्यासमोर काम देण्याकरितां बोलाविलें ह्मणजे मीं लटलटां कांपावें व माझ्या अंगास घाम सुटावा, व त्यानें एक सांगितलें तर मीं भलतेंच समजून कामाचा विघाड करावा. माझ्या जवळच एक पारशी क्लार्क बसत असे, त्यानें मजवर मेहरबानी करून मला बरेंच सहाय करावें ह्मणून कसा तसा मीं दिवस लोटावा. घरीं मीं करमणुकी-करितां आदनचे वर्णनाचा एक इंग्रजींत निबंध लिहून ठेविला तो माझ्या-पाशीं पुष्कळ दिवस होता. कित्येक वेळ मी आदनाच्या आसपासचे डोंगर पाहावयास गेलों, त्यांत कांहीं जागा अशा अवघड होत्या कीं, मला व माझ्या सोबत्यांस हातापायांवर रांगत चढावें लागलें. परंतु ते पर्वत ईश्व-

राचीं कृत्यें आहेत असें मनांत येऊन मी त्याची त्या काळीं स्तुति केली नाहीं. मला "होमन्यूस" वगैरे कित्येक इंग्लिश वर्त्तमानपत्रें वाचायास मिळूं लागलीं. तेथील इंजनेरसाहेबांपैकीं एक गृहस्थ कृपा करून देत असे. त्या वेळीं पंजाबची लढाई चालली होती, व रोमच्या पोपावरही संकट आलें होतें; पण मला माझ्या आत्म्याचें संकट दिसूं लागलें नव्हतें, व माझ्या पापाशीं माझी लढाई चालली नव्हती.

**तेथील हिंदु लोकांची भक्ति.**

आदनांत पुराणकीर्त्तन हीं माझ्या स्वप्नांत सुद्धां येत नसत. सरकारी कामानिमित्त गेलेल्या हिंदू लोकांची तेथें पुष्कळ मोठी संख्या होती, पण त्यांत कोणी हरिकीर्त्तन करणारा अथवा पुराण सांगणारा नव्हता. बिगारखात्यामध्यें नांव लिहून देऊन आलेले कित्येक ब्राह्मण, भट, गोसावी, वगैरे होते, ते आपापल्या जातीच्या लोकांचें उपाध्येपण करीत. सर्व हिंदु लोकांनीं वर्गणी करून तेथील एका गुहेला देवळाचें रूप दिलें होतें. ह्या कामाला पुष्कळ गवंडी, सुतार व मजूर यांनीं आपल्या अंगमेहनतीनें सहाय केलें. ते दिवसभर सरकारचें काम करून संध्याकाळीं तेथें येऊन खपत, तसेंच रविवारचे सुटींतही काम करीत. ह्या देवळांत शिवलिंगाची स्थापना करून तें एका गोसाव्याच्या ताब्यांत दिलें होतें. पुढें त्यानें बऱ्याच लोकांच्या ठेवी घेऊन पोबारा केला!

**"हिंगलाजमाता."**

आदन गांव विझालेल्या व फुटलेल्या ज्वलत्पर्वताच्या बुडाशीं वसलेलें आहे. त्याच्या आसपास जे डोंगर आहेत त्यांत कित्येक बिकट कडे आहेत. अशा एका कड्यांत तेथील आदन बनयांनीं "हिंगलाजमाता" नांवाची देवी कल्पिली आहे. तिच्या दर्शनास ते लोक जातांना कांहीं पक्वान्नांचा नैवेद्य घेऊन जात, तो सोमाली जातीच्या मुसलमान चाकराच्या डोकीवर देऊन नेत. त्यानें एकदां तें अन्न तेथें नेऊन ठेविलें म्हणजे मग त्यास शिवूं देत नसत. देवीला नैवेद्य दाखविल्यावर हे तिचे भक्त तो तेथेंच भक्षण करीत. हेच सोमाली लोक ह्या वाण्यांच्या घरीं चूल चौका करून ठेवीत. एकदां तो तयार झाल्यावर व त्यांत त्यांनीं पाणी वगैरे नेऊन ठेवल्यावर त्यास आंत जाण्याची मनाई असे!

ज्वलत्पर्वताच्या खडकावर जो थंड झालेला "लावा"नामक रस पसरला होता त्यास लोक 'दगडाचा घाम' ह्मणत. एका डोंगराच्या शिखराला मोठें छिद्र पडलें होतें त्यांतून मशिहा येणार आहे असें तेथले यहूदी ह्मणत. तसेंच एका खडकांत मोठी भेग पडली होती ती बैबलांतील शमशोनानें सोडगा मारून पाडली असें ते सांगत.

**दगडाचा घाम व मशिहा येण्याची वाट, शमशोनाची भेग.**

आदनांत असतांना केवळ दोनच कावळे माझ्या दृष्टीस पडत, ते तेथील हिंदु लोकांनीं आपल्या पितरांच्या श्राद्धपक्षाकरितां मुंबईहून आणून सोडले होते. त्यांस राहाव्यास झाडपान नसल्यामुळें ते बिचारे रस्त्यावर बसून कावकाव करीत; त्यांची ती स्थिति पाहून मला दया येई.

**दोनच कावळे.**

त्या काळीं तेथें एका नारळास दोन आणे पडत, परंतु नारळीपौर्णिमेच्या दिवशीं समुद्रांत टाकण्याकरितां त्याची किंमत आठ आणे होत असे, तरी बहुत लोक ती देऊन सागरास श्रीफळ अर्पण करीत.

**आठ आण्यांस एक नारळ.**

ज्या वर्षी इंग्रजानें आदन घेतलें त्या वर्षी व पुढें कांहीं दिवस तेथें गांजा रुपायास तोळा विकला, आणि दारू तर मी असतांना फार महाग होती. ब्रांडीशिवाय गांवठी दारू मुळींच मिळत नसे, व तीही चवलीच्या खालीं देत नसत. त्यामुळें "परोपकारी" युरोप शापवाले पारशी दुकानदारांस तर अतिशय नफा होत असे. इंजनेरखात्याच्या लोकांस पगार झाला ह्मणजे त्यांच्या दुकानांत चांदी झडायाची. सगळे रुपये, अधेल्या, पावल्या व चवल्या; तांब्याचें नाणें ह्मणून दृष्टीस पडायाचें नाहीं. ह्या व्यसनानें हिंदु, मुसलमान व इस्राएल यांस अगदीं ग्रासून टाकलें होतें. कित्येकांस तर अशी चट लागली होती कीं, ते सकाळीं उठल्याबरोबर प्रथम ड्राम मारल्यावर तोंड धुवीत. दुसरें असें होतें कीं त्यांचा सगळा पगार दंड ("फाईड"—फाईन, "सिख," व "हबसान"—आबसेंट, गैरहाजीर, या कारणांमुळें झालेला) व दारूविक्याचें देणें यांत जात असे. कोणा कोणाच्या हातांत आठ पै, चार पै इतके बटवडा करणारानें (पगार वांटणारानें) द्यावे. हें सर्व दर

**रुपाया तोळा गांजा.**

महिन्यास मीं पाहावें, कारण आमच्या घरींच चार पांच हजार लोकांचा पगार वांटला जाई, परंतु मला त्या वेळीं अशा हतभाग्य लोकांकरितां मद्यपानवर्जक सभा स्थापण्याचें अगत्य दिसून आलें नाहीं, व मीं त्यांस बोध केला नाहीं. अशा गरीबांची दुसरे लोक थट्टा मात्र उडवीत.

**तेथील वाऱ्यांचें प्रकरण.**

पूर्वींच्या हकिकतींत एका ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, मी बेळगांवीं असतांना आमच्या घरांत अंगांत वारीं खेळत असत, व त्या वेळीं मलाही आपल्या अंगांत एखादें वारें असावें अशी इच्छा उत्पन्न होत असे. मध्यंतरीं मुंबईस आल्यावर हीं वारीं दुसऱ्यांच्या अंगांत आलेलीं वारंवार माझ्या पाहण्यांत येऊं लागलीं. जी बाई बेळगांवांत आमच्या घरीं होती तीही मुंबईस आली, तिच्या वाऱ्याखेरीज दुसरींही वारीं, ह्मणजे कान्होबाच्या मठांतील व माझ्या नातलगांच्या व इतरांच्या अंगांत येणारीं वारीं माझ्या पाहण्यांत येऊं लागलीं. आदनांत आल्यावर वरच्याप्रमाणें पुष्कळ वाऱ्यांचे खेळ माझ्या दृष्टीस पडत नसत, तरी आमच्या घरांत त्या बाईचा मुलगा होता त्याच्या अंगांत कांहीं वारें येत असे. व बाहेरच्या एक दोन मनुष्यांस कारणप्रसंगीं घरीं बोलावून आणीत तींही मांत्रिकी करणारीं असत. त्यांत एक कोल्हापुराकडला मराठा होता, त्याच्या अंगांत आदनाचा एक पीर येऊं लागला. त्याच्यामागून माझ्याही अंगांत एक वारें येऊं लागलें तें कोणी हिंदुदैवतांचें नव्हतें, तर मुसलमानाचें होतें, ज्याला खवीस ह्मणतात तशापैकीं कोणी होतें. त्याचें ह्मणणें असें होतें कीं, "मी बेळगांवचा आहें, मला माझ्या गांवीं पोंचतें करा, व ह्याकरितां ह्या मुलाला (मला) बेळगांवास गेलें पाहिजे." आणि तो जाई तोंपर्यंत त्यानें मला बकऱ्याची सागुती खाण्याविषयीं मनाई केली. प्रथम त्याचें बोलणें मोठ्या धमकीचें असे, परंतु पुढें पुढें तो निवळला, तो अंगांत आला ह्मणजे घरांतील माणसें त्याचा मोठा मान राखून त्याची प्रार्थना वगैरे करीत, त्यास आपल्या संकटाविषयीं विचारपूसही करीत, परंतु त्याचा परत जाण्याविषयीं मोठा आग्रह होता. शेवटीं माझी एक बहीण फार आजारी असतांनाच मला बेळगांवास पाठविण्याचें ठरलें. (मी आदन सोडल्यावर ती निवर्तली). माझ्या बापानें मजबरोबर एक मनुष्य देऊन आगबोटींतून मला सन १८४९ साच्या आरंभीं मुंबईस पाठविलें, तेथून जल-

मार्गानें आह्मी बेळगावांस जाऊन तेथें माझे चुलते होते त्यांच्या घरीं उतरलों. नंतर एका दिवशीं वाऱ्यानें सांगितल्याप्रमाणें सर्व साहित्याची तयारी करून मध्यरात्रीं त्यानेंच सांगितलेल्या गांवाबाहेरच्या एका पिंपळाच्या झाडाखालीं तें नेऊन ठेविलें. मीही तेथें गेलों होतों. आह्मांला त्या वेळीं फार भय वाटलें; रात्र अंधारी होती, केवळ आह्मी तिघेजण मात्र होतों. तेथून येतांना आह्मीं मागें पाहिलें नाहीं, फार जलदीनें बिऱ्हाडीं येऊन बाहेरच स्नान करून आंत गेलों. हें वारेंप्रकरण त्या वेळच्या माझ्या हिंदु समजुतीप्रमाणें लिहिलें आहे, त्याच्या खरेखोटेपणाचा यांत विचार नाहीं. ख्रिस्ती झाल्यापासून माझ्या डोक्यांतून हें वेड (वेड असो, भूत असो) अगदीं गेलें एवढें येथें सांगणें बस आहे. प्रभु येशू ख्रिस्त सैतानाच्या कामांचा नाश करायास आला होता; जे त्याचा आश्रय करितात ते अंधाराच्या सर्व सत्तेपासून कुकर्मापासून व सैतानाच्या सत्तेंतून मुक्त होतात. देवानें मला अंधाराच्या सत्तेंतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यांत आणून ठेविलें. (कल. १:१३)

# प्रकरण ८.

## मुंबईच्या फ्रिचर्च विद्यालयांत माझें जाणें.

बेळगांवाहून मुंबईस परत आल्यावर विद्याभ्यासाकरितां माझें राहणें तेथेंच झालें* परंतु सरकारी शाळेंत परत गेलों नाहीं. तेथल्या प्रिन्सिपालानें मला लग्नाकरितां रजा दिली नसल्यामुळें, व माझ्यादेखत आमच्या क्लासांतील एका मुलास बुटाच्या लाथा मारिल्या होत्या तें पाहून मला तेथें पुनः जाणें बरें वाटलें नाहीं. मग कोणत्या शाळेंत जावें अशा विचारांत असतां मला माझ्या नातलगांपैकीं एक मुलगा भेटला, तो दाक्तर उइलसन साहेबांच्या इंग्लिश शाळेंत (फ्रिचर्च इन्स्टिट्युशन) जात असे, त्याला मी शाळेच्या शोधांत आहें असें समजल्यावर त्यानें मला त्या विद्यालयांत येण्याविषयीं मसलत दिली व मीं ती मान्य केली. ही शाळा त्या वेळीं (१८४९ त) काळबादेवीच्या रस्त्याच्या गायवाडी नांवाच्या

* माझा आदनास परत जाण्याचा बेत होता, व तो कोणत्या कारणामुळें सिद्धीस गेला नाहीं हें मीं अगदीं विसरलों होतों, परंतु माझ्या चुलत्यांच्या कागदपत्रांत मीं त्यांस पाठविलेलें एक पत्र मिळालें त्यावरून असें समजतें कीं, आदनास माझी मातोश्री प्रसूत झाली होती तिच्या सहायार्थ माझ्या आजीला घेऊन जाण्याचा माझा बेत होता, व आगबोटींतून सरकारी पास मिळावा ह्मणून (तेव्हांचे) मिलिटरी बोर्डास मीं अर्ज केला होता, परंतु त्याचें मला असें उत्तर मिळालें कीं, तो अर्ज जर माझ्या वडिलांनीं केला असता तर मला व माझ्या आजीला पास मिळाला असता. या कारणामुळें माझें राहणें मुंबईस झालें. हें **ईश्वरी सूत्राकडून झालें** यांत संशय नाहीं. जर मी मुंबईस राहिलों नसतों, तर फ्रिचर्च विद्यालयांत माझें जाणें झालें नसतें. सदरील अर्जाची मिती २ री एप्रिल १८४९ आहे; त्याचें उत्तर मला त्याच महिन्याच्या २३ व्या तारखेस मिळालें, त्यावर "Charles D. Mylne Capt. Acting Secretary, Military Board," अशी सही होती. हे गृहस्थ हल्लींचे मुंबईचे बहुसन्मान्य बिशप साहेब दा० मिलन यांचे वडील होत.

गल्लींत होती, तींत मी त्याच वर्षाच्या आगष्ट महिन्यांत गेलों. ह्या मित्राचें नांव माधवराव विश्वनाथ आगलावे असें होतें. त्यानें शाळा सोडून तो पोस्ट खात्यांत शिरला. पुढें त्याचा मुलगाही पोस्टमास्तर झाला, त्याचें नांव शंकर राव. ह्या उभयतां बापलेंकांचा मजवर फार लोभ होता. शंकरराव ठाण्यास पो० मा० असतांना त्यांनीं एक मराठी बैबल विकत घेतलें होतें. तेथें नवीन मुलांस वर्गांत बसविण्याचें वगैरे काम रा० रा० गोविंदजी नारायण* यांजकडे होतें. त्यांनीं मला स्कुलडिवीजनाच्या ( वरून ) दुसऱ्या क्लासांत बसविलें. त्या क्लासाचा मास्तर ब्राह्मण होता. परंतु ज्यानें मला शाळेंत आणिलें तो मुलगा पहिल्या क्लासांत होता, व तेथेंच दुसरा एक सुतार जातीचा मुलगा ज्या आळींत माझें लग्न झालें तेथला होता. ह्या दोघा मित्रांनीं मला दुसरे दिवशीं आपल्या वर्गांत येऊन बसण्याविषयीं फार आग्रह केला, परंतु त्या वर्गाचे शिक्षक आतां जे डी. डी. ह्म० दाक्तर आफ दिविनिटी ही बहुमानाची पदवी पावलेले आहेत ते मि० नारायण शेषाद्री हे होते. ते "बाटलेले" ब्राह्मण असल्यामुळें त्यांच्या हाताखालीं शिकणें मला बरें वाटलें नाहीं. तरी ह्या दोघां मित्रांनीं मला बसल्या ठिकाणावरून जुलमानें ओढून नेऊन आपल्या वर्गांत बसविलें! मि० नारायण यांनीं माझ्या अभ्यासाविषयीं फारशी विचारपूस न करितां आपल्या ममताळू स्वभावाप्रमाणें हा नवा मुलगा आहे इतकें समजून बसूं दिलें. (त्यांस मी कोंकणस्थ ब्राह्मणाचा मुलगा आहें असा प्रथम भास झाला, असें त्यांनीं आतां मला लिहून कळविलें.) त्याच दिवशीं रा० गोविंदजी नारायण (माडगांवकर) यांची फेरी वर्गांत झाली, त्यांनीं मला पाहून हा मुलगा काल खालच्या वर्गांत असतां आज येथें कसा आला अशी विचारपूस केली, व त्यांस मि० नारायण यांनीं उत्तर दिल्यावर "जर हा ह्या वर्गास योग्य असला तर ह्याला बसूं द्यावें, कांहीं दिवस पाहा," असें सांगून ते निघून गेले, तेणेंकरून माझ्या मित्रांस फार आनंद झाला, परंतु मला तितकें विशेष वाटलें नाहीं.

---

* हे गृहस्थ त्या काळांतील प्रसिद्ध मराठी ग्रंथकर्त्यांपैकीं होते. त्यांनीं मुंबईचें वर्णन, सत्यनिरूपण, ऋणनिषेधक बोध इ० अनेक उपयुक्त व मनोरंजक पुस्तकें लिहिलीं. हे बहुत वर्षे फ्रिचर्च विद्यालयांत होते, त्यांजवर दा० उईलसन वगैरे फ्रिं० चर्च मिशनेरी यांचा फार लोभ असे.

रेव० नारायण शेषाद्री.

त्या दिवसांत मि० नारायण हे ब्राह्मणी पोषाक करीत असत. त्यांचीं सर्व वस्त्रें फार शुभ्र व स्वच्छ असत, पांढरें पागोटें, पांढरा अंगरखा, पांढरें उपरणें, पांढरें धोतर, पायांत परभुशाई जाधवी जोडा, व लांब पांढरे इस्टाकीन, असा त्यांचा पोशाक होता. त्यांत दोन गोष्टी मला विलक्षण दिसल्या, म्हणजे त्यांच्या डोक्याचे इंग्लिश चालीप्रमाणें राखलेले केश व पायांतील इस्टाकीन. त्यांचें इंग्रजी बोलणें शुद्ध, स्पष्ट परंतु अमळ मंद होतें. ते मुलांशीं क्वचित् मराठींत बोलत. ते फार श्रमानें व आस्थेनें शिकवीत. त्यांच्या वर्गांतील मुलेंही हुशार व आनंदी असून त्यांचा मान राखीत. कोणी कोणी त्यांजवर प्रीति करीत. ते कित्येक गरीब मुलांस आपल्या खर्चानें शिकण्याचीं बुकें देत, इतकेंच नाहीं तर कपडेही देत. हे त्यांचे गुण व बोज पाहून माझ्या मनाला जो त्यांविषयीं कंटाळा आला होता तो लवकरच नाहींसा झाला; तरी जेव्हां ते हिंदु धर्माविषयीं बोलत तेव्हां मला बरें वाटत नसे. कधीं कधीं मी त्यांच्याशीं वाद घालीं, परंतु ते लवकरच मला कुंठित करीत.

मुलांचे इनसाफाचें कोर्ट.

नारायण साहेबांनीं मुलांच्या अपराधांची चौकशी करण्याकरितां एक कोर्ट स्थापिलें होतें. शाळा सुटल्यावर सर्व अपराधी मुलांस ह्या कोर्टापुढें आणीत. त्या कोर्टांत ज्युरर होते, त्यांनीं आपला अभिप्राय स्लेटीवर किंवा कागदावर लिहून दाखवावा, अथवा तोंडींच सांगावा; मुलांवरील दोषारोपही त्यांचे मास्तर लिहून आणीत. मि० नारायण हे स्वतां त्या कोर्टाचे जज्ज होते. कोर्टाचा इनसाफ बहुधा सर्वांस मान्य होत असे. असें इनसाफाचें कोर्ट मनिस्कुलांतही त्या वेळीं होतें असें एका जुन्या मासिक पुस्तकावरून ( ओरिएंटल क्रि० स्पेक्टेटर ) समजतें.

मुलांची परोपकारी मंडळी.

ह्याच सद्गृहस्थांच्या प्रयत्नानें तेथें एक मुलांची परोपकारी मंडळी स्थापिली होती, तिच्या योगानें गरीब मुलांस पुष्कळ सहाय होत असे. ह्या मंडळीची व्यवस्था व उन्नति करण्यांत हेनरी बेल व जानी बेल या नांवांचे दोघे बंधु फार श्रम घेत. ह्यांपैकीं एक जण स्काटलंदास जाऊन विशेष विद्याभ्यास करून

पाळकाची दीक्षा पावून तेथेंच राहिला. रेव० हेनरी बेल यांचे वडील व माझे वडील हे उभयतां एकाच इंजनेरिंग स्कुलांत शिकलेले होते. मि० डब्ल्यु. एच्. बेल हे इंग्लिश वर्गांत होते, व माझे वडील मराठींत होते. हे वृद्ध गृहस्थ कांहीं काळ रेव० निसबिट साहेबांच्या बंगल्यांत राहिले होते, तेव्हां त्यांनीं त्यांच्या खासगत वर्गास आमच्या बरोबर येऊन बसावें; अशी यांस ज्ञानप्राप्ति करून घेण्याची इच्छा होती. तरुण वाचकांनीं ही गोष्ट लक्ष्यांत ठेवावी.

मि० नारायण यांच्या वर्गांत गेलों तेव्हां मला तपकिरीचें व्यसन होतें.

**तपकिरीचें व्यसन.**

आह्मी कित्येक मुलांनीं मिळून तपकीर विकत आणण्याचा व डबी एकमेकांस देऊन बाहेर जाऊन ती ओढण्याचा एक लहानसा क्लब केला होता. एके दिवशीं ही गोष्ट रा० गोविंदजी नारायण यांच्या समजण्यांत आली तेव्हां त्यांनीं ती आमच्या मास्तरास सांगितली. मास्तर साहेबांनीं वर्गांतील मुलांस तंबाखूपासून तोटे व हानि काय होतात यावर कांहीं स्वल्प निबंध आणायास सांगितलें, त्याप्रमाणें कित्येकांनीं ह्या व्यसनाला प्रतिकूल व कित्येकांनीं अनुकूल अशा गोष्टी लिहून आणून वाचून दाखविल्या. मीं कांहीं लिहिलें नाहीं, परंतु जेव्हां माझी वाचायाची पाळी आली तेव्हां मीं उभें राहून असें ह्मटलें कीं, आजपासून मीं तपकीर ओढण्याचें सोडून दिलें; हाच माझा निबंध. तेव्हां तंबाखूच्या विरुद्ध पक्षाच्या मुलांनीं टाळ्या पिटल्या व नारायण साहेबांस फार संतोष वाटला. फ्रिचर्च विद्यालयांत असतांना जी माझी सुधारणूक होत गेली तिचा आरंभ एथून झाला.

मिशन शाळेंत गेल्याची गोष्ट मीं आपल्या वडिलांस लिहून कळविली, व नारायण साहेबांच्या क्लासांत बसल्याचेंही कळविलें. त्या वेळीं ते आदनास होते. त्यांनीं तें ऐकून आपल्यास संतोष झाला असें लिहिलें, व मि० नारायण यांस 'रामराम' पाठविला.

ह्या मिशन शाळेंत जाऊं लागल्यापासून बरेच दिवस माझा विश्वास हिंदु धर्मावरून अगदीं ढळला नाहीं, तर उलटा अधिक बळकट होत

गेला. मुंबईंत माझीं नातलगें व जातीचीं मनुष्यें पुष्कळ असल्यामुळें त्यांच्या घरीं वारंवार जाण्याचा मला प्रसंग येई, व मुलांस देवी आल्या किंवा मुलें व मोठीं माणसें आजारी पडलीं ह्मणजे, आणि दुसऱ्या अनेक कारणांवरून तेथें वारीं येत; तसेंच गोकुळअष्टमीच्या सणांत माझ्या नातलगांपैकीं कित्येकांच्या अंगांत कानोबाचें वारें येत असे, व माझ्या एका वहिणीच्या सासऱ्याच्या अंगांत त्याच सणांत एक पीर येत असे. हे सर्व प्रकार पाहून पूर्वी सांगितल्याप्रमाणें मला पुनः वाटूं लागलें कीं, माझ्या अंगांत असें एखादें वारें खेळत जाईल तर वरें होईल. ह्याशिवाय कित्येक भगतांचा पोट भरण्याचा व नांव मिळविण्याचा हा एक धंदाच होता, त्यांस बाहेरचीं फार बोलावणीं येत व त्यांचें उत्पन्नही बरेंच असे. जी बाई बेळगांवीं आमच्या घरांत होती ती मुंबईस आल्यावर कोणी साधारण मनुष्याच्या घरीं "देवाशीं वसायास" गेली असतां तेथून शेर पायली तांदूळ, एक नारळ व एक चवली आणल्याशिवाय परत येत नसे; मोठ्या घरीं तर तिला पुष्कळच मिळे. आह्मी कावजी पाटलाच्या तळ्याजवळच्या कापूरवाडींत घरांत भाड्यानें राहिलों होतों, त्यांत दुसरें एक कुटुंब राहत होतें, त्याचा सर्व खर्च देवऋषिपणावर चालत असे. परभु, सोनार, शेणवी, सुतार, इ० जातींचे पुरुष व वायका त्या देवऋषीस रात्रंदिवस बोलावून नेत, त्यांत बायकांचीं बोलावणीं तर फार, आजारी लेकरांस अंगारा धुपारा करण्याकरितां तर त्याहून अधिक. त्या देवऋषीनें कधीं कधीं आपल्या नातलगांस व स्नेह्यांस सांगावें कीं, रोग्याला वैद्यास दाखवा किंवा इस्पितळांत न्या, तरी 'तुमाना बायजुन बोलावलय' असें बाणकोटी बाल्यानें आग्रहानें सांगावें. ह्याच चाळींत एक कानोबाचा प्रसिद्ध मठ होता, तेथें गोकुळअष्टमीच्या सणांत तर वाऱ्यांची मोठी गर्दी उडत असे. असो. मुंबईंतील कोणत्याही दैवतांचें वारें माझ्या अंगांत खेळलें नाहीं, परंतु ज्या खवीसाला मी बेळगावीं सोडून आलों होतों तोच पुनः माझ्या अंगांत येऊं लागला. घरच्या लोकांस त्याचें पूर्वीप्रमाणें भय वाटलें नाहीं; ते त्यास विचारपूस करीत इतकेंच नाहीं, तर बाहेरचे लोकही कधीं मधीं विचारायास येत, तरी मीं लोकांच्या घरोघर जावें व भगतपणा करावा असें माझ्या वडिलांच्या

माझें फ्रिचर्च विद्यालयांत असतां धर्माचरण; वाऱ्यांचे खेळ.

मनांत अगदीं नव्हतें, व त्यांनीं तसें होऊंही दिलें नाहीं, मलाही पुढें पुढें त्या गोष्टीचा संकोच वाटूं लागला.

अघोर कृत्य, शितळा देवी, चोर, सुप्रीम कोर्ट.

एकदां आमच्या कुटुंबाच्या कोणी एका मनुष्यानें आपल्यास कोणी मोठा जबर वैरी आहे असें कल्पून त्याचा नाश करण्यासाठीं पंचाक्षऱ्यांच्या सांगण्यावरून त्याचा पिठाचा पुतळा करून जाळला. ह्या अघोर कृत्याची मला चांगली आठवण आहे. हें काम मध्यरात्रीं केलें. भगतिणीच्या अंगांत त्या वेळीं एकामागून एक अशीं पुष्कळ वारीं येऊन गेलीं, त्यांच्या साठीं पुष्कळ पक्वान्नांचें जेवण केलें होतें. ज्या मनुष्याच्या नांवाचा पुतळा जाळला तो सहा महिन्यांचे आंत मरेल असें त्या सर्व वाऱ्यांनीं सांगितलें, परंतु तसें कांहीं झालें नाहीं. त्याला जरा ताप थंडी झाली कीं, त्याचें मरण जवळ आलें असें आह्मांस वाटावें, पण तो बरींच वर्षें जगला!

मुंबईंत असतांना आमच्या घरीं कुलाचाराप्रमाणें शक्तिपूजा चालू होतीच; दक्षिणी ब्राह्मणांच्या ऐवजीं गुजराथी ब्राह्मण व क्वचित् तैलंग ब्राह्मण पूजेस येत असत. आमच्या घरांत मुलांस देवी आल्या ह्मणजे त्यांचा मानपान बेळगांवांतल्यापेक्षां अधिक डामडौलानें व खर्चानें होऊं लागला. मुलास उतार पडेपर्यंत मी भुलेश्वरांतील शितळा देवीस नित्य पूजा न्यावी, व घागरभर थंड पाणी तिच्या डोक्यावर ओतावें. ह्या देवीला त्या काळांत पारशी लोकही भजत. हिंदूंच्या नवसांबरोबर पारशी बायकांचेही नवस येत. आमच्या घरीं एकदां एका मुलास देवी आल्या असतां "बायांच्या सवाशिणी पुजण्याचे" (त्यांची बोळवण करण्याचे) दिवशीं आह्मी शितळा देवीस गेलों, तेथें माणसांच्या गर्दीत एका चोरानें माझ्या एका भावंडाच्या गळ्यांतील पुतळ्यांचें गांठलें कापण्याचा प्रयत्न केला, त्यास आह्मीं पकडलें. त्याच्या चौकशीच्या वेळीं मला सुप्रीम कोडतांत (हायकोर्टांत) साक्षीस जावें लागलें. कोर्टाच्या पायरीवर चढण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग.

पंचमुखी मारुती, कालिका देवी, धाकलेश्वर.

बेळगांवांत केवळ एक मुखाचा मारुती मला माहीत होता, परंतु मुंबईंत भुलेश्वराजवळ पंचमुखी मारुती भेटला; त्याचें तें विलक्षण ओबडधोबड रूप, त्याचे चांदीचे डोळे, व त्याच्या अंगावरील शेंदराचें घोंगडें पाहून मला त्याचा कंटाळा येण्याबद्दल मी त्याच्याही भजनीं लागलों. दर

शनिवारीं त्याला तेल, शेंदूर व रूयीच्या फुलांची माळ वाहूं लागलों. त्याशिवाय कांसारांच्या कालिका भवानीच्या दर्शनास वारंवार जावें. महालक्ष्मीस लक्ष्मीबाईची तर मला जुनी ओळख होतीच, पण धाकलेश्वरनामक एक नवा देव तिच्याजवळच भेटला, त्याला मी आदरून त्याच्या पायां पडायास कधीं कधीं जावें. हें देऊळ मुंबईतील जुन्या काळांतील प्रसिद्ध धाकजी दादाजी नांवाचे परभु गृहस्थाच्या स्मरणार्थ बांधलें आहे, त्यांत त्यांच्या कुटुंबांतील मनुष्यांच्याही मूर्त्ति आहेत. त्यांस ब्राह्मण लोक भजत नाहींत असें त्या वेळीं माझ्या ऐकण्यांत होतें.

# प्रकरण ९.

## सिंहावलोकन.

हिंदुधर्मावरील माझा विश्वास कोणकोणत्या कारणांनीं व कसकसा उडत चालला हें सांगण्यापूर्वीं हिंदुधर्माविषयींचें माझें ज्ञान, अनुभव व त्यांपासून झालेले लाभालाभ हे थोडक्यांत सांगतों.

१. पहिली गोष्ट अशी आहे कीं, मला जें धर्मज्ञान झालें होतें तें पौराणिक हिं० ध० चें होतें. वेद व वेदांत यांविषयीं मला कांहीं माहिती नव्हती, व ती करून देण्याचा माझ्या वडिलांनीं किंवा उपाध्यांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं, आणि तसें करण्याचें त्यांच्या व माझ्या मनांतसुद्धां आलें नाहीं. बेळगांवांत कधीं कधीं एखादा हरदास कथेच्या आरंभीं अध्यात्मविषयावर कांहीं व्याख्यान देत असे, पण तें ऐकायास फारच थोडे लोक जमत, व तें संपून कथानुसंधान केव्हां लागेल याची वाट पाहात. तसेंच मलाही स्वतां वेदांतविचार कधीं आवडला नाहीं. हीच स्थिति हजारों व लाखों लोकांची आहे. मूर्त्तिपूजेच्या द्वारें, ह्मणजे सगुणोपासनेच्या योगानें निर्गुणाप्रत मनुष्य पावतो असें जें हिं० ध० प्रतिपादकांचें ह्मणणें तें अगदीं निराधार आहे. मूर्तिपूजेच्या योगानें मनुष्य कधींही वरच्या पायरीवर चढत नाहीं, तर खालीं खालीं उतरत जातो हेंच खरें आहे. पाहा, माझीच गोष्ट ध्यानांत आणा. प्रथम माझी मूर्तिपूजा हलक्या प्रतीची ( जर तींत प्रती आहेत असें क्षणभर मानिलें ) नव्हती; जाखाई जोखाई, भैरोबा, रोकडोबा यांचा मी भक्त नव्हतों. खंडोबा जरी आमचें कुळदैवत होतें तरी तो माझें इष्ट दैवत नव्हता; रामकृष्ण, शिव, विष्णु, विठोबा इ० दैवतांची मी पूजा करीत असें; मोठे कर्मठ व आपणांस अत्यंत पवित्र मानणारे अशा ब्राह्मण लोकांत मी राहिलों व लहानाचा मोठा झालों; चांगल्या हरदासांचीं कीर्तनें ऐकिलीं, पुराणें श्रवण केलीं, व जें कांहीं मी करीत असें तें पूर्ण श्रद्धेनें व भोळ्या भावाचें होतें, त्यांत ढोंग सोंग कांहीं

नव्हतें. परधर्माची गंधवार्तादेखील मला नव्हती. जरी अगदीं लहानपणीं विद्याभ्यासाकरितां मिशन शाळेंत गेलों व मध्यंतरीं सरकारी शाळेंत जाऊन पुन: तरुणपणीं दुसऱ्या मिशनशाळेंत जाऊं लागलों, तरी माझी हिंदुधर्मावरील श्रद्धा तिलमात्र कमी झाली नाहीं, उलटी विशेष वाढत जाऊन मूर्त्तिपूजेच्या अगदीं हलकट प्रकाराकडे वळली, श्रेष्ठ (मानिलेल्या) देवांची उपासना व क्षुद्र दैवतांची भक्ति एकाच काळीं मजकडून चालली होती. एकीकडे शिवरात्री व एकादशी करावी व दुसरीकडे छांछु करणाऱ्या पंचाक्षऱ्याच्या नादीं लागावें. एका दिवशीं पुराण कीर्त्तन श्रवण करावें, व दुसऱ्या दिवशीं नागांची काहणी ऐकत बसावें. देवळांत विष्णु किंवा कृष्ण सर्व देवांत थोर आहे, रामनामासारिखें दुसरें कांहीं नाहीं असें साधूंच्या मुखें ऐकावें, व तिकडे घरांत खंडोबाची तळी भरतांना "एल्कोट" ह्मणावें व मुरळ्यांचें गाणें ऐकावें. (खंडोबा हा आमचें कुळदैवत होता हें मागें सांगितलेंच आहे.) एकदां ब्राह्मणाचें चरणतीर्थ घ्यावें व दुसरेंदा देवीचें तीर्थ (मद्य) घ्यावें. एकदां कपाळास गंध लावावें, व दुसरेंदा भस्म चर्चावें, पुन: खंडोबाचा भंडार (हळद) चोळावा; व त्याच्या मागून विठोबाचा अबीरबुका फांसावा, आणि शेवटीं देवीचा कुंकुमतिलक लावावा, आणि होळींत सर्वांगावर धूळ घ्यावी ! संध्येंतील मंत्र जपत असतां गोसाव्यापासून घेतलेला साधक मंत्रही मी पुटपुटत असें. शिवस्तोत्र व सर्पस्तोत्र हीं दोन्ही मला सारख्याच मोलाचीं वाटूं लागलीं. कोणी ह्मणतील कीं ही अज्ञानपणांतील पोरकट समजूत होती, तर असें नाहीं. आतां मला समजतें कीं, हिंदु लोकांत जे मोठमोठे ज्ञानी व साधुसंत होऊन गेले, ते लोकांस ब्रह्मज्ञान शिकवीत असतां व स्वतां वेदांत विचार करीत असतां अनेक दैवतांचें भजन करीत असत, व क्षुद्र दैवतांचें भय वाळगीत. आणखी मला आतां असें समजतें कीं, वैदिक काळांतील आर्य लोकांची देखील अशीच गोष्ट होती. ते महान इंद्राची स्तुती करीत असतां नीच सर्पाचीही प्रार्थना करीत; आणि सोमरस काढण्याच्या पाट्यावरवंट्यासही पूजत.

२. दुसरी गोष्ट अशी कीं, ह्या सर्व देवभक्तींत व धर्माचरणांत मला पापाचें भय ह्मणून कांहीं समजलें नव्हतें. सोवळ्याओवळ्याचे आचार व खाण्यापिण्याचे नियम यांसंबंधीं दोषांपासून मात्र मी फार जपून दूर राहिलों. परंतु असत्य भाषण व चोरी करणें, खोटी शपथ वाहणें, विषय-

वासनांची लगाम ढिली सोडणें इ० गोष्टी करण्याविषयीं देवाचें भय ह्मणून वाटलें नाहीं, व त्या कर्मांचा हिंदु धर्मांत निषेध केला आहे, असें मला समजलें नाहीं, अथवा तीं केल्यानें ज्या दैवतांची भक्ति मी करीत होतों तीं मजवर रागें भरतील असेंही वाटलें नाहीं. मीं होळीच्या दिवसांत चोरी करावी व दिपवाळींत जुगार खेळावा. जुगारी लोकांच्या अड्डयांत बसण्याचेही मला वारंवार प्रसंग येत. हे जुगार रात्रंदिवस चालत, व थैल्या भरभरून रुपये एकएकापाशीं असलेले व ते त्यांनीं हरवलेले मीं पाहावे. परंतु देवानें मजवर मोठी दया करून ह्या आखाड्यांच्या खाड्यांत मला पडूं दिलें नाहीं. मीं चोरून लपून एखाद्या शाळेच्या सोबत्याबरोबर एकीबेकीच्या खेळांत पैसे हरवावे, व दिपवाळींत मात्र प्रसिद्ध रीतीनें एक दिवस चौघांबरोबर जुगार खेळावा. चैनबाजींत उधळण्याकरितां घरांतील पैसे वगैरे चोरल्यावर चोरी छपली जाण्याकरितां मारुती वगैरे दैवतांस नवसही करावे! बेळगांवांत एकदां मीं आपल्या चुलत्याच्या खोलींत माळ्यावरून खालीं उतरून फणसपोळी चोरली; व चोरी छपविण्याकरितां, अथवा काकाचे शिव्याश्राप मला न भोवावे ह्मणून एका बाईच्या अंगांत येणाऱ्या वाऱ्याची विनंति केली! एकदां मुंबईंत सरकारी शाळेंत जात असतां एका पारशाच्या मुलानें फीकरितां आणलेला एक रुपया गमाविला तो मला सांपडला. जेव्हां तो मुलगा आमच्या क्लासांत शोध करण्यास आला, तेव्हां तो पायाखालीं दाबून ठेवून मला जिरावा ह्मणून मीं जवळच्या मारुतीस नवस केला. ह्या नवसाची आठवण आतां जेव्हां जेव्हां मी त्या देवळावरून जातों तेव्हां मला होते. याप्रमाणें अनीतीच्या अंधारांत मी होतों. याचीं दोन कारणें होतीं; एक कृष्णादिक देवांच्या चरित्रांतील अशा गोष्टीचें उदाहरण, व भोंवतालच्या मनुष्यांचें वर्त्तन. ज्या लोकांत मी लहानाचा मोठा झालों त्यांच्यामध्यें मला कोणी नीतिसंबंधी सदुपदेश करणारा भेटला नाहीं. अनीतीनें चालण्याचा कोणीं उपदेश केला असें नाहीं; अथवा माझ्या अनीतीच्या वर्त्तनाबद्दल मला शिक्षा मिळाली नाहीं असेंही नाहीं, तर अनीतीनें वागणें हें ईश्वराज्ञेविरुद्ध आहे त्यांत अधर्म आहे, असें मला कोणीं शिकविलें नाहीं. अनीतीनें वागण्यांत बेअब्रू, लज्जा व ऐहिक हानि आहे हें मला ठाऊक होतें.

३. तिसरी गोष्ट ही कीं, जो धर्म मी आचरीत होतों तो खरा किंवा खोटा आहे याचा मीं कधीं विचार व शोध केला नाहीं. हा आपल्या वडिलांचा धर्म आहे

ही मुख्य कल्पना, तिच्या मागून हा आपल्या जातीचा व लोकांचा धर्म ही दुसरी कल्पना; व तिसरी ही कीं, सर्व धर्म खरे आहेत, किंवा ज्याचा धर्म त्याला खरा असें समजत असतांही मुसलमानी धर्मांतील पीर व फकीर यांचा मी मान राखीत असें. ज्याचा धर्म त्याला खरा असें बहुत लोकांच्या तोंडून माझ्या कानीं पडत असे व तें मी खरें मानावें.

४. जीं दैवतें मी भजत होतों तीं वास्तविक आहेत, व तीं मूर्त्तींत आहेत व मूर्त्तीच देव आहेत असें मला वाटत होतें. मूर्त्तींच्या स्मरणानें किंवा ध्यानानें तृप्ति होत नसे, तर "देवदर्शनास" जावें, देवांची पूजा करावी, त्यांस अर्पणें व्हावीं, त्यांला प्रदक्षिणा कराव्या, त्यांस न्यहाळीत बसावें, त्यांच्यापुढें उभें राहून त्यांचीं स्तोत्रें ह्मणावीं, त्यांची प्रार्थना करावी, अशा प्रकारची मी त्यांची भक्ति करीत असें. येणेंकरून माझ्या अष्टांगीं मूर्त्तिपूजा भरलेली असे. मूर्त्तींच्या द्वारें निराकार देवाची कल्पना माझ्या मनांत कधींच आली नाहीं. जी मूर्त्ति पहावी तीच मनांत सर्वदां बसून व ठसून राही. जशी वस्तूशिवाय रंगाची कल्पना होत नाहीं, तशी मूर्त्ती-शिवाय हिंदु देवाची कल्पना माझ्या मनांत आली नाहीं.

५. ब्राह्मण, साधुसंत, गुरु, संन्याशी यांस मी अत्यंत पवित्र व पूज्य मानीत असें, परंतु त्यांच्याठायीं कोणती पवित्रता आहे याचा मीं कधीं विचार केला नाहीं. ते जातीनें पवित्र अथवा गुणस्वभावानें पवित्र हा विचार माझ्या मनांत कधीं आला नाहीं, तर त्यांचें दर्शन घेतल्यानें व त्यांचा प्रसाद व आशी-र्वाद मिळाल्यानें पुण्यप्राप्ति होते, एवढें मात्र समजत होतों. पण हें पुण्य काय, व कोणत्या उपयोगीं पडेल हें मला ठाऊक नव्हतें, त्यांचा प्रसाद ह्मणजे त्यांच्या हातचे नारळ, केळीं वगैरे पदार्थ, त्यांचें उच्छिष्ट किंवा त्यांचें चरणतीर्थ मिळालें ह्मणजे मोठा लाभ झाला असें मी समजत असें. त्यांचा आशीर्वाद ह्मणजे धनधान्यादि संसारोपयोगी पदार्थ प्राप्त होवोत असे मंत्र-रूपानें त्यांच्या मुखचे शब्द ऐकणें; परंतु त्यांच्या सदुपदेशाचें मला अगत्य दिसलें नाहीं. त्यांनीं दिलेले, व त्यांनीं शिकविलेले मंत्र वगैरे जपण्यास मी फार जपत असें. ह्याविषयीं घरांतील स्त्रीपुरुषांचा कित्ता मी वळविला इत-केंच नाहीं, तर आमच्या आसपास मोठ्या निष्ठेनें असे जपी माझ्या दृष्टीस पडत, त्यांचेंही मीं अनुकरण केलें. मागल्या हकीकतींत सांगितलेल्या आमच्या घरासमोरील सोनारांच्या घरांत गुरुमंत्र जपणारे व हरिपाठ वगैरे

नित्य मोठ्या कडकडीत नेमानें पठण करणारे पुरुष व विधवा स्त्रिया असत त्यांचाही मीं कित्ता वळविला.

६. शेवटची गोष्ट ही कीं, अशा गाढ अंधारांत भटकत फिरत असतांना कृपाळू देवाची दृष्टि मज पाप्यावर होती. देवाचा आत्मा मला पापमार्गांतून फिरविण्याकरितां माझ्याशीं झटत होता. हें त्या वेळीं जरी मला समजलें नाहीं, तरी आतां समजतें.

(१.) याविषयीं पहिली गोष्ट माझ्या ध्यानांत अशी येते कीं, देव आपल्या सूत्राकडून मला आपणाकडे वळवीत होता. त्याच्या सूत्रानें मला दुष्ट सोबतींत बहुत दिवस एका ठिकाणीं राहूं दिलें नाहीं, बेळगांवांत मिशन शाळेंत जात असतां कित्येक दुष्ट मुलें वरच्या वर्गांत होतीं, त्यांच्या वर्गांत मी गेल्यावर त्यांनीं कांहीं काळपर्यंत मला आपल्या दुष्ट चाली शिकविल्या. परंतु तेथून मुंबईस आल्यानें त्यांची संगत सुटली; इतकेंच नाहीं, तर तशी सोबत पुनः लागलीच नाहीं. मुंबईत असतां जी दुष्ट संगत लागली होती, व मद्यपानादि व्यसनांत पडण्याचे मोह प्राप्त झाले होते ते आदनास गेल्यामुळें दूर झाले. कारण नव्या ठिकाणीं नवी मित्रमंडळी जोडावयास बराच काळ लागतो. तरी माझें दुष्ट अंतःकरण माझ्याबरोबर (मजमध्येंच) होतें, त्याची सोबत सुटली नव्हती, ह्मणून आदनांत गेल्यावर दुसऱ्या प्रकारच्या मळीण पापांत मी पडलों, पण मुंबईस परत आल्यावर पुनः ती अवस्था बदलली. याप्रमाणें कुसंगतीपासून देवानें मला वारंवार सोडविलें.

(२.) ईश्वरी सूत्राच्या योगानें माझा बेळगांव मिशनस्कुलांत प्रवेश झाला. त्यापासून जरी तात्कालिक लाभ झाल्यासारखें दिसलें नाहीं, तरी देव माझ्या अंतःकरणांत आपल्या शास्त्राचें जीवनदायक बीज पेरीत होता. त्यानें मजपुढें आपल्या भक्तांच्या पवित्र वर्त्तणुकीचा कित्ता ठेविला. बेळगांवांत असतांना, रे० टेलर साहेब व रे० बेनन साहेब यांच्या खिस्ती वर्त्तनाकडे जरी त्या काळीं फारसें लक्ष दिलें नाहीं, तरी पुढें त्यांजविषयीं योग्य समयीं माझ्या मनांत विचार येऊं लागले. तसेंच जें ईश्वरी शास्त्र ते आह्मांस शिकवीत व ज्या प्रार्थना ते करीत त्याही यथाकाळीं माझ्या फार उपयोगीं पडल्या. तेथें कोणी देशी खिस्ती होते त्यांशीं मीं स्नेह ठेविला नाहीं, तरी त्यांपासूनही ईश्वरी सूत्राकडून मला पुढें लाभ घडला. माझ्या एका हिंदू शिक्षकाचा वृद्ध बाप खिस्ती होता, तो शाळेंत आला ह्मणजे मीं त्याजकडे

आश्चर्यानें पाहावें. त्याच्याशीं त्याचा मुलगा (निदान आमच्या देखत तर) बोलत नसे. तो बोलला तरी ह्यानें त्याला झिटकारून जा ह्मणून सांगावें. त्या शाळेंत पिराजी नांवाचा एक हिंदु मुलगा होता, तो जरी त्यावेळीं ख्रिस्ती नव्हता तरी त्याचा हिंदु धर्मावर अगदीं विश्वास नव्हता. त्यानें वारंवार आमच्या वर्गांतील मुलांशीं हिंदु धर्माविरुद्ध बोलावें, तें जरी मला आवडत नसे तरी मी त्याच्याशीं स्नेहानें वागावें. हा मित्र तेथील कलेकटर साहेबांचा शिपाई होता, त्याला तो बुद्धिमान दिसून आल्यावरून त्यानें त्याला दिवसा शाळेस पाठवावें व रात्रीं आपल्या बंगल्यावर पाहाऱ्यास बोलवावें. त्याला आह्मी जबरीनें मारुतीच्या देवळांत न्यावें तेव्हां त्यानें मूर्त्तीपुढें डोळे मिटून उभें राहावें, परंतु तिच्या पायां पडूं नये. यावरून त्याच्या सोबतीच्या मुलांनीं त्याचा छळ केला नाहीं. त्याच्या शिपायगिरीच्या बाण्यास तीं भिऊन असत. याच्या बुद्धीवरून व विद्येवरून माझे वडीलही त्याला मान देत. पुढें तो माझ्या अगोदर (मी बेळगांव सोडल्यावर) ख्रिस्ती झाला, व नंतर विशेष विद्या वगैरे शिकून त्याला उपदेशकाची दीक्षा मिळून बेळगांवच्या कानडी मंडळीचें पाळकपण मिळालें. पुढें कांहीं वर्षांनीं जेव्हां त्याची माझी ख्रिस्ती भावाच्या नात्यानें भेट झाली तेव्हां आह्मां उभयतांस अत्यानंद झाला, व बहुत दिवस आह्मीं एकमेकांच्या ख्रिस्ती समागमाचा उपभोग घेतला. बेळगांवच्या मि० स्कुलांत कांहीं दिवस त्रावणकोर येथील राजकुळांतील रामवर्मा नामक एक पुरुष शिक्षकाचें काम करीत असे तो ख्रिस्ती होता, त्याच्या वर्गांत मी जरी कधीं गेलों नाहीं, तरी त्याची वर्त्तणूक व त्याचें प्रार्थनेच्या वेळीं गंभीर रीतीनें उभें राहणें हें माझ्या लक्षांत वारंवार येत असे. त्याचा गौरवर्ण व सुंदर रूप व पांढरीं शुभ्र विलक्षण (चिनी लोकांसारिखीं) वस्त्रें व चमत्कारिक वाटोळी टोपी हीं सर्व अद्याप माझ्या दृष्टीपुढें येतात, मी त्याच्याशीं क्वचित् बोलत असें, परंतु त्याचा जो कांहीं विलक्षण ठसा माझ्या मनावर उठला तो कधीं गेला नाहीं.

(३) जें ख्रिस्ती शास्त्राचें ज्ञान त्या शाळेंत मला प्राप्त झालें तें जरी तत्काल माझ्या उपयोगीं पडलें नाहीं, तरी त्यापासून मला पुढें मोठा लाभ झाला. मला इंग्रजी बरेंच समजूं लागल्यापासून मी आपल्या चुलत्याचें इं० बैबल घरीं वाचूं लागलों. आब्राहाम, इझाक इ०च्या कथा व दावीदाचीं गीतें हीं मला फार आवडत. तें देवाचें शास्त्र आहे असें समजून वाचीत नव्हतों,

तरी दयाळू देव त्यावेळीं देखील आपल्या आत्म्याकडून शास्त्रद्वारें मजशीं बोलत होता, पण जशी शमुवेलानें त्याची वाणी प्रथम ओळखली नाहीं तशी मींही ती ओळखली नाहीं. बैबलाखेरीज कांहीं ख्रिस्ती पुस्तकें माझ्या वाचण्यांत फार लहानपणीं आलीं त्यांपासून मीं कांहीं बोध घेतला नाहीं, केवळ गमतीसाठीं ह्मणून तीं वाचावीं तरी जेव्हां माझे ज्ञानचक्षु उघडण्याचा समय देवानें आणिला तेव्हां त्यांतील गोष्टी मला हितावह झाल्या.

(४) ख्रिस्ती पुस्तकांखेरीज हिंदुधर्मसंबंधीं जीं पुस्तकें माझ्या वाचण्यांत आलीं त्यांतील भक्तिपर वचनें मला फार आवडत. मोल्स्वर्थ साहेबाच्या म० इं० कोशाचीं पानें चाळून पाहण्याचा मला फार नाद असे. त्यांत जीं उदाहरणार्थ घेतलेलीं बोधपर वाक्यें अढळत तीं मी उतरून घेत असें. अशा उदाहरणांत "कोण मी कैंचा कोठूनी आलों, हें गूज श्रीगुरुलागीं पुसावें" हें वाक्य माझ्या ध्यानांत पक्कें बिंबलें होतें. कित्येक रामदासी श्लोक व तुकारामाचे अभंग व नामदेवाचा हरिपाठ मी मोठ्या प्रेमानें एकटाच ह्मणत बसें. तसेंच भजनाचे अभंग घरांत मोठ्या प्रेमानें ह्मणावे. मला प्राकृत पोथ्या वाचायास शिकविण्याकरितां जो हरिदास ठेविला होता त्याच्या घरीं रात्रीं भजन होई तेथें मीं जावें, व मोठ्या प्रेमानें व उच्चस्वरानें "बुडतों भवसागरीं, तारींरे विठोबा!" असें भजन करावें. पण तारण ह्मणजे काय व तारणारा कोण हें मला त्या काळीं समजलें नाहीं. तथापि ह्या भजनादिकांकडून अंतःकरणांतील स्वाभाविक भक्तिभावना स्थिर व जागृत राहून निवळ नास्तिक मताकडे माझी प्रवृत्ति झाली नाहीं; हा एक मोठा लाभ झाला. ईश्वर आहे व त्यानें मनुष्यास शास्त्र दिलें आहे ही कल्पना माझ्या मनांतून तर कधींच गेली नाहीं.

याप्रमाणें निबिड अंधारांत असतां प्रकाशाचीं किरणें देवाचा आत्मा माझ्या अंतःकरणावर पाडीत होता. तीं पाडणाऱ्याचा हात मीं त्यावेळीं पाहिला नाहीं, व ह्या किरणांच्या मागून पूर्ण प्रकाश प्राप्त होईल असेंही मला वाटलें नाहीं.

(५) ईश्वरी सूत्रानें मला आणखी असें शिकविलें कीं, जरी माझ्या घरचीं मनुष्यें हिंदुधर्माप्रमाणें अत्यंत भाविक व कर्मठ होतीं व धर्माचरण करण्यांत कांहीं अंतर पडूं देत नसत; जरी त्यांस ब्राह्मणांचे व साधुसंतांचे वारंवार आशीर्वाद मिळत, व ते अनेक दैवतांची भक्ति मनोभावानें करीत;

तरी त्यांच्या मध्यें तंटे व भांडणें वारंवार होत. माझे आजोबा कडकडीत शिवभक्त व शक्तिउपासक असून ते आपल्या दोघांही पुत्रांशीं फार भांडत, खाण्यापिण्याच्या पदार्थावरून भांडणें, वस्त्रालंकारावरून भांडणें, मानापानाच्या गोष्टीवरून भांडणें; सारांश, भांडण ह्मणून घरांतून कधीं गेलें नाहीं. भांडणें करावीं व देवपूजा करावी; देवांचे मंत्र जपावे व घरांतील माणसांशीं अबोलेपणा धरावा; भांडणें करावीं व व्रतें उपोषणें करावीं, दानधर्म करावे, तुळशीपुढें बसून एकमेकांचें अनिष्ट चिंतावें व नवस करावे, असे जे प्रकार हिंदु कुटुंबांत साधारणतः असतात ते आमच्या घरांत नव्हते असें नाहीं. हें मी एथें संतोषानें लिहीत नाहीं. मी त्या भांडणावरून अत्यंत कष्टी व दुःखी होत असें. भांडण होतेवेळीं माझें आंग थरथर कांपावें. हा लेख लिहिण्याचें कारण हेंच कीं, हिंदुधर्माचें कितीही मनोभावानें आचरण केलें तरी त्यांत त्याच्या अनुयायींस अशा अनीतीच्या वर्त्तनापासून दूर ठेवण्याची बिलकूल शक्ति नाहीं. सर्व हिंदु कुटुंबांची अशी स्थिति असते असें माझें ह्मणणें नाहीं, तर जो प्रीतीचा व शांतीचा अंश हिंदु कुटुंबांत असतो तो त्यांच्या विवेकाचें, सुस्वभावाचें, सुज्ञानपणाचें, साधुसंतांच्या बोधपर ग्रंथवाचनाचें फळ होय; मूर्तिपूजा केल्याचें, मंत्र जपण्याचें, व्रतउपोषणादिक केल्याचें, तीर्थयात्रेस जाऊन आल्याचें, व ब्राह्मणादिकांस दानधर्म दिल्याचें, त्यांचे आशीर्वाद मिळविण्याचें तें फळ नव्हे. जे भटभिक्षुक अथवा विद्वान ब्राह्मण आमच्या घरीं धर्मकृत्यें चालविण्यास येत ते आह्मांस नीतीच्या वर्त्तनाविषयीं बोध करीत नसत. त्यांनीं पूजेची पोथी वाचावी, पंचांग सांगावें. फलज्योतिष सांगावें, पीकपाण्याविषयीं भविष्य सांगावें, मंत्र ह्मणावे, मंत्र शिकवावे, आह्मांस आशीर्वाद द्यावे, आपल्या पायाचें तीर्थ पाजावें, आह्मांवर मंत्राक्षता टाकाव्या; परंतु कधीं कोणत्याही प्रकारचीं बोधवचनें आमच्या कानीं पाडलीं नाहींत. प्रभु मला जेव्हां प्रकाश दाखवूं लागला तेव्हां ह्या गोष्टीचें व्यर्थपण धर्मदृष्ट्या मला दिसूं लागलें.

# प्रकरण १०.

## फ्रिचर्च विद्यालयांत अभ्यास करीत असतां माझ्या सुधारणुकेस कसा आरंभ झाला, व त्यावेळची माझी धर्मसंबंधीं स्थिति.

( १८५०–५३ ).

ज्या काळांत मी फ्रिचर्च विद्यालयांत हिंदु असतां विद्याभ्यास करीत होतों, तो काळ त्या विद्यालयाच्या संबंधानें मात्र चमत्कारिक होता असें नाहीं, तर धर्मसंबंधीं शोधाच्या व सुधारणुकेच्या संबंधानें सर्व महाराष्ट्रदेशांत पवित्र आत्म्याचें कार्य बहुत सुशिक्षित तरुणांच्या अंतःकरणांत अनेक स्थळीं चाललें होतें असें दिसतें. तसेंच सुधारणुकीसंबंधीं शिकलेल्या तरुणांमध्यें मोठी चळवळ चालली होती. सन १८४० सांपासून जातिभेद मोडावा व मूर्त्तिपूजा सोडावी यांविषयीं पुष्कळ तरुणांच्या मनांत विचार येऊन त्यांची एक जूट झाली होती, तिला त्यांनीं "परम हंससभा" किंवा मंडळी असें नांव दिलें होतें. हिच्याविषयीं पुढें सांगण्यांत येईल. विद्या व सुधारणूक ह्यांच्या संबंधानें एथें लिहूं लागल्यास पुष्कळ विषयांतर करावें लागेल. तरी टीपेंत कित्येक गोष्टींचें दिग्दर्शन केलें आहे.*

* ह्या काळांत मुंबईंत व महाराष्ट्रदेशांत धर्म व लोकसमाज यांची स्थिति सुधारण्याकरितां व विद्यावृद्धि करण्याकरितां ज्या संस्था स्थापित झाल्या होत्या, त्या येणेंप्रमाणें:—"**दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी.**" हिनें नानाफडनविसाची बखर, गुजराथचा इतिहास, सृष्टींतील चमत्कार अशीं कित्येक मोठमोठीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं. "**दक्षिणा प्राइज कमिटी.**" ही पुण्यांत स्थापली गेली. हिच्या योगानें मराठी ग्रंथ लिहिणारांस बरेंच उत्तेजन मिळून कित्येक चांगले ग्रंथ तयार झाले. "**मराठी ज्ञानप्रसारक मंडळी.**" ही मुंबईंत असून पुष्कळ वर्षें चालली. ही आपल्याच नांवाचें एक मासिक पुस्तक काढीत असे, व हिच्या सभेंत विद्वान लोक उपयुक्त विषयांवर व्याख्यानें देत. या नांवाची दुसरी गुजराथी सभा होती. "**कल्याणोन्नायक मंडळी.**" ही पुण्यांत होती. हिच्या नियमांपैकीं दोन नि-

फ्रिचर्च विद्यालयांत जाऊं लागल्यापासून सुमारें सहा महिन्यांनीं मी लिहून ठेविलेला एक कागद माझ्यापाशीं आहे, त्यांत येणेंप्रमाणें मजकूर आहे:—

---

यम असे होते कीं, "१ सर्व धर्मांमध्यें व सर्व वादांमध्यें व सर्व व्यवहारामध्यें मध्यस्थपणानें आपल्या बुद्धीस येईल तें निर्णित करून लोकांस कळविलें जाईल. २ शास्त्राचें तात्पर्य एक असतां लोक भलतेंच समजून दुराग्रहानें आपला तोटा करून घेतात, अशाविषयीं वास्तविक तात्पर्य जाहीर केलें जाईल. **ज्ञानप्रकाश सभा.** ही पुण्यांत होती. ह्या काळांत कलकत्त्याकडे **वेद व वेदांत** यांविषयीं इंग्लिश भाषेंत बरेच ग्रंथ व निबंध छापले जाऊन ते मुंबईच्या सुशिक्षित लोकांस वाचायास मिळाल्यावरून त्यांविषयीं चांगली माहिती झाली. लोकप्रिय व विद्वान **दाक्तर भाऊ दाजी** यांनीं रजपूत लोकांतील कन्याहत्येविषयीं उत्कृष्ट ग्रंथ रचिला त्यास सरकारानें मोठें बक्षिस दिलें. **कोणीही धर्मांतर केलें असतां त्याचे हक्क बुडत नाहींत** असा एक मोठा महत्वाचा कायदा सरकारानें १८५० सांत केला. (१८५० साचा आक्ट नंबर २१) त्याचा अभिप्राय असा आहे कीं ज्याला जो धर्म खरा वाटेल त्याप्रमाणें चालण्याची पूर्ण मुखत्यारी आहे व त्यावरून त्याचे जिनगीसंबंधीं वगैरे हक्क बुडत नाहींत. ह्याविषयीं कलकत्ता रिव्यु मार्च १८५१ ) नामक मोठ्या व वजनदार मासिक पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, "The year 1850 has also been distinguished above all others in the annals of Brjtish India, by the establishment of the principle of religious liberty throughout the whole of the country." तसेंच याविषयीं मद्रासच्या सुप्रिम कोर्टाचे जज्ज सर विल्यम बर्टन यांनीं एका खटल्याचा निकाल करितांना या कायद्याविषयीं ( मे ७, १८५१ ) येणेंप्रमाणें बोलून दाखविलें:—"This Act has been passed, not to encourage a change from one religion to another; but to secure liberty of conscience, and equal rights to all. Some of the people of this country may be insensible of the benefit now conferred upon them, some of them may be furious against it; but let me tell them, and tell them solemnly, that this act of 1850 is the Great Charter of religious freedom, which declares that the rights of all classes shall be equally respected, which says, "Do as your conscience bids you, you will not forfeit any of your rights by following the dictates of your conscience, whether you turn to the right hand or to the left. This Act for which all should render thanks to the great Disposer of events, and it is a wonder that any should be found to find fault with so merciful a provision, for according to it no man's rights can be hurt by a change of religion." ह्या महत्वाच्या उताऱ्या-

## "श्री."

"सकल विश्वाचा उत्पन्नकर्त्ता श्री जगद्गुरू, सर्वोत्तम नारायण याच्या पवित्र चरणांतें स्मरून मी शपथ करितों कीं, आजपासून मी ह्या खालीं लिहिलेल्या गोष्टी कदापि प्राण गेल्यासही करणार नाहीं. व ईश्वर मला अशा गोष्टी करण्यास बुद्धि न देवो. जर मजपासून असें घडेल तर शतगोहत्येच्या पातकाचें फळ माझ्या मस्तकीं पडो, व यमराज मला अक्षय नरकांत टाको.

अगदीं पहिला सुनिश्चय.

१. असत्य भाषण.
२. चोरी.
३. रंडीबाजी, व्यभिचार, शिंदळकी व तत्संबंधी कर्में—लावण्या, नाच, तमाशा, ख्यालखुशाली, गप्पा.

"जर कदाचित यांतून कांहीं मजपासून घडलें तर तात्काल हे परमेश्वरा, तुजपाशीं क्षमा मागून पश्चात्ताप करीन. कां कीं तुझ्या दयेशिवाय मनुष्याचे कोणतेही चांगले उद्योग सिद्धीस जात नाहींत."

"ता० २५, आगष्ट, १८४९."

नीतिसंबंधीं वर्तनाचा मी आपल्याविषयीं लिहिलेला हा पहिलाच लेख असावा असें मला वाटतें. याच्या पूर्वी कांहीं लिहून ठेविलेलें मला आठवत नाहीं. व जर हा कागद मजपाशीं राहिला नसता तर ह्याची कांहींच आठवण मला झाली नसती. त्यावेळचीं माझ्या हातचीं दुसरीं कांहींच कागदपत्रें माझ्यापाशीं नाहींत. हा कागद कोणत्या विशेष प्रसंगीं लिहिला, व कोणत्या कारणामुळें मीं आपल्याशीं हे ठराव केले याचें मला आतां स्मरण नाहीं. परंतु वरील मितीच्या मागून आठ वर्षांनीं त्यावर माझ्या हातचें आडवें

---

चा सारांश असा आहे कीं, हा कायदा लोकांस धर्मांतर करण्यास उत्तेजन द्यावें अशा हेतूनें केला नाहीं, तर सर्वांस धर्माच्या बाबतींत आपल्या मनाच्या सांगीप्रमाणें वागण्याची मोकळीक असावी, व सर्वांस सारखे हक्क असावे. हा जो या देशांतील लोकांवर महद् उपकार झाला आहे तो त्यांतून कित्येकांच्या ध्यानांत येत नसेल. परंतु मी ईश्वरास स्मरून सांगतों कीं, हा १८५० साचा आक्ट धर्मसंबंधीं स्वातंत्र्याची मोठी सनद आहे, ही मिळाल्याबद्दल सर्व गोष्टींचा मोठा व्यवस्थापक जो ईश्वर त्याचे आपण सर्वांनीं उपकार मानावे.

लिहिलेलें एक इंग्रजी वाक्य आहे, त्याचा आशय असा आहे कीं, "हा निश्चय मीं फ्रिचर्च विद्यालयांत जाऊं लागल्यावर केला, तेथें खिस्ती शास्त्रांतील शुद्ध नीति शिकूं लागल्यावरून असा निश्चय करण्याचें मला अगत्य वाटलें."

**रेव० नारायण शेषाद्री यांच्या स्नेहाची वृद्धि.**

मि० नारायण शेषाद्री यांच्या वर्गांत बसल्यावर त्यांचा धर्माच्या निमित्यानें जो मला कंटाळा होता तो उत्तरोत्तर कमी होत गेला. शाळा सुटल्यावर घरीं येतांना मी त्यांजबरोबर मार्गांतून चालूं लागलों; त्यांच्या व माझ्या घरची वाट एकच होती. त्यांच्या संगतींत मला पाहून लोकांनीं ह्मणावें कीं, हाही ह्याच्याच सारिखा एके दिवशीं होईल; परंतु मला त्याविषयीं कांहीं वाटूं नये. नारायण साहेबांनीं आपल्या घरीं शाळेसंबंधीं कांहीं विषय शिकविण्याचा एक वर्ग काढला होता, तेथेंही मी जाऊं लागलों. ते वारंवार मला माझ्या घरच्या मनुष्यांचें क्षेमकुशळ विचारीत, तेणेंकरून मला फार संतोष वाटे व माझें मन त्यांजवर विशेष बसूं लागे. कधीं कधीं त्यांनीं मला थट्टेनें चहा, काफी घ्याल काय असें विचारावें, परंतु मी ती घेत नसें. तेव्हां त्यांचें लग्न झालें नव्हतें. त्यांची व मिस्तर उलियम पेटन ( जे आतां स्काटलंदांत रेव० पेटन आहेत ) यांची मिळून एक युरोपियन व युरेशियन मुलांकरितां बोर्डिंग शाळा होती तेथें ते राहत असत, त्यांत कित्येक मुलें फार सुशील व धर्मशील होतीं त्यांची माझी ओळख पडली; कांहीं आमच्याच शाळेंत व वर्गांत येणारीं होतीं, अशांपैकीं जाकसन नांवाचा एक युरोपियन मुलगा होता, तो फार स्नेहाळु व धार्मिक होता. तो मजवर फार प्रीति करीत असे, व माझ्या आत्म्याच्या तारणाविषयीं काळजी धरून मला बोध करीत असे. त्यानें एकदां आपलें व आपल्या कुत्र्याचें रंगीत चित्र काढून मला दिलें तें माझ्यापाशीं पुष्कळ दिवस होतें. हा मित्र पुढें अमेरिकेस जाऊन मिशनरी होऊन हिंदुस्थानांत आला. रेव० हेनरी जाकसन यांच्या मिशनाचें ठाणें लखनौस होतें. पेटन साहेबही मजवर प्रीति करीत; ते जेव्हां शाळेंत शिकवायास येत तेव्हां त्यांची शिक्षणपद्धति मला फार आवडे. ते सर्वदां हास्यमुख असत.

**फ्रि० च० विद्यालयांतील धर्मशिक्षण.**

त्या काळांत फ्रि० च० विद्यालयांत जें ख्रिस्ती धर्मशिक्षण मुलांस मिळत असे तें फारच उत्तम प्रकारचें होतें. एक गणिताचा व रसायणशास्त्राचा वर्ग खेरीजकरून इतर सर्व विषयांच्या वर्गांत धर्मसंबंधी चर्चा थोडीबहुत चालायाचीच; आणि ती अशा प्रकारची होती कीं, तिचा कोणास कंटाळा येत नसे. सकाळचा व संध्याकाळचा धर्मोपदेश खेरींज करून प्रत्येक वर्गास बैबल किंवा त्यासंबंधी तोंडचे धडे नित्य पूर्ण एक तास शिकवीत; जेव्हां मला शिक्षकाचें काम मिळालें तेव्हां मी ख्रिस्ती नसतांही मला बैबल मास्तरची जागा दिली होती. ही गोष्ट मला फारच हितावह झाली. पूर्वींच्या मिशन शाळेंत संपादन केलेलें बैबलाचें ज्ञान माझ्या उपयोगीं पडूं लागलें, जणूं काय त्याचें माझ्या मनांत पुनर्जीवनच झालें.

**माझा बैबल शिकविण्याचा वर्ग.**

मीं आपल्या वर्गास बैबल पद्धतवार शिकवित असें. मीं धड्यांची वरीं चांगली तयारी करावी. मुलांस शास्त्रांतील ओव्या पाठ करायास लावाव्या, धड्यावर प्रश्न लिहून आणायास सांगावें, हुशार मुलांस नंबर द्यावे. कित्येक मुलें बैबल शिकण्याचा कंटाळा करीत, तरी दुसरीं आवडीनें व हुशारीनें आपले धडे तयार करून आणीत. कधीं कधीं शास्त्रसंबंधी विषयाची फोड करण्यांत व त्याजवरून बोध करण्यांत मीं इतकी आस्था दाखवावी कीं, ती पाहून मुलांनीं मला ह्मणावें कीं, "जर तुह्मांला ह्या गोष्टी खऱ्या वाटतात, तर तुह्मी ख्रिस्ती कां होत नाहीं?" मुलांस शास्त्रार्थ सांगतेवेळीं कधीं कधीं देवानें मला असा प्रकाश द्यावा कीं, तेणेंकरून माझें मन अगदीं वेधून जावें, व माझे नेत्र अश्रूंनीं भरावे. एकदां "अहो कष्टी तुह्मी सर्व मजकडे या" ह्या ओवीचा अर्थ सांगतांना माझी अशीच अवस्था झाली, मुलेंही कांहीं वेळ तटस्थ व सद्गदित होऊन त्यांनीं पुन: वरील प्रश्न मला विचारिला. ह्या प्रसंगाची मला चांगली आठवण आहे. ही गोष्ट १८५१ सालांतली आहे.* त्या वेळीं आमची

---

* ह्या काळीं फ्रि० च० विद्यालयांत व्यावहारिक विषयांखेरीज कोणकोणते धर्मसंबंधी विषय शिकवीत असत हें पुढील यादीवरून दिसून येतें. ही याद "ओरिएन्टल स्पेकटेटर" नामक मासिक पुस्तकावरून घेतली आहे. (१८५१—५२.)

(School Division). Sixth, Fifth, Fourth, and Third Classes. Verbal religious instruction, Elementary Catechism, Gospels and Acts. Second

शाळा आंब्रोळी मिशन गृहाजवळच्या एका बंगल्यांत होती. ( हें मिशनगृह गिरगांवांतील पोलिसकोर्टाच्या शेजारीं जें मोठें घर आहे तेंच होय. )

---

Class. Gospels, Companion to the Bible, Prophecies. First Class. Keith on Prophecy, Gospel of Luke, Acts, Peter, Daniel, Bi-weekly Essays. Catechetical Class. Exercises on the Assembly's Shorter Catechism. (COLLEGE DIVISION). BIBLE CLASS. Genesis with Bishop Hall's Contemplations and Dr. Candlish's work on Genesis, Exodus, Epistle to the Hebrews, with Stewart's Commentary and other works.—Evidences of Christianity. NATURAL THEOLOGY, whole of Paley's Nat. Theology with illustrations and additions. THEOLOGY. O. T. Hist. Geo. and Christology, and early Hist. of the Christian Church. Edward's Hist. of Redemption. Lands of the Bible for illustrations. Hengstenberg's Christology of the O. T. Prophecies of Zechariah and Daniel, with critical readings. Popish controversy;—Stillingfleet's Doctrines and Practices, with Cunningham's Notes.

सन १८५६ सालच्या अभ्यासाच्या विषयांची पुढील याद त्या वेळीं छापलेल्या शाळापत्रकावरून घेतली असून तींत केवळ कालेज डिविजनांत शिकवायाचे विषय आहेत:—

Church History, Fulfilment of prophecy, History of ancient religions, particularly Primitive, Zabaisim, Egyptian, Celtic, Greek. BIBLE CLASS. Epistle to the Romans:—Revision of Chap. I—V. Critical study of Chap. VI—XII. Punishment of Idolatry, Clean and unclean animals, The year of Release, The three great Feasts, Divination &c. The great Prophet.—Deut. XII—XVIII.—Witnesses to Christ, The miracle of the loaves, Christ, the Bread of Life. John V. VI.

MENTAL AND MORAL PHILOSOPHY. Butler's Sermons: three on the Human Nature; on Compassion; Resentment; Self-deceit; Love of our neighbour. Abercrombie's Moral Feelings.—Written Abstracts. Theology. Old Testament History. Edward's History of Redemption, complete with Historical and Geographical illustrations. NEW TESTAMENT HISTORY. Incarnation and Ministry of our Lord, from Harmony of the Gospels of Tract Society, with Dr. W's., written Notes and illustrative references to various authors. Senior Division. Ministry of the Apostles, from Neander's History of the planting of the Christian Church, and select passages from Conybeare and Howson's Life and Epistles of Paul. Doctrines of Divine Revelation. Exposition of Confession of Faith, Chapters VII—XV. Eighteen Lectures, with Examinations on the day following their delivery, on the Doctrines of the Bible compared with those of the Oriental Gentile Scriptures:—The

ज्ञानप्रकाशास माझें धर्मसंबंधी विचारदर्शक पत्र.

याच वर्षाच्या आरंभीं ह्मणजे फेब्रुवारी महिन्याच्या १७ व्या तारखेच्या ज्ञानप्रकाशांत "सत्य ईश्वरोक्तशास्त्रशोधक फ्रिचर्च शाळेंतील विद्यार्थी" ह्या सहीचें माझें पत्र छापलें होतें, त्याचा शेवटचा भाग येणेंप्रमाणें आहे:—

"कोणी ह्मणतात कीं, सृष्टिजन्य ईश्वरी ज्ञानाचे उजेडानेंच आह्मी दिव्य नगराचा पंथ शेवटपर्यंत क्रमूं. तर त्यांस मी असें विचारतों कीं, त्या नगराचें वर्णन तुह्मांस त्या उजेडाचे योगानें कसें प्राप्त होईल? तुह्मांस तिकडील वर्त्तमान कोणी सांगितलें आहे, व तुमच्याजवळ तेथील राजास दाखविण्यास काय दस्तऐवज आहे?....दुसरा विचार असा उत्पन्न होतो कीं, मरणानंतर मनुष्याची अवस्था कोणत्या प्रकारची होईल, हें सृष्टिजन्य ईश्वरी ज्ञानावरून कळत नाहीं. कोणी ह्मणतात कीं, मनुष्यास अनेक जन्म प्राप्त होतात, कोणी ह्मणतात, मनुष्यास एकच जन्म आहे. कोणी ह्मणतात मनुष्याचा आत्मा वायु आहे तो शरीरांतून गेला ह्मणजे वाऱ्यांत वारा मिळून जातो. दुसरें असें कीं, मनुष्य पापी आहे व ईश्वर परम पवित्र आहे, त्यास पाप अगदीं सोसत नाहीं, तर त्याजवळ पापी मनुष्य कसा जाईल? जर ईश्वराचे दयेवर भरंवसा ठेवावा तर त्याच्या न्यायास बाध येतो. सर्व लोक पाप करून देवा आह्मांवर दया कर असें ह्मणतील. तिसरें असें कीं, आपण स्वतां पुण्य करून तरावें तर आपलें पाप अपार आहे, तें जाण्यास आपणाकडून अनंत पुण्य होत नाहीं. याप्रमाणें सृष्टिज्ञानावरून या प्रश्नांचीं उत्तरें मिळत नाहींत. आणि पाहिलें असतां या मुख्य सिद्धांतांची मनुष्यास मोठी गरज आहे; आणि यांचा निवाडा झाला पाहिजे. यास्तव जे कोणी वर सांगितलेल्या पंथांचे सुज्ञ विद्वान असतील त्यांस माझी विनययुक्त प्रार्थना आहे कीं, त्यांनीं आपल्या आत्म्यांचें तारण करण्याकरितां कोणते मार्ग शोधून काढले असतील तर ते जगप्रसिद्ध करतील तर बहुतांवर त्यांचे उपकार होतील."

---

authorities on which the Religions of the East are founded. The Being and Perfections of God. Creation. Created things. The Primitive Condition of Man. The Fall and Depravity of Man. The Providence of God. The Law of God (partly treated of) but including the object of Worship, the Form of Worship, and Relations of Man involved in the doctrine of Caste, &c. Written Essays.

मि० नारायण शेषाद्री यांच्या वर्गांतून वरच्या ह्मणजे कालेज डिविजनच्या वर्गांत गेल्यावर तेथें रेव० डाक्तर उइलसन, डाक्तर मरे मिचल व रेव० निसबट यांच्या पासून मला शिक्षण मिळूं लागलें. ते जीं धर्मसंबंधीं पुस्तकें शिकवीत तीं माझ्या फार उपयोगीं पडलीं. मि० नारायणही कालेजडिविजनांत शिकवीत असत.* ह्या पुस्तकांच्या अभ्यासानें ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेचीं प्रमाणें मला दिसूं लागलीं. आणि ख्रिस्ती मंडळीच्या बखरींतील गोष्टी व विशेषेंकरून लुथराच्या वेळीं जी धर्मसुधारणा झाली ती वाचून तर बहुत आवेश व धैर्य आलें, आणि सुधारकांस केवढीं दुःखें भोगावीं लागतात आणि देव त्यांस कसें सहाय करितो इ० समजलें. हीं पुस्तकें मीं व माझ्या सोबतीचे कित्येक तरूण विद्यार्थ्यांनीं मोठ्या हौसेनें शिकावीं, आणि जणूं काय लुथराच्या काळांत आह्मी आहों, व त्याला जीं संकटें लागत व जो जय मिळे त्यावरून आह्मांस खरोखर दुःख व आनंद होत आहे, आणि पोपाशीं युद्ध करण्याचें आमच्या अंगीं स्फुरण आलें आहे असें आह्मांस वाटावें. आमच्या वर्गांत कित्येक रोमनक्याथोलिक धर्माचे पोर्तुगीज विद्यार्थी असत ते देखील हा इतिहास शिकून विचार करणारे झाले होते. अशांपैकीं एक जण रो० का० पंथांतील भ्रामक मतें सोडून प्राटेस्टंट ख्रिस्ती झाला, त्याचें नांव मि० विन्सेन्ट डिकुना. हे गृहस्थ हल्लीं मुं० बैबल सोसायटीचे सन्मान्य असिस्टंट सेक्रेटरी आहेत. दुसऱ्याही मिशनेरी अध्यापकांचें शिकविणें फार सहायभूत झालें. एकीकडून हिंदु धर्माची माझ्या मनांतील इमारत ढासळत चालली, व दुसरीकडून ख्रिस्ती धर्माच्या इमारतीचा पाया भरत चालला.

मिशन शाळेंतील शिक्षणाविषयीं आणखी सांगण्यापूर्वीं शाळेच्या बाहेरून माझी धर्मसंबंधीं सुधारणूक होण्यास ज्या गोष्टींकडून सहाय झालें त्या सांगतों.

**सुधारणुकेचीं इतर साधनें, धर्मसंबंधीं पुस्तकें.**

त्या काळांत मुंबईत खोजे, मोमीन इ० मुसलमान लोक जुनीं इंग्लिश पुस्तकें विकण्याकरितां घरोघर फिरत असत. विशेषेंकरून विद्यार्थी मुलांच्या घरीं जात. धर्मसंबंधीं पुस्तकें ते फार स्वस्त देत. अशीं पुस्तकें कित्येक जण माझ्याही घरीं वारंवार घेऊन येत; आणि ज्या-

* नारायण साहेबाचे शिकविण्याचे धर्मसंबंधीं विषय येणेंप्रमाणें होते;—Milner's Church History, History of the Reformation.

प्रमाणें मी हिंदुधर्मसंबंधीं ग्रंथ ब्राह्मणांपासून घेत असें, तसें ख्रिस्ती धर्मसंबंधी ग्रंथ त्यांजपासून घेऊं लागलों. मला नॉवेल्स वाचायाची गोडी नव्हती, (ही मजवर देवाच्या आत्म्याची दयाच झाली असें मीं समजतों) हें त्या बुकसेलरांस समजलें होतें, ह्मणून ते मला तीं न दाखवितां धर्मसंबंधी बुकेंच दाखवीत. अशा बुकांचा मी या वेळीं पुष्कळ संग्रह केला होता इतकेंच नाहीं, तर मन लावून तीं वाचीत असें.*

पुस्तकांशिवाय जीं वर्तमानपत्रें मी वाचीत असें त्यांविषयीं थोडेंसें सांगितलें पाहिजे. **ज्ञानोदय** हें पत्र मी बहुत वर्षांपासून वाचीत असें. बेळगांवांत असतांना माझे चुलते तें घेत असत, तें माझ्या वाचण्यांत येई. सन १८४५ सालच्या ज्ञानोदयाचें बांधलेलें पुस्तक अद्याप माझ्यापाशीं आहे. ( दुसरींही पुष्कळ

**वर्त्तमानपत्रें.**

---

* हीं पुस्तकें माझ्यापाशीं आतां नसल्यामुळें त्या सर्वांच्या नांवांची मला आठवण नाहीं परंतु Boston's Fourfold State या नांवाचें पुस्तक त्यावेळीं घेतलेलें माझ्याजवळ आहे, तें माझ्या फार उपयोगीं पडलें. मजसारिख्या त्या वेळच्या स्थितींत असणाऱ्यांनीं व सर्व ख्रिस्ती तरुणांनीं हें अवश्य वाचावें. हें मी ता० १७ अक्टोबर १८५२ त्यांत घेतल्याची त्यावर तारीख आहे. तसेंच The Trial of the Witnesses of the Resurrection of Jesus ह्या नांवाचें त्यावेळीं घेतलेलें एक बुक आहे; त्याच्या संगतीं Lord Lyttleton on the conversion of St. Paul, व Bishop Gibson's Pastoral Letters हीं पुस्तकें एकत्र बांधलेलीं आहेत, तीं वाचल्यानें नास्तिक लोकांच्या शंकांची निवृत्ति करण्यास मला पुष्कळ बळ आलें. याशिवाय Bunyan's Holy War. Dodridge's Progress of Religion in the Soul व James' Anxious Enquirer व Dr. Duff's India and Indian Missions हीं पुस्तकें विकत घेऊन मीं वाचलीं होतीं. तसेंच Solitude Sweetened ह्या नांवाचें एक पुस्तक माझ्यापाशीं होतें, तें एका सर्जनानें लिहिलें होतें. त्यांत त्यानें आपले धर्मसंबंधीं अनुभव, ख्रिस्ताचीं गुणकर्में, भक्त व अभक्त यांचा भेद, स्वर्ग, नरक, पापपुण्य इ० विषयांवर आपले विचार फार उत्तम रीतीनें प्रगट केले होते, ते मला फारच आवडावे. हें पुस्तक पुढें मीं एका मिशनेरी साहेबाच्या पत्नीस दिलें. Harvey's Meditations among the Tombs व Life of Col. Gardiner ह्या पुस्तकापासूनही मला पुष्कळ फायदा झाला, तसेंच हेनरी मारटिन याच्या सर्मनांचें एक जुनें पुस्तक माझ्या हातीं आलें त्यांतील "रक्त पाडल्यावांचून क्षमा होत नाहीं" (इब्री ९:२२) ह्या ओवीवरील उपदेश मीं फार लक्ष लावून वाचला व तो ईश्वरकृपेनें माझ्या मनांत चांगला बिंबला. पूर्वींपासून जगांत यज्ञाची रीत कशी चालत आली, व ख्रिस्ताच्या यज्ञाचें फळ काय इ० गोष्टींचें त्यांत फार उत्तम रीतीनें विवेचन केलें होतें.

आहेत ) मुंबईंत आल्यावर तर मी स्वतां त्याला वर्गणीदार झालों इतकेंच नाहीं, तर एक वेळ मी त्याकरितां १० वर्गणीदार मिळवून तितक्या सर्व प्रती आपल्या नांवावर घेऊन ज्यांच्या त्यांस वांटीत असें. ज्ञानोदयाखेरीज **प्रभाकर** पत्र वाचण्याची मला फार आवड होती. वेळगांवांत आमच्या शेजारीं विनायकपंत रानडे या नांवाचे एक ब्राह्मण सर्वेयर राहत असत ते हें पत्र घेत. त्यांस त्या दिवसांत रविवारचा प्रभाकर शुक्रवारीं टपालांतून मिळे व त्यास ट. ह. एक आणा पडे! तो हातीं आला ह्मणजे त्यांनीं आमच्या घरीं येऊन ओव्यावर बसून मला मध्यें उभें करून मजकडून तो समग्र वाचवावा. हें पत्र ऐकण्यास बरीच मंडळी जमत असे. याप्रमाणें कित्येक वर्षें चाललें होतें. या पत्रांत ( रेव० दा० ) नारायण शेषाद्रि व त्यांचे बंधु रा. रा. श्रीपत शेषाद्रि यांचा ख्रिस्ती होण्यासंबंधी व ग्रामण्यासंबंधी मजकूर वाचून दाखविल्याची मला आठवण आहे. तिसरें पत्र **ज्ञानप्रकाश**. हें त्यावेळीं आतां ज्यांस रावबहादूर ही पदवी मिळाली आहे ते विद्वान गोपाळराव हरि देशमुख काढीत असत. ह्या तीन पत्रांच्या वाचनाकडून मला धर्म व नीतिसंबंधी गोष्टींचा जो लाभ झाला तो पुरतेपणीं सांगतां येत नाहीं. ह्यापैकीं ज्ञानोदय हें पत्र रेव० आर. डब्ल्यु. ह्यूम साहेब उत्तम प्रकारें चालवीत असत; हे गृहस्थ विद्वान असून हिंदु लोकांचे खरे मित्र होते. यांनीं त्यांच्या कल्याणार्थ अनेक उद्योग व बहुत श्रम केले. त्यांनीं Bombay Temperance Union नामक मद्यपानवर्जक सभा स्थापिली व तिच्या संबंधानें Temperance Repository नामक एक त्रैमासिक पुस्तक बहुत दिवस चालविलें. ह्या सभेचे कित्येक विद्वान हिंदु व पारशी गृहस्थ सभासद होते, त्यांत प्रसिद्ध विद्वान व परोपकारी दाक्तर **भाऊदाजी** ह्यांचें नांव सांगण्यास मला अत्यंत आनंद वाटतो. मीही पुढें त्या सभेचा सभासद झालों. व एकदां तिच्यापुढें कांपत कांपत व चुकत चुकत लहानसें इंग्रजी भाषण केलें, तें १८५४ च्या १५ एप्रीलच्या ज्ञानोदयांत छापलें आहे. त्या वर्षीं मी ह्या मंडळीच्या कमिटींत होतों. ह्यूम साहेबांचें मजवर फार प्रेम असे. त्यांच्या संगतीं त्यावेळीं रेव० दा० आलेन व रेव० ( दाक्तर ) फेरब्यांक साहेब हेही मिशनच्या कामांत होते. ह्या त्रिवर्गांचें ज्ञान, चातुर्य, विद्वत्ता, शास्त्रज्ञान, शास्त्रीय मतें, धार्मिकता, सौजन्य व परोपकारिता यांच्या योगानें अमेरिकन मिशनाचें व छापखान्याचें

काम उत्तम प्रकारें चालत असे. छापखान्यांत दररोज कामाचे आरंभीं ईश्वरभजन होत असे. ह्यूम साहेबांची व माझी प्रथम ओळख होण्यास कारण ज्ञानोदय पत्र होय. त्याचा मी वर्गणीदार होतों इतकेंच नाहीं तर मी त्याला वारंवार विषय लिहून पाठवित असें. ह्यूम साहेबांची केवळ कोरडी ओळख नव्हती; ते मजवर फार लोभ करीत. त्यांच्या छापखान्यांत जीं सुंदर व उपयुक्त मराठी पुस्तकें छापलीं जात त्यांची एक एक प्रत ते मला कृपा करून देत; शिवाय ज्ञानोदयाचें उत्तम बांधणीचें पुस्तक दरवर्षी देत. प्रभाकर पत्र रा० रा० **भाऊ महाजन** हे काढीत असत. हे गृहस्थ विद्वान असून पहिल्या प्रतीचे मराठी लिहिणारे होते, त्यांचाही मजवर फार लोभ होता. ख्रिस्ती धर्माविषयीं यांचें असें मत होतें कीं, मनुष्याच्या सामाजिक सुखाच्या वृद्धीसाठीं हा धर्म फार चांगला आहे. त्यांच्या पत्रांत "लोकहितवादि" ह्या सहीची जी दीर्घ निबंधमाला लागली होती तिजपासून तर मला फार उपयोग झाला. (ह्या मालिकेंत शंभरांहून जास्त पत्रें होतीं.) ब्राह्मणधर्म व ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व यांजवरील माझी श्रद्धा व पूज्यबुद्धि हीं उत्तरोत्तर नष्ट होण्यास ही पत्रमालिकाच बहुतेक अंशीं कारणीभूत झाली. मी ज्ञानप्रकाश पत्राचा कांहीं काळपर्यंत मुंबईचा एजंट होतों. तें मी फार मन लावून वाचीत असें. त्यांत नीतिविषयक निबंध वारंवार येत असत. ह्या तिन्हीं पत्रांस मीं वारंवार निबंध लिहून पाठवावे व ते त्यांनीं मेहरबानीनें सर्वदा आदरावे.

पुण्यांत **विचारलहरी** या नांवाचें एक ख्रिस्ती धर्मविरोधि पत्र १८५२ त निघूं लागलें, तेंही मी घेत होतों. त्यांतील विचार फारच हलकट व पोरकट होते. त्यांतून दोन तीन उतारे खालीं घेतले आहेत.

मिशनेरी कोणास ख्रिस्ती करितातः—

"कोणी एखादा भिकारी ज्याचा प्राण जात असेल, किंवा कोणी अडाणी, नीच जातीचा स्वदेशांत उपहास पावलेला, किंवा कोणी उमेदवार ज्यास आपली ख्याती व्हावी, अशी आशा असते, परंतु मार्ग सांपडत नाहीं, अशा मनुष्याची गांठ पडली ह्मणजे त्यास हे मिशनेरी लोक घेतात."

येशू ख्रिस्ताविषयींः—

त्याची नीति वगैरे वर्तणूक बरीच होती. दाहा पांच वर्षांनीं असें झालें कीं या मनुष्यावर लोकांचा द्वेष उत्पन्न झाला व त्या काळीं यहूदी लोकांचे धर्माध्यक्ष होते, त्यांस ह्या नूतन धर्म सांगतो असें वाटून त्यांनीं बंडाचा गुन्हा त्याजवर घातला; तेव्हां पाम हा

देश रूमचे वादशहाचे स्वाधीन होता. तेथील सुभेदारानें मनास आणून बंडाचा गुन्हा शाबीत होऊन इसवीस सुळावर दिला.

बैबलांत सांगितलेल्या देवाविषयीं:—

"मुसलमान तरी एक निर्गुण, निराकार ईश्वर मानितात; परंतु हे ख्रिस्तभक्त ईश्वरास कपटी, खोटा, हट्टी, अन्यायी, पराधीन, जिंकलेला, पुत्रहीन, क्रोधी, विभागलेला, निर्दय, स्वच्छंदी, अविचारी, खटपट्या, घालमेल्या, पुत्रवधकर्ता, सिताफळांकरितां सर्व सृष्टीस नरकांत घालणारा, असा मानितात. तेव्हां असला धर्म किती निंद्य, पाखंडी, वाईट आहे हें पाहा. या धर्मापासून कोणाचें कल्याण होईल बरें?"

असलें निंदक व बाष्कळ पत्र फार दिवस चाललें नाहीं, व तें वाचल्यानें माझ्या धर्मविचारांत कांहीं फरक पडला नाहीं. केव्हां केव्हां मी ह्या पत्रास दुसऱ्या पत्रांतून उत्तर देत असें. ह्याचा मुख्य एडिटर लवकरच मरण पावल्यामुळें त्याच्या मागून तें चालविण्यास कोणी धजला नाहीं असें त्याच वेळीं माझ्या ऐकण्यांत आलें. कोणी ह्मणूं लागले कीं ह्या धर्मनिंदक पत्राचा एडिटर होण्यास नास्तिक मंडळीस भय उत्पन्न झालें!

सारांश, ह्या तिन्हीं पत्रांकडून माझी तीन प्रकारची सुधारणूक झाली, ह्मणजे ज्ञानोदयानें माझी ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेविषयीं व हिंदु धर्म ईश्वरप्रणीत नाहीं याविषयीं खातरी केली. प्रभाकरानें माझ्या मनांत ब्राह्मणांविषयीं जी पूज्यबुद्धि होती ती नष्ट केली. आणि ज्ञानप्रकाशानें नास्तिक मताकडे माझी प्रवृत्ति होऊं दिली नाहीं.

ठाकूरद्वार एथील कृष्णशास्त्र्यांचीं व्याख्यानें.

ख्रिस्ती धर्मसंबंधी ग्रंथ वाचणें व वर्तमानपत्रें वाचणें ह्यांखेरीज माझीं धर्ममतें सुधारण्यास व्याख्यानें ऐकण्यास जाणें हें एक कारण होतें. मी दोन्ही धर्मांचीं व्याख्यानें ऐकण्यास जात असें. पुराण व कथा ह्यांस व्याख्यान ह्मटलें असतां चालेल. हिंदुधर्माविषयींचीं हीं व्याख्यानें तर पहिल्यापासून माझ्या कानीं पडत आलीं, परंतु मुंबईत आल्यापासून ख्रिस्ती धर्माविरुद्ध हिंदूंनीं दिलेलीं व्याख्यानेंही माझ्या ऐकण्यांत येऊं लागलीं. अशा प्रकारची एक व्याख्यानमाला वे० शा० सं० कृष्णशास्त्री साठे यांनीं चालू केली होती, तिच्या आरंभाविषयीं १८५२ सालच्या १९ सप्तेंबरच्या प्रभाकरांत येणेंप्रमाणें सूचना होती:—

"आजपासून दर रविवारीं पालवावरील ठाकूरद्वारांत हिंदुधर्मप्रतिपादक व्याख्यान देण्यास कृष्णशास्त्री साठे या नांवाचे गृहस्थ कबूल झाले

आहेत. त्या वेळेस यावत् हिंदुमात्रांहीं ( बाटे व परधर्मी खेरीज करून बाकीच्यांहीं ) हिंदुधर्मविषयक शंका काढून समाधानें करून घ्यावीं अशी बातमी आहे." मी ह्या स्थळीं जाऊन प्रत्येक व्याख्यानाचें टिपण घेऊन ज्ञानोदयास पाठवीत असें, व त्यासोबत शास्त्रीबावांच्या शंकांचेंही मला खिस्ती धर्माचें जितकें ज्ञान होतें त्याप्रमाणें समाधानें लिहून पाठवावीं. शास्त्री मजकूर यांचा मजवर डोळा असे, परंतु मला ते कधीं कांहीं बोलले नाहींत. लोकांनींही मला कधीं छेडलें नाहीं. परंतु कोणी एक हिंदु गृहस्थ एके दिवशीं व्याख्यानकारांस कांहीं प्रश्न करणार होता, त्यास लोकांचें इतकें भय पडलें होतें कीं, त्या दिवशीं त्यानें पोलिस कमिशनर फोर्जेट साहेब यांस सांगून आपल्या रक्षणाकरितां कांहीं पोलिसचे शिपाई मागवून त्या दिवशीं ठाकूरद्वाराच्या आसपास बसविलेले होते! ह्या गृहस्थांच्या नांवांची मला आतां आठवण नाहीं. ह्या व्याख्यानांचा व माझ्या उत्तरांचा मासला पुरवणींत दाखविला आहे. हीं व्याख्यानें सुमारें एक वर्षपर्यंत चाललीं. त्यांसंबंधी माझीं सुमारें २५ पत्रें ज्ञानोदयांत ( १८५२–५३ ) इंग्लिश भाषांतरासहित छापलेलीं आहेत. हें भाषांतर ज्ञानोदयाचे विद्वान् कर्ते करीत असत. ह्या व्याख्यानांकडून लोकांचे डोळे बरेच उघडले. मला तर त्यांजपासून मोठाच लाभ झाला. हिंदु विद्वानांच्या खिस्ती धर्मावरील शंका किती पोरकट व पळपळीत आहेत, व त्यांस कसें उत्तर द्यावें हें मला तेव्हांपासून कांहींसें समजूं लागलें.

**अमेरिकन मिशनांतील खिस्ती व्याख्यानें.**

ठाकूरद्वाराचीं व्याख्यानें सुरू होण्याचे अगोदर सुमारें चार महिने अमेरिकन मिशन भजनालयांत खिस्ती व्याख्यानांस आरंभ झाला होता, त्याचा क्रम सुमारें एक वर्ष चालला. ह्या व्याख्यानांसही मी जात असें. यांचा सारांश व त्यांजवर झालेल्या वादाचा सारांश वर सांगितलेल्या ज्ञानोदयाच्या पुस्तकांत छापला आहे. ह्या व्याख्यानांकडून मला खिस्ती धर्माचें पुष्कळ ज्ञान झालें.

**अंब्रोलींतील दा० विलसन यांची व्याख्यानमालिका.**

मुंबईत मी विद्याभ्यास करीत असतांना जी तिसरी व्याख्यानमालिका चालत असे व जिच्यापासून माझें धर्मसंबंधी ज्ञान वाढलें ती दाक्तर उइलसन साहेबांची होय. ही मालिका अंब्रोली मिशनगृहांत बहुत वर्षांपासून स्थापिलेली होती. ती बहुधा प्रतिवर्षी कांहीं महिने चालत असे. हीं व्याख्यानें ऐकायास

पुष्कळ विद्वान् युरोपियन व नेटिव गृहस्थ येत, त्यांत तरुणांची संख्या विशेष असून ते निरनिराळ्या सरकारी व मिशनेरी विद्यालयांतील व हपिसांतील असत. ह्यांचे विषय सृष्टिसंबंधी ईश्वरविद्या व शास्त्रसंबंधी ईश्वरविद्या हे असून त्यांत अनेक धर्मांचें तुलनारूप वर्णन येत असे. व्याख्यान झाल्यावर उइलसन साहेब कित्येक श्रोत्यांस आपल्या माडीवर बोलावीत व त्यांस चहा वगैरे दिल्यावर त्यांशीं धर्म व सुधारणुकेसंबंधी मोठ्या प्रेमानें भाषणें करीत. हा त्यांचा क्रम फारच स्तुत्य व लोकहितावह होता. तेणेंकरून इंग्लिश व नेटिव लोकांचें दळणवळण, स्नेह व कळवळा यांची वृद्धि होत असे.*

**मला दा० उइलसन साहेबांचें प्रथम दर्शन.**

दाक्तर उइलसन साहेबांस मी त्यांच्या विद्यालयांत जाऊं लागल्यापूर्वींच पाहिलें होतें. त्यांचें मला प्रथम दर्शन व्याख्यानाच्या प्रसंगीं झालें, परंतु तें वर सांगितलेल्या व्याख्यानमालिकेंतलें नव्हतें. ते पालस्तैन देशाचा प्रवास करून आल्यावर त्यांचा वृत्तांत Lands of the Bible नामक स्वकृत ग्रंथांतून आपल्या

---

*ह्या मित्रमेळ्यांत उइलसन साहेबाची पत्नी आमंत्रितांचें प्रेमपुरस्सर आगतस्वागत करीत असे. ही साध्वी बाई मोठ्या कुलीन व सधन घराण्यांतील असून फार निगर्वी होती. आह्मां एतद्देशीय विद्यार्थ्यांस तिच्या मोठ्या बंगल्यांत जायाला कांहीं भय किंवा संकोच वाटत नसे. आह्मीं मराठी जोडे घालून बेलाशक आंत शिरावें व जेथें साहेब असतील तेथपर्यंत खुशाल जावें. उइलसन साहेबांच्या कंपौंडांत त्यांचें एक प्रकारचें खासगत आर्फेनेज ( अनाथ मुलांचें गृह ) होतें; त्यांत अनेक देशचीं, अनेक जातींचीं, गोतांचीं व अनेक भाषा बोलणारीं मुलें असत; त्या सर्वांची देखरेख ठेवणें, त्यांचीं गाऱ्हाणीं ऐकणें, त्यांच्या खोड्या खटाळ्यांकडे लक्ष देणें, हें त्रासाचें व दगदगीचें काम ह्या दीनमातेनें शांतपणें पहावें. हिच्या कनवाळू स्वभावाविषयीं पुष्कळ गोष्टी सांगतात त्यांपैकीं एक अशी आहे कीं, ती एकदां आपल्या पतीसह महाबळेश्वरीं जात असतां वाटेंत त्यांच्या चाकराचा एक मुलगा गाडी हांकतांना खालीं पडून त्याच्या मांडीवरून चाक गेलें, तेव्हां त्याची जखम वांधण्यास जवळ दुसरें फडकें नसल्यामुळें मिसेस उइलसन हिनें आपल्या आंगावरील मोलवान् शाल फाडली. मनुष्याचे गुणावगुणांची परीक्षा करणारे जे सद्भक्त रेव० निसबट साहेब त्यांचें ह्या बाईच्या गुणस्वभावाविषयीं असें मत होतें कीं, ती पवित्र दूतांच्या गुणस्वभावाच्या जवळ जवळ होती.

अंब्रोली फ्रिचर्च मंडळीस मराठींत सांगत असत, त्याची बातमी मला लागल्यावरून मीं तेथें जाऊं लागलों. इंग्लिश गृहस्थास मराठी बोलतांना ऐकण्याचा हा मला पहिलाच प्रसंग. त्यांचें भाषण मी आश्चर्यानें ऐकत असें. त्यांचें रूप त्या वेळीं जें माझ्या दृष्टीस पडलें तें माझ्या मनांत इतकें बिंबलें कीं, तें तेथून कधीं नष्ट झालें नाहीं. ते जरी त्या वेळीं चाळिशीच्या वर होते तरी मला फार तरुण असे भासले. त्यांच्या सौम्य वृत्तीचा व ममताळु स्वभावाचा ठसा तेव्हांच माझ्या मनावर उमटला. त्या वेळीं त्यांचें व्याख्यान ऐकावयास कोणी विद्वान्, धनवान् व उंच जातीचे लोक मिळाले होते असें नाहीं, तर बहुतेक अशिक्षित, गरीब व जगानें नीच मानलेले असे पुरुष, बायका व कांहीं तरुण मुली व मुलगेही होते, अशांस हे थोर विद्वान् पुरुष, ज्यांस मुंबईचे गवरनर आपल्या पंक्तीस भोजनास बोलावीत व बडे लोकांच्या सभेंत लौकिक भाषण करण्यास आदरयुक्त निमंत्रण होत असे, ते ह्या गरीब लोकांस जवळ घेऊन त्यांस आपल्या प्रवासाच्या गोष्टी सांगतांना मीं पाहिलें. परंतु मी त्या वेळीं आपल्या जातीच्या व्यर्थ अभिमानानें ह्या लोकांपासून दूरच राहिलों. मी त्यांच्याबरोबर बांकावरही बसलों नाहीं, तर परोशाप्रमाणें दूर उभा राहून त्यांचें भाषण ऐकिलें!

**खिस्ती शाळा-गुरूंचे खासगत वर्ग.**

फ्रिचर्च विद्यालयाचे युरोपियन व नेटिव मिशनेरी प्रोफेसर केवळ विद्यालयांत मात्र धर्मसंबंधीं विषय मोठ्या श्रमानें व आस्थेनें शिकवीत इतकेंच नाहीं, तर रविवारीं व आठवड्यांतील दुसऱ्याही दिवशीं त्यांच्या घरीं सकाळीं किंवा संध्याकाळीं कांहीं विषय शिकविण्याचे वर्ग असत. रेव० (आतां दाक्तर) मरे मिचल साहेबांच्या चौपाटीवरील बंगल्यांत प्रतिरविवारीं प्रातःकाळीं शास्त्र शिकविण्याचा वर्ग असे, तेथें मिशनेरी व सरकारी शाळेंतून व हपिसांतून बरेच लोक येत. ह्या वर्गास मी जात असें. माझ्याबरोबर एक तरुण परभु गृहस्थ जो पुढें प्रभुसिमिनेरीचा प्रिन्सिपाल झाला तो येत असे. आह्मी वाटेंत भेटलों ह्मणजे शास्त्रसंबंधी विषयांवर चर्चा करीत चालावें. आह्मांस फार सकाळीं जावें लागत असे, त्या वेळीं कांहीं खाल्लेलें नसल्यामुळें वर्गांत बसल्यावर पोटांत गुरगुरे ह्मणून हा मित्र कांहीं मिठाई बरोबर आणी, तींतून त्यानें मला कांहीं द्यावी. परंतु ह्या मिष्टान्नापेक्षां मला शास्त्राभ्यास विशेष

गोड लागे, व अंतःकरण संतृप्त झालेलें असतां मी घरीं येत असें, कारण देवाचें शास्त्र मधापेक्षां गोड आहे, ह्या शास्त्रवचनाचा अनुभव मला त्या काळापासून देवाच्या कृपेनें येत चालला होता.

**मित्रमंडळी.**

माझी धर्मसंबंधी सुधारणूक होण्यास कित्येक मित्रांची संगतही कारणीभूत झाली. त्यांत कोणी सरकारी हपिसांतील, कोणी सरकारी शाळेंतील, कोणी दुसऱ्या मिशन स्कुलांतील असे होते. त्यांनीं मजबरोबर मूर्त्तिपूजा व जातिभेद यांच्याविरुद्ध पुष्कळ वाद करावा, व कित्येकांनीं खिस्ती धर्माची व बैबलाची फार प्रशंसा करावी. हे सर्वच पुढें खिस्ती झाले असें नाहीं. कोणी गुप्त रीतीनें खिस्ती धर्मावर विश्वासणारे होते. एकाची स्थिति अशी होती कीं तो नित्य रात्रीं परमेश्वराची प्रार्थना करितेवेळीं आपल्या गळ्यांतील जानवें काढून ठेवीत असे. एका पारशी तरुण गृहस्थानें आपल्या स्त्रीसहित पवित्र शास्त्र वाचण्याचा परिपाठ ठेविला होता. कित्येक जण नेमानें खिस्ती भजनालयास येत, त्यांपैकीं एक हिंदु गृहस्थ आपल्या एका मुलास बरोबर घेऊन येत असे, खिस्ती धर्मापासून माझें मन वळविण्यास यत्न करणारे असेही कित्येक जण माझ्या मित्रमंडळींत होते.

# प्रकरण ११.

## माझा परमहंस मंडळींत प्रवेश.

मीं जातिभेद कसा मोडला.

मीं जरी कित्येक सुधारलेलीं मतें अवलंबिलीं होतीं, तरी मी आपल्यास "सुधारलेला" ह्मणवीत नसें व सुधारलेल्यांच्या मंडळींत मोडावयास इच्छित नव्हतों, कारण त्या काळांत "सुधारलेला" हा शब्द मुंबईंत व विशेषेंकरून पुण्यांत फार निंद्य असे. "सुधारलेला" ह्या शब्दाची व्याख्या जातीचे आचार मोडणारा, मद्यमांस खाणारा व चौपायीं उडणारा अशी जुन्या समजुतीचे लोक करीत, ती मला आवडत नसे. तरी मागल्या प्रकरणांत सांगितलेल्या माझ्या मित्रांच्या सहवासानें माझा प्रवेश परमहंसमंडळींत झाला. हे मित्र त्या मंडळीचे सभासद असून गुप्त रीतीनें दुसऱ्यास तींत आणण्याचे प्रयत्न करणारे होते. एके दिवशीं ह्यांनीं माझ्याशीं ( व माझ्या मताच्या एका मित्राशीं ) जातिभेदाविषयीं फार निकरानें वाद केला, आणि जेव्हां जातिभेद खोटा आहे व तो मोडावयास सिद्ध आहों असें आह्मीं कबूल केलें, तेव्हां ते ह्मणाले कीं, आतांच आमच्या देखत तुह्मी तो मोडाल काय; आह्मीं ह्मटलें, "होय, मोडूं." परंतु खरोखर तो मोडण्यास ते सांगतील असें आह्मांस वाटलें नाहीं. पण आमचें संभाषण होत असतां त्यांतून एक जण मुकाट्यानें बाहेर जाऊन थोड्याच वेळानें कांहीं बिस्कुटें घेऊन आला व तीं आमच्यापुढें ठेवून ह्मणाला कीं, 'जर तुह्मांला जातिभेद खोटा वाटतो, तर हीं खा पाहूं.' आह्मीं ह्मटलें, "प्रथम तुह्मी खा. मग आह्मी खाऊं." तेव्हां त्यांनीं त्यांतून कांहीं खाल्लीं, मग आह्मांसही खाणें प्राप्त झालें. परंतु त्या वेळीं माझी जी गाळण झाली, ती सांगतां पुरवत नाहीं. माझ्या अंगास कंप सुटून चळचळां घाम आला, व आतां घरीं गेल्यावर आई घरांतून हांकून लावील असें वाटूं लागलें. जसा कांहीं एखाद्यावर डोंगर

कोसळून पडतो, तशी माझी गत झाली. आतां मी कुटुंबाच्या सर्व माणसांस मुकलों व जातींतून उठलों, परागंदा झालों, सर्वजण मला 'बाट्या' ह्मणतील असें वाटूं लागलें; कारण तोंपर्यंत मीं कधीं पावबिस्कुटें खाल्लीं नव्हतीं. माझा दुसरा मित्रही फार चकित झाला, त्यानेंही धीर धरून एक दोन बिस्कुटें खाल्लीं. त्याजवरही हा पहिलाच प्रसंग होता, ह्मणून त्याच्या घशाखालीं तीं उतरण्यास त्याला बराच प्रयास लागला. मग आह्मांस ग्लासांत पाणी आणून दिलें. ही गोष्ट मनीस्कुलांत झाली. त्या वेळीं शाळा सुटली होती. याप्रमाणें जातिभेद गुप्तरूपानें प्रथम हिंदु मित्रमंडळींतच मीं मोडला. जरी माझें त्या काळीं कित्येक ख्रिस्ती लोकांच्या घरीं जाणें येणें होतें तरी मला कोणी खाण्यापिण्याविषयीं आग्रह केला नाहीं. सांप्रतच्या काळांतही सुधारलेले हिंदु लोक आपसांत गुप्त रीतीनें अशाच प्रकारें जातिभेद मोडीत आहेत, त्याकरितां त्यांस ख्रिस्ती लोकांची मदत लागत नाहीं. *

घरीं आल्यावर ही गोष्ट कोणास कळली नाहीं, असें समजून माझें मन शांत झालें. पुढें ह्या मित्रांनीं मला व माझ्या मताच्या दोघां तिघां मित्रांस परमहंस मंडळीविषयीं सांगून एके रात्रीं आह्मांस तिच्या सभेस नेलें. तेथें मोठमोठे अनेक जातीचे विद्वान् व संभावित हिंदु गृहस्थांचा बराच मोठा समुदाय पाहून आह्मांला फार आनंद वाटला, व आमच्या मताचे इतके लोक आहेत असें पाहून धैर्यही आलें.

---

* दा० उइलसन साहेबांनीं मी हिंदु असतांना जात मोडण्याच्या संबंधानें एकदां आह्मांला वर्गांत जो उपदेश केला तो सांगणें अवश्य दिसतें. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, कोणीही हिंदूनें उगीच खाण्यापिण्याकरितां आपली जात मोडूं नये, तर जातिभेद पाळणें पाप आहे व ईश्वराला तें आवडत नाहीं अशी ज्याची खातरी झाली असेल त्यानेंच तो मोडावा, ह्मणजे त्याबदल त्याचा छळ झाला असतां तो सोसण्यास त्याला ईश्वर शक्ति देतो. अशा श्रेष्ठ तत्वरूप कुऱ्हाडीनें ह्या जातिरूप वृक्षावर प्रहार करणारे किती थोडे आहेत. मी ख्रिस्ती झाल्यावर त्याच दा० उइलसन साहेबांच्या बंगल्यांत दुसऱ्या दोन तीन ख्रिस्ती भावांसह राहत असतां पुष्कळ तरुण हिंदु आमच्या बिऱ्हाडीं येऊन आह्मांला बीफ कसें लागतें तें खाऊन पाहूं द्या असें ह्मणत. आणि कांहीं खाणें झालें तर दारें बंद करून खात.

**परमहंस मंडळीचीं मतें व प्रवेशक संस्कार.**

ह्या मंडळीचीं मुख्य मतें अशीं होतीं कीं, जातिभेद मानूं नये, विधवांच्या पुनर्विवाहाविषयीं संमति असावी, व मूर्त्तिपूजा करूं नये; वाकीचे धर्मसंबंधी विचार कसेही असोत, त्यांविषयीं कांहीं निर्णय केला नव्हता. आणि मंडळीची संख्या मोठी वाढेपर्यंत हीं मतें गुप्त ठेवावीं, ह्मणजे मंडळीची परिस्फुटता करूं नये, परंतु मंडळी वाढविण्याकरितां प्रयत्न करावे. ही एक मंडळींत मिळण्याची अट होती. हिच्या सभा गुप्त रीतीनें भरत. मंडळींत प्रवेश करणारास तिचे नियम वाचून दाखवीत व त्यानें त्यांस आपली सम्मति दर्शविल्यावर तो ओंजळींत पाणी घेऊन खालीं सोडी. नंतर एक दुधाचा प्याला आणून प्रथम अध्यक्षानें व दुसऱ्या कित्येकांनीं तोंडास लाविल्यावर त्यास प्यायास देत, आणि रोटीचा (पांवाचा) तुकडा खावयास देत. ह्याप्रमाणें प्रवेशक विधि करून मला व माझ्या मित्रांस मंडळींत घेऊन आमचीं नांवें सभासदांच्या पटावर मांडलीं.* सभेच्या आरंभीं व शेवटीं मराठींत प्रार्थना वाचीत, त्या रावबहादूर दादोबा पांडुरंग यांनीं रचलेल्या होत्या. सभेचे अध्यक्ष त्या वेळीं रा० ब० रामचंद्र बाळकृष्णजी (राम बाळकृष्ण) कस्टम खात्याचे दफतरदार हे होते. रा० ब० दादोबा पांडुरंग व रा० रा० भाऊ

---

*ह्या मंडळीविषयीं Political Rishi या सहीचीं पत्रें लिहिणारानें १८८५ च्या इंदुप्रकाशांत कांहीं माहिती दिली आहे, तींत असें लिहिलें आहे कीं, तिच्या प्रवेशक संस्कारांत रोटी व मुसलमानाचें पाणी देत असत. आणखी असें सांगितलें आहे कीं, या मंडळींचे सभासद आरंभीं इतके आवेशी व धैर्यवान् होते कीं, त्यांनीं एकदां कोटांतून रोट्या हातांत घेऊन रस्त्यांत त्यांची मिरवणूक करीत उघड रीतीनें त्या गिरगांवांतील आपल्या सभास्थानांत आणिल्या. हें कोणत्या वर्षीं झालें हें सांगितलें नाहीं; व मी जेव्हां त्या मंडळींत होतों तेव्हां मला ही गोष्ट समजली नाहीं, निदान समजल्याची मला आतां आठवण नाहीं. आणखी ऋषींच्या पत्रांत असा मजकूर आहे कीं, सभासदांचें गुह्य फुटण्याच्या अगोदर कोणी एकानें मंडळीचें रजिष्टर बुक चोरून नेलें, त्यांत सर्व सभासदांचीं नांवें होतीं. ह्या मंडळीचे संख्येविषयीं "ऋषि" ह्मणतात कीं, ती सुमारें एक हजार असावी. तिच्या शाखा पुणें, सातारा, अहमदनगर, बेळगांव, रत्नागिरी इ० स्थळीं होत्या. परंतु मी ज्या दिवशीं तींत मिळालों त्या दिवशीं सुमारें ५०-६० लोक हजर होते. एक हजार संख्या जमली ह्मणजे आपलें मत प्रगट करावें असें तोंडानें बोलत मात्र असत.

महाजन हे जरी मंडळीच्या मताचे व मंडळीचे पुरस्कर्ते होते तरी ते कधीं सभेस येत नसत. आलेच तर दुसऱ्या खोलींत बसत, व सभा विसर्जन झाल्यावर अध्यक्षाची व कांहीं निवडक मंडळीची भेट घेत. रा० ब० दादोबांचे बंधु रा० रा० दाक्तर आत्माराम पांडुरंग हे ह्या मंडळीचे सभासद होते, पण यांची वर्तणूक अशा प्रकारची नव्हती. ते सभेस येत इतकेंच नाहीं, तर आपल्या घरीं सभा भरवीत.

मंडळीची वृद्धि करण्याचे कामीं कित्येक गृहस्थ फार आवेशी असत, त्यांत राबर्ट मनीस्कुलांतील मराठी शिक्षक रा० रा० भिकोबा दादा व त्यांचे बंधु रा० रा० सखाराम लक्ष्मण हे विशेष आवेशी होते. त्यांखेरीज रा० रा० लक्ष्मण शास्त्री हळबे, रा० रा० बाळभास्कर शिंत्रे, रा० रा० मदन श्रीकृष्ण (हे पुढें पुण्यांत स्मा० का० को० चे जज्ज असतां परमहंस मत सोडून देव मामलेदाराचे शिष्य झाले!), रा० रा० मोरोबा विनोबा इ० मंडळी मोठी आस्थेवाईक होती.

ह्या मंडळीचा असा बेत होता कीं, तिला एक हजार सभासद मिळाले ह्मणजे लौकिकांत आपलीं मतें प्रसिद्ध करावीं. परंतु असा काळ येण्याच्या पूर्वीच तिची दुसऱ्या रीतीनें प्रसिद्धि झाली. ह्या प्रसिद्धीचा प्रस्तुत वृत्तांताशीं संबंध असल्यामुळें तिजविषयीं एथें सांगितलें पाहिजे.

मंडळीचा बोभाटा; निंदात्मक कवन.

एका दिवशीं ह्या मंडळीच्या सभेस कोणी नवीन तरुण गृहस्थ येऊन नेमाप्रमाणें शपथा वगैरे घेऊन तींत मिळाला. आणि कांहीं दिवसांनीं त्यानें सर्व सभासदांचीं नांवें फोडून असें प्रसिद्ध केलें कीं, ते सर्व खिस्ती होणार असून अमुक दिवशीं त्यांचा बाप्तिस्माही होणार आहे. ही बातमी शहरांत पसरतांच मोठा गवगवा झाला. मिशन शाळेंत जाणाऱ्या मोठमोठ्या हिंदु मुलांस त्यांच्या आईबापांनीं भराभर शाळेंतून काढलें; कित्येकांस मुंबईच्या बाहेर पाठविलें.*

* अशा प्रसंगीं शाळेंतून काढलेल्या विद्यार्थ्यांतून फ्रिचर्च विद्यालयांतील कित्येक विद्यार्थ्यांनीं मला पत्रें पाठविलीं, त्यांपैकीं एक इंग्रजी पत्र माझ्यापाशीं पेनूसलीनें लिहिलेलें अद्याप आहे, त्यांतून कांहीं मजकुराचें भाषांतर खालीं दिलें आहे:—

"मला लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं, तुमच्या संगतीपासून दूर राहणें मला प्राप्त झालें आहे, इतकेंच नाहीं, तर जुलमानें मला दूर ठेविलें आहे; ही वेळ केव्हां टळेल हें

वर्तमानपत्रांतून ह्या गोष्टीची चर्चा चालली. ह्याच गडबडींत कित्येक बडे लोकांच्या आश्रयाखालीं एका मनुष्यानें परमहंस मंडळीविषयीं निंदात्मक कवन छापून प्रसिद्ध केलें, त्यांतून मासल्याकरितां एक उतारा देतों:—

'प्रभु राज्यधारकांनीं आणिविली ह्या पुरांत सोसाटी। मिशनारीही तद्वत झटती अत्यंत भ्रष्टतेसाठीं। नित्य सोसेटींत अभ्यास । तेथें म्लेंच्छांसीं सहवास । आवडूं लागे कैफ मनास । ज्वान मुलाला ॥ कर्माचा लोप झाला। गांजा भांग जिरणीस पडली । बरांडीवर इच्छा जडली । ही उत्पत्ति कोणीकडली । ठाऊक आईला ॥ तदनुसार बुद्धि मुलाला । राज्याधिशांनीं मुंबईत । विद्यालय केलें विख्यात । अनेक स्थळींचे विद्यार्थी येत । अभ्यासार्थ या ग्रामीं ॥ जे जन पूर्वीं योग्यतावान । ते जरी सर्व झाले द्रव्यहीन ॥ तथापि हें विद्यालय अव्हेरून । स्वदेश विद्या करविती ॥ आचारी पाणके आगंतूक । इतर व्यवसाई होते अनेक । तयांसी वाटून हें कौतुक । मुलगे धाडिले या स्थळीं ॥

ह्या ताकपिच्या कवीची प्रभाकरकर्त्यांनीं चांगली खबर घेतली.* ह्याच

---

मला ठाऊक नाहीं. मला आपल्या धन्य शाळेपासूनच दूर राहणें प्राप्त झालें आहे असें नाहीं, तर कोणत्याही गुप्त किंवा प्रसिद्ध सभेसही जाण्याची मला मनाई झाली आहे: कांहीं चिंता नाहीं. ज्यांचें धर्मसंबंधी उपदेशापासून कल्याण होतें असे जे सर्व मजसारिख्या अवस्थेंत आहेत त्यांस असेंच दुःख सोसावें लागतें. तुह्मी प्रापंचिक विद्या व धर्मसंबंधी शिक्षण प्राप्त करून घेत असतां देव तुमचें सहाय करो, आणि जसा मला अटकाव झाला आहे तसा तुम्हांस न होवो."

रा० के०

मुंबई, २९।९।५१.

* ह्या निंदात्मक चोपडीचें "परमहंसमतप्रशंसा" असें नांव होतें. तिचा कर्त्ता कसबिणींस लावण्या शिकविणारा हलकट ब्राह्मण होता. प्रभाकरकर्त्यांनीं त्याविषयीं जो स्वाभिप्राय प्रगट केला त्याच्या शेवटीं येणेप्रमाणें लिहिलें होतें:—

"अस्तु. ह्या कवि तर चावट आहे हें सर्व मुंबईत प्रसिद्ध आहे. आणि याच्या कवनाची वास्तविक किंमत लोक जाणतच आहेत. परंतु आधीं या लोकांस विद्येची अभिरुचि नाहीं, आणि तशांत अज्ञ लोकांच्या मनास सुकर्मापासून भ्रष्ट करायास हा पाहत आहे ह्मणून आम्हांस इतकें पुष्कळ लिहिणें प्राप्त झालें, परंतु आह्मांस मोठें आश्चर्य वाटतें कीं, एकापेक्षां अधिक बडे लोकांनीं ह्या ग्रंथास आश्रय दिला आहे अशी जी गांवांत बातमी उडली आहे, ती जर खरीच असली तर या असल्या नीच व बीभत्स कवनास एकापेक्षां अधिक बडे लोकांनीं आपला आश्रय द्यावा येणेंकरून त्यांस त्रिवार धिःकार असो."

(ज्ञानो० १५ मार्च. १८५२.)

धांदलींत गंगाधर शास्त्रीफडके यांनीं हिंदुधर्मतत्व नामक ग्रंथरूप झेंडा फडकाविला, त्याजवरही वर्त्तमानपत्रांतून पुष्कळ गोळीबार झडले.

ह्याप्रकारें ह्या मंडळीच्या नांवाचा पुकारा झाल्यावर तिला आपल्या सभा फारच गुप्त रीतीनें भराव्या लागल्या. एकाच जागीं मंडळी जमत नसे. तिच्यांत (पुढें लिहिल्याप्रमाणें) मी जाणें सोडल्यावर मला तिजविषयीं फारसें समजत नसे, व समजण्याजोगें तींत कांहीं होतही नव्हतें. तरी तिजविषयीं माझ्या कधींमधीं लिहून ठेवण्याच्या रोजनिशींत एक लेख मिळतो तो येथें दाखल करितों. तो असा कीं "ह्या मंडळीनें कलकत्त्याचे रेव० बिहारी लालसिंघ हे विलायतेहून परत आल्यावर त्यांस चहाची मेजवानी केली. त्या प्रसंगीं सुमारें ५०—६० मंडळी होती. परंतु रा० ब० दादोबा पांडुरंग यांनीं तेथें चहा घेतला नाहीं." [१८६०]

# प्रकरण १२.

## परमहंस मंडळीचा बोभाटा झाल्यावरून मला कांहीं वेळपर्यंत मुंबई सोडून जावें लागलें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें परमहंस मंडळीचा बोभाटा

**माझें साताऱ्यास जाणें.**

झाल्यानें मजविषयीं जी गोष्ट घडली ती अशी कीं, माझ्या (हिंदु) सासऱ्यास मी ह्या मंडळींत आहें असें समजून त्यांनीं माझ्या वडिलांस मी अमुक तारखेस ख्रिस्ती होणार असें लिहून पाठविलें. त्या वेळीं ते साताऱ्याजवळच्या उडतारें गांवीं नदीस पूल बांधण्याच्या कामावर होते. त्यांस ही बातमी पोंचतांच त्यांनीं मला बोलविण्याकरितां गडी पाठविला. त्यापाशीं मला जें पत्र दिलें होतें त्यांत माझी मातोश्री फार आजारी आहे व तिच्याकरितां दोन वैद्य वांईहून आणिले आहेत असें लिहिलें होतें. हें पत्र वाचतांच मी शाळेंतून रजा घेऊन निघालों. जातेवेळीं सातारा येथें फ्रिचर्च मिशनाचे मिशनेरी रेव० एटकिन साहेब यांस एक पत्र दा० उइलसन साहेब यांजपासून सहज मागून घेतलें. तसेंच पुण्यांतील परमहंस मंडळीच्या शाखेची ओळख करण्याकरितां मुंबईच्या मंडळींतील कोणा मित्राचें पत्र घेतलें होतें, तेथें गेल्यावर सभासदाच्या नात्यानें कित्येकांस भेटलों. पुढें मार्गांत गड्यानें मला सर्व खरा मजकूर सांगितला, ह्मणजे आई आजारी नाहीं इतकें सांगितलें, परंतु कोणत्या कारणावरून मला बोलाविलें होतें हें त्याला माहीत नव्हतें. तरी मीं तर्क केला कीं, हें सर्व मुंबईंत झालेल्या गवगव्याचें फळ आहे. त्या वेळीं माझ्या मनांत प्रसिद्ध रीतीनें ख्रिस्ती होण्याचें नव्हतें, व तितका माझा विश्वासही दृढ नव्हता, तरी मूर्त्तिपूजेवर श्रद्धा नसल्यामुळें ती एकदम सोडून द्यावी, व ख्रिस्ती लोकांत जाऊन मिळावें असे विचार मनांत येऊं लागले.*

---

* ह्या काळांत मूर्तीविषयीं माझ्या मनांतील भय अगदीं उडून गेलें होतें. साताऱ्याच्या वाटेनें जात असतां एका ठिकाणीं रस्त्याच्या बाजूस एक देऊळ लागलें, त्यांत शेंदरानें माखलेले दोन दगड होते, ते मीं उचलून रस्त्यावर आणून ठेविले!

त्या काळीं माझा धर्म परमेश्वराची प्रार्थना करणें व त्याच्या सृष्टींतील कृत्यांचें चिंतन करणें इतकाच होता. धर्मसंबंधी विशेष महत्वाच्या व अगत्याच्या सिद्धांताविषयीं मीं कांहीं नियम केल्याचें मला आठवत नाहीं. मी बरोबर इंग्लिश बैबल व स्टमर्स मेडिटेशन्स हीं पुस्तकें घेतलीं होतीं, दुसरींही कांहीं असतील, परंतु त्यांची आठवण नाहीं. बैबलांतील गीतें वाचण्याची मला फार गोडी असे. तीं मीं रानांत जाऊन वाचावीं.

**माझ्या धर्ममतांची परीक्षा.**

उडताऱ्यास घरीं पोंचल्यावर (सप्तेंबर १८५१) माझ्या मातापितरांस फार आनंद झाला. त्यांनीं मला महादेवाच्या देवळांत नेलें. बरोबर कित्येक मंडळी होती, त्या सर्वांनीं "देवदर्शन" घेतलें, ह्मणजे शिवस्तुतीचा श्लोक ह्मणून लिंगापुढें हात जोडून उभे राहून व बोकडासारखा शब्द करून देवालयास प्रदक्षिणा वगैरे घातल्या; परंतु मीं तसें कांहीं केलें नाहीं. शिवापुढें ठेवण्याकरितां माझ्या हातांत नारळ दिला, पण मीं तो परत केला. हें सर्व माझ्या वडिलांनीं लक्ष्य लावून पाहिलें, परंतु त्या वेळीं मला कांहीं बोलले नाहींत. घरीं आल्यावर पेढे वांटले. मग सर्व मंडळी घरोघर गेल्यावर व भोजन झाल्यावर माझी आई रडूं लागली, व मला बोलावून आणण्याचें कारण माझ्या बापानें मला सांगितलें. नंतर ख्रिस्ती धर्माविषयीं व परमहंस मंडळीविषयीं पुष्कळच बोलणें झालें. माझे वडील मजवर फार रागावले, व मला परत मिशन शाळेंत पाठवायाचें नाहीं असें ह्मणाले. ह्या सर्व संभाषणावरून ख्रिस्ती धर्माच्या पक्षानें बोलण्याचा मला फारच आवेश आला, व नवी शक्ति मिळाली; आणि असें वाटूं लागलें कीं, तेव्हांच साताऱ्यास जाऊन बाप्तिस्मा घ्यावा. माझ्याशीं धर्मसंबंधी भाषण व वाद करण्याचा माझ्या वडिलांस हा पहिलाच प्रसंग. ते बहुत काळ आदनास होते व मी मुंबईस एकटाच होतों, त्यामुळें त्यांस माझीं सुधारलेलीं मतें माहीत नव्हतीं, आणि "सुधारणूक" व ख्रिस्ती धर्म यांजमध्यें काय भेद आहे हेंही ते जाणत नव्हते. ख्रिस्ती होणें ह्मणजे अत्यंत नीच व भ्रष्ट होणें असें त्यांस वाटलें. ते मला ह्मणाले कीं, भंग्याची टोपली उचलणें व ख्रिस्ती होणें हें एकच. त्यांचा समज पुढें कसा बदलत चालला हें दाखविण्याकरितां ही गोष्ट एथें सांगणें प्राप्त आहे.

उडताऱ्यास सुमारें मी दोन महिने होतों. त्या काळांत मी तेथें चाललेल्या सरकारी इंजनेर खात्यांतील कामाची बरीच माहिती करून घेतली; त्यावरून सुतार, गवंडी, बिगारी यांच्या कामाची देखरेख करणारे ब्राह्मण कारकून कसा जुलूम करीत व त्यांजपासून कसा पैसा खात, व सरकारचेंही कसें नुकसान करीत हें मला बरेंच समजलें. तसेंच त्या खात्याचा जो मुख्य अधिकारी इंजनेर साहेब होता तो कोणत्या गुणांचा होता हेंही माझ्या कानावर आलें. तेणेंकरून मला फार वाईट वाटलें, व त्या गरीब कामगारांचा कैवार घेऊन त्यांची दाद लागावी, व इंजनेर साहेबांचीही कानउघडणी करावी ह्या हेतूनें मीं त्याला एक बरेंच लांबलचक पत्र लिहिलें. त्यांत बैबलांतील पुष्कळ बोधकारक ओव्या उतरून घेतल्या होत्या, त्यांपैकीं उपदेश ४:१. ही ओवी उतरून घेतल्याचें मात्र मला आठवतें. हें पत्र प्रथम रा० गोविंदजी नारायण यांस पाहण्यास व त्यांची मसलत घेण्यास पाठविलें. त्यांनीं तें फार पसंत केलें, पण त्या साहेबास पाठविल्यानें कांहीं उपयोग होणार नाहीं असें सांगितल्यावरून तें तसेंच राहिलें.

**जाचलेल्यांचा कैवार.**

वर सांगितलेल्या दोन महिन्यांत आमच्या घरीं सणावारांच्या निमित्तानें बरींच धर्मकृत्यें झालीं, परंतु तीं मला कांहीं गोड लागलीं नाहींत. आमच्या कुळाचाराप्रमाणें एकदां शक्तिपूजाही झाली, त्या वेळीं केवळ एकच ब्राह्मण पूजेस आला होता व घरचीच मंडळी होती. नैवेद्याकरितां उत्तम प्रकारचीं अन्नें व मांसें व मिष्ट पदार्थ सिद्ध केले होते, परंतु मला त्या सर्वांचा अगदीं कंटाळा आला. त्या ब्राह्मणाच्या हातून मीं प्रसाद वगैरे कांहीं घेतला नाहीं, केवळ तिरस्कारानें त्याला व त्याच्या पूजेला पाहत बसलों होतों; इतका मला शाक्त लोकांचा वीट आला होता. त्याविषयीं पुढें मी पुण्याच्या ज्ञानप्रकाशास एक पत्र पाठविलें. जो ब्राह्मण इंजनेर खात्यांतील गरीब कामगारांवर जुलूम करून त्यांजपासून पैसा खात असे तो आमच्या घरीं उपाध्येपण करायास येई, त्याला पाहून तर मला फार राग यावा.

**हिंदुधर्मसंबंधीं कृत्यांची निवड.**

परत मुंबईस येण्याची उत्कंठा; एक तोड.

ते दिवस आमच्या विद्यालयाच्या वार्षिक परीक्षेचे असून मला बक्षिसें मिळविण्याची मोठी आशा होती, ह्मणून मुंबईस परत जाण्याची मला मोठी उत्कंठा लागली; परंतु माझ्या वडिलांनीं बहुत दिवस माझ्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं. शेवटीं त्यांनींच अशी तोड काढिली कीं, मी त्यांच्या जीवंतपणीं ख्रिस्ती धर्म प्रसिद्ध रीतीनें स्वीकारणार नाहीं, अशी जर बैबलावर हात ठेवून शपथ घेतली, तर मला मुंबईस परत जाण्याची परवानगी मिळेल. ह्या तोडीस मी अज्ञान, अशक्त व अल्पविश्वासी असतां मान्य झालों. परंतु ही एक अट धरिली कीं घरांत किंवा बाहेर मी मूर्त्तींची पूजा करणार नाहीं, व सोवळ्या ओवळ्याचा विचार बाळगणार नाहीं; आणि त्यांनीं घरांत मूर्त्ति ठेवूं नयेत. ह्या गोष्टीस ते मान्य झाले. त्यांनीं माझ्या चुलत्यांस बेळगांवाहून बोलावून आणिलें, व त्यांस ह्या सर्व गोष्टी सांगून त्यांच्या समक्ष मजकडून शपथ घेवविली. आणि माझ्या मर्जीस्तव आपल्या देव्हाऱ्यांतील सर्व देव त्यांच्या स्वाधीन केले. मीं घरांत पाहिजे तर बूट घालून जेवावें, कोणतेंही धर्मकृत्य करूं नये, परंतु बाहेरून जनाचाराप्रमाणें चालावें असें मला सांगितलें. हें सर्व एकदम झालें नाहीं. वारंवार उभयतांनीं मला रानांत न्यावें व माझें मन वळविण्याचा मला नरमगरम गोष्टी सांगून प्रयत्न करावा.

उडताऱ्याहून ज्ञानप्रकाशास पत्र.

उडतारें सोडण्याचे पूर्वीं मीं पुण्याच्या ज्ञानप्रकाशास एक पत्र पाठविलें होतें तें त्याच्या कर्त्यांनीं कृपा करून प्रसिद्ध केलें. यांतील विषय "भरतखंडाची स्थिति" हा होता. हें पत्र १५ डिसेंबर १८५१ च्या ज्ञानोदयांत इंग्लिश भाषांतरासहित आहे. त्याचा शेवटचा भाग येथें उतरून घेतों:—

"मला वाटतें कीं आतां कलियुग होऊन गेलें किंवा त्याचा अंतकाळ जवळ आला आहे व सत्ययुगाच्या प्रथम दिवसाचा अरुणोदय झाला आहे. ईश्वरी कृपेनें ज्ञानसूर्य लवकरच उदयातें पावो. त्या वेळीं जे दिवाभीत आहेत त्यांस मात्र रात्र होईल. ते गिरिकंदरीं व कपाटीं जाऊन बसतील. ज्यांस अज्ञानाची मोडशी होऊन विद्येची अभिरुचि लागत नाहीं, ज्यांस राज्यांत आबादानी नकोशी वाटून दंगा लूट हीं आवडतात ते ह्या युगास

कलियुग असें ह्मणतील. बरें तर तसें कां होईना. असें निर्दोष कलियुगच आह्मांस आवडतें. त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें याची अशीच वृद्धि व्हावी व वर्णसंकर व्हावा ह्मणजे कोणीं कोणाचा द्वेष करूं नये, ब्राह्मणांनीं महारांस तुच्छ मानूं नये व महारांनीं ब्राह्मणांशीं वैर करूं नये; व शूद्रांनीं ब्राह्मणांस हात दाखवीन असें ह्मणूं नये; हिंदूंनीं सर्व पृथ्वींतील देशांत व्यापारास जावें, तेथील लोकांसीं सख्यत्व करावें, त्यांची विद्या, कसवें शिकावीं, अडाणी समजुती सोडाव्या व स्वदेशांत परदेशांतील यंत्रें व हरएक हुन्नर आणावे. काशीपासून लंकेपर्यंत सर्वांच्या मनांत वर्त्तमानपत्रद्वारें एक सूत्र खेळत असावें. एकाचें दुःख तें सर्वांचें व एकाचें सुख तें सर्वांचें असें सर्वांनीं मानीत जावें. याप्रमाणें फार चांगला वर्णसंस्कार झाला, ह्मणजे सर्वांस सुख प्राप्त होईल. अशा वर्णसंकराचीच सर्व सुज्ञ लोक मार्गप्रतीक्षा करीत आहेत."

**मुंबईस परत येणें.**

इतकें झाल्यावर मी मुंबईस परत येऊन ( दिसेंबर १८५१ ) पुनः फ्रिचर्च विद्यालयांत जाऊं लागलों. उडतारें एथें झालेलें वर्त्तमान मीं आपल्या खिस्ती मित्रांस कळविलें; त्यांनीं मीं जें वचन आपल्या आईबापांस दिलें होतें तें अयोग्य होतें असें मला सांगितलें, व पुढें माझीही त्याविषयीं खातरी झाली. नंतर कांहीं दिवसांनीं मी आपल्या तीर्थरूपांस त्याप्रमाणें लिहून कळविलें, व माझी शपथ हेरोद राजाच्या शपथेप्रमाणें अयोग्य होती, व ती पाळण्यास मी बांधलेला नाहीं असें सांगून तिजपासून मी मोकळा झालों. ह्या गोष्टी-संबंधी बराच पत्रव्यवहार झाला, परंतु त्यापैकीं उभयपक्षांकडील एकही कागद माझ्यापाशीं आतां राहिला नाहीं, व कांहीं टिपणही सांपडत नाहीं. माझें सर्व लक्ष्य शिकण्याकडे व बक्षिसें मिळविण्याकडे होतें. वर सांगितलेल्या शपथेपासून मुक्त होण्यास मला बराच काळ लागला. ह्या दोषाविषयीं माझी खातरी करण्याच्या कामीं रेव० दा० मरे मिचल साहेब यांनीं पुष्कळ श्रम घेतले. वारंवार त्यांनीं ह्याविषयीं मला बोलून, व शास्त्रवचनें दाखवून हे माझे दोष माझ्या पदरीं घातले.

**एक बोधक गोष्ट.**

उडताऱ्याहून परत येण्याच्या अगोदर एक गोष्ट घडून आली तिजवरून देवानें मला पुष्कळ बोध केला; ती अशी कीं, माझी मातोश्री आजारी होती अशा ज्या बाहण्यानें मला बोलावणें पाठविलें होतें, त्याचप्रमाणें ती मी तेथून

निघण्यापूर्वी खरोखर आजारी झाली, व वांईहून एका वैद्यास आणावें लागलें !

ज्या मंडळीच्या संबंधामुळें मजवर व इतर तरुण विद्यार्थ्यांवर इतकीं संकटें आलीं व लोकांत मोठा गवगवा झाला तिला मीं लागलेंच सोडलें असें नाहीं, तिच्या सभांस मीं पूर्वींप्रमाणें जाऊं लागलों. ह्या सभा आतां पूर्वींपेक्षां विशेष गुप्त रीतीनें व सावधगिरीनें होऊं लागल्या. शत्रूंस त्याचा पत्ता लागूं नये ह्मणून सभेच्या जागा वारंवार बदलत व नवीन मनुष्यास मंडळींत घेण्यापूर्वीं फार चवकशी करीत.

**मीं परमहंस मंडळी कां सोडली.**

ह्या सभेंत कांहीं विशेष कामें होत नसत, प्रार्थना वाचून झाल्यावर इकडच्या तिकडच्या गोष्टी होत. यास्तव कित्येक सभासदांनीं असें सुचविलें कीं, प्रत्येक सभेस कांहीं नियमित विषयावर संभाषण व्हावें, अथवा कोणीं कांहीं निबंध लिहून आणून वाचावा व त्यावर चर्चा व्हावी. त्याप्रमाणें क्रम चालू झाला. एका सभेस माझी पाळी आली. तेव्हां मीं अक्रुरानें गोपींस शिकविलेलें ब्रह्मज्ञान यावर कांहीं लिहून आणून वाचलें.* त्याच वेळीं पुण्याहून कांहीं विद्वान् मंडळी आली होती, तींतून कित्येकांनीं माझ्या निबंधावर चर्चा चालली असतां नास्तिक मत स्वीकारून कांहीं विचार प्रदर्शित केले, तेणेंकरून मला व माझ्या एक दोन मित्रांस फार वाईट वाटलें. त्यांत आणखी एक विशेष गोष्ट ही घडली कीं, आमचे सुविचारी, सुज्ञ, विद्वान् व बहु सन्मान्य सभाध्यक्ष रावबहादुर रामचंद्र बाळकृष्णजी यांनींही ह्या पुणेकर नास्तिकांचाच पक्ष स्वीकारला, तें पाहून तर आह्मांस अतिशय वाईट वाटलें. दुसऱ्या वेळीं त्यांस आह्मीं असें करण्याचें कारण विचारलें, तेव्हां ते ह्मणाले कीं, केवळ वाद चालवावा इतक्याच बुद्धीनें मीं त्यांचा पक्ष स्वीकारिला, मी नास्तिक नाहीं हें तर तुम्हांस ठाऊकच आहे. हें सर्व जरी खरें होतें तरी त्या रात्रीच्या वादाचा माझ्या मित्रांस व मला इतका कंटाळा आला कीं,

---

* हा निबंध ता० १ आगष्ट १८५३ सालच्या ज्ञानोदयांत छापिला आहे, व त्यावर तो वाचल्याची १० डिसेंबर १८५२ ची तारीख आहे.

तेव्हांपासून आम्हीं ती मंडळी सोडून देण्याचा निश्चय केला. वास्तविक पाहतां ह्या मंडळीच्या मतांपासून आत्म्याच्या तृष्णा तृप्त होण्याजोगें तींत कांहींच नव्हतें, केवळ जुन्या मतांस कंटाळलेल्या लोकांस क्षणभर टेंकण्याची मात्र ती जागा होती. पापाची क्षमा कशी होईल, तारणारा कोण, शांति देणारा कोण, इ० अत्यंत महत्वाच्या गोष्टींचा परमहंस मंडळीचे लोक मुळींच विचार करीत नसत, व त्या विचाराची कोणास गरज वाटत होती असें मला दिसून आलें नाहीं.

**परमहंस मंडळीच्या मताचें हस्तलिखित पुस्तक.**

ह्या मंडळीकरितां कोणी एका गृहस्थानें बहुत दिवसांमागें एक मराठी पुस्तक रचिलें होतें, परंतु तें तेव्हांच छापलें नव्हतें. माझा कल खिस्ती धर्माकडे आहे असें माझ्या कित्येक मित्रांनीं जाणून त्यांनीं तें मला वाचायास दिलें. त्यांत जातिभेद, मूर्त्तिपूजा इ० गोष्टींचा निषेध केल्यावर कोणताही धर्म ईश्वरदत्त नाहीं, व कोणतेंही शास्त्र ईश्वरप्रणीत नाहीं असें प्रतिपादन करण्याचा यत्न केला होता. हें पुस्तक वाचल्यावर परमहंस मंडळीविषयींची पूज्यबुद्धि माझ्या मनांतून नष्ट झाली. कारण ईश्वरानें मनुष्यास शास्त्र दिलें नाहीं, असें मत मीं कधींच बाळगिलें नव्हतें. जरी हिंदु धर्मावरील माझा विश्वास उडत चालला होता, तरी वेद हे ईश्वरप्रणीत आहेत असें मी बहुत दिवस समजत होतों; त्यांत काय आहे हें जरी मला ठाऊक नव्हतें, तरी मूर्त्तिपूजा नाहीं असें लोकांच्या सांगण्यावरून मला समजलें होतें. ह्याविषयीं विशेष पुढें सांगण्यांत येईल.*

* वर सांगितलेलें हस्तलिखित पुस्तक पुढें ( १८६८ ) "धर्मविवेचन" ह्या नांवानें छापून प्रसिद्ध झालें. त्याच्या प्रस्तावनेंत जें लिहिलें आहे तें वरील मजकुरास जुळतें म्हणजे ज्या वेळीं मीं तें पाहिलें त्यावेळीं तें छापलेलें नव्हतें. तो लेख असाः—"ग्रंथकर्त्याच्या संग्रहीं तो ग्रंथ तसाच पुष्कळ वर्षें पडून राहिला होता. ह्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत वाचल्यावर कांहीं वर्षांनीं ( १८५८ ) मी "निःशास्त्रवादपरीक्षा" नामक एक पुस्तक लिहिलें, तें यांतील मतांस उत्तररूप आहे. तें माझ्या वडिलांनीं समग्र वाचून पाहिल्यावर आपणास फार संतोष झाला असें बोलून दाखविलें. कारण कोणतेही भाविक हिंदु निःशास्त्रवाद कबूल करीत नाहींत, व कोणींही तो कबूल करूं नयेच.

लहानशी सत्यशोधक सभा.

परमहंस मंडळीचा संबंध सोडल्यावर मी व माझ्या कित्येक मित्रांनीं मिळून "सत्यशोधक" या नांवाची एक लहानशी सभा स्थापिली, तींत माझ्या मताचे ह्मणजे देवानें मनुष्यास शास्त्र दिलें आहे व तें कोणतें याचा शोध करावा असें मत बाळगिणारे कित्येक तरुण होते. आम्हीं प्रति रविवारीं एकत्र मिळून प्रार्थना करून धर्मसंबंधी विषयांची चर्चा करावी, बैबलाचे कांहीं भाग वाचावे आणि इतर धर्मांचाही शोध करावा. ह्या सभेपुढें मीं वाचलेलें एक 'सर्मन' (उपदेश) माझ्यापाशीं वहुत दिवस होतें.

वेदाविषयीं माझा जुना समज बदलतो.

ह्याच काळाच्या सुमारास मला विद्वान् प्रोफेसर एच्. एच्. उइल्सनकृत ऋग्वेदाच्या प्रथम अष्टकाचें इंग्लिश भाषांतर मिळालें, तें वाचून वेदाविषयीं माझ्या मनांत ज्या कल्पना होत्या त्या अगदीं बदलल्या. त्यांत ईश्वरी शास्त्राचें कांहींच लक्षण दिसून आलें नाहीं इतकेंच नाहीं, तर अग्नि, सूर्य, इंद्र इ० ची जी भक्ति सांगितली आहे ती एक प्रकारची मूर्तिपूजाच होय अशी माझी खातरी झाली. वेदांतील ऋषींचीं स्तोत्रें बैबलांतील दाविदाच्या गीतांपुढें सूर्यापुढें जसे काजवे त्यांप्रमाणें निस्तेज दिसूं लागलीं.

हा शोध चालला असतां ज्ञानोदयांत वेदाच्या अनादित्वाविषयीं कलकत्ता रिव्यूंतून घेतलेला एक फार उत्तम निबंध माझ्या वाचण्यांत आला, त्यांत वेदाच्या अनादित्वाविरुद्ध प्रमाणें इतकीं सबळ होतीं कीं त्यांकडून वेदावरील माझा विश्वास जो उडून गेला तो पुनः कधींच परत आला नाहीं.

प्रोफेसर उइल्सन यांच्या ऋ० वेदाचे भाषांतराचा केवळ पहिलाच भाग मीं वाचला असें नाहीं, तर दुसरा भाग जेव्हां विलायतेहून आला तेव्हां तोही विकत घेऊन वाचला. (दोन्ही भागांस १२ किंवा १४ रु० दिले असतील) आणि त्या ग्रंथारंभीं जो मोठा उपोद्घातरूप निबंध होता तोही मीं लक्ष्य लावून वाचला, इतकेंच नाहीं, तर वेदावरील विश्वास उडाल्यानंतर त्यासंबंधीं इतर ग्रंथ काळजीनें जसे मीं वाचले व शोध केला तसा पूर्वीं कधीं केला नाहीं. वेदाच्या अनादित्वाविरुद्ध जीं प्रमाणें मला सांपडलीं त्यांजविषयीं कित्येक विद्वान् शास्त्री व पंडित यांच्याशीं मीं भाषणेंही केलीं. परंतु त्यांच्या प्रत्युत्तरांवरून माझें कांहींच समाधान झालें नाहीं. याप्रमाणे

आश्रयार्थ हिंदुधर्माचा जो शेवटचा खांब मीं धरिला होता तो मोडून पडला. तरी मनुष्यास ईश्वरानें शास्त्र दिलें आहे, ही कल्पना माझ्या मनांतून कधीं गेली नाहीं, ह्या गोष्टीमुळें मी परमेश्वराचे महत् उपकार मानितों, कारण जर अशी माझ्या मनाची स्थिति झाली असती तर कोणत्या दुष्परिणामास मी पोंचलों असतों हें माझ्यानें सांगवत नाहीं. *

* एका जुन्या कागदावरून असें समजतें कीं, सुमारें सहा महिनेपर्यंत मी धर्माविषयीं निष्काळजी होतों. एका मित्राच्या सहवासानें कोणतेंच शास्त्र ईश्वरप्रणीत नाहीं, अशी कुकल्पना माझ्या मनांत घोळूं लागली होती. परंतु प्रभूनें तिला फार दिवस तेथें राहूं दिलें नाहीं. हा केवळ संगतीचा गुण होता. जगांत कोणतें तरी ईश्वरदत्त शास्त्र आहे अशी माझी पक्की खातरी पहिल्यापासून होतीच व तिचें वजन मजवर अधिकाधिक पडत चाललें.

# प्रकरण १३.

## फ्रिचर्च विद्यालयांतील कालेज डिविजनांत असतां माझ्या धर्मसंबंधीं सुधारणुकेची वृद्धि.

आतां फ्रिचर्च विद्यालयांतील कित्येक गोष्टींकडे लक्ष्य दिलें पाहिजे. स्कुल डिविजनांतून कालेज डिविजनांत गेल्यावर मला सद्धर्माचा विशेष प्रकाश मिळूं लागला. रेव० निजबिट साहेब, रेव० ( दाक्तर ) मरे मिचल व रेव० दा० उइलसन साहेब यांच्या आणि रेव० ( दाक्तर ) नारायण शेषाद्री साहेब यांच्या उत्तम शिक्षणपद्धतीकडून व प्रेमाळूपणाकडून माझें मन उत्तरोत्तर सुधरत चाललें.* माळी जसा बागांतील रान उपटून टाकून त्याच्या जागीं उत्तम बीज पेरितो किंवा रोपें लावितो, तद्वत् पवित्र आत्मा माझ्या अंतःकरणांत कार्य करूं लागला. केवळ अज्ञानाच्यामुळांचें रान उपटलें जाऊन माझें मन स्वच्छ होत चाललें होतें इतकेंच नाहीं, तर देवाचें वचनरूप बीज

* माझ्या एका जुन्या टिपणावरून असें दिसून येतें कीं, मी १८५१ सालीं आपल्या आत्म्याविषयीं कळकळीनें प्रार्थना करूं लागलों, आणि बैबल हें देवाचें शास्त्र आहे असें समजून तें आवडीनें वाचूं लागलों. ह्याच सुमारास रेव० मरे मिचल साहेब हे मजशीं माझ्या आत्मिक कल्याणाविषयीं फार कळकळीनें बोलूं लागले, व मीही त्यांस माझ्या आत्म्याच्या स्थितीविषयीं मन मोकळें करून सांगूं लागलों. त्यांनीं ख्रिस्ती धर्माचे मुख्य सिद्धांत ह्मणजे मनुष्य पापक्षमा कशी पावतो, व पुनर्जन्म पावून पवित्र कसा होतो हें फार स्पष्टरीतीनें मला शिकवावें, व ख्रिस्ताला प्रसिद्धपणें अंगीकारण्याचें केवढें अगत्य आहे हेंही मला सांगावें. क्षमा व शुद्धता यांस इंग्रजींत Pardon व Purity ह्मणतात, ह्या शब्दांचीं प्रथम अक्षरें घेऊन मला दोन पी (Two ps.) पाहिजेत असें ते वारंवार ह्मणत. माझा बाप्तिस्म्याच्या जुबिली संबंधानें यांचा माझा जो पत्रव्यवहार झाला त्यांत त्यांनीं ह्या गोष्टीचें मला स्मरण दिलें तेव्हां ते स्काटलंदांत असून त्यांचे ह्या गोष्टीला ५० वर्षें झालीं होतीं. पुढें दाहा वर्षांनीं ते प्रभुपाशीं गेले. त्या वेळीं त्यांचे वयास ९० वें वर्ष लागलें होतें. नवेंबर १४, १९०४.

त्यांत पेरलें जाऊन तें उगवूं लागलें. मला पवित्रशास्त्राची अधिकाधिक गोडी लागली, व तत्संबंधी जें ज्ञान इतर पुस्तकांवरून मला शिकविलें जाई तेंही फार आवडूं लागलें. वर्तमानपत्रांस जे मीं निबंध लिहून पाठवावे, त्यांत प्रमाणार्थ व बोधार्थ शास्त्रवचनें घेऊं लागलों, तसेंच मित्रासंगतीं धर्मचर्चा करितांना शास्त्रवाक्यांचा उपयोग करूं लागलों. हें माझ्या ख्रिस्ती व हिंदु मित्रांच्या ध्यानांत येत चाललें. मी आपल्या इंग्रजी बैबलांत कांहीं कोरीं पानें घालून त्यांवर पवित्र शास्त्रांतील निवडक वाक्यें उतरून ठेवीत असें. अशा वाक्यांपैकीं पवित्र शास्त्राची उत्कृष्टता व उपयोगिता यांसंबंधीं वचनें ( गीत. १९: ७–१० व २ तिम. ३: १६, १७ ) एका पानावर होतीं, तीं एके दिवशीं उइलसन साहेबांच्या पाहण्यांत सहज आलीं, तीं अशीं कीं, कांहीं धडे शिकवितांना त्यांस बैबलची गरज लागली तेव्हां मीं आपलें बैबल त्यांच्या हातांत दिलें, तें उघडून पाहतां त्यांच्या दृष्टीस तें पान पडलें; तें पाहून त्यांस फार संतोष झाला, आणि त्यावरून वर्गांतील सर्व मुलांस त्यांनीं उत्कृष्ट बोध केला. तसेंच मी एका चोपडींत शास्त्राच्या ओव्या लाल शाईनें उतरून त्या पाठ कराव्या. ही चोपडी माझ्यापाशीं पुष्कळ वर्षें होती. अशा सुस्थितींत असतां मला एकदां शाळेच्या परीक्षेंत जीं पुस्तकें बक्षीस मिळालीं त्यांत एक इंग्रजी बैबल आलें, त्यांत एका कागदाच्या तुकड्यावर हातानें लिहिलेलें एक वाक्य होतें तें असें कीं, "प्रभु येशूवर प्रीति करणाऱ्या अशा पांच वर्षांच्या लहान मुलानें हें पवित्र शास्त्र एका हिंदु मुलाकरितां पाठविलें आहे." ख्रिस्ती होण्यापूर्वीं जीं पुस्तकें मीं लिहिलीं त्यांत, ह्मणजे स्त्रीविद्याभ्यास निबंध, हिंदु लोकांच्या सणांविषयीं निबंध व व्यभिचारनिषेधक बोध यांत मीं बैबलांतील पुष्कळ वचनें उतरून घेतलीं होतीं.

हा प्रकाश माझ्या घरांतील मनुष्यांसही दिसूं लागला. मूर्तिपूजा करायाचें तर मीं बहुत दिवसांपासून सोडलेंच होतें. पुढें व्रतें उपोषणें करणें, सणवार पाळणें हींही मीं सोडून दिलीं, संध्या करणें टाकलें, श्रावणीच्या दिवशीं जानवें बदलणें सोडलें, परंतु भोजनसमयीं सोवळें नेसणें करणें सुटलें नव्हतें.

पश्चात्ताप व विश्वास.

देवाच्या पवित्र आत्म्याची कृति माझ्या अंतःकरणावर घडत असल्याचें अणखी एक फार मोठें व अनुभविक प्रमाण मला असें मिळालें कीं, माझ्या पापाविषयींचा पश्चात्ताप माझ्या मनांत उत्पन्न होऊं लागला. केवळ बुद्धि प्रकाशित झाल्यानें मनुष्य तारण पावतो असें नाहीं, तर अंतर्यामीं पश्चात्ताप व प्रभु येशूवरील विश्वास ही दोन्ही पाहिजेत. हीं कृपादानें देण्याचे पूर्वी पापी मनुष्यास देवाचा आत्मा ज्याप्रकारें जागृत करितो, त्याप्रकारें तो मला करूं लागला. प्रथम मला माझ्या पापाचें अत्यंत भय वाटूं लागलें. माझी स्थिति यात्रिकक्रमणांतील ख्रिस्तीच्या आरंभक स्थितीसारखी झाली. मला संसारिक सुखापासून शांति मिळेना. ईश्वरी न्यायाचें व दंडाचें अतिशय भय वाटूं लागलें. जें अन्न मी नित्य खात असें तेंच मजवर न्यायकाळीं उठेल असें वाटूं लागलें, तें विषाप्रमाणें माझा प्राण घेईल असें माझ्या मनांत येई. मी जेव्हां सोनापुराच्या बाजूस समुद्रकांठीं फिरायास जाई, तेव्हां तेथें हिंदु लोकांचीं जीं प्रेतें जाळीत त्यांचा जाळ व धूर पाहून माझी मरणोत्तर गति काय होईल असें वाटून भय उत्पन्न होई. तसेंच मार्गांतून प्रेत जातांना पाहिलें ह्मणजे फार गंभीर विचार माझ्या मनांत येत.

सत्यशोधकांची टोळी.

मी मुंबईस सत्य शोधूं लागल्यापासून बेळगांवीं जाईपर्यंत फ्रिचर्च विद्यालयांत जी सत्यशोधकांची लहानशी टोळी जमली होती, तिची थोडीशी हकीकत सांगितली पाहिजे. ह्या मंडळींत ब्राह्मण, परभू, सोनार, शेणवी, अशा जातींचीं मुलें होतीं. एक तरुण ब्राह्मण रा० रा० माधवराव मोरोजी* यांच्या बरोबर जमखिंडीस जाऊन परत आलेला होता. त्याची माझी मैत्री जडल्यावर त्यानें रा० माध-

---

* हे गृहस्थ फ्रिचर्च विद्यालयांतील नामांकित विद्यार्थी होते. त्यांस जमखिंडीकरांस इंग्लिश शिकविण्याचे कामावर सरकारानें पाठविलें होतें. तेथें असतांना त्यांस रेव० डाक्तर मरे मिचल यांनीं Letters to Indian Youth नांवाची पत्रमालिका लिहिली ती पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्धीस आली. ( तिचें आतां मराठी भाषांतर झालें आहे ) हे गृहस्थ तेथें घोड्यावरून पडून मरण पावले, ( सन १८५०.) त्यांच्या मरणाचें वर्त्तमान ऐकून मिचल साहेबांस व त्यांच्या इतर मित्रांस अत्यंत दुःख झालें. मिचल साहेबांनीं आम्हांस त्यावरून बोध केल्याचें मला आठवतें.

वरावांच्या मतांविषयीं मला वारंवार सांगावें. ते ख्रिस्ती धर्मावर गुप्तरीतीनें विश्वास ठेवणारे होते. त्यांनीं ह्या तरुणासंगतीं रात्रीं निजण्याचे पूर्वीं दावीदाच्या गीतांतून कांहीं वाचून प्रार्थना करावी, व त्यास ख्रिस्तीधर्म शिकवावा. अशा सुसंगतीनें ह्या तरुणाचें मन पापभीरु झालें होतें. त्यानें आपल्या पापाविषयीं माझ्याशीं वारंवार बोलावें, व कामदृष्टीचें पाप आपल्यास फार जाचतें असें सांगावें.

दुसरा एक ब्राह्मण कोणी पोलीस शिपायाचा भाऊ होता, त्याला तो लांच खातो ह्मणून त्याच्या पैशावर आपला उदरनिर्वाह चालवून विद्याभ्यास करणें बरें वाटेना. एके दिवशीं तो म्लानमुख व दुःखी होऊन माझ्या घरीं आला. तेव्हां मीं त्याला त्याच्या उदास मुद्रेचें कारण विचारिलें, तो ह्मणाला, मी उपाशीं आहे. त्याचें कारण त्यानें असें सांगितलें कीं, मला माझ्या भावाच्या घरीं जेवणें बरें वाटत नाहीं, कां तर तो लांचेचा पैसा घरांत आणतो, व मी त्याला तसें करूं नको ह्मणून सांगितलें असतां ऐकत नाहीं, तर मी त्याला सोडून वेगळा राहायास इच्छितों. ह्या तरुणाचा पूर्ववृत्तांत व शाळेंतील वर्त्तन मला चांगलें माहीत होतें ह्मणून मी आपल्या सोबत्यांस सांगून वर्गणी करून दरमहा तीन रुपये त्याच्या पोटखर्चास देऊं लागलों. असें त्याचेंही मन पापभीरु झालें होतें. दुसरे दोघे मुलगे, एक शेणवी व एक सोनार, नित्य दोनप्रहरीं शाळेच्या सुटीच्या वेळीं एकांतीं प्रार्थना करायास जात, व त्यांच्या सोबत्यांनीं तुह्मी कोठें गेलां होतां असें विचारिलें असतां आह्मी भाकर खायास गेलों होतों असें सांगत, त्याचा अर्थ आत्मिक अन्न खाण्यास जातों असा होता. एक सत्यशोधक मुलगा माझ्या वर्गांत (ह्मणजे जो वर्ग मी शिकवीत असें त्यांत) होता, तो पुढें मी ख्रिस्ती झाल्यावर बहुत वर्षांनीं सातार प्रांतांतील वाळवें पेठ्यांत पोस्टमास्तर असतांना मरण पावला. मरतेवेळीं आपण ख्रिस्ती आहें असें त्यानें आपल्या घरच्या मनुष्यास सांगितलें, व आपल्या बायकोकडून आपणास बाप्तिस्माही देवविला! ही गोष्ट त्या प्रांतांत अमेरिकन मिशनाचे रेव० आबट साहेब (हल्लीं जे बहुसन्मान्य रेव० दाक्तर जे० इ० आबट साहेब ज्ञानोदयाचे इंग्लिश एडिटर आहेत त्यांचे वडील.) हे उपदेशाची फेरी करीत त्याच्या गांवीं गेले असतां त्या तरुणाच्या आईबापांनीं त्यांस सांगितली व माझी त्याची ओळख होती व तो मुंबईस उइल्सन साहेबाच्या शाळेंत होता वगैरे मजकूर कळविला.

पुढें आबट साहेबांनीं मला तें लिहून कळविलें, हा मुलगा आपल्या आईबापांसुद्धां ज्या घरांत मी राहत असें त्यांत भाडेकरी होता. आणखी एक मुलगा सोनार जातीचा होता त्याचें नांव काशिनाथ विश्वनाथ. त्यानें मी हिंदु असतां मजपासून ख्रिस्ती धर्माविषयीं शाळेंत व घरीं पुष्कळ ज्ञान संपादिलें, पुढें तो ख्रिस्ती झाला. ( १८५५ ). तसाच दुसरा एक रामा ( रामचंद्र ) नारायण हाही सोनार होता. तो फ्रिचर्च विद्यालय सोडून मेडिकल कालेजांत शिकण्यास गेला त्यावेळीं त्याचाही विश्वास ख्रिस्तावर होता, व तो विश्वासांत मरण पावला अशी त्याच्या ख्रिस्ती मित्रांची आशा आहे. आणखी एक मुलगा सोनार जातीचाच असून मोठ्या धनवान व अब्रूदार गृहस्थाचा जांवई होता, त्याचें मन शास्त्रबोध ऐकण्याविषयीं फार कोमळ झालें होतें. त्याच्या वर्त्तनांतील कांहीं चुकी दाखवितेवेळीं अथवा एखाद्या धर्मसंबंधी गोष्टीचा निर्णय करतेवेळीं मी त्याला बैबल उघडून वाचून दाखवूं लागलों, ह्मणजे त्यानें भयभीत होऊन लागलेंच ह्मणावें कीं, आतां माझी खात्री झाली, जर शास्त्रांत असें लिहिलें आहे, तर त्यावर माझें अणखी कांहीं ह्मणणें नाहीं. हा प्रिय मित्र क्षयरोगानें मरण पावला. मरतेवेळीं त्याचा विश्वास प्रभूवर होता अशी माझी खातरी होती. हीं सर्व तरूण मुलें चपळ बुद्धीचीं व शिकण्यांत फार हुशार होतीं. त्या सर्वांत रामा नारायण हा तर फार तैलबुद्धी होता. ह्यांतून कित्येकांनीं लिहिलेलीं कांहीं पत्रें अद्याप माझ्यापाशीं आहेत. कोणी कोणी मला "My dear brother" (प्रिय भाऊ) असें लिहीत. बाळवेपेठ्यांत मरण पावणाऱ्या मित्रानें माझें पहिलें ख्रिस्ती लग्न पुण्यास झाल्याचें वर्त्तमान ज्ञानप्रकाशांत वाचून मला अभिनंदक पत्र पाठविलें; तोंपर्यंत मी कोठें होतों हें त्याला माहीत नव्हतें. त्याचें नांव केशव सखाराम होतें.

८ उपदेशश्रवण इ०

ख्रिस्ती भजनालयांत मी नेमानें जात असें, विशेषेंकरून कांपावरील फ्रिचर्चांत इंग्लिश उपदेश ऐकायास जाई तेव्हां माझ्याबरोबर दुसरेही विद्यार्थी येत. तेथील उपदेश मला बहुत हितावह होई. ह्या देवालयांत एकदां अमेरिकन मिशनाचे रेव० मंगर साहेब यांनीं "एवढ्या मोठ्या तारणाचा अव्हेर केला असतां आह्मी कसे निभावूं?" ( इब्री. २.३ ) ह्या प्रतिकावरून उपदेश केला; तो माझ्या मनाला लागला व त्यापासून माझें पुष्कळ हित झालें.

पुढें कित्येक वर्षांनीं मि० मंगर साहेब यांची सातार मुक्कामीं गांठ पडल्यावर मी त्यांस ह्या उपदेशाची आठवण देऊन त्यापासून झालेल्या लाभाबद्दल मीं त्यांचे उपकार मानिले; तेव्हां त्याची हस्तलिखित प्रत आपणापाशीं अद्याप आहे असें त्यांनीं मला सांगितलें. अंग्रोळींतील मराठी उपदेशासही मीं कधीं कधीं जावें, त्यांत निसबीट साहेबाच्या मराठी उपदेशास तर मी कधींच चुकत नसें. मि० नारायण शेषाद्री यांनीं एक नेटिव मिशनेरी असोसिएशन नांवाची ख्रिस्ती सभा स्थापिली होती, तींत माझें नांव सभासदांच्या पटांत दाखल केलें होतें, तिच्या मासिक सभेस मीं जावें व चार आणे वर्गणीही द्यावी. ह्या सभेस कित्येक तरुण हिंदु मंडळी येई त्यांत रा० मोरोबा विनोबा हे नेमानें येणाऱ्यांपैकीं होते. तेथें अशिक्षित व साधेभोळे ख्रिस्ती लोक ज्या प्रार्थना करीत त्या ऐकून त्यांस मोठें आश्चर्य वाटावें व त्यांविषयीं त्यांनीं मला त्यांची तारीफ करून बोलावें कीं हे महारामांगांतून झालेले ख्रिस्ती कशी प्रार्थना करितात पहा! तशी आमच्या एखाद्या शास्त्र्यास तरी करितां येईल काय ?

ही माझी धर्मसंबंधीं स्थिति अप्रत्यक्ष रीतीनें लोकांच्या नजरेस पडत चालली इतकेंच नव्हे, तर तिजविषयीं मीं आपल्या वडिलांस लिहून कळविण्याचा परिपाठ घातला.

**मेडिकल कालेजांत जाणें.** जो प्रकाश मला मिळत चालला होता तो त्यांस दाखविण्याची मला फार उत्कंठा झाली. त्यावेळीं ते साताऱ्यास होते. त्यांनीं माझी मनाची स्थिति जाणून मला मिशन स्कुलांतून काढण्याचा उपाय योजिला, तो असा कीं मीं ग्रांट-मेडिकल कालेजांत जाऊन वैद्यक शिकावें अशी इच्छा दर्शविली; ह्या इच्छेस मी आड आलों नाहीं. मलाही त्यावेळीं त्या विद्येचा अभ्यास करावा असें वाटलें, आणि त्याप्रमाणें मीं सन १८५२ त्नांत त्या विद्यालयांत प्रवेश केला. त्यावेळीं रीतीप्रमाणें मला जीं माझ्या विद्यागुरूंपासून सर्टिफिकिटें मिळालीं, त्यांजमध्यें दाक्तर मरे मिचल साहेबांच्या सर्टिफिकिटांत माझ्या मनाच्या धर्मसंबंधीं स्थितीविषयीं थोडीशी सूचना प्रिन्सिपाल मोरहेड साहेब यांस केली होती. हें सर्टिफिकिट पत्राच्या रूपानें होतें.

विद्यार्थ्यांस माझा बोध.

फ्रिचर्च विद्यालय सोडतेवेळीं मीं शिक्षकाच्या नात्यानें माझ्या वर्गांतील मुलांशीं बोधपर भाषण केलें, तें त्या वर्षाच्या मे महिन्याच्या ज्ञानोदयांत छापिलें गेलें. तें बरेंच लांब आहे, त्यांतील शेवटच्या धर्मसंबंधीं भागाचा उतारा खालीं घेतला आहे:—

" आतां माझे मित्र हो, मीं तुह्मास शेवटली गोष्ट सांगतों, ती तुह्मीं सर्वदा ध्यानांत ठेवावी व तिजप्रमाणें चालावें. इतका वेळ जें मीं सांगितलें, तें सर्व या शेवटल्या गोष्टीशिवाय व्यर्थ होईल. ती गोष्ट ही कीं, तुह्मी सदा सर्वकाळ ईश्वराचें भय धरीत जा; सर्वकाळ ईश्वर तुमच्या सन्निध आहे असें मनांत वागवा, व जें सर्व तुह्मी करितां तें तो पाहतो व त्याचा न्याय करील असें समजा. पाहा, ईश्वराचे तुह्मांवर सदा सर्वकाळ किती उपकार आहेत ? त्याच्या शक्तीनें तुह्मीं हालतां, चालतां व सर्व कामें करितां. तुह्मांस आईबाप, अन्नवस्त्र व दुसऱ्या हजारों सोई कोणीं दिल्या ? तर अशा दयाळू परमेश्वरास कधीं विसरूं नका. या शाळेंत राहिल्यानें सरकारी शाळेपेक्षां तुम्हांस सर्वांहून मोठा लाभ झाला आहे. त्याविषयीं तुह्मीं परमेश्वराचे बहुत आभारी व्हावें. ईश्वराविषयीं तुह्मांस दररोज एथें उपदेश ऐकायास मिळतो. ईश्वर कसा आहे, त्याचे गुण काय आहेत, त्यानें आपणास कशाकरितां उत्पन्न केलें व त्याशीं आपण कसें वागावें, त्याची कृपा कशी संपादन करून घ्यावी व आपल्या पापाची क्षमा कशी मिळेल इत्यादि मोठ्या अगत्याच्या व अमोल्य गोष्टीचें ज्ञान तुह्मांस एथें प्राप्त होत आहे. सर्व ज्ञानापेक्षां व सर्व माणकांमोत्यांपेक्षां, हें ईश्वरी ज्ञान अति मोलवान आहे. याची जरी तुह्मांस आतां किंमत समजत नाहीं, तरी पुढें थोड्याच काळांत तुह्मांस त्याची गोडी लागेल. मग असें वाटेल कीं, जेथें हें ज्ञान प्राप्त होत नाहीं, अशा शाळेंतील जे विद्यार्थी, ते किती गरीब असावे ! त्यांची तुह्मांस दया येईल. त्यांची पुष्कळ व गहन विद्या तुमच्या थोड्याशा व सोप्या विद्येपुढेंही निस्तेज दिसेल. तर हे मित्रहो, ईश्वराविषयीं जी सत्यता तुमच्या कानीं पडती, ती विसरूं नका. परंतु पुढें तुह्मांस अधिक विचार व ज्ञान प्राप्त झालें ह्मणजे सत्य कोणतें व मिथ्या कोणतें, याचा भेद समजूं लागेल; व कोणतें ग्रहण करावें व कोणतें त्यजावें, हें तुमची बुद्धिच तुह्मांस सांगेल.

सारांश, ही ईश्वराविषयींची गोष्ट तुह्मांस शेवटीं सांगितली, कारण ती सर्वांपेक्षां मोठ्या अगत्याची आहे. आतां माझे मित्रहो, मी पुनः तुह्मांस शिकविण्यास येईन असा संभव नाहीं. मी तुह्मांस सोडून जाण्यास बहुत खंती आहे; परंतु ईश्वराची इच्छा जोंपर्यंत म्यां एथें राहावें अशी होती तोंपर्यंत राहिलों. आणि आतां जरी मी तुह्मांपासून कांहींसा दूर जातों, तरी माझ्या हृदयांतून तुमची आठवण व प्रीति कधीं जाणार नाहीं; व तुह्मीहि मला विसरणार नाहीं अशी माझी आशा आहे. आतां ईश्वर तुमचें कल्याण करो. तो तुह्मांस विद्या शिकण्यास बुद्धि व बळ देवो व त्याच्या आशीर्वादानें तुह्मी सर्वदा सुखी राहा; ह्मणजे तुह्मांविषयीं माझी इच्छा पूर्ण होईल."

**माझी असमाधानवृत्ति.**

मेडिकल कालेजांत जातांना प्रवेशक परीक्षेच्या वेळीं माझ्याबरोबर जे दुसरे तरुण होते, त्यांत एक दोन माझ्या मताचे होते, त्यांमुळें मला फार आनंद झाला, परंतु ते पुढें कालेजांत आले नाहींत, ह्मणून मला फार वाईट वाटूं लागलें. मी केवळ एकटाच ख्रिस्ती मत बाळगिणारा तेथें पडलों. तरी मीं आपलीं मतें लपवून ठेविलीं नाहींत. माझ्या वर्गांत जे हिंदु व पारशी विद्यार्थी होते, त्यांस लवकरच तीं कळून आलीं. पारशी विद्यार्थ्यांनीं माझी फार कुचेष्टा करावी. त्यांत एक जण तर फार निंदक व थट्टेखोर असे. रोजरोज त्यानें ख्रिस्ती धर्माविरुद्ध कांहीं तरी बोलतच असावें. दुसरीं मुलें इतका त्रास देत नसत तरी हा त्रासदायक सहाध्यायी मजवर प्रीति करीत असे. मी जातिभेद पाळीत नाहीं, असें जेव्हां त्याला समजलें तेव्हां त्यानें दररोज आपल्या दुपारच्या जेवणांतून मला कांहीं तरी खायास लावावें. ह्या विद्यालयांत मी सुमारें ९ महिने होतों. तेथें असतांना माझ्या मनाला अगदीं समाधान नव्हतें. "प्रथम देवाचें राज्य व त्याचें न्यायीपण शोधा, मग तुह्मांला सर्व वस्तु मिळतील," असें जें प्रभु येशूचें वचन तें वारंवार मनांत येऊन मला टोंचत असे. तें मला ह्मणे कीं, तूं देवाच्या राज्यांत गेल्यापूर्वी जगिक लाभाकरितां ही विद्या शिकत आहेस; इजपासून तुझें कल्याण होणार नाहीं. माझा हेतु असा कीं, दाक्तराची परीक्षा पास झाल्यावर बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ताला लौकिकांत पत्करावें. परंतु ह्या विचारानें माझ्या मनाचें समाधान झालें नाहीं. तेथील अभ्यासाच्या पुस्तकांत धर्म-

संबंधी विषय मुळींच दृष्टीस पडत नसे, त्यामुळें मला तीं पुस्तकें अगदीं कोरडीं व निस्सार लागत. एकदां क्वेन्स अनाटामीच्या पुस्तकांत ईश्वरानें मनुष्याला सर्व प्राण्यांमध्यें श्रेष्ठ केला आहे, अशा गोष्टीविषयीं कांहीं विचार माझ्या वाचण्यांत आले, तेव्हां रेतीच्या मैदानांत प्रवास करीत असतां तृषितास पाण्याचा झरा लागला ह्मणजे जसा आनंद होतो, तसें मला वाटलें, व वारंवार तो विषय काढून मीं वाचावा. तेथील प्रोफेसर आह्मांला जीं लेक्चरें देत त्यांचा सारांश आह्मांस लिहून आणून दाखवावा लागत असे, त्यांत मीं कधीं कधीं बळेंच धर्मसंबंधी विचार प्रदर्शित करावे, परंतु त्यांविषयीं प्रोफेसर साहेब मला कांहीं बरें वाईट बोलत नसत. मीं सणाच्या सुटीच्या दिवशीं फ्रिचर्च कालेजांत निसबिट साहेबाच्या बैबलाच्या वर्गास यावें, व ख्रिस्ती भजनालयांतही रविवारीं जावें. तरी मला चैन पडत नसे. ह्या चिंतेनें व दुसऱ्या कारणांनीं मीं वारंवार आजारी पडावें, तेणेंकरून माझें शिकणें बरोबर होत नसे.* शेवटीं मीं राजीनामा दिला, तो कबूल करण्यास प्रिन्सिपाल मोरहेड फार नाखूश होते. त्यांस वाटलें कीं मला शवच्छेदन करण्याच्या खोलींत जाण्यास किळस येत असेल. असें वाटण्यास

---

* अशा एका दुखण्यांत प्रिन्सिपाल मोरहेड यांनीं कृपा करून माझा समाचार घेण्याकरितां आपल्या एका कालेज विद्यार्थ्यास ( मि० बाळा गोपाळ जोशी ) पाठविलें. हा तरूण प्रकृतीनें सुदृढ, रूपानें सुंदर व रंगानें गोरा होता. त्याचा ब्राम्हणी आंगरखा, पागोटें व इंग्रजी बूट पाटलून पाहून माझ्या एका हिंदु शेजाऱ्यानें हा कोण ह्मणून विचारलें. जेव्हां तो ब्राह्मण ख्रिस्ती आहे, असें त्याला समजलें तेव्हां त्याला वाईट वाटलें, तरी तो ह्मणाला कीं, ब्राम्हण बाटला म्हणून त्याचें ब्रह्मतेज लपतें काय ? ह्याच्यापूर्वी कांहीं दिवस मला पाहण्याकरितां रेव० नारायण शेषाद्रि आले होते, त्यांविषयीं त्याच शेजारी बुवानें तोच प्रश्न केला, व माझें उत्तर ऐकल्यावर ह्मटलें कीं, ब्राह्मण असून जातीभ्रष्ट झाला ह्मणून ह्याच्या मुखावर काळीमा आली ! ( मि. नारायण यांचा वर्ण मि. जोशी यांच्या इतका उजळ नव्हता ). हा तरूण ख्रिस्ती मेडिकल कालेजांतील अभ्यास पुरा होण्यापूर्वीच मरण पावला. ( १८५३ ) तो फ्रिचर्च मिशनाचा असल्यामुळें त्याची प्रेतक्रियेसंबंधीं ईश्वरोपासना कांपावरील फ्रिचर्च भजनालयांत झाली. ख्रिस्ती धर्मांतील प्रेतक्रियेची पद्धति पाहण्याचा हाच मला प्रथम प्रसंग. ती फार साधी असून अतिशय गंभीर होती. ती डाक्तर मिचल यांनीं चालविली. त्यांच्या प्रार्थना व उपदेश ऐकून माझ्या चित्तास फार बोध झाला. कालेजाचे प्रोफेसर व कित्येक पारशी व हिंदु विद्यार्थी तेथें आले होते.

त्यांत

कारणही होतें. माझ्याबरोबर प्रवेशक परीक्षेंत उतरलेले कित्येक पारशी तरुणांच्या आईबापांस जेव्हां समजलें कीं ह्यांस प्रेतास शिवावें लागेल, तेव्हां त्यांनीं त्यांस कालेजांत पाठविणें बंद केलें.* ह्या कारणास्तव मोरहेड साहेबांनीं मिचल साहेबांस लिहून त्यांच्याकडून माझी समजूत करवून मला कालेजांत राहायास लाविलें. तरी कांहीं दिवस गेल्यावर मीं पुनः राजीनामा दिला, व त्या सोबत प्रिन्सिपालांस दा० उइलसन यांचें पत्र पाठविलें, त्यांत त्यांनीं मला कालेज सोडण्यास परवानगी असावी अशी माझ्या विनंतीवरून रदबदली केली होती, ती प्रिन्सिपाल यांनीं मान्य केली. कालेज सोडतेवेळीं मला आठ नऊ महिन्यांचे जे स्कालरशिपीबदल पैसे मिळाले होते ते परत करावे लागले.

**मे० का० सोडून परत फ्रि.च.कालेजांत येणें.**

मेडिकल कालेजांतून निघाल्यावर पुनः फ्रिचर्च विद्यालयांत मी जाऊं लागलों. तेणेंकरून जरी मला कांहींसें बरें वाटलें, तरी माझ्या तीर्थरूपांस हें माझें करणें फारच वाईट वाटलें; तथापि त्यांनीं मला तेथून तावडतोब काढण्याचा प्रयत्न केला नाहीं.

**एक दुःखाची गोष्ट.**

ग्रांट कालेजांत असतांना माझा एक मेहुणा (बायकोचा भाऊ) मरण पावला. हा तरूण गृहस्थ माझा मित्र होता, तो मला फार चाहत असे. त्याला माझे धर्मसंबंधीं विचार माहीत होते. त्याला सन्निपात ज्वर झाला तेव्हां त्याच्या वडिलांनीं त्यास औषधउपाय करण्याच्या बद्दल जोशास विचारून त्याचे ग्रह पाहिले, व ग्रहांचीं शांति करण्यासाठीं अनेक दानें व जप करविले. ब्राह्मणांच्या सांगण्यावरून त्याच्या तरुण बायकोस व्रतें उपोषणें करायास लाविलें. तिची वेणीफणी बंद केली, इतकेंच नाहीं, तर तिला नुसत्या भुईवर फार थोडें अन्न खायास घालीत व उघड्या भुईवरच निजायास लावीत. हे तिचे हाल व तिच्या नवऱ्याची औषधोपचाराची हेळणा पाहून मला फार वाईट वाटलें.

---

* ग्रांटमेडिकल कालेजाच्या स्थापनेच्या आरंभीं पारशी विद्यार्थ्यांकरितां जवळच एक खोली केली होती, तेथें ते शवच्छेदनाचा वर्ग झाल्यावर जाऊन स्नान करीत. ही युक्ति त्यावेळचे बोर्ड आफ् एज्युकेशनाचे मेंबर मि० फ्रामजी कावसजी बनाजी यांनीं काढली होती. मी तर 'अनाटामी' शिकण्याकरितां सोनापुरांतील एक मुंडकें घरीं आणून ठेविलें होतें, तें मीं मुंबई सोडून जातेवेळीं माझ्या वडिलांनीं आमच्या घरापुढें होळी मांडण्याचा एक खळगा होता त्यांत पुरून टाकलें!

मीं त्याच्याकरितां दाक्तर रामसे नांवाचा एक इंग्रजी वैद्य आणिला. त्यानें त्याची अत्यावस्था आहे असें ह्मटलें तरी माझ्या आग्रहावरून त्यास उपचार सांगितले. ते त्याच्याच हातून व्हावे ह्मणून मीं त्याला जास्ती फी देऊन एक दोन तास त्याजवळ बसविलें. त्या वेळीं त्याचें माझें जें धर्मसंबंधीं भाषण झालें, त्यावरून तो ख्रिस्ती आहे असें मला समजलें. मिशनेरी नव्हे अशा इंग्लिश गृहस्थाशीं हें माझें पहिलेंच धर्मसंबंधीं भाषण होय. येशू ख्रिस्तावांचून तारणोपाय नाहीं असें त्यानें मला स्पष्ट सांगितलें. तो गेल्यावर ही गोष्ट माझ्या आजारी मित्रास सांगावी असें माझ्या मनांत होतें, पण तो अत्यवस्थ असून शुद्धीवर नव्हता. त्याचा प्राण जाईपर्यंत मी त्याजवळ बसलों होतों. मरणकाळीं त्यानें डोळे उघडले, त्यांतून विलक्षण तेज निघाल्यासारखें दिसलें; जणू काय त्याचा आत्मा नेत्रद्वारें निघून गेला असें मला भासलें. ह्या मरणावरून मला पुष्कळ पारमार्थिक बोध झाला.

मी फ्रिचर्च विद्यालयांत परत आल्यावरून निजबिट साहेब आदिकरून माझ्या प्रोफेसर मंडळीस फार आनंद झाला. माझी प्रकृति क्षीण झाली होती ती पाहून निजबिट साहेबांस माझा कळवळा आला व आतां तूं पुष्ट होशील असें ह्मटलें. तसेंच एकदां दाक्तर आत्माराम पांडुरंग हे आमच्या विद्यालयांत कांहीं कारणाकरितां आले असतां त्यांनीं मला पाहून दा० मिचल साहेबांस मीं ग्रांट मे० कालेज सोडण्याचें कारण विचारिलें, त्यांस त्यांनीं हंसत हंसत ह्याला दाक्तर आफ मेडिसन व्हायाला नको, तर दा० आफ दिविनिटी व्हायाला पाहिजे असें उत्तर दिलें.

सन १८५३ अखेरपर्यंत माझ्या धर्मसंबंधी वृत्तांतामध्यें कांहीं विशेष सांगण्याजोगे फेरफार झाले नाहींत. ख्रिस्ती विद्यालयांत व ख्रिस्ती लोकांमध्यें वागण्यानें* व शास्त्राचा अभ्यास वगैरे करण्यानें व उपदेश ऐकण्यानें मला

* ह्या काळांत रेव० नारायण साहेबांच्या घराखेरीज दुसऱ्या नेटिव ख्रिस्ती लोकांच्या घरीं माझें फारसें जाणें येणें नव्हतें, तरी चर्च मिशनाचे रेव० जेम्स बंटर यांच्या घरीं मी व माझा अंध भाऊ आणि वर सांगितलेल्या सत्यशोधक तरुणांच्या टोळींतला रामानारायण असे आह्मी वारंवार जात होतों. बंटर साहेब व त्यांची पत्नि मिसेस बंटर (माग-
बाई) यांनीं आमच्याशीं फार प्रीतीनें वागा[illegible] वाटाड्या पाहिजे.
आह्मांस ख्रिस्ती धर्माविषयीं बोध होई इत माझें अपराधी मन मला भयकंपित
असते व एतद्देशीय ख्रिस्ती स्वदेशबांधवां[illegible]द्यांच्या ग्रंथांत व सुवार्त्तिकांच्या लेखांत

असा लाभ झाला कीं, ज्या विश्वासाचा अंकूर मजमध्यें फुटला होता तो क्षय न पावतां वाढत गेला. ही परमेश्वराची मजवर मोठी दयाच समजली पाहिजे; कारण सत्याविषयीं एकदां पूर्ण खातरी झाल्यावर त्याचें अवलंबन व आचरण न करणें ही मोठी जोखमाची गोष्ट आहे. देवाचा आत्मा पाप्यास ख्रिस्ताकडे वळविण्यासाठीं जरी दीर्घकाळ यत्न करितो तरी सर्वकाळ करीत नाहीं. त्याला त्यानें खेदित केलें, व त्याच्या पवित्र व प्रीतियुक्त सूचना दीर्घकाळ अवमानिल्या तर तो त्यास सोडून जातो. परंतु अशा प्रकारें तो दयाळू आत्मा मला सोडून गेला नाहीं ह्मणून मी त्याचे अनंत उपकार मानितों. मी ख्रिस्ताला अनन्य भावानें शरण जाऊन लोकांपुढें बाप्तिस्म्याच्या योगें त्याला पत्करीपर्यंत तो मला शिकवीत व बळावीत राहिला.

**एक आनंदाची गोष्ट.**

ह्याच काळाच्या सुमारास एक गोष्ट घडली ती सांगितली पाहिजे. जेथें मी राहत होतों तेथें शेजारी एक लिंगाईत जातीचा धनवान व्यापारी राहत होता, त्याचें कुटुंब वारलेलें असल्यामुळें त्यानें एक मराठ्याची बाई घरांत ठेविली होती, ती त्याच्या मुलांचा जीव लावून संभाळ करीत असे व शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं स्नेहानें वागत असे. पुढें ती दुखण्यांत पडली तेव्हां मी तिच्या शोधसमाचारास जाऊं लागलों. माझ्याबरोबर आमच्या शाळेंतील एक सत्यशोधक मुलगाही येत असे, आह्मीं दोघांनीं तिला प्रभु येशू ख्रिस्ताविषयीं सांगण्यास धैर्य धरून आरंभ केला, आणि तिच्या पापाविषयीं बोलूं लागलों. तिनें आमच्या गोष्टी मन लावून ऐकाव्या शेवटीं आह्मी तिच्या बिछान्याशीं बसून प्रार्थना करूं लागलों. कांहीं दिवसांनीं ही बाई मरण पावली, आणि आह्मांला वाटलें कीं ती प्रभूवर विश्वास ठेवून मेली व त्याच्यापाशीं गेली. ही गोष्ट आह्मीं कोणास कळविली नाहीं.

**१८५२ह्नांतील माझ्या मनाची धर्मसंबंधीं स्थिति.**

सन १८५२ ह्यांत माझ्या मनाची धर्मसंबंधीं स्थिति कशी होती हें माझ्यापाशीं त्यावेळीं एका ख्रिस्ती मित्रास लिहिलेले इंग्रजी पत्राची अर्धवट नकल आहे, तिजवरून समजतें. त्याचें भाषांतर येणेंप्रमाणें आहे:—

युक्त ... पोचलें, आपणास प्रभूनें कृपा करून आमच्या-
काढली होती. मी तर 'अनाटोमी' शिकण्याकरि
...विलें होतें, तें मीं मुंबई सोडून जातेवेळीं माझ्या आनंद करितों. देव तुह्मांला दीर्घायु
मा...च्याचा एक खळगा होता त्यांत पुरून टाकून देण्यास साधनीभूत करो.

"आपलें पत्र वाचून मला फार संतोष झाला. तें मीं पुनः पुनः वाचलें, तरी तें आणखी एकदां वाचल्याशिवाय पेटींत ठेवावेसें वाटत नाहीं. तुमचा बुद्धिवाद सत्य व चित्तभेदक आहे, व तो मला सर्वस्वी मान्य आहे. तुह्मी मला आपल्या पत्राचें उत्तर लिहायास सांगतां, तर त्यांत माझ्या धर्मसंबंधीं स्थितीविषयीं मजकूर कळवावा अशी अपेक्षा बाळगीत असालच, तर मी खरोखर माझी स्थिति काय आहे ती आपणास कळवितों.

"मूर्तिपूजा वाईट आहे अशी जरी माझी खातरी झाली आहे तरी मी मूर्तिपूजेच्या धर्मांत राहत आहें ही माझी चूक मी पदरीं घेतों. आणि अशा स्थितींत राहण्याचीं कारणें सांगण्यास मला लाज वाटते. हिंदुस्थानांत जेव्हां कोणी ख्रिस्ताला लोकांसमोर पत्करितो, तेव्हां त्याला ज्या परीक्षा, छळणुकी, विरोध, अडचणी सोसाव्या लागतात त्या सोसायास मी अद्याप तयार नाहीं, तर देवानें लुथरास वर्म्स गांवीं जसें धैर्य दिलें तसें मला द्यावें. त्यानें मला आपला आत्मा देऊन, [ लूथरासारिखें ] 'मी येथें देवाच्या शास्त्रावर उभा राहतों ' असें ह्मणायास शक्ति द्यावी. ख्रिस्तानें आमच्या पापांकरितां जीं दुःखें सोशिलीं त्यांची कशाशींही तुलना करितां येत नाहीं, हें मी कबूल करितों. मी आपल्या आईबापांवर व कुटुंबांतील दुसऱ्या मनुष्यांवर जी प्रीति करितों तिच्यामुळें मी आपला निश्चय विसरतों, हेंही मी कबूल करितों. परंतु माझ्या पापांचें ओझें व बैबलांत सांगितलेली पाप्याची मरणोत्तर स्थिति हीं मला ख्रिस्ताच्या खांबाकडे ओढतात, आणि ज्या जीवनाच्या अधिकाऱ्यानें आपलें रक्त मजकरितां पाडिलें त्याचा आश्रय धरायास सांगतात. तो तारणारा माझा पाप मल धुवून टाकायास सर्वदा तयार आहे.

"माझ्या मनांत प्रापंचिक वासना व परलोकसंबंधीं आशा यांची नित्य झोंबी चालली आहे. मला शांति नाहीं. मी स्वपुण्याविषयीं निराश झालों आहें. मी जीं आपणास वचनें देतों तीं व्यर्थ होतात. मला तारणाराची गरज आहे. मी ह्या पापाच्या व दुःखाच्या अरण्यांत हरवलों आहें. मला त्यांतून वाट दाखवून बाहेर काढायास वाटाड्या पाहिजे. पवित्र देवाची प्रार्थना करायास माझें अपराधी मन मला भयकंपित करितें. जो मला प्राचीन भविष्यवाद्यांच्या ग्रंथांत व सुवार्त्तिकांच्या लेखांत

सांपडला आहे त्याच्या नांवानें मी प्रार्थना करीत असतों, तथापि तो माझा मित्र नाहीं. तो मला न्यायाधिशाप्रमाणें माझ्या गतपापांविषयीं व ज्या पापाचरणांत प्रस्तुत मी आहें त्याविषयीं मोठ्या कडक रीतीनें वाग्दंड करीत आहे, असा दिसतो.

"याप्रमाणें हल्लीं माझ्या मनाची स्थिति आहे. यांत कांहीं अतिशयोक्ति नाहीं, व आपणाला संतुष्ट करण्याकरितां नवीन गोष्टी घातल्या नाहींत."

याच्या पुढें अर्धवट मजकूर आहे, ह्मणजे मूळ प्रतीचा सगळा उतारा घेतला नाहीं. त्यांत असें आहे कीं, "मी घरांतील देवांची पूजा करीत नाहीं, संध्या करीत नाहीं, परंतु माझ्या उत्पन्नकर्त्याची प्रार्थना करून त्याचा आशीर्वाद मागत असतों. मनुष्यास ईश्वरी शास्त्र व खरा धर्म पाहिजे याविषयीं मी आपल्या इष्टमित्रांशीं बोलतों."

ग्रंथप्रसिद्धि.

सन १८५१ पासून ५४ च्या मध्यापर्यंत माझीं पांच पुस्तकें प्रसिद्धीस आलीं; ह्मणजे स्त्रीविद्याभ्यास निबंध, हिंदुलोकांच्या सणांविषयीं निबंध, व्यभिचारनिषेधक बोध, कुटुंबसुधारणा व निबंधमाला.* ह्या पुस्तकांच्या प्रसिद्धीकडून माझ्या वडिलांस

---

* ह्या पांच पुस्तकांच्या पूर्वीं दोन पुस्तकें बहुत वर्षांमागें मी लिहिलीं होतीं, त्यांतून एकाची प्रसिद्धि झाली नाहीं, व एक प्रसिद्ध झालें असतांही आतां कोठें मिळत नाहीं हें बरें झालें. त्यांपैकीं पहिलें पुस्तक बोधपर निबंधाचें होतें. तें बेळगांवांतील मिशन शाळेंत असतां माझ्या वर्गांतील एका ब्राह्मणाच्या मुलाचें वर्तन सुधारण्याच्या हेतूनें लिहिलें होतें. त्याची स्वच्छ प्रत त्याच्याच हातून करविली होती, ती करितांना तें आपल्यासाठीं रचिलें हें त्याला समजलें. हा निबंध रेव० टेलर साहेबांच्या परवानगीनें कित्येक शनिवारीं थोडा थोडा शाळेंतील विद्यार्थ्यांस वाचून दाखवून पुरा केला. टेलर साहेबांनीं प्रथमच हें पुस्तक पाहून जें ह्मटलें तें माझ्या आठवणींत आहे, तें असें कीं, तीन गोष्टींनीं पूर्ण मनुष्य होतो, ह्मणजे पुस्तक लिहिण्यानें, घर बांधल्यानें, व लग्न केल्यानें. वर जीं पांच पुस्तकें सांगितलीं आहेत, त्यांपैकीं पहिल्यास दाक्तर एच्. लीथ (जे पुढें सानेटेरीकमिशनाचे प्रेसिडेंट झाले) यांनीं ज्ञा० सो० मार्फत १०० रु० बक्षीस देऊं केले होते, ते मला मिळाले. ह्या विषयावर जीं पुस्तकें बक्षिसाकरितां कमिटीपुढें आलीं होतीं त्यांत संस्कृत विद्वान् गोविंदशास्त्री लेले (ज्यांनीं कांहीं वर्षांमागें नाशकास बाप्तिस्मा घेतला) यांचें एक होतें. त्यास दुसरें बक्षीस ह्मणजे ५० रु० मिळाले, परंतु तें छापलें नाहीं. दुसरेंही पुस्तक बक्षिसाकरितां लिहिलें होतें, त्याचें १०० रु० बक्षीस होतें. तिसरें मीं स्वत. छापलें. चाथें व पाचवें दक्षिणा प्रैज कमिटीनें घेऊन त्यास

मजविषयीं फार अभिमान व संतोष वाटला, व माझ्या धर्मसंबंधीं मतां-विषयीं त्यांच्या मनांतील विरोध कमी कमी होत गेला. मी पाद्री लोकांच्या नादीं लागलों आहें, ते मला फसवितात इ० कल्पना त्यांच्या मनांतून निघून जात चालल्या व मीं भावार्थी आहें, व जें धर्मांतर मी करूं पाहतों तें माझ्या तारणासाठीं ह्मणून इच्छितों अशी त्यांची खात्री होत चालली.

---

अनुक्रमें १५० व १२५ रु० मला दिले. हें शेवटलें पुस्तक मुळीं आमच्या शाळेंतील एका वार्षिक परीक्षेकरितां रचलें होतें, त्याजबद्दल निजविट प्रेज २५ रु० मला मिळाले. प्रारंभीं जुन्याकाळचीं जीं दोन पुस्तकें सांगितलीं त्यांपैकीं दुसऱ्याची हकीकत सांगायचें राहिलें तें Napoleon's Book of Fate ( नेपोलियन बोनापार्ट यांची शकुनवंती ) ह्याचें भाषांतर होतें. तें मीं सरकारी शाळेंत असतां व आदनास जाण्याचे सुमारास केलें व माझ्या वडिलांच्या खर्चानें छापिलें. त्याच्या एक हजार प्रती विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांच्या शिळाछापावर छापल्या होत्या. त्या बहुतेक फुकट वांटण्यांत गेल्या. हा अज्ञानांधकारांतील उद्योग व्यर्थ गेला, व आतां त्या पुस्तकाचा मागमोस नाहीं ह्मणून मला आनंद वाटतो. अद्याप कोणी कोणी जुन्या समजुतींचे मित्र तें पुस्तक माझ्यापाशीं मागतात! स्त्रीविद्याभ्यास निबंध छापून निघाल्यावर पुण्याचे ज्ञानप्रकाशाचे कर्ते यांनीं मला अभिनंददर्शक पत्र व त्या-सोबत एक चर्मी चोडा व पितळी वाटी बक्षीस पाठविली. प्रभाकरपत्रांत ह्या लहानशा पुस्तकाविषयीं चांगला अभिप्राय आला होता.

# प्रकरण १४.

## माझ्या वडिलांचें मुंबईस येणें व त्या वेळची माझी स्थिति. १८५४ ह्याचा आरंभ.

सन १८५४ च्या आरंभीं माझे वडील साताऱ्याहून मुंबईस रजेवर आले, कारण त्यांची बदली बेळगांवास झाली होती, व त्यांच्या मनांत मला तेथें घेऊन जाण्याचें होतें. ते मुंबईस आल्याबरोबर माझ्या नातलगांनीं व जातिगृहस्थांनीं मजविषयीं त्यांजपाशीं पुष्कळ गाऱ्हाणीं केलीं तीं येणेंप्रमाणें:—मला मिशन शाळेंत पाठविलें ही मोठी चूक केली, मला मुंबईत एकटें ठेवायाचें नव्हतें, मला दावांत राखायाचें होतें, मजशीं नरम गरम वागायाचें होतें, माझ्या हातांत घरचा कारभार व पैसाटक्का द्यायाचा नव्हता; असे अनेक गिल्ले त्यांच्या कानावर येऊं लागले. माझ्या सासऱ्याच्या घरचे लोकही त्यांजवर फार रागें भरूं लागले, आणि मला मिशन शाळेंतून काढावें असा सर्वांचा एकच आग्रह पडला.

मी आपल्या तीर्थरूपांस दोन वर्षांपासून आपली धर्मसंबंधीं स्थिति कळवीत आलों होतों, ह्मणून त्यांस माझीं त्या काळचीं मतें माहीत झालीं होतीं, इतकेंच नाहीं तर त्या मतांतील कांहीं ते स्वतांही कबूल करूं लागले होते. माझ्यापाशीं जेव्हां त्यांचे मित्र वाद करायास येत, तेव्हां त्यांनीं उभय पक्षांचें बोलणें फार शांततेनें लक्ष्य देऊन ऐकावें, व आमच्या वादाचा निवाडा यांनीं आपल्या मताप्रमाणें करावा.

एक जुना वेदांती व एक जुना नास्तिक.

मुंबईत माझ्या तीर्थरूपांचा एक फार जुना मित्र होता, तो वेदांती होता, तरी त्याच्या तोंडांतून बोलतांना शिवी गेली नव्हती. त्यानें भाषण करितांना अभद्र शब्द काढावे. त्याला मीं ख्रिस्ती शास्त्रांत बीभत्स व अमंगळ भाषणाचा जो निषेध केला आहे तो वडिलांच्या देखतां एकदां वाचून दाखविला, आणि जेव्हां

जेव्हां त्याच्या बोलण्यांत वाईट शब्द येत तेव्हां मीं त्या निषेधात्मक बोधाची त्याला आठवण द्यावी. तें ऐकून माझे वडील त्याला हंसत आणि तोही लज्जित होई. दुसरा एक त्यांचा मित्र मानसिंग या नांवाचा परदेशी गृहस्थ होता, तो कर्नाटकांतील एका मिशन स्कुलांत इंग्लिश शिकलेला असून खिस्ती धर्माचा मोठा द्वेष्टा होता. ह्या वेळीं तो कांहीं कारणामुळें मुंबईस येऊन राहिला होता, त्यानें खिस्ती शास्त्रलेखकांची फार निंदा करावी. दावीद, पेत्रस, इत्यादिक मोठे पापी व ढोंगी होते. त्यांचे लेख विश्वास ठेवण्याजोगे नाहींत असें ह्मणावें.

नास्तिक मताच्या पुस्तकांचें वाचन.

माझ्या वडिलांस मसलत देणारांनीं मला नास्तिक मताचीं पुस्तकें वाचायास देण्याचें सुचविलें, व त्याप्रमाणें निरनिराळ्या लोकांनीं मला सुमारें ३० पुस्तकें आणून दिलीं. बहुतेक मानसिंग यानें दिलेलीं होतीं, त्यांतून एक दोन पारशी लोकांनीं मुंबईंत छापलेलीं होतीं, व दुसरीं इंग्लंड व अमेरिका एथलीं होतीं. कांहीं लहान व कांहीं मोठीं होतीं. तीं वाचण्यास मीं अनमान केला नाहीं. मला देवाच्या कृपेनें खिस्ती शास्त्राची बरीच माहिती झाली होती ह्मणून त्या पुस्तकांतील लबाड्या माझ्या ध्यानांत तेव्हांच येत, त्या मीं आपल्या वडिलांस व त्यांच्या मित्रांस उघड करून दाखवाव्या. अशा लबाड्यांपैकीं एकीची मला चांगली आठवण आहे. एका पुस्तकांत "देव गर्जणाऱ्या सिंहाप्रमाणें मनुष्यास खाण्याकरितां फिरतो" असें लिहिलें होतें. हें वाक्य सैतानाविषयीं आहे असें मला ठाऊक असल्यामुळें त्याचें पवित्र शास्त्रांतील स्थळ काढून माझ्या वडिलांस त्यांच्या कित्येक मित्रांदेखत दाखविलें.

मोरभट दांडेकराशीं भाषण.

खिस्ती धर्मापासून माझें मन वळविण्याकरितां माझ्या नातलगांनीं आणखीही कित्येक उपाय योजिले; त्यांत एक असा होता कीं, त्यांनीं एकदां प्रसिद्ध मोरभट दांडेकर ह्यांस आमच्या घरीं पाठविलें. * ज्या वेळीं ते आले त्या वेळीं माझे वडील बाहेर

---

* हे मोरभट दांडेकर दाक्तर उइलसन साहेबाशीं जाहीरसभेंत धर्मसंबंधीं वादविवाद करून व त्या वादाविषयींचें एक पुस्तक छापून प्रसिद्धीस आले होते. (सन १८३१) ह्या पुस्तकास उइलसन साहेबांनीं "हिंदुधर्म प्रसिद्धिकरण" नामें उत्तररूप ग्रंथ इंग्रजींत व मराठींत छापला. हे वेदमूर्ति शाक्त होते. यांच्याविषयीं १८५२ च्याच्या ११ नवेंबरच्या प्रभाकरांत येणेंप्रमाणें लिहिलें होतें:—

गेले होते. ह्या गृहस्थांस मीं पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें, ह्मणून मीं त्यांस ओळखलें नाहीं, व कोणत्या उद्देशानें ते आले होते हेंही मला समजलें नाहीं. सहज बोलतां बोलतां त्यांनीं ख्रिस्ती धर्माची गोष्ट काढली, व येशू ख्रिस्तानें गाढव चोरलें असें ह्मटलें. तेव्हां मीं त्यांच्या पुढें मराठी बैबल ठेऊन ह्मटलें कीं, यांत असें कोठें लिहिलें आहे तें दाखवा. पण तें त्यांस दाखवितां येईना. मग मीं त्यांस शुभवर्त्तमानांतील जितक्या ठिकाणीं ख्रिस्तानें आपल्या शिष्यांस गाढव आणायास सांगितलें होतें तीं सर्व स्थळें काढून वाचून दाखविलीं, आणि त्यांचें स्पष्टीकरण असें केलें कीं, तेणेंकरून त्यांची पूर्ण खातरी झाली व त्यांनीं प्रांजळपणें असें बोलून दाखविलें कीं, असा अर्थ पूर्वीं माझ्या ध्यानांत आला नाहीं. मग मीं त्यांस त्यांचें नांव विचारिलें व तें कळल्यावर ह्मटलें कीं, आपण येशूवर असा खोटा दोषारोप आपल्या पुस्तकांत कसा घातला? ते ह्मणाले, मला इंग्रजी येत नाहीं, व मीं नवा करार वाचला नाहीं, माझे इंग्रजी शिकलेले मित्र इंग्रजी बुकांतून जें मला सांगत त्यावर विश्वास ठेवून मीं लिहीत असें.

**शिकलेल्या लोकांचे उदाहरण.**

माझ्या तीर्थरूपांनीं इंग्रजी शिकलेले विद्वान् व मिशनेरींच्या शाळेंत किंवा त्यांच्या सहवासांत असून ख्रिस्ती न झालेले अशा गृहस्थांचीं उदाहरणें घेऊन मला ह्मणावें कीं, तें जर ख्रिस्ती झाले नाहींत तर तूं काय त्यांजपेक्षां शाहणा व विद्वान् आहेस ह्मणून ख्रिस्ती होतोस? अशा गृहस्थांपैकीं रा० हरि केशवजी ( यात्रिकक्रमण पुस्तकाचे मराठी भाषांतरकर्त्ते ); रा० गोविंदजी नारायण ( अनेक ग्रंथांचे कर्त्ते ); रा० त्रिमळराव व्यंकटेश ( स्मा० का० कोर्टाचे पेनशनदार जज्ज व दा० उइलसन साहेबांचे स्तुतिपाठक ); रा० आपाजीराव ( बेळगांवच्या मिशन स्कुलाचे हेडमास्तर ) इ० चीं नांवें घ्यावीं. तेव्हां त्यांस मीं कलकत्त्याकडील राममोहनराय व दुसरे विद्वान् व वजनदार बंगाली गृहस्थ व मद्रासेकडील कित्येक विद्वान् शास्त्री हे ख्रिस्ता-

" फडकोपाव्ह सूरिसूनु गंगाधर शास्त्री यांनी आपल्या बारा आणे किंमतीच्या हिंदुधर्मतत्व पुस्तकांत वाममार्ग हा मनुष्यास नरकास नेणारा आहे. असें साफ लिहिलें त्यावरून वेदमूर्ति राजश्री मोरभट दांडेकर व अणखी कित्येक तन्मतानुसारी यांस फार राग येऊन त्याजविषयींची सभा करणार आहेत आणि त्यांत वादविवाद चालवून वामपंथाशिवाय दुसरा मार्ग मोक्षप्राप्तीस नाहीं असें स्थापना करणार आहेत असें ऐकतों.

विषयीं कशी पूज्यबुद्धि बाळगितात व कित्येकांनीं तर ख्रिस्ती धर्म उघड रीतीनें पत्करिला हें सांगावें; आणि ह्मणावें कीं दुसरे ख्रिस्ती होवोत अगर न होवोत, त्यांचें अनुकरण मला करायाचें नाहीं, मला आपल्या आत्म्याच्या तारणासाठीं माझ्या मनाच्या खातरीप्रमाणें चालायाचें आहे.

**जनरल वान्स केनडी यांचें उदाहरण.**

माझ्या वडिलांस जनरल वान्स केनडी यांची चांगली माहिती होती, हे जुने विद्वान् गृहस्थ त्यांच्या तरुणपणीं मुंबईत प्रसिद्ध होते. त्यांजविषयीं ते मला असें सांगत कीं, त्यांची हिंदुधर्मावर मोठी श्रद्धा होती, त्यांस गायत्रीमंत्र येत होता व ते गीता वाचीत; त्यांनीं ब्राह्मणांस पुष्कळ द्रव्य द्यावें व त्यांच्या संग्रहीं हिंदुधर्माच्या पुष्कळ पोथ्या होत्या; ते ख्रिस्ती नव्हते, मिशनेरी लोकांशीं फार वाद करीत इ०. ह्या बोलण्यास मी असें उत्तर द्यावें कीं, असें जरी होतें तरी ब्राह्मणांनीं त्यांच्या गळ्यांत जानवें घातलें नाहीं व त्यांस आपल्या पंक्तीस घेतलें नाहीं. ह्याशिवाय ह्या साहेबांचा कारभार फार उडावपणाचा होता, त्यांला फार कर्ज होतें. एकदां त्याला धरायास सावकारानें वारंट काढलें होतें तें चुकविण्याकरितां त्यानें घरांत लपून बसावें, व रविवारीं मात्र बाहेर पडावें. याप्रमाणें ज्या धर्माचा तो द्वेष करी त्या धर्माच्या एका नियमाच्या आश्रयानें त्यानें तुरुंगांत न पडतां आपला बचाव केला. युरोपियन नास्तिक लोकांच्या नीतीविषयीं मीं वडिलांस बऱ्याच गोष्टी सांगाव्या.

**पांचवी आज्ञा मोडल्याचा आरोप.**

कित्येक लोकांनीं मला बैबलाची पांचवी आज्ञा मोडल्याचा दोष लावावा, ते ह्मणत कीं, आईबाप जें सांगतात तें ऐकिलें पाहिजे असें बैबलांत लिहिलें असतां तूं त्यांचें ऐकत नाहींस हें कसें? चल तुझ्या पाद्रीपाशीं! त्यांनीं तुला असाच उपदेश केला आहे काय हें त्यास विचारूं.

**दुष्ट मसलत.**

माझ्या कित्येक सोयऱ्याधायऱ्यांनीं मला एकांतीं घेऊन दुष्ट मसलत द्यावी, ह्मणजे तुला आह्मी पैसे देतों, तूं एखाद्या वाडींत किंवा बंगल्यांत जाऊन राहा, व —— च्या बरोबर ख्यालीखुशाली कर, पण ख्रिस्ती होऊं नको. मी जेव्हां त्यांस झिटकारून रागानें प्रत्युत्तर देई तेव्हां ते मजवर डोळे वटारून मला

दटावण्या दाखवित. परंतु ह्याप्रमाणें कोणी माझ्या वडिलांच्या देखत केलें नाहीं, व पुढें मी कोणाशीं एकांतीं बोलायास कबूल झालों नाहीं.

**आयाबायांची कळकळ व मसलत.**

कित्येक आयाबायांस माझी कींव येऊन त्यांनीं मला सांगावें कीं, तूं तें बुक (बैबल) वाचूं नको. त्यांत मोहिनी आहे. तेवढें न वाचलें तर त्यांत तुझा काय तोटा होणार आहे? कित्येक बायांनीं जोशास विचारून माझे ग्रह फिरले आहेत ह्मणून अशी विपरीत बुद्धि मला प्राप्त झाली असें मानून आपलें समाधान करून घेतलें.

**माझ्या चुलत्याचें पत्र.**

ह्याच काळाच्या सुमारास माझ्या चुलत्यांनीं मला एक पत्र पाठविलें (ता० १३ फेब्रु० १८५४) तें आतां मजपाशीं नाहीं, परंतु त्याचे उत्तराची बहुतकरून सगळी प्रत राहिली आहे, तिच्यांतून पुढील उतारे घेतले आहेत:—

"आपण आपल्या पत्रीं मुख्यत्वें तीन गोष्टींवर जोर दिला आहे. त्या येणेंप्रमाणें:—

"१. ख्रिस्ती होण्यांत मोठें पाप आहे. कारण तेणेंकरून आईबापांच्या आज्ञेचा भंग होतो व त्यांस दुःख होतें.

"२. ख्रिस्ती झाल्यानें आपली अबरू, मान, कूळ यांस मोठा बट्टा लागतो व चहूंकडे फजिती होते.

"३. ख्रिस्ती झालेले एतद्देशीय लोकांची दुर्दशा होती, त्यांस अन्न मिळेनासें होऊन ते पश्चात्ताप पावतात व त्यांस घरची आठवण पडते."

ह्या तीन आक्षेपांस माझें उत्तर बरेंच लांबलचक आहे त्याचा संक्षेप खालीं दिला आहे.

"आईबापांची आज्ञा मानणें ही उत्तम गोष्ट आहे, परंतु ती मानण्यास कांहीं मर्यादा आहे किंवा नाहीं? तीं जें कांहीं सांगतील तें सर्व ऐकावें कीं काय? जनांतील आईबापांपेक्षां स्वर्गांतील बाप मोठा आहे. त्याचे उपकार, दया, चांगुलपण हीं या मातापितरांपेक्षां अधिक आहेत. आपलें शरीर, जीव, आत्मा, आपलें सुख, वैभव, दुःख, संकट हीं ज्याच्या स्वाधीन, जो आपला उत्पन्नकर्ता त्याची आज्ञा भंग करून मातापितरांची जी आज्ञा त्याच्या विरुद्ध असेल ती मानणें यांत पाप आहे........आपण कदाचित् विचाराल कीं, तुला तुझे आईबाप चोरी, लबाडी, खून करायास सांगतात

काय? तर हीं कर्में करायास सांगत नाहींत हें खरें, परंतु याशिवाय दुसऱ्या गोष्टी ज्या आपणास केवळ निर्दोष वाटत असतील, त्या मला माझ्या मनाच्या विरुद्ध व ईश्वराज्ञेच्या विरुद्ध कराव्या लागतात. त्या जेव्हां आपण खिस्ती व हिंदु धर्माविषयीं विचार करूं तेव्हां लिहिण्यांत येतील.

"आपण दुसरा दोष दिला आहे त्याचें उत्तर. ज्या देशांत खिस्ती धर्म नवीनच स्थापित होतो, तेथें कांहीं दिवसपर्यंत अविचारी व अज्ञान लोक आपणांतून बाहेर पडलेल्या मनुष्यास छळतीलच यांत आश्चर्य नाहीं. याविषयीं येशूनें आपल्या शिष्यांस असें सांगितलें कीं, "माझ्या नामासाठीं तुह्मीं सर्वांकडून द्वेषिले जाल" इ०. याप्रमाणें येशू खिस्तासाठीं हजारों हजार मनुष्यांनीं छळणूक सोसून परमेश्वराच्या पवित्र आत्म्याच्या सहायानें मरणापर्यंत आपला विश्वास सोडला नाहीं.

"खिस्ती धर्माचा या जगांत प्रसार कसा झाला याचा इतिहास आपण वाचून पाहाल तर ह्या धर्माच्या सत्यतेविषयीं एक मोठें प्रमाण आपणास मिळेल. राजे व मोठमोठे बादशाहा यांचे क्रूर छळणुकीमध्यें हा धर्म जय पावला. आणि पुढेंही असाच जय पावून सर्व पृथ्वी व्यापेल.

"जरी लोकांनीं " कानव्हर्ट " मनुष्याचा द्वेष केला, तरी त्याच्या सदाचरणावरून व नीतीवरून अखेरीस त्यांची खातरी होऊन ते आपल्या वाईट वर्तणुकीविषयीं लज्जित होऊन त्याची स्तुति करितात.

"तिसरा दोष. 'खिस्ती झालेल्यास शेवटीं अन्न मिळेनासें होतें. तो लोकांच्या दारोदार फिरूं लागतो.' जे पोटासाठीं खिस्ती मंडळींत शिरतात त्यांविषयीं हें ह्मणणें खरें आहे; परंतु यांत खिस्ती धर्माची शुद्धता दिसून येते. जोंपर्यंत त्या ढोंग्याचें स्वरूप मनुष्यास कळून येत नाहीं, तोंपर्यंत तो वेषधारी लांडग्याप्रमाणें खिस्ती मंडळींत राहतो. पण एक वेळ त्याची लबाडी उघडकीस आली ह्मणजे त्याची आपण लिहिल्याप्रमाणें अवस्था होते व ती त्यास योग्य शिक्षा होय. परंतु यावरून खरे व खोटे खिस्ती यांची भेळ करूं नये. खिस्ती धर्म खाणेंपिणें, टोपी घालणें किंवा बूट पाटलोन घालणें यांत आहे असें तुह्मांस वाटतें याचें मला मोठें आश्चर्य वाटतें.

"ख्रिस्ती धर्म केवळ मनाचा आहे; त्यांत सांगितलें आहे कीं, देव आत्मा आहे आणि जे त्याला भजतात त्यांनीं आत्म्यानें व सत्यतेनें भजलें पाहिजे.

"आतां कित्येक ख्रिस्ती गरीब आहेत, ते ख्रिस्ती झाल्यानें गरिबीस आले असें नाहीं, तर ते कनिष्ठ स्थितीच्या लोकांतून आलेले आहेत. जर ते पैशाचे आशेनें येते तर तेथें तो मिळत नाहीं असें पाहून दुसऱ्याच्या धर्मांत जाते, ह्मणजे मुसलमान होते. आणि जे ढोंगी आहेत ते असें करतातही.

"जे धनवानांतून ख्रिस्ती होतात ते देवाकरितां धनाचीही आशा सोडतात. त्यांस शास्त्रावरून समजतें कीं, जर आपण येशूकरितां सर्व त्यागलें तर तो आपणास त्यापेक्षांही या जगीं हजारपट व मरणोत्तर अनंतपट अधिक देईल. यास शास्त्रप्रमाणः— "मी तुह्मांस खचित सांगतों कीं, ज्यानें देवाच्या राज्याकरितां घर किंवा बायको किंवा भाऊ किंवा आईबाप किंवा लेंकरें सोडलीं आहेत तो या काळीं पुष्कळ व पुढल्या काळीं सार्वकालिक जीवन पावणार नाहीं असा कोणी नाहीं.

(लू० १८:२९, ३०.)

"ख्रिस्ती लोक जरी गरीब असले तरी त्यांस जशी परलोकाविषयीं आशा आहे तशी कोणत्याही धर्मांतील लोकांस नाहीं. यास शास्त्रप्रमाणः— देव आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताचा पिता सुवंदित असो. जीवंत आशा प्राप्त होण्यासाठीं अविनाशी व निर्मळ व न कोमेजणारें वतन पावण्यासाठीं त्यानें आपल्या महादयानुसार आह्मांस मेलेल्यांत, व येशू ख्रिस्ताच्या उठण्याच्या द्वारें पुनः जन्म दिला. जें तारण शेवटल्या काळीं प्रगट होण्यास सिद्ध आहे, तें पावण्यासाठीं जे तुह्मी देवाच्या शक्तीनें विश्वासाच्या योगें रक्षण केलेले आहां, त्या तुह्मांसाठीं तें वतन स्वर्गांत राखून ठेवलें आहे.

(१ पेत्र १.३,५.)

तर ही आशा तुह्मांतील मोठमोठे धनवान्, विद्वान्, साधुसंत ह्मणविणारे यांस आहे काय? हें त्यांस विचारून पाहा. आपण कोठें जातों हें त्यांस ठाऊक नाहीं. ते ह्मणतील, आह्मी स्वर्गास जाऊं, कैलासास जाऊं, पण तेथें किती काळ राहाल? पुण्य आहे तोंपर्यंत, तें सरलें कीं, पुनः आह्मांस ढकलून देतील, मग? मग काय, कोल्ह्याकुत्र्यांच्या, गाढवाच्या किंवा कोणत्याही जन्मास जाऊं. मग तेथें पापाचें शासन भोगूं. मग ? जर तेथें पुण्य केलें

तर एखाद्या चांगल्या जन्मास जाऊं. मग पुनः स्वर्गास जाऊं, मग पुनः खालीं येऊं. कारण आमच्या हातून वारंवार पाप घडतें. असो. ज्याप्रमाणें अंधळ्याला अंधळा वाटाडी भेटला ह्मणजे दोघेही खांचेंत पडतात, तसे हे ब्राह्मण व त्यांचे अनुयायी आहेत. "

माझ्या चुलत्यांचें माझ्या वडिलांस पत्र.

आह्मी मुंबईंत असतांना माझ्या वडिलांस माझ्या चुलत्यांकडून मजविषयीं एक पत्र आलें (ता० १२ मार्च १८५४) तें येणेंप्रमाणें होतें:—

" चि० बाबास युक्तीनें स्कूल सोडविणार ही गोष्ट फारच अघटित आहे. तेथें त्यास ठेऊन गोष्ट सुधारणें कठीण आहे. त्याचे स्कूलमित्र सुटत नाहींत. जर तुह्मी पेनशन घेऊन मुंबईपासून दुसरे ठिकाणीं पुणें किंवा बेळगांवास राहाल तर ठीक पडेल. आतां तुमची व चि० बाबाची भेट झाली येणेंकरून फार संतोष झाला. तुह्मी त्यास युक्तीनें स्कुलांतून सोडविणार! तर तो बेत राहूं द्यावा. त्यास एकच ताकीद देऊन त्याजपासून स्कूल सोडवावें. जेवढी विद्या प्राप्त झाली तेवढी पुरे करावी, अधिक विद्या शिकून चि० भाऊची (माझ्या भावाची) बुद्धि पालटली आहे. आतां पुढें चि० कृष्णा व रामभाऊ (माझे दुसरे भाऊ) यांस उपदेश करण्याचें आहे. असा आपला तोटा करून लोकांचे शब्द ऐकावे लागतात. ते असे कीं, चि० बाबास स्कुलांतून काढलें नाहीं, आणि त्यास मुंबईपासून दुसरे ठिकाणीं बदललें नाहीं, ह्मणून त्याची बुद्धि दिवसानुदिवस फारच फिरली, तरी तुह्मी त्याचे आज्ञेंत आहां. तर त्यानें तुमचे आज्ञेंत केव्हां चालावें? त्यास तुह्मीं घरचें काम सांगावें, बरोबर घेऊन फिरावें. त्यास बरोबर नरमगरम रीतीनें ठेवावें. आणि त्यास सरकारी बिनप्राप्तीचें काम फुरसत न मिळेल असें लावावें. पुढें जेव्हां पगार मिळेल तेव्हां मिळो. त्याजपाशीं खर्चायास दिलें तरी कामापुरतें द्यावें. सोन्याचे जिन्नस वगैरे ठेवायास देऊं नये. त्यास प्रपंचाचें सुख कळण्याजोगें करावें. त्यास मीं एक पत्र त्याचेविरुद्ध लिहिलें होतें तें त्यानें वाचून पाहिलें किंवा नाहीं? एखादे वेळेस वाचलें नसल्यास त्यांतील अभिप्राय त्याच्या मित्राकडून त्याचे कानीं घालावा."

याप्रमाणें चहुंकडून मला घरच्या व बाहेरच्या लोकांनीं घेरून टाकिलें होतें. कधीं कधीं माझ्या तीर्थरूपांनीं माझ्या आईच्या व भावंडांच्या देखत बोलतांना अशी धमकी द्यावी कीं, जर तूं बाप्तिस्मा घेशील तर आह्मी मुलांबाळांसुद्धां सर्वजण होडींत बसून नदीच्या मध्यभागीं जाऊन प्राण देऊं !

**भयंकर धमकी.**

अशा संकटांत असतां मी फार गोंधळून गेलों. माझ्या मनांत अनेक कल्पना येऊं लागल्या. कधीं कधीं असें वाटावें कीं, दूरच्या गांवीं जाऊन बाप्तिस्मा घ्यावा; कलकत्त्यास, मद्रासेस, विलायतेस जावें. कधीं असें वाटावें कीं, विष खावें व मरण आलें ह्मणजे पश्चात्तापी होऊन प्रभूला शरण जाऊन मरावें; अथवा त्या वेळीं एखाद्या मिशनेरीला बोलावून आणून त्याच्या समक्ष येशूवरील आपला विश्वास पत्करावा. परंतु प्रभूनें मजवर दया करून अशा अयोग्य व अघोर विचारांचें वजन मजवर पडूं दिलें नाहीं.

**होळीच्या रंगाच्या दिवसाचें संभाषण.**

माझे वडील मुंबईत १८५४ च्याच्या मार्च महिन्यांत होते. त्याच महिन्यांत शिमग्याचा सण आला होता. ह्या सणांत मुंबईच्या हिंदु लोकांची अशी चाल आहे कीं, रंगाच्या दिवशीं आपल्या सोयऱ्यांस, व विशेषेंकरून व्याही वगैऱ्यांस, ते बाहेरगांवाहून आलेले असले किंवा आप्तांच्या मरणामुळें दुःखी असले तर त्यांच्या घरीं जाऊन मोठ्या आदरानें व विनयानें आपल्या ( जातीच्या ) देवळांत घेऊन जातात; तेथें कळवंतणीचा नाच वगैरे झाल्यावर रंग होतो. ह्या चाली-प्रमाणें माझे वडिलांचे व्याही ( माझ्या एका बहिणीचे सासरे ) त्यांस रंगाच्या रात्रीं बोलावण्यास येतील असें समजून त्याच दिवशीं अगोदर आह्मां उभयतांचें संभाषण झालें तें मीं दुसऱ्या दिवशीं जितकें आठवणींत राहिलें तितकें लिहून ठेविलें. तें येणेंप्रमाणें:—

बा०—मीं येथें आल्यापासून आपलें एका ठिकाणीं कांहीं बोलणें झालें नाहीं. तर आतां तूं आपलें मन मोकळें करून जें असेल तें मला सांग. तूं सांगशील तसें मी ऐकेन व माझें त्वां ऐकावेंस. माझा बेत आहे कीं आतां पेनशन घ्यावें, ह्मणजे आपली मोकळीक होऊन

पाहिजे तेथें जाण्यास वेळ मिळेल. परंतु जर तूं माझ्या बरोबर बेळगांवास येत असलास तर अणखी दोन वर्षे चाकरी करून मग पेनशन घेतां येईल.

मी—आपण जसें सांगाल तसें करायास व जेथें जाल तिकडे येण्यास मी सिद्ध आहें. परंतु इतकें एक माझें मागणें आहे कीं, मला धर्मसंबंधीं कामांत मोकळीक असावी. जेथें ईश्वर व मनुष्य यांच्या सांगण्यांत विरोध येतो तेथें मात्र माझ्यानें देवास सोडून मनुष्याचें ऐकवत नाहीं; आणि हीच मोठी अडचण आहे.

बा०—आह्मी तुला कोणतें काम करायास सांगतों ? आपल्या घरांतील मूर्तिपूजा, तर तीही बंद केली. तूं जेवणाच्या वेळीं चित्राहुती घेत नाहींस तशी मीहि घेत नाहीं. अणखी तुला चोरी लबाडी करायास आह्मी सांगत नाहीं, याशिवाय तुला दुसरें काय पाहिजे ?

मी—ज्या धर्माप्रमाणें चालावें अशी माझी इच्छा आहे त्याप्रमाणें प्रसिद्धपणें माझ्यानें अजून चालवत नाहीं.

बा०—ह्मणजे कसें ?

मी—तें असें कीं, ख्रिस्ती धर्माप्रमाणें मी बाप्तिस्मा घेणार व जातिभेद मोडणार.

बा०—मग लोक आपल्यास जातींत कसे ठेवतील ? मग तर हा गांव सोडून उठून जावें लागेल.

मी—मी तुह्मांस सांगत नाहीं कीं तुह्मी जात मोडा. जोंपर्यंत तुह्मांस जात खोटी असें वाटत नाहीं व जोंपर्यंत तुह्मांस आपल्या पापाविषयीं कळकळ लागली नाहीं तोंपर्यंत जात मोडून व माझ्या बरोबर येऊन फळ काय ?

बा०—आह्मी सर्व तुझ्यासारखे झालों ह्मणजे लोक कांहीं बोलणार नाहींत. पण तूं एकटाच जातींतून निघालास तर आह्मांस मोठी लाज होईल व सर्वजण आह्मांस टोंचणी लावतील. तर असें तूं कांहीं करूं नको. चार लोकांप्रमाणें आपणास चाललें पाहिजे. घरांत पाहिजे तर तसें करूं नये.

मी—हें तर ढोंग झालें. आणि हेंच व दुसऱ्या अशा गोष्टीं

तुमच्या व माझ्यामध्यें आल्या ह्मणजे तुह्मांस वाटतें कीं मी तुमची आज्ञा मानीत नाहीं.

बा०—पण आह्मीं तुला लहानाचा मोठा केला, तुझें पाळणपोषण केलें, आणि तूं आह्मांस सोडून जाणार हें देवास आवडतें काय ?

मी—मी तुह्मांस सोडून जात नाहीं. तुमच्या बरोबर राहण्यास मीं खुशी आहें. जर तुह्मांस मजविषयीं लोकांकडून अडथळा होत नसला तर मी येथें राहीन. इतकेंच कीं, मीं जात सोडली ह्मणून तुमच्या बरोबर पंक्तीस बसणार नाहीं. मग तुह्मांस काय अडचण आहे ?

बा०—यास चार लोक काय बोलतील ? आपल्या दारापुढें कोणी उभें राहणार नाहीं. पाहा आज रंग आहे. तेव्हां चार लोक बोलवायास येतील तेथें गेलेंच पाहिजे. अशींच दुसरीं कामें. मग तूं माझ्याबरोबर न आलास तर बरें दिसणार नाहीं. चौघांसारिखें आपणास वागलें पाहिजे.

मी—पाहा, अशाच ठिकाणीं तुमचा व माझा विरोध येतो, व तुह्मी मला अशीं कामें करावयास सांगतां कीं, त्या वेळीं या जगांत आपल्यास विचारपूस करणारा असा ईश्वर नाहीं हें समजून तीं कामें मीं करावीं. तुह्मी विचार करा कीं, चौघांच्या भिडेस्तव ईश्वराच्या आज्ञांचा भंग केला तर आपल्यास संकटसमयीं चौघेच सोडवायास येतील ? चौघेच आपणास अन्नवस्त्र देऊन आपलें पाळणपोषण करितात ? चौघेच आपणास मरणकाळीं उपयोगीं पडतील व चौघेच पुढें मरणोत्तर दुःखांतून सोडवायास येतील ?

बा०—शेवटास तर ईश्वरच पाहिजे. अंतकाळीं त्याशिवाय कोणीच कामास येणार नाहीं.

मी—तर मग त्याच्या आज्ञा सर्वकाळ पाळिल्या पाहिजेत. अंतकाळींच त्यापाशीं गेलों तर तो आपणास कसें घेईल ? या दुनियेंत आपला मित्र जो आपलें पाळणपोषण करितो त्यास एऱ्हवीं कधीं विचारपूस न केली, व केवळ संकटाच्या वेळींच मात्र त्याचें आर्जव करूं लागलों, तर तो आपला अंगीकार करील कीं काय ? आणि तुह्मी ह्मणतां कीं देवाच्या आज्ञा भंग करून नंतर अखेरीस त्याची पायधरणी करायास जावें हें कसें ?

हें संभाषण झाल्यावर रात्रीं कांहीं मंडळी आह्मांस बोलविण्याकरितां आली, त्यांस माझ्या वडिलांनीं माझ्याकडे सोंपविलें. ते ह्मणाले कीं, जर याला तुह्मी रंगास जाण्याकरितां राजी कराल तर मीही येईन. अर्थांतच मीं जाण्याचें नाकारिलें. त्या मंडळीचें व माझें बरेंच संभाषण झालें, शेवटीं आह्मी उभयतां रंगास गेलों नाहीं.

एक नवीन तोड.

ख्रिस्ती धर्मावर माझा पूर्ण विश्वास आहे, व त्याचा बाप्तिस्म्याच्या द्वारें प्रसिद्ध रीतीनें स्वीकार करण्याचा मीं दृढ-निश्चय केला आहे असें पाहून माझ्या विचारी तीर्थरूपांनीं मला अणखी छेडण्याचें सोडलें; आणि सुज्ञपणानें असें ह्मणूं लागले कीं, जो धर्म तुला खरा वाटतो तो आह्मांला शिकीव, व आमची खातरी झाल्यावर आपण सर्व जण ख्रिस्ती होऊं, ह्मणजे आपणाला कोणी नांव ठेवणार नाहीं. एकट्यानें स्वर्गास जावें व आह्मीं नरकांत जावें हें तुझ्या शास्त्राप्रमाणें तुला बरें दिसतें काय? तर तूं आमच्या बरोबर बेळगांवास ये व तेथें आम्हांला ख्रिस्ती धर्म शिकीव. हें बोलणें मला मोडून काढतां आलें नाहीं. पण तें खरोखर मनापासूनचें होतें, अथवा वरपंगी होतें, याचाहि निर्णय करण्यास त्या वेळीं कांहीं साधन नव्हतें. तथापि तें भावार्थाचें आहे असेंच आदरून त्याविषयीं मीं आपल्या मिशनेरी मित्रांस विचारिलें व त्यांसही वाटलें कीं मीं तें मान्य करावें हें माझें कर्तव्य आहे.

धूमकेतूस पत्र.

ह्या महिन्याच्या (मार्च) २९ व्या तारखेस हिंदूंचें नवें वर्ष निघालें. त्याचें वर्षफळ मीं धूमकेतु पत्रास लिहून पाठविलें. त्यांत १० कलमें होतीं, त्यांपैकीं ९ वे कलमांत असें लिहिलें होतें:—

"यावर्षी पृथ्वीवर बहुत ठिकाणीं ख्रिस्ती धर्माची वृद्धि होईल व अन्य धर्मांचा क्षय होत जाईल."

आणि शेवटीं पुढील मजकूर होता:—

या वर्षी राजा परमेश्वर आहे. तो कधींही बदलत नाहीं. त्यास मंत्री नको, कोशाधिपति तोच, छत्राधिपती तोच, रसाधिपति तोच, अग्रधान्याधीश, तोच पश्चिम धान्याधिपति, तोच व्यवहारेश, तोच व्यापारेश, तोच सर्वेश्वर आहे. बुध, भौम, शुक्र, चंद्र, रवि, गुरु, हे सर्व त्याचे सेवक आहेत, त्यांच्या

हातीं काडीचीही सत्ता नाहीं. ते केवळ निर्जीव पदार्थ होत, त्यांजवर विश्वास ठेऊन फळ नाहीं. त्या सर्वांचा व आपला उत्पन्नकर्त्ता जो परात्पर, सर्वशक्त, सर्वज्ञ, परम पवित्र, परम न्यायी, महादयाळू, सदावंदनीय ईश्वर त्याचीच भक्ति करावी ह्मणजे या आनंदसंवत्सराच्या ठायीं सर्वत्र आनंदच होईल."

याप्रमाणें वादांत, विचारांत, अविचारांत, काळजींत, लोकांचें बोलणें व मित्रांचे बोध ऐकण्यांत कांहीं दिवस गेल्यावर माझ्या वडिलांची रजा भरली, व बेळगांवास जाण्याचा समय जवळ आला तेव्हां मींही त्यांजबरोबर जाण्याचा निश्चय केला.

**बेळगांवास जाण्याची तयारी.**

माझ्या ख्रिस्ती मित्रांनीं मजसाठीं बहुत प्रार्थना केल्या; फ्रिचर्च विद्यालयांतील सर्व विद्यार्थ्यांनीं वर्गणी करून मला एक पंचवीस तीस रु० किंमतीचें पवित्र शास्त्र (Cobbin's Family Bible) बक्षीस दिलें. त्यावर रेव० (दाक्तर) नारायण शेषाद्रि, मि० विन्सेन्ट डिकुना, व रा० गोविंदजी नारायण यांच्या सर्व शाळेच्या वतीनें सह्या आहेत. हें अमोल्य पुस्तक अद्याप माझ्यापाशीं आहे.*

---

* मीं मुंबई सोडण्यापूर्वीं एक मराठी जुना करार विकत घेतला, त्याविषयीं माझ्यापाशीं टिपण आहे तें येणेंप्रमाणें:—

१ ली मार्च १८५४. आजच्या दिवशीं मीं परमेश्वराच्या शास्त्रांतील जुन्या करारांचें मराठी भाषेंत पुस्तक विकत घेतलें. तेणेंकरून मला जो हर्ष झाला तो सांगतां येत नाहीं. देवानें कृपा करून आह्मां अज्ञान्यांस आपलें पवित्र शास्त्र आमच्या भाषेंत दिलें हें त्याचें मोठें वरदान होय. आज माझ्यापाशीं देवाचे धर्मपुस्तकाचा सर्व ग्रंथ आहे. आतां मी किती सुखी आहें. जे कोणी तो वाचायास इच्छितील त्यांस परमेश्वराचीं अद्भुत कृत्यें दाखविण्यास अडचण पडणार नाहीं. जे धर्माविषयीं वादविवाद करितील त्यांस देवाचें शास्त्र खरें आहे अशीं प्रमाणें काढून दाखविण्यासही सुलभ झालें. देवाची गोष्ट ही तरवार आहे हिच्या बळानें आह्मी सर्व संकटांतून पार पडूं व हिच्या योगानेंच सर्व भरतखंड जिंकलें जाईल. हे परमेश्वरा, त्वां हें शास्त्र आज आम्हांस आमच्या भाषेंत दिलेंस ह्मणून आह्मी तुझा आभार मानितों."

जें इंग्लिश बैबल मला फ्रि० च० विद्यालयानें बक्षीस दिलें त्यावरील बक्षीस लेख येणेंप्रमाणें आहे:—

"Presented to Mr. Baba Padmanji by the Pupils and Teachers of the Free General Assembly's Institution, on the occasion of his seperation from them, as a token of their affection and respect for his excellence as a Teacher and a Companion."

"Govind Narayan.
"Narayan Sheshadri.
"Vincent A. De Cunha."

माझ्या सुधारलेल्या हिंदु मित्रांनीं मला एका वाडींत मेजवानी केली. तेथें मी खिस्ती रीतीची प्रार्थना केली. रेव० नारायण साहेब यांनीं शाळेंत एक मेजवानी दिली. निसबिट साहेबांनीं आपल्या छापलेल्या उपदेशांचें मोठें पुस्तक दिलें. मिसेस उइलसन मडम साहेब यांनीं एक "मार्कर" दिला त्यावर "Follow the Lord fully" ("परमेश्वराला पूर्णपणें अनुसर") असें वचन होतें. याशिवाय विद्यालयांतील अभ्यासाच्या संबंधानें रेव० दाक्तर उइलसन व निसबिट साहेब यांनीं वेगळीं वेगळीं सर्टिफिकिटें दिलीं. परंतु त्यांपेक्षां उत्तम वस्तु ती ही मिळाली कीं, रेव० निसबट साहेब व रेव० नारायण साहेब यांनीं मला एकांतीं घेऊन मजकरितां ईश्वरापाशीं फार आग्रहाच्या प्रार्थना केल्या व मला स्थिर राहण्याविषयीं बोध करून ईश्वराकडे निरविलें.

# प्रकरण १५.

## सिंहावलोकन.

मुंबई सोडून बेळगांवास गेल्यावर ज्या गोष्टी घडल्या त्या सांगण्याचे पूर्वी १८४९ पासून १८५४ पर्यंत ६ वर्षांचें जें वृत्त वर सांगितलें आहे, त्याजकडे पुनः अवलोकन केल्यानें जें दृष्टीस पडतें त्याचा थोडक्यांत विचार केला पाहिजे.

१. माझें आदनास परत जाणें न होतां मुंबईसच राहणें कसें झालें हें वर सांगितलेंच आहे. तसेंच फ्रिचर्च विद्यालयांत कोणत्या कारणावरून माझें जाणें झालें हेंही सांगितलें आहे. ह्या दोन गोष्टींत ईश्वरी सूत्र ढळढळीत दिसून येतें. जर मिलिटरी बोर्डाकडून आगबोटीचा पास मला मिळाला असता तर मी आदनास पुनः गेलों असतों, व तेथें गेल्यावर कोणत्या मार्गास लागलों असतों हें कोणाच्यानें सांगवलें असतें? तसेंच मुंबईत राहिल्यावर माझ्या दोघां मित्रांनीं मला मिशन स्कुलांत जाण्याचा आग्रह केला नसता तर दुसऱ्या कोणत्याही शाळेंत गेलों असतों, व तेथील शिक्षणानें माझ्या धर्मसंबंधी मतांस कोणतें वळण लागलें असतें हें तरी कोणाच्यानें सांगवलें असतें? तर ह्या गोष्टींत ईश्वरी सूत्र दिसत नाहीं काय? मला जीवनाच्या मार्गावर आणण्याकरितां परमेश्वरानें परम चातुर्यानें व दयेनें जे जे उपाय योजिले त्यांपैकीं हेही होते असें कबूल केलें पाहिजे. 'जरी त्वां मला जाणिलें नाहीं तरी म्यां तुझी कमर बांधिली आहे,' (यशा. ४:५५) हें शास्त्रवचन ह्या माझ्या अवस्थेसही लागू आहे.

२. त्या काळीं फ्रिचर्च विद्यालयांत धर्मसंबंधीं शिक्षणाची कोणती पद्धत होती हें वरच्या वर्णनांत आलेंच आहे. ती सर्वप्रकारें उत्तम असून मिशनेरी सोसैटीच्या व मिशन स्कुलांच्या उद्देशाला अगदीं अनुसरून होती. जे ख्रिस्ती शिक्षक मला मिळाले ते केवळ विद्वान्, बुद्धिमान् व लोकप्रिय होते इतकेंच नाहीं, तर ख्रिस्ती गुणमंडित होते. मनुष्याच्या आत्म्याचें कल्याण करण्याची कळकळ, उत्कंठा व आवेश हीं ख्रिस्तासारखीं त्यांच्या ठायीं वसत असून त्यांच्या वर्त्तनांत तीं

दिसून येत. तरुणांस धर्मज्ञान कसें शिकवावें हें ते चांगलें जाणत होते. विद्यार्थ्यांचे ते खरे मित्र होते; त्यांच्या अडचणी त्यांनीं जाणाव्या. त्यांची धर्मसंबंधीं स्थिति कशी आहे व कोणत्या उपायानें ती सुधरेल हें समजून घेण्याविषयीं ते फार काळजी बाळगीत.* त्यांनीं ईश्वरविद्या शिकावी आणि धार्मिक व सदाचरणी व्हावें एवढ्याविषयींच ते काळजी वाहत असें नाहीं, तर व्यावहारिक विद्येंतही निपुण व्हावें ह्मणून ते बहुत श्रम करीत. निसबिट साहेबांच्या वर्गांत परदेशाहून आलेला एक ख्रिस्ती तरुण असे, त्यास असें वाटत असे कीं, बैबलाशिवाय दुसरें कांहीं शिकणें नको. त्याला निसबिट साहेबानें सांगावें कीं, व्याकरण शिकल्याशिवाय आपल्या देशास परत जाऊं नको. हे साहेब आह्मांस मराठी शिकविण्याविषयीं फार श्रम घेत. आह्मीं इंग्रजीवरून जीं भाषांतरें करावीं, किंवा नवीन निबंध रचावे ते घरीं नेऊन शुद्ध करून त्यावर स्वाभिप्राय लिहून आणून आह्मांस परत देत. त्याप्रमाणेंच दाक्तर मिचल साहेबांच्या वर्गांत जितके विषय आह्मी शिकत होतों, तितक्यांचा सारांश आह्मांस लिहून आणावा लागत असे; तो चांगल्या कागदावर, काळ्या भोर शाईनें, सुबक अक्षरानें व सरळ भाषेनें जुळलेला नसला तर ते कधीं कधीं तो कागद विद्यार्थ्यांपासून मागून घेऊन त्याची वळकटी करून त्याच्याकडे फेंकून देत. दाक्तर उइलसन साहेब पशुपक्षी, कीटक यांची विद्या (Natural History), भूगर्भरचनाशास्त्र (Geology), खनिजपदार्थविद्या (Mineralogy) हे विषय शिकविण्याविषयीं बहुत श्रम घेत. वरच्या एका प्रकरणांत त्या विद्यालयांत धर्मसंबंधी शिक्षणाचे कोणते विषय होते हें दाखविलें आहे. एथें

---

* त्या काळांत पुष्कळ युरोपियन लष्करी व दिवाणी कामदार व व्यापारी साहेब लोक आमची शाळा पाहण्यास येत. आमचे प्रोफेसर दा० मरे मिचल साहेब यांची चाल अशी होती कीं, अशा लोकांपुढें आपल्या वर्गांतील विद्यार्थ्यांस उभें करून त्यांस मुंबईंतील शिकलेल्या तरुणांच्या स्थितीचें निरूपण करायास व कोणत्या उपायानें देशकल्याण होईल इ० विषयांवर चर्चा करायास सांगावें. रेव० निसबिट साहेबांची रीत अशी होती कीं, ह्या पाहुण्यांस आपल्या वर्गांत बोलावून त्या वेळीं जो धडा चालला असेल तो होईपर्यंत बसवावें, तेणेंकरून त्यांच्या शिकविण्याची पद्धत व मुलें कोणत्या प्रकारें शिकतात हें त्यांस चांगलें समजे. कधीं कधीं तेही मुलांस कांहीं विचारीत. वर्ग आटोपल्याशिवाय ते त्यांच्याशीं दुसऱ्या गोष्टी करीत नसत.

व्यावहारिक शिक्षणाच्या विषयांची याद संक्षेपानें खालीं दिली आहे.* सारांश सुभक्ति सर्वांविषयीं उपयोगी आहे. तिला आतांच्या व पुढच्याही जीवनाची भाक मिळाली आहे. शास्त्रवचनाच्या आधारावर ती शिक्षणपद्धत होती. ( १ तिम. ४:८ )

३. ह्या विद्यालयांत जाऊं लागल्यापासून सहा महिन्यांच्या आंत माझ्या विचारांत व वर्त्तनांत कसा फेर पडला हें मीं मागें दाखविलें आहे. जें लहानसें चिटोरें मला नकळत प्रथम आठ वर्षेपर्यंत माझ्याजवळ राहिलें व जें हातीं लागल्यावर आजपर्यंत ह्मणजे पहिल्यापासून सुमारें ४० वर्षें-पर्यंत माझ्या संग्रहीं राहिलें तें उगीच किंवा आकस्मिक योगानें राहिलें असेल काय? त्यापेक्षां मोठमोठाले तावचे ताव लिहिलेले नाहींसे झाले, व छापील पुस्तकेंही कोठें गेलीं त्याचा पत्ता नाहीं, पण हा पांच बोटें रुंद व सात बोटें लांब पाठपोट लिहिलेला तुकडा कसा व कां अभंग राहिला? तो त्या काळांत फ्रिचर्च विद्यालयांतील धर्मशिक्षणावरून माझ्या मनावर अर्धवर्षाच्या आंत जो उत्तम ठसा उमटला त्याची साक्ष देण्यास नव्हे तर कशास राहिला?

४. तेथें मला जे शिक्षक मिळाले व त्यांपासून जे आत्मिक लाभ झाले, त्यांबद्दल मी देवाची इहलोकींच स्तुति करीत आहें असें नाहीं, तर परलोकीं अनंतकाळ त्याचे उपकार मानीन. ते शिक्षक सर्वप्रकारें पूर्ण व निर्दोष होते असें नाहीं, तर त्यांच्या ठायीं परिपूर्ण व निष्कलंक जो खिस्त त्याची प्रतिमा प्रतिबिंबित होऊन झळकत होती व त्याची प्रीति त्यांच्या अंतःकरणाच्या ठायीं वसत होती; त्या प्रीतीचा अनुभव घेण्याकरितां देवानें माझें अंतःकरण हळुहळु खुलविलें, व ती प्रतिमा पाहण्याकरितां माझे ज्ञानचक्षु उत्तरोत्तर उघडले. **रेव० नारायण शेषाद्री** यांच्या शिक्षणाकडून मला खिस्ती धर्माच्या सत्यतेचें जें एक खंबीर प्रमाण ह्मणजे बायबलांतील भविष्यांची पूर्णता, तें सांपडलें. ही भविष्यपूर्णता कशी झाली हें कीथ नामक विद्वानानें वोल्टेर

* (College Division) General History, Mathematics, Natural Philosophy, Chemistry, Sanskrit, Mental and Moral Philosophy, Logic, Natural History, English Classics and Composition, Mineralogy and Geology, Zoology, Vernacular Translation and Comparison of the Indian and European Languages.

नांवाच्या फ्रेंच नास्तिकानें केलेल्या आपल्या प्रवासाच्या ग्रंथाच्या साक्षीवरून नकळत पटविलें आहे. प्रथम मी त्यांच्या वर्गांत असतांना हे आमचे प्रिय शिक्षक आह्मांस नित्याचे धडे शिकवून झाल्यावर विलायतेकडील धर्मसंबंधी वर्त्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांतील निवडक गोष्टी वाचून दाखवीत. न्यूस आफ दी चर्चस ( News of the Churches ) ह्या नांवाचे मासिक पुस्तकांतून वारंवार त्यांनीं आह्मांस वाचून दाखवावें. तसेंच एका वर्षी मद्रासेकडील रेव० राजगोपाळ हे स्काटलंदांत गेले होते, ते तेथील जनरल आसेंब्लीच्या राष्ट्रीय महासभेपुढें व दुसऱ्याही ठिकाणीं जीं भाषणें करीत तीं उइटनेस पत्रांत छापून येत, तीं फार आवेशानें त्यांच्या बोलण्याप्रमाणेंच वाचून दाखवीत. तीं ऐकण्यास आह्मांला फार हौस वाटे, व कधीं कंटाळा येत नसे. याशिवाय हे अश्रांत शिक्षक दुपारच्या सुटीच्या वेळीं किंचित् उपहार घेतल्यावर रा० गोविंदजी नारायण यांसही कांहीं पुस्तक नेमानें वाचून दाखवीत. याप्रमाणें ते कष्टी मेहनत करीत. तसेंच ख्रिस्ती मंडळीचा जो इतिहास त्यांनीं आह्मांस शिकविला, त्यांत त्या मंडळीची स्थापना व वृद्धि कोणाच्या सामर्थ्यानें व कोणत्या उपायांनीं झाली तें माझ्या मनांत पक्कें ठसलें. डाक्तर उइलसन साहेबांच्या शिक्षणपद्धतीकडून जगांतील निरनिराळ्या धर्मांचें तुलनारूप ज्ञान बरेंच प्राप्त झालें व त्यांत विशेषेंकरून हिंदु शास्त्र व ख्रिस्ती शास्त्र यांच्या तुलनेवरून माझ्या मनाची सत्याविषयीं खातरी झाली, व तेणेंकरूनच मला पुढें " हिंदुधर्म व ख्रिस्ती धर्म यांची तुलना " हें पुस्तक लिहिण्यास सहाय मिळालें. उइलसन साहेबांच्या उपदेशांत, व्याख्यानांत व प्रार्थनेंत "देवानें जगावर एवढी प्रीति केली कीं, आपला पुत्र दिला" ही ओवी वारंवार येत असे, व ती ऐकून देवाच्या प्रीतीविषयीं फार आश्चर्य वाटावें, व तिचा मीं बहुत विचार करावा. हिंदु धर्मांत ज्या कित्येक सत्य गोष्टी आहेत त्यांकडे विशेष लक्ष्य लागण्यास डा० उइलसन यांचीच शिक्षणपद्धति माझ्या उपयोगीं पडली. **रेव० निसबिट साहेब** यांची शिक्षणपद्धति अनुपम्य होती, याविषयीं ख्रिस्ती व हिंदु एकच साक्ष देतात. त्यांच्यासारखा दुसरा शिक्षक त्या काळांत सगळ्या हिंदुस्थानांत कोणी झाला नसेल.*

---

* निसबिट साहेबांची शिक्षणपद्धति लोकांस किती प्रिय होती याचें एक उदाहरण आठवतें, तें असें कीं, जेव्हां ते १८५१ त्यांत विलायतेहून परत मुंबईस आले, तेव्हां त्यांनीं आपल्या घरीं कांहीं विषय शिकविण्याचा वर्ग काढला. त्या वर्गास पहिल्याच दि-

त्यांच्या शिकविण्याकडून मला पवित्र शास्त्राच्या कित्येक भागांचा उत्तम प्रकारें अर्थ समजला. जुन्या करारांतील अनुवाद व नव्या करारांतील

---

वर्शी इतके लोक आले कीं, त्यांस बसावयास जागा मिळाली नाहीं. सुमारें १५० मनुष्यें आलीं असतील. पुढें ही संख्या अनेक कारणांनीं कमी होत गेली, तरी त्यावरून त्यांच्या शिकविण्याची केवढी आख्या होती हें दिसून येतें. त्यांच्या शिक्षणपद्धतीविषयीं त्यांच्या मरणानंतर माझें एक पत्र ज्ञानोदयांत [१५ आग. १८५५] छापलें होतें त्यांतील एक उतारा एथें घेतों:—'ह्या विद्यागुरूची शिक्षणपद्धति सर्वोत्कृष्ट होती. त्यांच्या हातोटीचा शिकविणारा मिळणें दुर्लभ. ज्यांनीं त्यांच्या चरणांपाशीं वसून विद्यादान घेतलें ते त्यांची पराकाष्ठेची तारीफ करितात. एतद्देशीय विद्यार्थ्यांस एखादा विषय कसा ग्रहण करितां येईल ही खुबी त्यांस चांगली समजली होती, तो विषय कितीही गहन असला तरी त्याचा स्पष्टार्थ करून तो शिकणाराच्या मनांत कसा बिंबवावा हें त्यांस चांगलें समजलें होतें. शिष्य जरी मंदबुद्धि असला तरी त्यास विषयाची फोड करून त्याच्या चाऱ्ही बाजू उलटून पालटून दाखवून त्याची समजूत पाडण्याचा त्यांचा हक्क होता. प्रत्येक अंशाचें पृथक्करण केल्यावर ते अंश एकत्र जुळून त्याचें सुंदर रूप दाखविण्याचें अप्रतिम बुद्धिकौशल्य त्यांजपाशीं होतें. यामुळें असें होई कीं, जो विषय विद्यार्थ्यांस प्रथम अगदीं कठीण, कोरडा व अभेद्य वाटत असे तोच पुढें सुलभ, सुरस व गम्य दिसूं लागे आणि हें सर्व स्वतः ते एकदम सांगत नसत, तर बहुधा शिष्यांस प्रश्न करून त्यांकरवीं उत्तरद्वारें अर्थविवेचन करवीत.' हें पुस्तक लिहिण्याचें काम चालत असतां निसबिट साहेबांच्या हाताखालीं शिकलेला एक आतां वृद्ध झालेला व सरकारी पेनशनदार ब्राह्मण मित्र मला भेटला, त्यानें माझ्या विनंतीवरून आपल्या विद्यागुरूविषयीं कांहीं मजकूर लिहून आणून दिला त्यांतील एक दोन उतारे खालीं घेतली आहेत.

"मीं बहुतेक पाद्री पाहिले, परंतु निसबिट साहेबासारिखा तंतोतंत नियमानें वागवणारा असा कोणी पाहिला नाहीं. हा शाळेमध्यें वेळेवर येत असे. शाळेंत आला ह्मणजे एक क्षण व्यर्थ घालवीत नसे. विद्यार्थ्यांस वारंवार सांगत असे कीं, क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्" याचें शिकविणें फारच थोडें असे, परंतु सविस्तर शिकवीत असे. जसें एखाद्या मुलाला अन्न भरवितात तसें तो पुस्तकांचीं वाक्यें भरवीत असे. याच्या हाताखालीं जे लोक शिकलेले आहेत ते फारच हुशार आहेत. यास कोणताही प्रश्न विचारिला असतां जबाब देणें तो विचार करून बरावर देत असे. उपदेश करितांना ईश्वराविषयीं विचार करा, दुराग्रह सोडा, खरेंखोटें याचा विचार करा, असें बोले.

"सन १८५४ च्या नोवेंबरच्या महिन्यांत मुंबईत मोठें वादळ झालें. त्या वादळांत बहुत माड पडले, पाऊस पडला, घरावरील कौलें उडालीं. दुसरे दिवशीं आम्ही शाळेंत गेलों, तेव्हां त्या साहेबानें प्रत्येक विद्यार्थ्यास विचारिलें—वादळाचे वेळीं तुझीं काय

योहानाचें शुभवर्त्तमान यांचे भाग त्यांजपाशीं मी शिकलों. त्यांच्या शास्त्र शिकविण्याच्या वर्गांत बसणें ह्मणजे मिष्टान्नाच्या भोजनास बसणें असें होतें. कधीं कधीं सगळ्या एका तासांत केवळ एकाच ओवीचा अर्थ होत असे. जें कांहीं ते शिकवीत तें सर्व पूर्वीं घरीं तयार करून व कागदावर टांचून आणीत, आणि शांत व गंभीर चित्तानें व आस्थेनें शिकवीत. ते शिकवितांना मुलांच्या समजुतीकरितां अनेक प्रकारचे दृष्टांत देत व कधीं कधीं शरीराच्या हावभावांनीं बतावणी करून दाखवीत. ती अशी हुबेहुब असे कीं, आह्मांस त्यांच्याकडे पाहून हसूं यावें; परंतु त्यांच्या गालावरील माशीही उडत नसे. त्यांच्या शिकविण्यावरून मला ज्या गोष्टी विशेषेंकरून समजल्या त्या येणेंप्रमाणें होत्याः—मनुष्याचा अपराध व ईश्वराचा न्याय. ईश्वर थोर आहे ह्मणून त्याची आज्ञा थोर. त्याची आज्ञा थोर ह्मणून ती मोडल्याचा अपराध थोर, व त्या अपराधाचा दंडही थोर. देव जर मनुष्याचें अपूर्ण आज्ञापालन मान्य करील तर काय परिणाम होतील? देवाच्या नीतीसंबंधी गुणांच्या संबंधानें ज्या त्याच्या नीतिविशिष्ट प्राण्यांनीं पाप केलें नाहीं त्यांच्या संबंधानें—आणि त्याच्या पतित प्राण्यांच्या संबंधानें—मनुष्य आपल्या अपराधाचा दंड सोसीत असतां एक घटका तरी ईश्वराज्ञा पाळूं शकेल काय? दंड सोसीत असतां त्याच वेळीं देवावर प्रीति करूं शकेल काय? कोणी मनुष्याला आपल्या पापाबद्दल पूर्ण प्रायश्चित्त करवेल काय? मनुष्याच्या हातून पुण्य घडतें काय? पुण्य ह्मणजे जें तो ईश्वराचें कर्तव्य लागतो त्यापेक्षां अधिक करणें.—सेवेची योग्यता कशावरून वाढते? सेवा करून घेणाराच्या थोरपणावरून किंवा सेवा करणाराच्या थोरपणावरून? अशा प्रकारचें त्यांचें शिकविणें होतें. जु० क० त अब्राहाम, याकोब इ० यहुदी कुलाधिपतींच्या कथांत जें रहस्य व बोध आहे तो समजण्यास व जुन्या

---

केलें, व दुसऱ्या लोकांनीं काय केलें व काय ह्मटलें. प्रत्येक विद्यार्थ्याचें ऐकून घेऊन नंतर त्यांनीं त्याजवर जबाब दिला कीं, वारा, अग्नि, पाणी, इ० तत्वें ईश्वराच्या स्वाधीन आहेत. त्याची जर नजर चुकली तर सृष्टीचा नाश होईल. एक तासभर त्यानें वाऱ्यास मोकळीक दिली तर इतका अनर्थ केला. अशीच जर जास्ती मोकळीक दिली असती तर काय झालें असतें याचा विचार करा. ज्या वेळीं अशीं अरिष्टें प्राप्त होतात, त्या वेळीं ईश्वराची प्रार्थना करावी, हाच काय तो उपाय मनुष्याच्या स्वाधीन आहे. देवांवर अभिषेक धरून, किंवा ब्राह्मणांस भोजन देऊन कांहींच होणार नाहीं."

नव्या करारांचा संबंध ध्यानांत येऊं लागण्यास ह्यांचेंच शिक्षण माझ्या उपयोगीं पडलें. तसेंच त्यांच्या शिकविण्यानें मला प्रभु येशूचे गुण व कर्में यांच्याठायीं भक्तिभाव उत्पन्न झाला.

**रेव० दाक्तर मिचल साहेब** यांच्या धर्मशिक्षणपद्धतीपासून मला ख्रिस्ती शास्त्राचा प्रकाश जसा उत्तम टीकेचे ग्रंथ वाचून प्राप्त होतो तसा झाला. त्यांच्या वर्गांत रोमकरांस पौलसाचें पत्र व पेत्रसाचें पहिलें पत्र हीं मीं बराच काळ शिकलों. सारांश, माझे सर्व ख्रिस्ती शिक्षक जसा कोणी घरधनी आपल्या भांडारांतून नवे व जुने पदार्थ काढितो त्यासारिखे स्वर्गराज्याविषयीं शिकलेल्या शास्त्राप्रमाणें होते. ( मात्थी १३:५२. )

५. मुंबईत मला जीं वर्त्तमानपत्रें वाचायास मिळत तीं सुताराच्या हत्यारांसारिखीं होतीं. सुतार जसा एखादें लांकूड तयार करण्याकरितां तें वाकसानें तासतो, व रंध्यानें साफ करितो तसें त्या काळच्या ज्ञानोदयादि पत्रांनीं माझी बुद्धि, विचार व नीति तासून रंधून साफ केली.

६. फ्रि. च. विद्यालयांत माझा प्रवेश झाल्यापासून मला जे मित्र मिळत चालले, त्यांकडूनही माझी बहुत प्रकारें सुधारणूक होऊन मी नास्तिक मताच्या खांचेंत न पडतां व दुर्व्यसनाच्या गाळांत न रुततां सन्मार्गवर्त्ती झालों.

७ जसजशी माझी धर्मसंबंधी सुधारणूक होत चालली तसातसा माझ्या वर्त्तनांत पालट पडत चालला, हें शाळेंत शिक्षक व विद्यार्थी यांच्या लक्ष्यांत व घरांत नातलगांच्या व जनांत ज्ञातिबांधवांच्या देखील नजरेस येऊं लागलें. मीं आपली नवीन धर्मसंबंधीं मतें आपल्या वडिलांशीं कधीं लपविलीं नाहींत. तेणेंकरून त्यांचें व माझें प्रथमतः कांहीं प्रकारें वैमनस्य पडलें. असें होणें साहजिक होतें. संसारांतील साधारण जुन्या व नव्या चाली यांची जेव्हां सुधारणुकेच्या मार्गावर गांठ पडते व त्यांच्या कर्त्तव्याकर्त्तव्याचा विचार करण्याचा जेव्हां प्रसंग येतो, तेव्हां जर इष्टमित्रांचे व जातीचे विरोध सोसावे लागतात, तर धर्मासारख्या महत्वाच्या गोष्टींचा विचार करून त्या टाकाव्या किंवा आदराव्या असा विचार करणारास, व त्यांतही त्याप्रमाणें आचरण करणारास किती विशेषेंकरून विरोध उत्पन्न होईल हें सांगणें नको. ह्याविषयीं मी कोणास दोष लावून लिहीत नाहीं, तर ख्रिस्ती होऊं इच्छिणाऱ्या हिंदूंस (व इतर धर्माच्या मनुष्यांसही) किती

अडथळे येतात व किती दुःखें सोसावीं लागतात, व तेणेंकरून प्रभु येशूनें सांगितलेल्या गोष्टीचा कसा प्रत्यय येतो हें समजतें. इतकेंच नाहीं, तर ह्या परीक्षेकडून ज्याचा त्यास आपला विश्वास कसोटीस लावून पाहतां येतो; व तो त्या कसोटीस उतरला ह्मणजे ख्रिस्तासाठीं दुःख, निंदा, अपमान, छल इ० सोसणारांस ज्या धन्यत्वाचें अभिवचन आहे तें प्राप्त होतें; आणि पुढें ख्रिस्ती जिण्यांत त्याला जीं महायुद्धें करून जय मिळवायाचा असतो त्यांसाठीं तो सज्ज व सावध होतो. कृपाळु देवानें मला याच मार्गानें आपल्या मंडळींत घेतलें. सुमारें तीन वर्षेंपर्यंत मला माझ्या धर्मसंबंधी मतामुळें अनेक प्रकारचें मानसिक दुःख सोसावें लागलें, त्याचें थोडें बहुत वर्णन वर आलेंच आहे. असें दुःख जरी त्यावेळीं अप्रिय होतें तरी त्याचा परिणाम गोड झाला. हें सर्व परमेश्वराच्या कृपेचें दान असें मीं समजतों. "स्वर्गाच्या राज्यावर बलात्कार चालला आहे आणि बलात्कारी तें नेटानें घेतात." ( मात्थी. ११:१२. )

वर ज्या नातलगांविषयीं लिहिलें आहे त्यांतच माझे प्रिय व बहु सन्मान्य तीर्थरूप रा० रा० **पदमनजी माणिकजी** यांच्याविषयीं दोन शब्द सांगून ह्या भागाचें हें पुनरावलोकन समाप्त करितों. जरी माझे वडील सुधारलेल्या लोकांपैकीं नव्हते व ख्रिस्ती धर्माचा त्यांस मुळींपासून संपर्क नव्हता, तरी त्यांनीं माझ्या मतांतरावरून माझ्याशीं जी वर्त्तणूक केली ती एकंदरीनें पाहतां फार सुज्ञपणाची होती व तिजबद्दल ते बहुत स्तुतीस पात्र झाले. त्यांस माझ्याविरुद्ध मसलत देणारे पुष्कळ होते, त्यांजविषयीं मागील प्रकरणांत आलेंच आहे, तरी त्या सर्वांचें ऐकून घेऊन ते आपल्या स्वतांच्या विचारानेंच चालले. याविषयीं विशेष मजकूर पुढील प्रकरणत, येईल. त्यांनीं माझें लालनपालन करून मला लहानाचें मोठें केलें, . नाहीं नाहीं तर पुष्कळ द्रव्य खर्चून मला सुशिक्षण व सुविद्या दिली..त्यांस वाशाळेंत राहूं दिलें; जीं पुस्तकें लागतील तीं पुरविलीं; कांहींआ प्राप्त होऊन त्यांनीं आपल्या वरिष्ठ इंग्लिश अमलदारांस सांगून मजकरीं आणिलें ह्मणून दाहून आणविलीं. त्यांपैकीं दोन तीन अद्याप माझ्यापायेना मनांत येऊन काळ ते आदनास होते, तेव्हां मी मुंबईस कांहीं दिवसाची मला आठवण घरीं; कांहीं दिवस एका वृद्ध मावशीबाईस जवळ ठेआपणास खोटें दिसतें आई व भावंडें यांच्या समागमांत असा राहिलों, तांत्रिक संध्या उरकून

व संसारोपयोगी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची त्यांनीं वाण पडूं दिली नाहीं. मीं सुधारणुकेच्या मार्गास लागण्यापूर्वीं फार उधळेपणानें खर्च करावा. मार्किटांत जातांना कधीं कधीं मोजल्यावांचून मूठ दोन मुठी रु० खिशांत घालून जावें व जे माझ्या गरजेचे नाहींत असे पदार्थ विकत घ्यावे. अशा पुष्कळ जिन्नसांचा मीं घरांत व्यर्थ भरणा केला होता. परंतु अशा खर्चाचा मला कोणास हिशेब द्यावा लागत नसे; कुटुंबाचा खर्च व कारभार माझ्या हातीं होता. हें माझ्या चुलत्यांनीं देखील आपल्या एका पत्रांत कबूल केलें आहे. आणि जेव्हां वडिलांच्या इच्छेविरुद्ध माझें मत बदललें तेव्हां देखील त्यांनीं मजशीं दुजा भाव ठेविला नाहीं. जरी ते रागें भरत व कठोर भाषण करीत व मीं प्रसिद्धपणें ख्रिस्ती धर्म स्वीकारिला असतां आपल्या कुळास काळिमा लागेल असें त्यांस वाटे, व कुटुंबाची मोठी हानि होईल अशी कल्पना करीत, तरी त्यांच्या मनांतून मजवरील प्रीति व प्रेम व भरंवसा हीं उडालीं नाहींत.

याप्रमाणें प्रभूची मजवर अत्यंत दया झाली. मी वेळगांवाहून मुंबईस आलों तेव्हां मोठ्या अंधारांत होतों. त्या अंधारांत त्यानें मला आपल्या प्रिय पुत्राचा आश्चर्यकारक प्रकाश आश्चर्यकारक रीतीनें दाखविला, आणि त्या प्रकाशांत मीं यावें ह्मणून आश्चर्यकारक उपाय योजिले; आणि मला अंधकारांत ठेवण्याविषयीं अंधकारांतील सत्ताधीशानें व त्याच्या धोरणानें चालणाऱ्यांनीं जे यत्न चालविले ते सर्व निष्फल केले.



णि.
डलें.
चाली य।
कर्त्तव्याचा विच
जातीचे विरोध
विचार करून त्या
त्यांतही त्याप्रमाणें
होईल हें सांगणें नको।
तर ख्रिस्ती होऊं इच्छि

# प्रकरण १६.

## माझें बेळगांवास जाणें व तेथील वृत्त.

## ( एप्रिल—सप्टेंबर १८५४ ).

मालवणांतील मानसिक धैर्याची गोष्ट.

सन १८५४ साल्याच्या एप्रिल महिन्यांत मी मुंबई सोडून आपल्या मातापितरांच्या समागमें समुद्राच्या मार्गानें बेळगांवास जाण्यास निघालों. वेंगुर्ल्याच्या बंदरीं उतरल्यावर माझ्या वडिलांनीं मला मालवणास नेलें. तेथें रा० श्रीधर लाडकोबा नांवाचे त्यांचे एक जुने मित्र मुनसुफीच्या कामावर होते, माझा त्यांस धर्मसंबंधी विचार कळवून त्यांच्या कडून मला कांहीं बोध करावा असा त्यांचा मानस होता. ज्या दिवशीं आह्मी तेथें पोचलों त्याच दिवशीं भोजनाच्या पूर्वीं त्या वृद्ध गृहस्थाचें व माझें बरेंच भाषण झालें. नंतर स्नान झाल्यावर देवखोलींत आह्मां उभयतांस संध्या वगैरे करायास पाठविलें. तेथें मीं कांहीं केलें नाहीं. परंतु स्नानास बसल्यापासून भोजनाची वेळ येईपर्यंत भोजनसमयीं चित्राहुती घालण्याविषयीं कसें काय करावें हा विचार माझ्या मनांत येऊं लागला. घरीं तर मीं हें कर्म करण्याचें मागेंच सोडलें होतें, परंतु आतां परक्यांच्या एथें कसें करावें याचा विचार पडला. जर तें करावें तर आपल्या धर्ममतास बाध येतो, सकाळीं जें भाषण झालें त्यावर पाणी पडतें, व मी केवळ तोंडानें बोलणारा मात्र आहें. बोलल्याप्रमाणें चालणारा नाहीं असें त्या गृहस्थास वाटणार आहे, जर न करावें तर माझ्या वडिलांस वाईट वाटेल व मजविषयीं भोजनसमयीं परस्थळीं त्यांस लज्जा प्राप्त होऊन खालीं पाहावें लागेल, आणि अशा क्रियाभ्रष्टास माझ्या घरीं आणिलें ह्मणून कदाचित आमच्या यजमानास राग येईल. अशा कल्पना मनांत येऊन मोठ्या पंचाइतींत पडलों. अशा प्रसंगीं लुथराच्या धैर्याची मला आठवण झाली, आणि मनांत परमेश्वराची प्रार्थना करून जें आपणास खोटें दिसतें तें वर्जण्याचा निश्चय केला. माझे वडील, आपली तांत्रिक संध्या उरकून

भोजनगृहांत येऊन पाटावर बसले. त्यांच्या शेजारीं मींही बसलों; आमच्या समोर आमचे यजमान बसले. ब्राह्मण स्वयंपाक्यानें वरणभात, भाजी पोळी वगैरे पात्रावर वाढलें. यजमान खत्री जातीचे होते, ह्मणून त्यांच्या भार्येनें आमच्याकरितां स्वयंपाक केला नाहीं, मागाहून आह्मांस मटनाचें कालवण मात्र आणून वाढलें. नंतर मुनसफ साहेबांनीं व माझ्या वडिलांनीं रीतीप्रमाणें चित्राहुती घालून आपोष्ण घेतलें; तोंपर्यंत मी स्वस्थ बसलों, आणि ते जेवायास लागल्याबरोबर मीही ग्रास उचलून तोंडांत टाकला. मला कोणीं कांहीं बोललें नाहीं. याप्रमाणें त्या प्रसंगावर जय मिळाल्यावर मला धैर्य आलें. संध्याकाळींही तसेंच केलें. पुनः दुसरे दिवशींही तसेंच केलें. आमच्या देशांतील सुधारलेल्या किंवा सुधारणा करणाऱ्या लोकांनीं ही गोष्ट ध्यानांत ठेवावी. धर्म व नीति यांच्या प्रकरणांत ज्या गोष्टीची आपली खातरी झाली असेल ती आचरायास पहिलें पाऊल टाकलें ह्मणजे त्याच मार्गांत पुढें चालायास परमेश्वर शक्ति देतो. हा जय मिळाल्यानें मला मोठें समाधान वाटलें व उत्तेजन आलें. तेथून निघतेवेळीं रा० श्रीधरजींनीं मला सामोपचाराच्या चार गोष्टी सांगून शेवटीं ह्मटलें कीं, आपलीं मतें मनांत बाळगावीं, पण बाहेरून जनरूढीप्रमाणें चालावें.

**चाकरी धरण्याचा आग्रह; मातापितरांस ख्रिस्ती धर्म शिकविण्याचा उद्योग.**

बेळगांवीं पोंचल्यावर थोड्या दिवसांनीं माझ्या आईबापांनीं मला सरकारी चाकरी धरण्याचा नेट लावला. मीं त्यांस सांगितलें कीं, ह्या हेतूनें मी एथें आलों नाहीं, तर आपणाला आपल्या सांगण्याप्रमाणें ख्रिस्ती धर्माचें ज्ञान करून देण्याकरितां आलों आहें; त्याप्रमाणें तुह्मीं त्या धर्माची माहिती करून घ्यावी. परंतु ह्या गोष्टीस कोणी मान्य होईना. तथापि मीं तो क्रम थोडा थोडा चालविला. ह्या कामांत माझा एक धाकटा भाऊही मला सहाय झाला. हा अंधळा असून त्याला ख्रिस्ती शास्त्राची बरीच माहिती झाली होती. तो मुंबईत असतांना माझ्यापासून व जी सत्यशोधक मंडळी माझ्या घरीं मिळे तिजपासून ख्रिस्ती धर्माचें ज्ञान प्राप्त करून घेत असे. याशिवाय तो त्या मंडळीपैकीं एका सोबत्यावरोबर कित्येक ख्रिस्ती लोकांच्या घरीं ह्मणजे ( रेव० दाक्तर ) नारायण शेषाद्री, रे० मि० वंटर इत्यादिकांच्या एथें जात असे. हे ख्रिस्ती मित्र त्याजवर फार प्रीति करीत. तो बोलण्यांत मजपेक्षां धीट होता. तो बेळगांवीं गेल्यावर अंध-

ल्यांकरितां जीं पुस्तकें छापलीं असतात तीं वाचायास शिकला; त्यांत सर्व शुभवर्त्तमानें व जुन्या करारांतील एक दोन पुस्तकें होतीं तीं मी त्याच्याकरितां बै० सो०तून विकत घेतलीं होतीं. याप्रमाणें आमच्या कुटुंबांत दोन सत्यार्थी त्यावेळीं होते. आह्मीं दोघांनीं उघडपणीं शास्त्र वाचावें व धर्मसंबंधी गोष्टींविषयीं घरच्या माणसांशीं बोलावें. फारकरून संध्याकाळीं आमची धर्मचर्चा चालत असे. कांहीं दिवसांनीं मला मुंबईंतील फ्रिचर्च विद्यालयांतील मित्रांनीं दिलेलें मोठें बैबल येऊन पोंचलें त्यांतील अनेक चित्रें व नकाशे मी आपल्या वडिलांस व इतरांस दाखवून त्यांवरून शास्त्रसंबंधी गोष्टींची त्यांस माहिती करून देऊं लागलों. ती त्यांस आवडूं लागली. वडील नकाशे काढण्यांत स्वतां कुशळ असल्यामुळें त्यांनीं त्या बैबलांतील नकाशांच्या कित्येक चिन्हांचा मला उलगडा करून सांगावा. तसेंच कित्येक शास्त्रसंबंधीं आरशांत बसविलेलीं सुंदर चित्रें मीं मुंबईहून आणिलीं होतीं तीं घरांत टांगून दिलीं; त्यांवरूनही मीं त्यांस शास्त्रांतील गोष्टी सांगाव्या. दाक्तर उइलसन साहेबांनीं मला आपली चौकटींत बसविलेली तसबीर दिली होती तीही भिंतीस लाविली. याप्रमाणें आमचें घर शास्त्र व शास्त्रसंबंधी चित्रें व एका मोठ्या मिशनेरीचें चित्र यांकडून मंडित झालें. ही शोभा करण्याला मला कोणीं अटकाव केला नाहीं. माझ्याकरितां माझ्या प्रिय पित्यानें एक चांगलें पुष्कळ खणांचें वर्तुळाकार चिनाई मेज विकत घेतलें आणि खुरच्या, दिवेबत्ति यांची चांगली सोयी करून दिली.

**धर्मसंबंधी वादविवाद.**

माझ्या धर्मसंबंधीं स्थितीविषयीं लवकरच माझ्या वडिलांच्या मित्रांस समजलें. पुष्कळ लोक मला भेटायास व मजसीं वादविवाद करावयास येऊं लागले. माझ्या वडिलांनीं एकदां एका विद्वान शास्त्र्यास आणिलें. त्याशीं बोलतांनां वेदाच्या अनादित्वाविषयीं मीं कांहीं प्रमाणें विचारिलीं, व त्याविरुद्ध जीं मला माहीत होतीं तीं सांगितलीं.* तीं ऐकतांच शास्त्रीबुवांनीं आपलें बोलणें बंद केलें. ते

* आलीकडे मुंबईस प्रोफेसर जिनसीवाले ह्यांनीं वेद अनादी व ईश्वरप्रणित नाहींत असें स्थापण्याकरितां ज्या प्रकारचीं प्रमाणें आपल्या एक दोन व्याख्यानांत दाखविलीं, तशाच प्रकारचीं माझीं प्रमाणें होतीं; तीं मला काशींत प्रसिद्ध झालेल्या एका निबंधांतून ज्ञानोदयाच्या द्वारें मिळालीं होतीं. (ज्ञानो० सन १८५१, आगस्त १५, पाहा.) याविषयीं विस्तारानें जाणायाचें असेल तर Muir's Sanskrit Texts Vol. III. हा ग्रंथ पाहावा.

ह्मणाले, वेदाला प्रमाणभूत मानून जर कोणी बोलत नाहीं तर त्याच्याशीं त्या विषयावर भाषणच करूं नये. हें ऐकून माझ्या वडिलांसही आश्चर्य वाटलें व शास्त्रीबावा कांहीं वाद करीनात असें पाहून त्यांनीं त्यांस आठ आणे दक्षिणा देऊन निरोप दिला. बेळगांवांत त्यावेळीं माझ्या चुलत्यांच्या घराशिवाय आमच्या आताचें किंवा जातीच्या लोकांचें दुसरें एकही घर नसल्यामुळें मला मुंबईतल्याप्रमाणें बाहेरून कोणापासून त्रास झाला नाहीं. तेथील सुधारलेले लोक आपापल्या ठिकाणीं मजविषयीं चर्चा करीत, परंतु धर्मसंबंधी वादविवाद करावयास कोणी त्यांपैकीं माझ्याकडे आलें नाहीं. जे माझ्या ओळखीचे होते ते बहुतेक परमहंस मंडळीच्या मताचे होते; त्यांस माझ्या मतांविषयीं विशेष वाईट वाटलें नाहीं.

**मी चाकरी धरण्याविषयीं वडिलांचा प्रयत्न. मोठ्या दुःखाचा दिवस.**

पुढें एके दिवशीं माझ्या वडिलांनीं मला तेथील कलेक्टर साहेब मि० इनविरारिटी यांच्या बंगल्यास नेलें, व त्यांस दोन पत्रें देऊन माझी भेट करविली. हीं पत्रें त्यांनीं मुंबईत असतांना डा० उइलसन साहेब व निसबिट साहेब यांजपासून मला न समजतां मागून घेतलीं होतीं. त्यांत काय मजकूर होता हें मला अगदीं माहीत नव्हतें. तीं पत्रें वाचल्यावरोबर कलेक्टर साहेबांनीं मला आपल्या कचेरींत ४० रु० ची ट्रान्सलेटरची जागा देण्याचें वचन देऊन दुसरे दिवशीं कामावर बोलाविलें; तेव्हां मी तेथें कांहीं न बोलतां घरीं आलों. आणि आपल्या पित्यास सांगितलें कीं, मी ख्रिस्ती झाल्याअगोदर कोणतीही चाकरी धरायाची नाहीं असा निश्चय केला आहे, व चाकरी करण्याकरितां मी येथें आलों नाहीं; तर तुह्मीं आपल्या वचनाप्रमाणें मजशीं वागावें. ह्या बोलण्यावरून घरांतील सर्व मनुष्यें मजवर अतिशय रागावलीं. तो दिवस त्यांस फार दुःखाचा गेला, व मलाही त्या दिवशीं त्यांच्या बोलण्यावरून फार वाईट वाटलें. माझ्या भावाशिवाय सर्व माणसें मला शत्रुवत् पाहूं लागलीं. माझ्या आईनें फार दुःख केलें. तिला वाटलें कीं, त्याच दिवशीं मी ख्रिस्ती झालों. मला माडीवर नेऊन तेथें माझ्याशीं सर्वांनीं मोठ्या निकरानें वाद केला. तेथें माझे विभक्त असलेले चुलते व माझी आजीही आली होती. माझ्या बायकोच्या कानीं ह्या गोष्टी गेल्या, व ती रडूं लागली. घरांतील स्वयंपाकीण व तिचा मुलगा ( ही आमच्या जातीची होती ) त्यांसही कु-

एकुण समजली. माझ्या माता पितरांस अशी आशा होती कीं, मला चाकरी लागली ह्मणजे माझा हा नाद सुटेल. परंतु ती त्याच दिवशीं भग्न झाली. अशा समयीं केवळ परमेश्वर माझा सहाय होता. ह्या दिवसाच्या हकीकतीचें टिपण कोठें सांपडत नाहीं; परंतु माझ्या मराठी बैबलाच्या पानावर पुढील टांचण इंग्रजींत लिहून ठेवल्यावर दुसऱ्या एका चोपडींत उतरून घेतलेलें येणेंप्रमाणें आहे:—

" १८५४.१९ मे. बेळगांव. माझे वडील मला प्रभूपासून फिरविण्याकरितां मला चाकरी लावून देऊं पाहतात. या कारणामुळें आज माझा जीव अतिशय दुःखी आहे. ईयोब २२:२१—३० ह्या ओव्या माझ्या जिवाचें समाधान करितात, आणि मला सरळ मार्ग दाखवितात. त्या ओव्या येणेंप्रमाणें:—

"त्याची ओळख करून घे व सुखी हो. तेणेंकरून तुला कुशल प्राप्त होईल, त्याच्या मुखापासून नेम घे, आणि त्याचीं वचनें आपल्या हृदयांत ठेव. सर्वसमर्थाकडे जर फिरशील तर तो तुला स्थापील, आपल्या डेऱ्यांपासून अन्याय दूर करशील. आणि तूं रुपें धुळीसारिखें व ओफिराचें सोनें ओघांतल्या दगडांसारिखें जमा करशील. ह्मणजे सर्वसमर्थ तुझें बहुद्रव्य असा होईल, आणि तुला भांडाराचें रुपें होईल, कांकीं तेव्हां सर्वसमर्थाविषयीं आनंदशील व आपलें मुख देवाकडे उंचावशील. तूं त्याला प्रार्थिशील तेव्हां तो तुझें ऐकेल, आणि तूं आपले नवस फेडशील आणि तूं गोष्ट कल्पिशील तेव्हां ती तुझी ठरेल, आणि उजेड तुझ्या मार्गांवर प्रकाशेल. कोणी तुला पीडलें म्हणजे तूं ह्मणशील कीं उंचावणें आहे आणि तो गरीब माणसाला तारील. तो निर्दोषाला सोडवील आणि तुझ्या हातांच्या स्वच्छतेनें तो सुटेल."

**वडिलांनीं ख्रिस्ती धर्म समजून घ्यावा ह्मणून माझा प्रयत्न.**

माझे वडील फार विचारी व सुज्ञ होते. त्यांनीं माझा हा दृढ निश्चय जाणून मजपासून ख्रिस्ती धर्म समजून घेण्याची इच्छा पुनः दर्शविली, व त्यांस सरकारी कामाकरितां प्रांतांत फिरावयास जायाचें होतें ह्मणून मी त्यांस वाचावयास दिलेलीं पुस्तकें बरोबर घेऊन व तीं वाचून पाहण्याचें मला वचन देऊन ते निघून गेले. त्या सर्व पुस्तकांची मला आठवण नाहीं, परंतु त्यांत योहानाचें शुभवर्त्तमान व दाविदाच्या गीतांचें पुस्तक व यात्रिकक्रमण हीं होतीं, असें त्यावेळीं त्यांस पाठविलेल्या पत्रांतील एका उताऱ्यावरून कळतें, तो येणेंप्रमाणें:—

"आपणास अणखी एक विनंती करितों कीं, आपल्या बराबर मीं जीं पुस्तकें दिलीं आहेत, तीं फुरसतीप्रमाणें अगत्य वाचावीं व नित्य रात्रीं निजण्याचे पूर्वी योहानानें लिहिलेलें शुभवर्त्तमान व गीतांचें पुस्तक यांतून अनुक्रमानें कांहीं भाग वाचण्याचा परिपाठ ठेवावा. हीं दोन पुस्तकें आपल्यास ईश्वरप्रेरित ह्मणवितात, तर त्यांच्या ठायीं एवढ्या मोठ्या हक्काचीं चिन्हें आपणास सांपडतात कीं काय हें पहावें. गीतांच्या पुस्तकांत यहूदी लोकांचा दावीद नामक एक मोठा धार्मिक राजा होता, त्यानें व दुसऱ्या कित्येक भक्तिमान पुरुषांनीं लिहिलेलीं गीतें आहेत, योहान हा येशूचा शिष्य होता. त्यानें आपल्या प्रभूचा वृत्तांत लिहिला आहे. या दोन पुस्तकांत ईश्वराच्या गुणांस बट्टा लावण्याजोग्या, त्याचा अपमान करण्याजोग्या गोष्टी आहेत काय हें पहावें. तशींच तीं पुस्तकें जगास फसविण्यासाठीं, भोळे लोकांपासून पैसा उपटण्यासाठीं बनावट लिहिलीं आहेत असें वाटण्याजोगें कांहीं त्यांत आहे काय हें पाहावें. तसेंच ज्याच्या गोष्टी योहानाच्या पुस्तकांत आहेत तो पुरुष कसा होता हें पहावें, त्याच्या ठायीं ईश्वरी गुण दिसून येतात किंवा नाहीं? सत्य, दया, कृपा, अनंत शक्ति, अनंत ज्ञान यांकडून तो पूर्ण आहेसा दिसतो किंवा कोणी ठक, लबाड, पोटभरू, ढोंगी असा दिसून येतो कीं काय हें पाहावें.

"मी जीवनाची भाकर आहें. जो कोणी मजवर विश्वास ठेवितो त्याला सर्वकाळचें जीवन प्राप्त होईल, आणि शेवटील दिवशीं मी त्यास उठवीन." 'जे मेलेले ते देवाच्या पुत्राची वाणी ऐकतील आणि ऐकणारे जिवंत होतील. जो पाप करतो तो पापाचा दास आहे. जो कोणी मी दिलेलें पाणी पितो त्याला सर्वकाळपर्यंत ताहान लागणार नाहीं.' (ह्या वाक्यांकडे लक्ष्य द्यावें.)

बेळगांवांतील खिस्तीलोकांशीं भेट.

आतां थोडीशी बाहेरची हकीकत सांगितली पाहिजे. मी कधीं कधीं संध्याकाळीं बाहेर फिरायास जात असें, तेव्हां कित्येक एतद्देशीय खिस्ती तरुण मला भेटत. परंतु ते प्रथम दुरूनच मला पाहत व कांहीं न बोलतां निघून जात; असें कित्येक वेळ झाल्यावर त्यांस मी कोण वगैरे समजलें, व ते जवळ येऊन बोलूं लागले. मी पूर्वी तेथल्या मिशनस्कुलांत होतों असें समजल्यावर त्यांस आनंद वाटला, आणि मी खिस्ती धर्माविषयीं विचार करणारा आहें असें जेव्हां मीं त्यांस सांगितलें, तेव्हां तर ते मजपाशीं फारच प्रीतीनें व मित्र-

पणानें वागूं लागले. त्यांनीं मला उत्तेजनदायक बोध करावा व मजसाठीं प्रार्थना करावी.

ख्रिस्ती देवळांत जाणें;इतर उद्योग.

मी दर आदितवारीं संध्याकाळीं लंदन मिशनाच्या इंग्लिश भजनालयास जाऊं लागलों. आणि तेथील मिशनेरी रेव० जोसेफ टेलर साहेब व रेव० बेनन साहेब यांची भेट घेतली. हेच गृहस्थ सुमारें १२ वर्षांमागें माझे विद्यागुरु[1] होते. त्यांची माझी पुनः या अवस्थेंत भेट झाल्यावरून मला फार आनंद झाला व उत्तेजन आलें. त्यांस मीं आपला मजकूर व स्थिति कळविली; परंतु अद्याप उघडपणीं प्रभूला पत्करण्याचा दिवस मीं नेमला नव्हता. ह्या दोघां मित्रांशिवाय व वर सांगितलेल्या एतद्देशीय ख्रिस्ती तरुणांशिवाय धर्मसंबंधी गोष्टींविषयीं माझा कळवळा करणारे तेथें कोणी नव्हते. तरी ख्रिस्ती नव्हे असा एक मनुष्य मला भेटला. त्याचा माझा पूर्वी शालागुरुशिष्यसंबंध होता, परंतु ह्या काळीं हे गृहस्थ सरकारी नोकर होते. त्यांचा विश्वास हिंदु धर्मावर अगदीं नव्हता. पहिल्यापासून ते तसेच होते, परंतु सत्याच्या अमलाखालीं न आल्यामुळें त्यांजवर जगाचा जबर अमल बसला होता. त्यांस माझी स्थिति कळविल्यावर तेही मजपाशीं फार ममतेनें वागूं लागले. त्याशिवाय ते माझ्या वडिलांचे स्नेही असल्यावरून त्यांनीं पुष्कळ प्रकारें त्यांची माझ्याविषयीं समजूत करावी. मीही त्यांच्या आत्मिक हितार्थ फार झटूं लागलों, ह्याशिवाय बेळगांवांतील नेटिव लायब्ररींत एक तरुणांची सभा भरत असे, तींत रे० बेनन साहेबांकडून मीं मद्यपाननिषेधक व्याख्यानें देवविलीं व स्वतांही त्याच विषयावर कित्येक वेळ बोललों.

एक मार्मन मिशनेरी.

त्या काळीं एक मार्मन मिशनेरी बेळगांवीं आला होता, तो लोकांस आपल्या अशुद्ध व अशास्त्र मताचा उपदेश करीत असे. त्याचीं व्याख्यानें ऐकण्यास बरेच हिंदु व युरोपियन लोक जाऊं लागले. तेथें मीही जात असें. माझ्या वडिलांस तें समजल्यावर ते मला ह्मणूं लागले कीं, ह्या मिशनेरीच्या मतांचा तूं कां विचार करीत नाहींस? अद्याप तुला सत्य कोठें सांपडलें आहे?*

*मार्मन मतांचीं कांहीं पुस्तकें मीं मुंबईस असतांना वाचलीं होतीं व तें मत अशास्त्र आहे हें मला तेथेंच समजलें होतें. वर सांगितलेल्या मिशनेरीस बेळगांवीं कित्येक

याप्रमाणें माझे दिवस बेळगांवांत जात चालले. मला घरांत अन्नवस्त्राची कांहीं वाण नव्हती. सर्व घरचा कारभार माझ्या हातीं होता, तरी मी सुखी नव्हतों. मला माझ्या आत्म्याच्या तारणाची व घरच्या माणसांच्या तारणाची फार काळजी लागली होती. मला जेवण गोड लागत नसे, व जें अन्न मीं खाई तें न्यायाच्या दिवशीं मजविरुद्ध साक्ष देण्यास उठेल असें भय वाटावें. त्यावेळच्या स्थितीचें वर्णन मीं कदाचित् सविस्तर लिहून ठेविलें असेल, परंतु त्यासंबंधीं सर्व कागदपत्रें आतां माझ्यापाशीं नाहींत, कांहीं थोडेंसें टिपण सुट्या कागदावर किंवा नोटबुकांत लिहिलेलें आहे. एका कागदावर ता० १३ जुलै १८५४ रोजीं इंग्रजींत लिहून ठेवलेला लेख अद्याप माझ्यापाशीं आहे, त्याचें भाषांतर खालीं केलें आहे:—

"मला गूढ ईश्वरी सूत्रानें वेढिलें आहे. अशा अवस्थेंत देवानें मला कशाकरितां घातलें हें मला समजत नाहीं. हे प्रभू, जो तूं पाप्याच्या मरणांत आनंद मानीत नाहींस, तो तूं मला कां आपणाकडे ओढीत नाहींस ? हे प्रभू, नाश पावणाऱ्या अशा मज पाप्याकडे पाहा, लोक जी माझी निंदा करितात ती ऐक. लोक माझी थट्टा करितात व मजकडे पाहून हंसतात. माझ्या उत्तम हेतूचा व इच्छेचा विपरीत अर्थ करितात. मीं काय करूं व कोठें जाऊं? हे देवा, केवळ तुझ्या दयेच्या पंखांचा आश्रय करितों. तूं कृपाळु होऊन केव्हां मला भेटशील? तूं नेमलेला दिवस लवकर येवो."

तसेंच एका रोजनिशीच्या बुकांत ह्याच महिन्याच्या ३० व्या तारखेस पुढील उद्गार इंग्रजींत लिहिलेले आढळतात:—

"ज्या रीतीचें माझें हल्लींचें जिणें आहे त्या रीतीनें जगण्यापेक्षां जन्मभर रोगी पडून धर्माचा उपभोग घ्यावा हें फार बरें." यावरून मी त्यावेळीं आजारी पडलों होतों असें दिसतें.

ह्याच महिन्याच्या २ ऱ्या तारखेस दा० मरे मिचल साहेबांस पाठविलेल्या इंग्रजी पत्राची अर्धवट नकल माझ्यापाशीं आहे, तींत मी आपल्या अवस्थेचें जें वर्णन केलें आहे तें येणेंप्रमाणें:—

---

अज्ञान युरोपियन भुलत चालले होते, हें पाहून क्यापटन आतां ( मेजर जनरल ) फेर साहेब यांनीं एक लहानसें ट्राक्ट तयार केलें, त्यांस मीं आपल्या जवळचीं पुस्तकें दिलीं त्यांपासून बरेंच सहाय झालें. हें ट्राक्ट त्यांनीं गांवांत व लष्करांत पुष्कळ वांटलें तेणेंकरून त्या मार्मन मिशनेरीस लवकरच तेथून आपला गाशा गुंडाळावा लागला.

'मी दोन वर्षांपासून मोठ्या निकराचें युद्ध करीत आहें. ख्रिस्ताकरितां जग सोडण्याचें वचन मी स्वतांस दिलें आहे. आणि जरी मला या युद्धांत जय मिळाला असें माझ्यानें ह्मणवत नाहीं, तरी देवानें मजवर एवढी दया केली कीं, माझे डोळे उघडून जगाची व्यर्थता मला दाखविली. गेल्या बारा महिन्यांत तर ह्या गोष्टीचा ठसा फारच उत्तम रीतीनें मजवर उठला आहे. जरी मला संसाराचें पुष्कळ सुख आहे तरी त्यापासून मला आनंद नाहीं. माझ्या पापाचें ओझें व भार व दुसऱ्या मरणाचें भय यांनीं या जगांतील ऐषआरामाची रुची घालविली. मी सर्वदां उदास व दुःखी आहें. मी इतका अशक्त आहें कीं, मला अग्नीच्या परीक्षेंत उभें राहण्याची शक्ति नाहीं. तथापि माझी अशी आशा आहे कीं, माझ्या अशक्तपणांत देवाची शक्ति पूर्ण होईल व माझ्या अशक्तपणाकडून मी त्याचा गौरव करीन.'

**वडिलांस टेलर साहेबांस भेटविणें.**

याप्रमाणें प्रभूला दुःख कळवीत व त्याची प्रार्थना करीत असतां लवकरच त्यानें माझी सुटका केली. वडील घरीं जाऊन येऊन असत. ते बाहेर असले ह्मणजे त्यांस धर्मसंबंधीं विषयांवर पत्रें पाठविण्याचा मीं क्रम ठेविलाच होता. त्यांपैकीं कांहीं पत्रांच्या प्रती मजपाशीं अद्याप आहेत. त्या फार लांबलचक असल्यामुळें त्यांचा उतारा येथें घेतला नाहीं. एकदां ते घरीं आल्यावर मी त्यांस रेव० टेलर साहेबांच्या एथें घेऊन गेलों. * तेथें कांहीं भाषण झालें, व टेलर

* ही भेट दोनदां झाली. (ता० २२ व २४ जुलै) असें माझ्या नोटबुकांत आहे. ती होण्याचे पूर्वीं टेलर साहेबांस मीं आपली धर्मसंबंधी स्थिति पत्रद्वारें कळविली होती. त्या पत्राची प्रत माझ्यापाशीं नाहीं, परंतु त्याचे उत्तराचीं मूळचीं चार पृष्ठें आहेत, त्यांजवर तारीख नाहीं, "सोमवार प्रातःकाळ" एवढें आहे. त्यांतील कांहीं मजकुरांचें भाषांतर एथें अशाकरितां दाखल करितों कीं, ख्रिस्ती होणाऱ्या मनुष्याविषयीं मिशनेरी लोकांचे विचार कसे असतात हें हिंदु वाचकांस समजावें.

"प्रिय तरूण मित्र—

तुमचें पत्र वाचून मला फार संतोष झाला. तुमच्या अंतःकरणांत देवानें परम दयेनें जें कार्य आरंभिलें आहे तें जाणून मला आनंद वाटतो. तुमच्या योगानें तुमच्या कुटुंबांतील दुसऱ्याही मनुष्यांस देवाच्या कृपेच्या तारणाचें ज्ञान होईल अशी माझी आशा आहे. देव तुमच्या वडिलांचे ज्ञानचक्षु उघडो, आणि ख्रिस्त येशूच्या द्वारें जी त्याची दया प्रगट झाली ती त्यांस दिसो. मार्ग, सत्य व जीवन तोच आहे; आणि त्याच्याच द्वारें पाप्यास देव अंगिकारितो, आणि त्यांस अनंतकालिक जीवनाचा वारीस करितो. त्यांस

साहेबांनीं त्यांशीं फार ममतेनें भाषण केलें, व जे माझे धर्मसंबंधी विचार व हेतु आहेत ते योग्य आहेत असें सांगितलें, आणि त्यांनींही ह्या गोष्टीचा विचार करून खिस्तावर विश्वास ठेवावा असा उपदेश केला. घरीं आल्यावर पूर्वींप्रमाणें पुष्कळ रागाचें व दुःखाचें बोलणें झालें. नंतर वडील कामावर बाहेर गांवीं गेले.

**पहिली मोठी परीक्षा.**

पुढें कांहीं दिवसांनीं माझ्या स्त्रीनें जन्म पाहिला. त्यासंबंधी विधि व सोहळा करण्याकरितां माझ्या आईनें तयारी चालविली. तासेवाजंत्री, चौघडा वगैरे वाद्यें दारापुढें लाविलीं, मखर बांधविण्याचें काम चालविलें, होम हवन करण्यासाठीं ब्राह्मण सांगून ठेविले. तेव्हां हें सर्व करण्याचें कारण नाहीं, व मी कोणतीही धर्मसंबंधी क्रिया करणार नाहीं असें आपल्या आईस सांगितलें. तिनें हें माझें ह्मणणें माझ्या चुलत्याकडून माझ्या पित्यास लिहून कळविलें. त्यांनीं तासे वाजंत्री बंद करावे असा जबाब पाठविला. परंतु माझ्या आईनें मला एकांतीं गांठून माझे पाय धरून व पदर पसरून व डोळ्यांत अश्रु आणून माझी विनवणी केली कीं, एवढा प्रसंग साजरा केलाच पाहिजे. नाहींतर आपल्या नांवलौकिकाला बट्टा लागेल. हा तिचा आग्रह पाहून मला फार दुःख झालें; तरी मी सांगायाचें तें सांगून तिची पुष्कळ समजूत केली पण ती व्यर्थ गेली.

**देवाची सूचना.**

त्या रात्रीं मला फार वेळ झोंप आली नाहीं. अनेक प्रकारचे विचार माझ्या मनांत येऊं लागले. मीं पुष्कळ प्रार्थना केली व रडलों. पवित्र आत्मा मला अनेक शास्त्रवचनांच्या सूचना करूं लागला, त्यांत मुख्य सूचना लग्नाच्या दाखल्याची होती. लूक १४: १६–२४ यांतील आमंत्रित मनुष्यांपैकीं एकानें जेवणावळीस न जाण्याचें जें निमित्त सांगितलें त्याची मला आठवण झाली, तें असें होतें कीं, "मीं

---

ही दया समजो इतकेंच नाहीं तर त्या दयेवर त्यांचा विश्वास व प्रीति बसून त्यांनीं तुमच्या सहवर्तमान व तुमचे बंधु व बायको ह्यांसहवर्तमान त्या दयेचा निर्भयपणें जगापुढें स्वीकार करावा, आणि जे खऱ्या व जिवंत देवाची भक्ति करितात व आमच्या पापाकरितां ज्याला त्यानें पाठविलें त्या प्रभु येशूवर विश्वास ठेवितात त्यांच्यामध्यें मिळावें."

बायको केली आहे ह्मणून माझ्यानें येववत नाहीं.*" यावरून मला अशी सूचना झाली कीं, मींही बायको केली आहे, आणि मलाही देवाचें आमंत्रण झालें आहे; जर मीं आतां त्याचा अव्हेर केला तर "त्या आमंत्रित माणसांतून एकही माझ्या जेवणांतील कांहीं चाखणार नाहीं." असें जें धन्यानें ह्मटलें तसें मजविषयींही देव ह्मणेल, मग देवाच्या राज्यांत माझा प्रवेश कधीं होणार नाहीं. असा विचार मनांत येऊन मला फार भय वाटूं लागलें; व ह्याच प्रसंगीं ख्रिस्ताला पत्करिलें पाहिजे असा निश्चय केला; तेव्हां मला शांति वाटली व झोंप आली.†

**मानवी उपाय.**

दुसरे दिवशीं मीं रेव० टेलर साहेबांस लिहून सर्व मजकूर कळविला, आणि पुढील रविवारीं देवळांत आल्यावर तेथूनच आपल्या घरीं राहावयास येईन, तर कृपा करून माझ्याकरतां एक खोली तयार करावी. तींत खुर्ची, मेज व बिछाना इतकें मात्र

---

* हा सगळा दाखला येणेंप्रमाणें आहे:—त्यानें (येशूनें) त्याला ह्मटलें, कोणी एक मनुष्यानें संध्याकाळची मोठी जेवणावळ केली, तेव्हां बहुतांस आमंत्रण केलें. आणि जेवणाच्या वेळेस, आतां या, तयारी झाली आहे असें आमंत्रितांस सांगायाला त्यानें आपला दास पाठविला. तेव्हां ते सर्व जण सारखेच क्षमा मागूं लागले. पहिला त्याला ह्मणाला, मीं शेत विकत घेतलें आहे, तें मला जाऊन पाहिलें पाहिजे, मी तुला विनंती करतों, मला क्षमा असावी. दुसरा ह्मणाला, मीं बैलांच्या पांच जोड्या विकत घेतल्या आहेत त्या मी पारखायाला जातों, मी तुला विनंती करितों, मला क्षमा असावी. अणखी दुसरा एक ह्मणाला, मीं बायको केली आहे, म्हणून माझें येणें होत नाहीं. मग त्या दासानें येऊन आपल्या धन्याला हें वर्तमान सांगितलें तेव्हां घरधनी रागावून आपल्या दासाला म्हणाला, नगराच्या रस्त्यांत व गल्ल्यांत लवकर जा, आणि दरिद्री, व्यंग, लंगडे व आंधळे यांस इकडे आण. दास ह्मणाला, महाराज, आपण आज्ञा केल्याप्रमाणें झालें आहे तरी अद्याप जागा आहे. धनी दासास ह्मणाला, माझें घर भरून जावें ह्मणून सडकांवर व कुंपणाकडे जाऊन लोकांस आग्रह करून आण. कारण मी तुह्मांस सांगतों कीं, त्या आमंत्रित मनुष्यांतून एकही माझ्या जेवणांतलें कांहीं चाखणार नाहीं.

† आणखी जीं शास्त्रवचनें माझ्या मनांत आलीं त्यांची मला आतां आठवण नाहीं. दहा कुमारींच्या दाखल्यांतील "दार बंद झालें" हें वचन आलें असावें असें आठवतें. परंतु त्या सर्वांत ह्या जेवणावळीच्या दाखल्याच्या पवित्र आत्म्यानें त्या समयीं माझ्या आत्म्यावर प्रहार करून मला जागृत केलें, व अशा प्रसंगीं माझें कर्तव्य कोणतें, तें न केल्यास कोणता भयंकर परिणाम होईल हें स्पष्ट दाखविलें.

असावें अशी विनंती केली. ह्या वेळचीं टेलर साहेबांचीं जीं पत्रें मजपाशीं आहेत, त्यांवरून असें समजतें कीं, घर सोडण्याची गोष्ट मीं प्रथम आपल्या पित्यास कळविली असतां बरें होईल असें त्यांनीं मला सुचविलें. परंतु तसें करण्यास वेळ नव्हता, व केलें असतें तर पुष्कळ अडथळे मात्र आले असते. घरांत सोहळ्याची सर्व तयारी चालली असून दिवसही नेमला होता. त्या दिवशीं ब्राह्मण बोलावून माझ्याकडून होम वगैरे करवायाचा होता, आणि तें केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. परंतु तसें करणें ह्मणजे प्रभु ख्रिस्ताला नाकारून आपलें तारण गमावणें अशी माझी पूर्ण खातरी झाली होती, ह्मणून टेलर साहेबांशीं आणखी कांहीं पत्रव्यवहार झाल्यावर शेवटीं त्यांनीं माझी विनंती मान्य केली.

# प्रकरण १७.

## ईश्वरी कृपेचा महादिन.

रविवार, ता० १३ आगष्ट १८५४ या रोजीं संध्याकाळीं मी ख्रिस्ती भजनालयास ( मिशनचापल ) जाण्यास निघालों. घरांतून निघतेवेळीं मीं रोजचा साधारण पोशाख केला होता. माझ्यापाशीं घरचे ३०० रुपये रोख होते, त्यांतून कांहीं बरोबर घेतलें नाहीं. आईला बाजारचें कांहीं सामान वगैरे पाहिजे काय असें विचारलें. बायको एका कोपऱ्यांत बसली होती तिला न्याहाळून पाहिलें. हिंदुधर्माच्या संबंधानें ही सर्वांची शेवटची भेट असें मनाला वाटलें. अंगणांत लहान भावंडें खेळत होतीं त्यांची भेट घेतली, आणि देवाची प्रार्थना करून बाहेर पडलों. मार्गांत कित्येक ख्रिस्ती मित्र भेटले, त्यांसह लंदन मिशनाचे लष्करांतील इंग्लिश भजनालयीं पोंहचलों. तेथें रेव० बेननसाहेबांची उपदेश करण्याची पाळी होती. त्यांस मी पूर्व दिवशीं टेलर साहेबांस पाठविलेल्या चिठीविषयीं अथवा मला ज्या शास्त्रवचनांवरून माझ्या कर्त्तव्याची जी सूचना व जें समाधान झालें होतें त्यांविषयीं कांहींच ठाऊक नव्हतें. मी टेलर साहेबांच्या घरीं राहण्यास जाणार हेंही त्यांस समजलें नव्हतें, कारण शनिवारीं शेवटचा पत्रव्यवहार होऊन ठराव होण्यास संध्याकाळ झाली होती. टेलर साहेबांच्या बंगल्यापासून बेनन साहेब बरेच दूर किल्ल्याबाहेर शहापूरच्या वाटेवर राहत असत. असें असतां त्या संध्याकाळीं त्यांचा उपदेश लूकाच्या शुभवर्त्तमानांतील ज्या दाखल्याचें दोन तीन दिवसांमागें रात्रीं मला स्मरण झालें होतें त्याच दाखल्यावर होता. *त्याचें व्या-

* रेव० बेनन साहेब आपलें सर्मन समग्र लिहून देवळांत वाचीत असत. वर सांगितलेलें सर्मन मी पुढें जेव्हां ( १८५७ त्नांत ) बेळगांवीं गेलों, तेव्हां त्यांजपासून मागून वाचलें. त्याची तेव्हांच एक प्रत घेऊन ठेविली असती तर फार बरें झालें असतें. आपल्यापाशीं अशीं सायंत लिहिलेलीं ८०० सर्मनें आहेत असें त्यांनीं एकदां मला सांगितलें. हें त्यांचें सांगणें त्यांच्या दुसऱ्या एका सांगण्याशीं जुळतें. ते ह्मणत कीं, ३०

ख्यान जसजसें मी ऐकत गेलों तसतशी माझ्या मनाची खातरी होत गेली कीं, हें देवाचें आमंत्रण मलाच आहे. सर्मनाच्या शेवटीं जो बोध होता तो फार चित्तभेदक व भारदस्तीचा होता. त्या अध्यायाच्या चोवीसाव्या ओवी-वरून ज्या सावधगिरीच्या सूचना त्यांनीं केल्या, त्या पूर्वीं माझ्या मनांत आलेल्या सूचनांसारिख्या असून पवित्र आत्म्यानें तत्क्षणीं माझ्या अंतः-करणांत बिंबविल्या.

सुटका.

याप्रमाणें उपदेश ऐकल्यावर मी आपल्या ख्रिस्ती मित्रांसह देवळांतून बाहेर निघूं लागलों. आतां एथें पाहा.—मनुष्याची दुर्बलता व देवाचें सामर्थ्य, मनुष्याचें भेकडपण व ईश्वर-दत्त धैर्य; मनुष्यास नरकाच्या मार्गांत धरून ठेवण्याची सैतानाची युक्ति व त्या मार्गांतून काढण्याची देवाची शक्ति; आणि तसेंच ईश्वराची पूर्ण सत्ता व मनुष्याची पूर्ण स्वतंत्रता; हीं अगदीं ढळढळीत दिसून येतात.

जरी मी त्या रात्रीं टेलर साहेबांच्या घरीं जाण्याचा पूर्ण निश्चय करून आलों होतों, व उपदेश ऐकून माझी पूर्ण खातरी झाली होती कीं, हाच प्रसंग देवाच्या राज्यांत प्रवेश करण्याचा आहे, तरी देवळांतील बांकावरून उठून बाहेर सोप्यावर जी खोली होती तिकडे येत आहें, इतक्यांत माझ्या मनांत सैतानाची सूचना झाली कीं **"घरीं चल."** मित्रमंडळी तर संगतीं होतीच, त्यांच्या सोबतीनें घरची वाट धरावी अशी कुबुद्धि झाली. परंतु देवानें त्यावेळीं परम दया करून "अग्नींतून पटकन काढलेल्या कोलतीप्रमाणें" ( जख. ३. २ ) मला काढिलें. ज्या प्रभूच्या दूतानें बंदिशाळेंत पडलेल्या पेत्रास "माझ्या मागें ये" असें ह्मटलें, व तो तयार होईपर्यंत जो खोळंबून राहिला ( प्रे० १२:७,८ ) त्याप्रमाणें त्या खोलीच्या दाराशीं टेलर साहेब माझी वाट पाहात उभे राहिले होते. त्यांनीं मला पाहिल्याबरोबर **"येतोस काय ?"** (Are you coming ?) इतकेंच विचारिलें, व तें ऐकल्याबरोबर "होय" (Yes) असें मी उत्तर दिलें, आणि

वर्षांत केवळ आजारीपणामुळें एक उपदेश करण्याची त्यांची पाळी चुकली होती. ते एक आदितवार आड उपदेश करीत, याप्रमाणें पाहिलें असतां ३० वर्षांत त्यांच्या ७८० पाळ्या होतात. ही संख्या ८०० च्या जवळ जवळ आहे. ह्या सर्मनांपैकीं एकही छापल्याचें माझ्या ऐकण्यांत किंवा पाहण्यांत आलें नाहीं. ही मोठी दुःखाची गोष्ट होय.

त्यांच्या संगतीं देवळाच्या पायऱ्या उतरून खालीं त्यांची गाडी उभी होती तींत बसलों. बंगल्यास पोंचून कांहीं उपहार घेतल्यावर व प्रार्थना झाल्यावर मजकरितां तयार केलेल्या खोलींत गेलों.

सुखावस्था; ईश्वर-समागम.

त्या रात्रीं माझ्या जिवाला जें सुख व समाधान वाटलें तें अवर्णनीय होतें. मी पापी आहें अथवा दुःखी आहें असें मला अगदीं वाटलें नाहीं. मी त्या एकांतस्थानीं कांहीं शास्त्रभाग वाचून प्रार्थना केल्यावर दिवा मालवून अंधारांत बिछान्यावर पडलों. परंतु तो अंधार मला प्रकाशमय झाला. जसा कोणी अत्यंत थोर व परम दयाळू पुरुष आपल्या गरीब मित्राजवळ येतो, तसा परात्पर देव व पाप्यांचा सखा प्रिय **प्रभु येशू ख्रिस्त** मज दीन पामराजवळ आला. त्याच्या समागमानें जसें खोल पाण्यांत बुडणाऱ्या मनुष्यास बाहेर काढल्यावर व अघोर मृत्यूच्या भयापासून मुक्त केल्यावर निर्भयता प्राप्त होते तसें मला झालें. जसें त्या थंडीनें गारठलेल्या मनुष्यास विस्तवापाशीं ऊबदार बिछान्यावर निजविल्यानें सुख व समाधान वाटतें, तसें माझ्या आत्म्यास वाटलें. माझें अंतःकरण प्रकाशानें व हर्षानें भरलें त्या रात्रीची आठवण माझ्या मनांतून कधीं जाणार नाहीं. तसा अनुभव मला पुढें वारंवार झाला नाहीं. देवानें परम दया करून मला त्या रात्रीं जें दिव्य दर्शन दिलें, तें स्वर्गांत भक्तांस जें सुख प्राप्त होतें त्याची वानगी होती. अशीं दर्शनें त्या काळीं कित्येक रात्रीं सतत होत गेलीं, व त्यांविषयीं मी आपल्या कित्येक ख्रिस्ती मित्रांस तेव्हांच लिहून कळवीत गेलों. खरोखर मी पिसगा डोंगरावर ( अनु. ३. २७. ), रूपांतराच्या पर्वतावर ( मात्थी १७. ) व बेऊला देशांत ( यशाया ६२:४ ) संचार करीत होतों. 'त्यानें मला मेजवानीच्या घरांत आणिलें, आणि मजवर त्याचा झेंडा प्रीतीच होता." ( शल. गीत २:४ )*

---

* ह्या प्रसंगीं ख्रिस्ती मित्रांस पाठविलेल्या पत्रांच्या नकला माझ्यापाशीं नाहींत, परंतु त्यांपैकीं एकाचा उतारा स्पर्जन साहेबांच्या "Feathers for Arrows, or My Note Book" या नांवाच्या पुस्तकांत बहुत वर्षांनीं माझ्या पाहण्यांत आला. तो ज्या मित्रास तें पत्र लिहिलें होतें त्यानें विलायतेंतील एकाद्या धर्मसंबंधी पत्रांत छापल्यावर घेतलेला असावा; तो येणेंप्रमाणेः—

"How I long for my bed! Not that I may sleep—I lie awake often

ह्या प्रसंगीं प्रभूच्या प्रीतीच्या अनुभवाची मला फार गरज होती. पुढें ज्या माझ्या परीक्षा होणार होत्या त्यांजमध्यें टिकून राहण्याकरितां मला ह्या अनुभवापासून शक्ति मिळाली, आणि जेव्हां जेव्हां माझी प्रीति थंड होईल तेव्हां ह्या प्रीतीची आठवण होऊन मला प्रभूवर अधिक प्रीति करण्यास प्रोत्साहन व्हावें असा ह्या दर्शनांचा हेतु आतां मला दिसून येतो.

ह्या दिवसाविषयीं त्याच रात्रीं आठ वाजतां मीं आपल्या रोजनिशीच्या बुकांत लिहिलें तें येणेंप्रमाणें:—

"दयेचा दिवस. आठवणींत धरण्याजोगा. ह्या दिवशीं मी बाहेर पडलों, आणि प्रभूची आज्ञा मानून मूर्त्तिपूजकांपासून वेगळा झालों. त्याजवरच मात्र

---

and long! but to hold sweet communion with my God. What shall I render unto him for all his revelations and gifts to me? Were there no historical evidence of the truth of Christianity, were there no well-established miracles, still I should believe that the religion propagated by the fishermen of Galilee is divine. The holy joys it brings to me must be from heaven. Do I write this boastingly, brother? Nay, it is with tears of humble gratitude that I tell of the goodness of the Lord!"

हें व दुसरीं कित्येक पत्रें ज्या मित्रांस लिहिलीं होतीं तीं त्यानें रेव० निसबिट साहेब यांस दाखविलीं. त्यांस व विशेषेंकरून वरील पत्रास अनुलक्षून त्या साहेबांनीं जें मला पत्र पाठविलें त्यांतील उतारा येणेंप्रमाणें आहे. ह्याचें भाषांतर पुढील एका टिपेंत दिलें आहे:—

We give unceasing thanks to God for all this goodness to you. I have read most of your letters with great interest and pleasure; but the one that gave me most delight was that in which previous to your baptism, you spoke of your delighting in God, meditating on Him in the night watches, and holding sweet and satisfying communion with him. Your experience and David's is the same (Ps. 63. 5-8). I always wish for young converts such experiences of holy joy. They are to them not only the shortest and surest proof of Christianity, but they make them miserable afterwards when they go astray in sin or in carelessness, and lose their sense of the Divine presence. I bless God for the guiding light you have had. May you ever remember your privileges, and strive to attain to the height of them. You glorified God and enjoyed Him in the most sensible manner; you may again and again. Let your soul still 'follow after Him and His right hand will uphold you.'"

मीं विश्वास ठेविला आहे, आणि मला शांति व सुख प्राप्त व्हावें एतदर्थ केवळ त्याची मीं आशा धरिली आहे."

ह्या रात्रीं मला फार शांत झोंप लागली. परंतु घरीं मोठी धावाधाव व आकांत झाला. देवळांतून परत येण्याची वेळ होऊन गेल्यावर माझ्या आईनें माझ्या चुलत्यास बोलावून आणून माझा शोध करायास सांगितलें. ते दोन चार स्नेह्यांच्या घरीं जाऊन नंतर वेनन साहेबांच्या घरीं गेले; तेथें मी नसल्यामुळें टेलर साहेबांच्या घरीं येणार होते, परंतु रात्र फार झाल्यामुळें सरकारी चालीप्रमाणें किल्ल्याचे दरवाजे बंद झाले होते, ह्मणून त्यांच्यानें तेथें येववलें नाहीं.

**दुसरी परीक्षा.**

दुसरे दिवशीं माझी मातोश्री माझ्या सर्व भावंडांसुद्धां मला पाहण्यास व परत नेण्यास आली ही प्रथमची भेट फार दुःखाची होती. तिचें वर्णन करितां येत नाहीं. परंतु त्या समयीं प्रभु माझ्याजवळच असून मला धीर देत होता. जर त्यावेळीं प्रिय आप्तांच्या शोकानें माझें अंतःकरण द्रवलें असतें तर खचीत मी परत गेलों असतों, परंतु तसें न होतां मीं स्थिर राहिलों. आईचीं, आजीचीं व सर्वांचीं बोलणीं ऐकून घेतलीं, व त्यांस जीं उत्तरें द्यायाचीं तीं थोडक्यांत दिलीं. पुष्कळ वेळपर्यंत बोलणें झाल्यावर माझा दृढ निश्चय पाहून आईनें मोठा हंबरडा फोडून मला आणि टेलर साहेबाला शिव्याशाप देऊन बंगल्यांतून पाय काढिला. तो तिचा आकांत व आक्रोश माझ्या कानांतून व डोळ्यांतून बहुत दिवस गेला नाहीं. सर्व मंडळी निघून गेल्यावर मला मोठें रडें कोसळलें, मीं एकटाच आपल्या खोलींत होतों. जीं माझीं प्रिय नातलगें नुकतींच येऊन गेलीं होतीं त्यांच्यासाठीं व आपल्यासाठीं मीं देवाची प्रार्थना केली. माझें सर्वांग चेंचून गेल्यासारखें होऊन माझें मन फार दुःखी व कष्टी झालें, तरी प्रभु मला धीर व बळ देत मजजवळ होता.

ह्या प्रसंगीं टेलर साहेबांच्या येथें क्यापटन फेर साहेब ( सर राबर्ट फेर ) होते. त्यांस माझी हकीकत ठाऊक होती. त्यांनीं मला जवळ घेऊन माझें पुष्कळ समाधान केलें. आणि ते स्वतां खिस्ती झाले तेव्हां त्यांस कसकशीं दुःखें भोगावीं लागलीं तीं सांगितलीं. तेणेंकडून माझ्या मनाला विशेष धीर आला. टेलर साहेबांस तर माझा फार कळवळा आला. त्यांनीं मला जवळ घेऊन माझें बहुत प्रकारें शास्त्रवचनांकडून सांत्वन केलें.

चौथ्या दिवशीं ह्मणजे ता० १५ रोजीं मी आपल्या नोटबुकांत पेनसलीनें पुढील टिपण करून ठेवलेलें आढळतें. मध्यंतरीं घरचा गडी वगैरे कोणी येऊन माझी आई उपास करिते असें सांगत; तिला तसें करूं नको असें मीं सांगून पाठवावें:—

आईची प्रीति.

"आज माझ्या प्रिय आईनें माझे कपडे पाठविले, परंतु त्यापेक्षां अधिक चांगलें तें हें कीं, तिनें प्रीतीचा निरोप पाठविला, तो असा कीं, 'मजकरितां दुःखी होऊं नको, जेथें आहेस तेथें सुखी ऐस; मी आतां उपास करीत नाहीं.' ह्या निरोपाबरोबर ५ रुपयेही पाठविले, व आणखी लागल्यास २०–२५ पाठविण्याचें वचन दिलें." ज्या छापील नोटबुकांत हें टिपण केलें त्याच्या डाव्या बाजूच्या पानावर त्या तारखेकरितां एक शास्त्रवचन होतें तें असें कीं, "जर कोणी माझी सेवा करील तर बाप त्याचा मान करील." (यो० १२:२६.) ह्या ओवीकडे पाहून मी त्यावेळीं वरील टिपणाच्या शेवटीं असें लिहून ठेविलें कीं, "ह्या गोष्टींत देवानें माझा मान केला नाहीं काय?" ह्याच दिवशीं मी आपल्या तीर्थरूपांस पत्र लिहिलें, परंतु त्याची प्रत माझ्यापाशीं आतां नाहीं. ज्या पेटींत माझ्या प्रिय आईनें माझे कपडे घालून पाठविले ती बहुत वर्षें मी आपल्या ख्रिस्ती कुटुंबांत स्मरणार्थ फार आवडीनें ठेविली होती, व तिजविषयीं कुटुंबांतील मनुष्यांस वारंवार सांगून तिजवरून बोधही करीत असें, तो असा कीं, जे ख्रिस्ताकरितां सर्वस्व सोडितात (ह्म० ज्यांस सोडण्याचा प्रसंग येतो) त्यांस देव त्यांच्या गरजेच्या सर्व वस्तु पुरवितो. त्या वस्तु मला पुरविण्याचा आरंभ त्यानें माझ्या आईबापांच्या घरांतील ह्या पेटीपासून केला; आणि तिच्या मागून पुष्कळ पेट्या व कपाटें व पुष्कळ वस्त्रेंपात्रें व बहुत धनही दिलें. इतकेंच नाहीं, तर ज्या मातापितरांपासून मला प्रभूकरितां दूर राहावें लागलें, त्यांच्या प्रीतीचा व ममताळुपणाचा अनुभवही पुढें बहुत वर्षें अधिकाधिक घेऊं दिला.

ता० १८. ह्या दिवशीं मीं धर्मांतर करण्याचें कारण मुंबईच्या धूमकेतु पत्रास लिहून पाठविलें. तें त्याच्या कर्त्यांनीं कांहीं टीका न करितां तसेंच प्रसिद्ध केलें. तेणेंकरून मी ख्रिस्ती झाल्याचें (होणार असें) वर्त्तमान मुंबईंत व सर्वत्र पसरलें. हें पत्र व दुसऱ्या वर्त्तमानपत्रकारांचे मजविषयींचे लेख पुरवणींत रहावे.

माझ्या धर्मांतराची वर्त्तमानपत्रांतून प्रसिद्धि.

आत्म्याची सुस्थिति.

घर सोडल्यानंतर माझ्या आत्मिक स्थितींत कोणता पालट झाला हें टेलरसाहेबांच्या एथें आल्यापासून सातव्या व आठव्या दिवशीं इंग्रजींत लिहून ठेविलेल्या ध्यानावरून (Meditation) समजतें. प्रथम दिवसाच्या स्थितीविषयीं वर सांगितलेंच आहे. तें ध्यान येणेंप्रमाणें:—

( इंग्लिश मूळावरून. )

"हे देवा माझ्या प्रभू, तूं मज नाश पावणाऱ्या पाप्यावर जी दया केलीस तिजबद्दल मी तुझे उपकार मानितों. मी आपल्या तारणाराला मनुष्यांसमोर कबूल करावें, माझ्या देवाची ओळख करून घ्यावी व शांति पावावी असें मीं मुंबईत असतांना कितीदां इच्छिलें! माझे प्रिय गुरु रेव० ( दाक्तर ) मिचल साहेब हे एकांतीं प्रार्थना करीत असतां मी किती वेळां त्यांच्या संगतीं होतों! ह्या प्रार्थना जर मी आपल्या मूर्तिपूजक कुटुंबांत राहिलों तर व्यर्थ जातील असें मला भय वाटलें होतें. हे देवा, आतां माझें मन कसें आहे हें तूं जाणतोस. मी किती सुखी आहें! मी आतां केवढ्या समाधानानें अन्न खातों! येथें येण्यापूर्वी मला माझें जेवण मरणदंड ठरलेल्या अपराध्यास वाढलेल्या अन्नाप्रमाणें लागत असे. मला कोणत्याही अन्नाची रुचि नव्हती. मी देवाची अशी प्रार्थना करीत असें कीं, हें जें दान ( ह्मणजे अन्न ) तो मला देत असे तें न्यायाच्या दिवशीं मजविरुद्ध न उठावें. मी कधीं आनंदी नव्हतों. माझ्या मुखावर सर्वदां दुःख व चिंता हीं उमटलेलीं असत. मित्रांस पत्रें लिहिणें, पुस्तकें वाचणें किंवा मित्रांशीं संभाषण करणें यांपासून मला सुख वाटत नसे; मी सर्वदा ध्यानस्थ व चिंतातुर असें. पुढच्या गोष्टीविषयीं मला कांहीं आशा नव्हती, सर्व अंधार होता. कधीं कधीं मला असें वाटावें कीं विष भक्षण करावें, आणि मरण आलें ह्मणजे पश्चात्ताप करून पापाची क्षमा देवापाशीं मागावी. कारण माझ्यानें प्रसिद्धपणें धर्मांगीकार करवेना. अणखी मला असें वाटे कीं मरणकाळीं पाद्रीस बोलावूं पाठवावें. ह्या विचारांत आत्महत्या होती. मी किती दुष्ट होतों! हे विचार सैतानापासून होते असें त्या काळीं मला अगदीं समजलें नाहीं. परंतु ते माझ्या मनांतून लवकरच नाहींसे झाले ह्मणून मी देवाचे उपकार मानितों. पवित्र आत्म्याच्या धन्य सूचना माझ्या मनांत येऊं लागल्या. तो सर्वदा माझ्या हातांस व नेत्रांस शास्त्रांतील योग्य स्थळें-

काढण्यास व वाचण्यास वाट दाखवीत असे. तेणेंकरून मी देवावर भरंवसा ठेवण्यास व त्याला आपला मित्र व वाटाड्या करण्यास शिकलों.

"माझें मन मुंबईकडे धांवतें. ज्या काळीं माझे प्रिय मित्र रेव. नारायण शेषाद्री यांनीं मजकरितां आपल्या खोलींत प्रार्थना केली व माझीं आईबापें आपला नाश करून घेण्याची मला धमकी देत असतांना मी कसें वागावें याविषयीं त्यांनीं मला ख्रिस्ती मसलत दिली, त्या काळाची आठवण होऊन माझे नेत्र अश्रूंनीं भरतात, आमचा देव प्रार्थना ऐकणारा देव आहे. प्रभु येशू ख्रिस्त आमच्या आत्म्यावर खरोखर प्रीति करितो, आणि देवाचा आत्मा हा आत्मिक गोष्टीविषयीं आमचा उत्तम बोधक आहे; हें सर्व मला आतां चांगलें समजूं लागलें.

ता० २०.—"हे देवा, मी तुझ्या लेंकरांपैकीं एक आहें व मी खरोखर ख्रिस्ताच्या अदृश्य कळपांत मिळालों आहें असें मला अधिकाधिक समजूं दे. तसेंच ख्रिस्ताचें राज्य माझें आहे आणि निष्कलंक व अविनाशी वतनाचा मीं वारीस झालों आहें हें मला समजूं दे. हे माझ्या जिवा, अशाप्रकारें तुला आपल्या उत्पन्नकर्त्याशीं भाषण करण्याचा हक्क मिळाला आहे ह्मणून आनंद कर. अज्ञान मूर्तिपूजकांस ख्रिस्ताच्या कृपेच्या संपत्तीविषयीं कांहीं ठाऊक नाहीं, त्यांची तुला दया येऊं दे. त्यांच्यासाठीं प्रार्थना कर, त्यांच्यासाठीं रड; ख्रिस्ताच्या धन्य शुभवर्त्तमानाच्या जयाची तूं एक जीवंत खूण आहेस असें त्यांस दाखविण्यास यत्न कर. अशासाठीं कीं, त्यांनीं तुझ्या अवस्थेची ईर्षा धरून ख्रिस्ताची अमोल्य संपत्ति मिळविण्याकरितां यावें.

"आहा, मी केवढा सुखी आहें! माझ्या पापांची ख्रिस्तानें क्षमा मिळविली आहे. तो मजकरितां मरण पावला. त्यानें मजकरितां पुण्य संपादन केलें. माझ्या पापाचा न्याय देव करील याविषयीं मी कांहीं घाबरा होत नाहीं, मला एक मध्यस्थ आहे व तो माझ्याकरितां रदबदली करितो, हें मी जाणतों. तो माझा वाद चालवितो. मी अशक्त आहें तरी ख्रिस्तामध्यें बळकट आहें. जसा बाप आपल्या लेंकरास वाट दाखवून नेतो व त्याला चालायास शिकवितो, तसा माझा तारणारा ह्या पापाच्या व परीक्षेच्या जगांतून मला नेईल. जर मी पडलों तर तो मला उठवील, जर मला सैतानाचे तिखट बाण लागले तर तो माझ्या जखमा बऱ्या करील. मला तहान लागली तर तो मला जीवंत पाण्याच्या झऱ्यावर नेईल; हा झरा तो स्वतांच आहे. सर्व

गोष्टींत मी त्याला आपला मार्गदर्शक व बोधक करीन. हे येशू, हे पवित्रा, महासंबोधक जो आपला आत्मा तो मला दे. त्याच्या प्रेरणा माझ्या मनाला लागोत. मीं आपलें अंतःकरण सर्वस्वी त्याला अर्पावें ह्मणून मला शक्ति दे. अशासाठीं कीं त्याचा तो कर्त्ता आहे, त्यानें तें नवीन करावें आणि माझ्या चित्तवृत्ति व मनकामना अगदीं पालटाव्या. अशासाठीं कीं मी ख्रिस्तामध्यें नवी उत्पत्ति व्हावें.

**आप्तांची दुसरी भेट.**

ता० २२ रोजीं माझी मातोश्री पुनः मला पहावयास आली. तिनें ह्या वेळीं पूर्वीप्रमाणें आकांत केला नाहीं, तरी ती फार दुःखी होती, व मला घरीं येण्याविषयीं फार आग्रह केला.

ता० १८ रोजीं माझ्या बायकोकडून असा निरोप आला कीं, मी मुंबईस जातांना तिला बरोबर घेऊन जावें. परंतु ह्या गोष्टीविषयीं माझे वडील घरीं येऊन त्यांच्याशीं माझें बोलणें होईपर्यंत विशेष कांहीं करवलें नाहीं. माझा बाप्तिस्मा झाला नव्हता व तो कोठें व केव्हां व्हावा याविषयीं अद्याप कांहीं निश्चय झाला नव्हता. तथापि असा निरोप पोचल्याबद्दल मी परमेश्वराचे उपकार मानिले. हें लिहून ठेवल्याचें माझ्या नोटबुकांत सांपडतें.

**पित्यावर प्रेम.**

मी बाहेर पडल्याचें वर्त्तमान माझ्या वडिलांस कळल्यावर ते लवकरच घरीं आले. प्रथम त्यांनीं मला ( ता० २३ रोजीं ) घरीं येण्याविषयीं बोलावणें पाठविलें, परंतु माझा बाप्तिस्मा झाला नसून त्या अवस्थेंत घरीं गेल्यास काय होईल याविषयीं टेलर साहेबांच्या मनांत संशय आला, ह्मणून त्यांच्या मसलतीप्रमाणें मी आपल्या वडिलांनींच मला भेटायास यावें अशी विनंती केली, परंतु त्या दिवशीं ते आले नाहींत. मध्यें एक दिवस गेल्यावर ता० २५ रोजीं मोठ्या पहाटेस गाडींतून एकटे येऊन टेलर साहेबांच्या बंगल्याच्या बाहेर गाडी उभी केली, व मला गड्याच्या हातीं बोलवायास पाठविलें. तेव्हां मी बिछान्यावरून उठून तसाच त्यांच्यापाशीं गेलों. त्यावेळीं टेलर साहेबांस विचारून जाण्याला अवकाश नव्हता, कारण ते निजलेले असून त्यांच्या बंगल्याचीं दारें लाविलीं होतीं. माझी खोली बंगल्याच्या कंपौंडांतील दुसऱ्या घरांत होती. मला त्यांनीं जवळ घेऊन थोडा वेळ गाडी उभी ठेवून "हें काय केलेंस?" असें बोलून अश्रु गाळले. नंतर "आतां घरीं चल" असें ह्मणून चाकरास गाडी हाका-

यास सांगितली, तेव्हां मी कांहींसा दचकलों, तरी धैर्य धरून व देवावर सर्व भार घालून त्यांच्या बरोबर घरीं येण्यास मान्य आहें असें दर्शविलें. वाटेंत कांहीं बोलणें झालें नाहीं. घरीं गेल्यावर पाहतों तों सर्व माणसें निजलेलीं आहेत, व माझ्या येण्याविषयीं कोणास कांहींच ठाऊक नव्हतें. मग माझ्या वडिलांनीं सर्वांस उठवून मी आलों आहें असें सांगितलें, व कोणी रडूं आरडूं नये व मला कांहीं बरें वाईट बोलूं नये अशी ताकीद दिली. नंतर, टेलर साहेबांस, मीं घरीं सुखरूप आहें, मजविषयीं घाबरूं नये, शाळेंत जातांना दहा वाजतां मला एथें येऊन भेटून जावें, व संध्याकाळीं मी परत बंगल्यास येईन असा लेखी निरोप पाठवायास मला सांगितलें, त्याप्रमाणें मीं पत्र पाठविलें व ते मला दहा वाजतां भेटून शाळेस गेले.

घरांतील सर्व माणसें उठल्यावर कोणी मला कांहीं बोललें नाहीं. वडिलांच्या सांगण्यावरून चांगलें जेवण करून मला एका खोलींत माझ्या बायकोच्या हातून ताट वाढविलें. मीं वस्त्रांतर न करितां जेवायास बसलों हें पाहून "अशा कापडासुद्धां जेवण गोड लागत असेल" असें ती बिचारी ह्मणाली.

भोजनोत्तर कोणी कोणी बाहेरचीं मनुष्यें मला पाहायास आलीं, परंतु त्यांशीं माझें फारसें बोलणें झालें नाहीं. तो दिवस शास्त्र वाचण्यांत, प्रार्थना करण्यांत, व मुंबईच्या कित्येक मित्रांस पत्रें लिहिण्यांत मी घालविला. संध्याकाळीं माझ्या वडिलांनीं आपल्या वचनाप्रमाणें मला गाडींत बसवून टेलर साहेबांच्या घरीं पाठविलें. तेव्हांपासून मीं घरीं जाण्यायेण्याचा परिपाठ ठेवला, व घरच्या मनुष्यांचें मजकरितां शोक करणें कमी होऊं लागलें.

ह्या वरील हकीकतीच्या संबंधानें माझ्या प्रिय वडिलांच्या सुज्ञ वर्तणुकीची अशी स्तुति केली पाहिजे कीं, जसें कित्येक लोक करितात तसें त्यांनीं मला घरीं आणण्याकरितां लोकांचे दंगल मिळवून पाद्रीसाहेबांच्या बंगल्यावर गर्दी केली नाहीं, व मला घरीं आणल्यावरही जुलमानें घरांत ठेवण्याचा अथवा दूर बाहेरगांवीं पाठविण्याचा प्रयत्न अगदीं केला नाहीं. ज्या आईबापांवर असे प्रसंग येतात त्यांस हें शांतीचें वर्त्तन अत्यंत प्रशंसनीय व कित्ता घेण्याजोगें आहे. बेळगांवांत माझ्या चुलत्याच्या घराशिवाय दुसरें आमच्या आप्तांचें किंवा जातीचें घर नसल्यामुळें इतर जातींच्या लोकांनीं माझ्या धर्मांतरावरून कांहीं गडबड केली नाहीं; गवगवा व चर्चा मात्र पुष्कळ झाली.

माझा बाप्तिस्मा होण्याचे पूर्वी टेलर साहेबांनीं माझी हकीकत मुंबईस उइलसन साहेबांस कळविली, व मी त्यांच्या विद्यालयांतला असल्यामुळें माझा बाप्तिस्मा लंदन मिशनांत होण्यास कांहीं हरकत आहे काय असें विचारिलें. उइलसन साहेबांनीं व त्यांच्या मिशनाच्या इतर मिशनेरींनीं माझा बाप्तिस्मा बेळगांवीं होण्याविषयीं पूर्ण संमति दिली व फार संतोष दर्शविला. मलाही ह्या गोष्टीसंबंधी निसबीट साहेब, मि० नारायण शेषाद्री व दाक्तर उइल्सन यांनीं बोधपर व उत्तेजनदायक पत्रें पाठविलीं.* बाप्तिस्म्याचा

---

* ह्या वेळेच्या पत्रव्यवहारांतील कित्येक कागदपत्रें माझ्यापाशीं आहेत, त्यांतून एक दोन पत्रांतील कांहीं उतारे एथें घेतों:—( भाषांतर ) दाक्तर उइल्सन यांचे पत्रांतील उतारा. ता. ८ आगस्त १८५४.

"मि० टेलर साहेबांनीं पाठविलेले कागद एक तासामागें पोंचले, आणि मिस्तर निसबिट, मि० नारायण व मी तुमच्या प्रकरणाविषयीं फार प्रेमभरित व प्रार्थनायुक्त कळकळ बाळगीत आहों. तसाच आमचा विचार झाला आहे तो हा कीं, तुह्मी देवाच्या सहायानें विलंब न करितां बाहेर पडून वेगळें व्हावें, आणि ख्रिस्ताच्या दृश्य मंडळींत मिळावें. तुम्ही त्याच्या अदृश्य मंडळींत मिळालां आहां असा आमचा भरंवसा आहे."

त्यांच्या दुसऱ्या पत्रांतील उतारा:—१ सप्टें० १८५४.

"तुम्हांस माझीं दोनीं पत्रें पोंचलीं असतील आणि लवकरच तुम्ही मला लिहाल अशी मला आशा आहे. तुमचा बाप्तिस्मा झाला आहे असें ऐकल्यावरून आह्मांस फार आनंद होईल. त्या गंभीर व आनंददायक प्रसंगीं प्रभु आपल्या आत्म्याची वृष्टि तुह्मांवर करो. धूमकेतूंतील तुमचें पत्र फार चित्तवेधक आहे. तुमच्याविषयीं लोक येथें फार बोलतात. परंतु तुमचें करणें भावार्थीपणाचें व विचाराचें होतें असें तुमचे देशबांधव कबूल करितात. आपल्या विद्यालयांतील तरूण विद्यार्थी तुमचे करण्याला अनुकूल आहेत हें लिहिण्यास मला आनंद वाटतो. ईश्वर त्यांस तुमचा कित्ता घेण्यास अनुग्रह देवो."

रेव० ( दाक्तर ) नारायण शेषाद्री ( पत्रावर तारीख नाहीं. )

"तुह्मी प्रभु येशू ख्रिस्ताला स्वीकारण्याचा निश्चय केला आहे हें जाणून मला फार हर्ष वाटतो. निसबिट साहेब तुमचीं पत्रें वाचून दाखवीत असतां मला गहिंवर आला. कारण तुमचें त्या प्रसंगीं कोणी समाधान व सांत्वन करणारें जवळ नव्हतें. मजवरही अशाच प्रकारचीं कठीण संकटें आलीं होतीं म्हणून मला तुमचा कळवळा येतो. मी तुह्माला इतकीच मसलत देतों कीं, ज्याप्रमाणें आजपर्यंत तुम्हीं टिकून राहिलां तसेंच राहत जा, म्हणजे दयाळू प्रभु तुम्हाला सर्व अडचणींतून पार पाडून ज्या जयाची तुम्ही फार इच्छा बाळगितां तो जय तुह्माला देईल. जेव्हां आपण आपलें अशक्तपण जाणतों तेव्हां देव आह्मांस शक्ति देतो. तुम्हाला, लुथर वर्मस एथील सभेपुढें उभा राहण्याचे पूर्वरात्रीं

दिवस येईपर्यंत घरच्या मनुष्यांनीं विशेष दुःख दर्शविलें नाहीं. त्यांस मी परत येईन अथवा जातीचे लोक मला परत घेतील अशी मोठी आशा होती. त्यांनीं मला शंकराचार्यांस कांहीं धर्मसंबंधी प्रश्न लिहून पाठविण्यास सांगितलें, परंतु तसें करण्यांत कांहीं हांशील नव्हतें. माझ्या प्रश्नांचीं उत्तरें येण्याची मला मुळींच आशा नव्हती ह्मणून मी त्या गोष्टीस मान्य झालों नाहीं. माझे वडील कधीं कधीं एखाद्या शास्त्री पंडितास व सरकारी कामदारास माझ्या बिन्हाडीं घेऊन येत, त्यांच्याशीं मी यथामति भाषण करीं; बाकीच्या वेळांत धूमकेतु, ज्ञानोदय, इ० वर्तमानपत्रांस कांहीं विषय लिहून पाठवावा. ह्याशिवाय मला पाहण्याकरितां लोकांची रोज रोज मोठी रांग लागत

---

कोणत्या स्थितींत होता, याची आठवण आहे काय ? त्या प्रसंगीं त्यानें जी प्रार्थना केली ती आठवा.

"त्या महासभेपुढें उभें राहून त्यानें जो जय मिळविला तो कशानें मिळविला ? देवाच्या वचनावर जो त्याचा दृढ विश्वास होता त्याकडूनच कीं नाहीं ? तर तीं वचनें दृढ धरा, ह्मणजे पर्वतांसही हलविण्यास तुह्माला सामर्थ्य येईल. तुमचे मित्र तुमच्या-करितां प्रार्थना करीत आहेत."

रेव० निसबिट साहेबांकडून आलेल्या पत्रांतील उतारा:—( भाषांतर. याचें मूळ मागच्या एका टीपेंत दिलें आहे. )

"देवानें तुह्मावर जी दया केली तिजमुळें आह्मी त्याचे अखंड उपकार मानितों. तुमचीं बहुतेक पत्रें वाचून मला फार संतोष झाला. त्यांत विशेषेंकरून ज्या पत्रांत तुह्मी आपल्या बाप्तिस्म्यापूर्वी ईश्वरी समागमात आनंद पावल्याविषयीं, व रात्रीच्या प्रहरीं त्याचें ध्यान करीत असतां तुम्हाला जो त्याचा समागम घडला त्याविषयीं लिहिलें आहे तें वाचून तर मला फार हर्ष झाला. तुमचा व दाविदाचा अनुभव एकच आहे. ( गीत. ६३:५–८ ) अशा प्रकारचा पवित्र अनुभव ख्रिस्ती तरुणांस व्हावा अशी माझी सर्वदा इच्छा आहे. तेणेंकरून त्यांस थोडक्यांत ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेचें खचीत प्रमाण मिळतें इतकेंच नाहीं, तर जेव्हां ते पुढें मार्ग सोडून पापांत पडतात अथवा नि-श्चित होतात, आणि ईश्वरी समक्षतेचा समज त्यांच्यांतून नष्ट होतो तेव्हां त्या अनुभ-वाच्या आठवणीनें ते दुःखी होतात. तुम्हांला जो मार्गदर्शक प्रकाश मिळाला त्यावरून मी देवाची स्तुति करितों. तुह्मी आपल्या मानांची सर्वदां आठवण धरा. आणि त्यांत जे सर्वांहून मोठे आहेत ते तुम्हांला प्राप्त होवोत. 'तुह्मी सुज्ञानपणानें देवाला गौरविलें आहे व त्याचा अनुभव घेतला आहे.' तुह्माला पुनः पुनः असाच अनुभव होवो. तुमचा 'जीव त्याशीं लागून राहो' व त्याचा उजवा हात तुम्हाला संभाळो."

असे, त्यांस भेटण्यास व त्यांच्याशीं बोलण्यांत पुष्कळ वेळ खर्चंत असे. मला इतके लोक पाहण्यास येऊं लागले कीं, त्यांजवर कांहीं कर बसवावा असें टेलर साहेब विनोदानें बोलत. तसेंच टेलर साहेबांबरोबर गाडींतून आदितवारीं देवळास जाण्याकरितां निघालों ह्मणजे आमच्या गाडीच्या मागून लोकांच्या झुंडीच्या झुंडी लागत. मी कोणी विदेशी व विलक्षण प्राणी आहें असें त्यांस वाटावें.

# प्रकरण १८.

## बाप्तिस्मा.

शेवटीं माझ्या बाप्तिस्म्याचा दिवस नेमला, व त्याविषयीं मीं आपल्या वडिलांस सांगितलें. ते मला ह्मणाले कीं, पाद्री साहेबांस कांहीं दक्षिणा द्यावी लागत असल्यास आपण देऊं, कारण तो विधि फुकट करून घेऊं नये. हें त्यांचें बोलणें थट्टेचें नव्हतें, खरोखरीचें होतें. परंतु मीं त्यांस सांगितलें कीं, तशी कांहीं रीत नाहीं. बाप्तिस्म्याच्या दिवशीं ख्रिस्ती देवळांत आपण येऊं असेंही ते ह्मणाले. परंतु जेव्हां तो दिवस आला (ता० ३ सप्तेंबर) तेव्हां तर माझी फार मोठी परीक्षा झाली. प्रथम माझ्या वडिलांनीं मला घरीं बोलायास पाठविलें, पण तो दिवस ईश्वर-समागमांत व पारमार्थिक चिंतन करण्यांत घालवावा असें माझ्या मनांत होतें, ह्मणून मी गेलों नाहीं. नंतर त्यांनीं आजचा दिवस तहकूब करावा असें लिहून पाठविलें. त्यांत कारण सांगितलें नव्हतें, ह्मणून मी तें चिठी पाठवून विचारिलें. त्यास कांहीं उत्तर न देतां, पुनः मला बोलवायास पाठविलें. याप्रमाणें चिठ्या चपाट्या पाठविण्यांत पुष्कळ वेळ गेला, व माझें मनही अस्वस्थ झालें. तथापि तो दिवस बदलला नाहीं. त्या दिवशीं सायंकाळीं लंदन मिशनाच्या इंग्लिश देवळांत रेव० बेनन साहेबांनीं उपासना केल्यावर माझा बाप्तिस्मा रेव० टेलर साहेब यांनीं केला. तेव्हां जरी पुष्कळ पाऊस पडत होता तरी गांवचे पुष्कळ लोक आले होते. इंग्रजी उपासनेस आलेले साहेब व सोल्जर लोकही बसून राहिले. बाप्तिस्म्याच्या पूर्वीं मीं कांहीं मजकूर इंग्रजींत व मराठींत लिहून आणिला होता; इंग्लिश मजकूर बेनन साहेबांनीं वाचला व मराठी मीं वाचला. त्या दिवशीं मला घरचा असा निरोप आला कीं, " तूं प्रकाशांत गेलास पण आमच्या घरांत अंधार पडला." माझ्या आईनें तर फार शोक केला. बाप्तिस्मा झाला नव्हता तोंपर्यंत तिला आशा होती कीं, मी परत येईन, परंतु ती आशा त्या दिवशीं अजीं बुडाली.

बाप्तिस्मा झाल्यावर मीं पूर्ववत् घरीं जाण्याचा परिपाठ ठेविला. पुढें माझा बेत मुंबईस विद्याभ्यासाकरितां जाण्याचा होता, परंतु माझ्या वडिलांचें असें ह्मणणें पडलें कीं, बेळगांवांतून जाण्याच्या अगोदर मीं ख्रिस्ती होण्याचें कारण लोकांस व विशेषेंकरून आपल्या कुळांतील मनुष्यांस समजावें ह्मणून एक पुस्तक लिहावें. त्याप्रमाणें मीं "हिंदु धर्म व ख्रिस्ती धर्म ह्यांची तुलना" ह्या नांवाचें संवादरूप पुस्तक दोन महिन्यांत लिहिलें. तें तयार होत असतां त्याचे कांहीं भाग आपल्या पित्यास वाचून दाखवावे, व त्यांत त्यांनीं कांहीं सूचना कराव्या. हें पुस्तक लिहीत असतां मध्यें वेळ फावल्यामुळें "आत्मारामपंत व मृत्यु शिपाई" या नांवाचा संवाद रचून ज्ञानोदयांत पाठविला, तो त्याच वर्षीं त्या पत्राच्या नवेंबर व दिसेंबराच्या अंकांत प्रसिद्ध झाला. हीं पुस्तकें पुढें मुंबईच्या त्राक्ट सोसैटीनें छापिलीं. ह्याशिवाय धूमकेतु, ज्ञानोदय वगैरे पत्रांस मी पूर्वीप्रमाणें मजकूर लिहिण्याचा क्रम ठेविलाच होता.

**मुंबईस जाण्याचा बेत.**

माझ्या बाप्तिस्म्याचें वर्त्तमान मुंबईंत माझ्या सासऱ्यांस समजल्याबरोबर ते बेळगांवांस येण्यास निघाले; त्यांच्या बरोबर त्यांचा दुसरा एक जांवई होता. परंतु ते येऊन पोंचण्याच्या अगोदर माझ्या वडिलांनीं मला माझ्या बायकोस मनावून माझ्याकडे जाण्याची मसलत दिली. मी वारंवार घरीं जाऊन तिला भेटून तिचें मन वळविण्याचा प्रयत्न करीत असें, व ती माझ्यापाशीं येण्यास कबूल झाली होती. तिनें जातिभेदही मोडला ह्मणजे एकदां भांड्यांत पाणी आणून त्यासुद्धां मला शिवून नंतर तें प्याली. हें तिनें मी न सांगतां केलें, तरी माझ्या वडिलांचें असें ह्मणणें होतें कीं, ते घरांत असतां तिनें माझ्याकडे निघून येऊं नये, असें केल्यास जातीचे लोक त्यांस शब्द लावितील, ह्मणून ते सरकारी कामानिमित्त प्रांतांत फिरायास गेले ह्मणजे तिनें घरांतून बाहेर पडावें. ह्या गोष्टीस मीही मान्य झालों. आणि त्याप्रमाणें ते बाहेर गेल्यावर एके दिवशीं माझ्या बायकोला जवळच एक नेटिव ख्रिस्ती गृहस्थ (मिस्तर मुतुकुमार मुदलीयार) राहत होते, त्यांच्या घरीं नेऊन तेथून त्यांच्या गाडींत बसवून टेलर साहेबांच्या बंगल्यांत पोंचविण्याचें ठरविलें. परंतु त्याच दिवशीं माझे सासरे येऊन पोंचले. तेणेंकरून सर्व बेत फिसकटला. मला पूर्वीप्रमाणें

**सासऱ्याची भेट, बायकोला आणण्याचा प्रयत्न.**

माझ्या बायकोशीं एकांतीं बोलायास प्रसंग मिळेनासा झाला. वडील परत घरीं आल्यावर मी आपल्या मामाजींस भेटलों. त्यांचें सोवळें भारी होतें. ते स्नानसंध्या व भोजन केल्यावांचून माझें तोंड पाहीनात, ह्मणून त्यांच्या इच्छेप्रमाणें वेळ नेमून भेट घेतली. प्रथमदर्शनीं किंचित दुःखाचे उद्गार काढल्यावर लागलीच क्रोधमुद्रा धारण करून भाषण चालविलें, त्यांत त्यांच्याबरोबरचे जावईबुवा तर मजवर फारच कडाडले, व त्यांनींच माझ्या बायकोचें मन बिघडलें. ती त्यांच्या बरोबर मुंबईस जाण्यास तयार झाली. तिच्याशीं बोलण्याकरितां हे पाहुणे निजल्यावर रात्रीं दहा अकरा वाजतां मला वेळ मिळावी, तोंपर्यंत मी दुसऱ्याच्या घरीं जाऊन बसत असें. तिनें शेवटपर्यंत हाच हेका धरिला कीं, "मुंबईस गेल्यावर तुमच्यापाशीं येईन." हें पाहून माझ्या वडिलांस फार वाईट वाटलें. ते माझ्या मामाजींस तिला माझ्याकडे पाठविण्याविषयीं उघड रीतीनें देखील बोलले, तरी त्यापासून कांहीं फळ झालें नाहीं. ह्या खटपटींत माझा वडिलांशीं जो पत्रव्यवहार झाला त्यांतून एका पत्राचा कांहीं भाग खालीं दाखल केला आहे:—

"आपण कृपा करून पत्र पाठविलें तें पावलें. आपण पूर्वींच मजकडे माझ्या बायकोस पाठवून दिलें नाहीं ह्मणून असें झालें इ० प्रकारचे विचार आपल्या मनांत येऊं देऊं नये, व मीं आपणांविषयीं तसा कांहीं विचार मनांत आणिला नाहीं. पूर्वींपासून माझा निश्चय होता तोच मीं धरिला आहे. ज्या ईश्वराकरितां मीं आईबाप, बायको, भाऊ यांजपासून वेगळा झालों आहें त्याजवरच मीं आशा व भरंवसा ठेविला आहे. माझ्या बायकोनें मला सोडिलें ह्मणून मीं स्वतांसाठीं दुःखी होत नाहीं, तिजकरितां मात्र दुःख वाटतें. तिनें वैधव्यांत व अज्ञानांत रहावें हेंच मला वाईट वाटतें. पण ती मजपाशीं न आली ह्मणून माझें सुख कमी होईल असें नाहीं. ज्या देवानें मजकरितां आपला पुत्र मरणास दिला तो देव माझें मन सुखी ठेवणार नाहीं असें कसें होईल? हा विचार मीं ख्रिस्ती होण्यापूर्वींच केला आहे. येशू ख्रिस्तानें सांगितलें आहे कीं, "जो कोणी मजकरितां सर्व सोडितो, तो या जगीं पाठलागासुद्धां शंभरपट व परलोकीं अक्षय जीवन पावेल." *** ख्रिस्ती मनुष्यांचें शांतवन अशा प्रकारचें आहे, व तसेंच आपणासही संकटाच्या व दुःखाच्या वेळीं प्राप्त व्हावें अशी माझी मनःपूर्वक इच्छा आहे." (२८ सप्तेंबर १८५४.)

बायकोविषयींची पुढील हकीगत.

ह्या प्रकरणाचा शेवट, ही हकीकत थोडीशी लांबवून ह्या पुस्तकाच्या कालमर्यादेचें उल्लंघन केल्याशिवाय करितां येत नाहीं. माझी बायको आपल्या बापाबरोबर मुंबईस गेल्यावर मागून मीही तेथें गेलों, तेव्हां तिनें मजकडे यावें ह्मणून मी पुष्कळ प्रयत्न केला. तिच्या वडिलांस पुष्कळ पत्रें पाठविलीं, पण त्यांकडून कधीं उत्तर आलें नाहीं. तिच्या घरचीं माणसें देखील मला भेटत नसत मग तिची भेट होणें तर लांबच होतें. याप्रमाणें सुमारें ४ वर्षे गेल्यावर मला तिच्या शेजारच्या मनुष्यांकडून ती मजकडे येण्यास खुशी आहे, पण तिला आईबापांचा अटकाव आहे असें समजलें तेव्हां तिला भेटून विचारण्याचा मार्ग अगदीं बंद असल्यामुळें सुप्रीम कोर्टांत ( आतां ज्यास हायकोर्ट ह्मणतात, ) फिर्याद करून जज्जापुढें तिला आणणें भाग पडलें. त्या कामास हाबियस कार्पस नांवाचें समन काढावें लागलें. परंतु हें समन माझ्या सासऱ्यास लाविल्याबराबर त्यांनीं व त्यांच्या घरच्या दुसऱ्या माणसांनीं रात्रंदिवस तिच्या भोंवतीं बसून तिनें कोर्टांत "नाहीं" असें ह्मणावें ह्मणून रड लाविली, व शेवटीं तसेंच झालें. ह्या खटल्याचा निवाडा चीफ जस्टीस सर म्याथु सास यांच्यापुढें झाला. त्यांनीं मला व माझ्या बायकोला चेंबर्समध्यें नेऊन तिच्याशीं सुमारें अर्धा तास बोलण्याची सवड दिली. जज्ज साहेब स्वतः तेथें वसले होते, उभयपक्षांचे बारिस्टर व वकीलही होते, व दाक्तर उइलसन साहेब मजबरोबर होते. माझ्या बायकोच्या जवळ तिचे वडील होते. मीं तिला पुष्कळ प्रकारें समजाविलें, परंतु तिनें वडिलांच्या शिकविण्याप्रमाणें शेवटपर्यंत नन्नाचा फाडा वाचला. आह्मी चेंबर्समधून बाहेर पडतांना माझ्या वकीलानें माझ्या समाधानार्थ मला एक शास्त्रवचन ह्मणून दाखविलें तें असें कीं, "जर अविश्वासी मनुष्य वेगळें होतें तर वेगळें होवो." ही गोष्ट १८५७ सालीं घडली, व ह्या खटल्यास मला सुमारें दोनशें रु० खर्च आला. हे पैसे यमुनापर्यटण पुस्तकांत मला मिळाले होते, व ज्याअर्थी तें पुस्तक विधवांच्या हितार्थ छापलें होतें, त्याअर्थी त्याचा नफा, नवरा जीवंत असून जी वैधव्यांत पडली होती, तिला त्या अवस्थेंतून सोडविण्यासाठीं खर्चीं घातला त्याविषयीं मला कांहीं वाईट वाटलें नाहीं, परंतु माझा यत्न सफळ झाला नाहीं ह्मणून मात्र वाईट वाटलें.

पुढें तीन वर्षांनीं ह्मणजे १८६०त माझें ख्रिस्ती लग्न झालें,तोंपर्यंतही मीं आपल्या हिंदु बायकोची वाट पाहिली, परंतु ती आली नाहीं परंतु हें लग्न झाल्यावर एकदां मी पुण्याहून मुंबईस येऊन एका मित्राच्या घरीं उतरलों असतां, ज्या दिवशीं परत जाणार त्याच दिवशीं (ता० २ मे १८६२) बगींत सामान टाकून बसत आहें इतक्यांत अकस्मात ती मला भेटायास आली. तिच्या बरोबर कोणी नव्हतें. तिला पाहून मी चकित झालों. कारण आठ वर्षांनीं तिचें तोंड पाहिलें; मध्यें केवळ एक वेळ पांच वर्षांमागें कोर्टांत मात्र ती दृष्टीस पडली होती. तिनें आपल्यास पुण्यास घेऊन जावें, व बायकोच्या नात्यानें घरांत ठेवावें, असा मला गळ घातला. तिला आतां एकटी बाहेर पडण्याची मोकळीक मिळण्याचें कारण तिनें असें सांगितलें कीं, तिचीं आईबापें व वडील भाऊ हीं मरण पावलीं असून तिच्या भावाच्या मुलांकडून तिला पूर्वींप्रमाणें प्रतिबंध नव्हता. नंतर मीं तिला सांगितलें कीं, आतां माझ्यानें तुला घेववत नाहीं; ख्रिस्ती धर्मांत दोन बायका करण्याची मनाई आहे. तरी ती कांहीं ऐकेना. मग मीं राहणें करून तिला दुसरे दिवशीं येण्यास सांगितलें, त्याप्रमाणें ती आली. त्या भेटीच्या वेळीं माझे बहु प्रिय ख्रिस्ती बंधु रेव० धनजीभाई नवरोजी हे माझ्या विनंतीवरून आले होते, त्यांनीं तिला पुष्कळ समजून सांगितलें, पण ती आपला हेका सोडीना. मला न्याच न्या असें ह्मणत बसली. मलाही फार वाईट वाटलें, परंतु माझा उपाय नव्हता. मीं तिला असें सुचविलें कीं, जर तुझी ख्रिस्ती होण्याची इच्छा असली तर माझ्याबरोबर पुण्यास चल, तेथें तुला दुसऱ्या ठिकाणीं ठेऊन विद्या व धर्म शिकवीन, आणि मग तुझी इच्छा असली तर दुसरें लग्न कर, अथवा शाळा वगैरे शिकविण्याचें काम कर. परंतु ही गोष्ट तिला मान्य झाली नाहीं. याप्रमाणें सुमारें दीड तासपर्यंत बोलणें झाल्यावर ती फार कष्टी होऊन मोठ्या नाखुशीनें परत गेली.

ह्या गोष्टीवरून, ज्यांचे जावई किंवा विवाहित पुत्र ख्रिस्ती होतात, किंवा दुसरा कोणताही धर्म पत्करितात, त्यांनीं त्यांच्या बायकांस त्यांची खुशी असतां त्यांजकडे जाण्याविषयीं अगदीं प्रतिबंध करूं नये, असें शिकावें. आणि जसें माझ्या विचारी वडिलांनीं केलें तसें त्यांस आपला पातिव्रत्य धर्म पाळायास सांगावें, ह्मणजे पतिसमागमांत राहायास बोध करावा. कारण त्यांच्या शिकविण्यावरून व जातीच्या लज्जेवरून जरी त्या प्रथम थोडा वेळ

आपल्या नवऱ्यांकडे जाण्यास अमान्य झाल्या, तरी पुढें त्यांस पस्तावा होतो. याविषयींचें ढळढळीत उदाहरण केवळ हेंच नाहीं, दुसरींही सांगतां येतील. *

ह्या गोष्टीच्या संबंधानें अणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे ती अशी कीं, माझ्या हिंदु बायकोचीं आईबापें व वडील भाऊ मरण पावल्यावर तिच्या दुसऱ्या नातलगांनीं ह्मणजे भावाच्या मुलांनीं माझ्याशीं फार स्नेह जोडला, व अद्याप तसाच लोभ ठेवीत आहेत.

* वरील मजकूर लिहून गेल्यावर मुंबईंत एक गोष्ट घडली. ती अशी कीं कोणी एक हिंदु जातीची कुलस्त्री आपल्या महंमदी धर्मांत गेलेल्या भ्रताराकडे २० वर्षांनीं गेली! इतका दीर्घकाल त्यापासून दूर राहण्याचें कारण तिच्या माहेरच्या मनुष्यांचा दुराग्रह होय.

# प्रकरण १९.

## बाप्तिस्म्यानंतरच्या कित्येक गोष्टी.

टेलर साहेबांच्या घरीं माझें राहणें.

रेव० टेलर साहेब यांनीं मला बाप्तिस्म्याच्या पूर्वी व नंतर आपल्या घरीं राहण्यास स्थळ दिलें, तेणेंकरून मला बहुत लाभ झाले. त्यांच्या कुटुंबांत १३ आगस्टपासून १० नवेंबर (१८५४) पर्यंत मीं राहिलों. तेथें माझी क्षीण झालेली प्रकृति सुधरली, व माझा खिस्ती विश्वास सुदृढ झाला. तो विश्वास आरंभीं कोंवळ्या रोप्यासारिखा असून त्याची काळजीनें जतन करण्याची फार गरज होती.* टेलर साहेब व त्यांची ममताळु व भक्तिशील पत्नि यांचा मजवर फार लोभ असे. त्यांची धर्मशीलता व सदाचरण यांचा जो मला कित्ता मिळाला तो अमोल्य होता. तेणेंकरून माझ्या पुढील खिस्ती जिण्यास वळण लागलें. टेलर साहेब कुटुंबांतील ईश्वरभक्तीच्या वेळीं ज्या प्रार्थना करीत त्या मला फार हितावह झाल्या. त्याकाळीं त्यांचीं कित्येक नातवंडें इंग्लंदांत होतीं त्यांची त्यांनीं आपल्या प्रार्थनेंत आठवण करावी, व त्यांतून जीं देवाकडे फिरलेलीं नव्हतीं त्यांच्यासाठीं फार आग्रहानें काकळूत करावी. त्यांजपासून जीं पत्रें येत त्यांतून कांहीं मजकूर त्यांनीं मला वाचून दाखवावा. एकदां

*ह्यावरून मला पेत्रसाचें १ लें पत्र यावरील लैटनकृत टीकेच्या आरंभींच्या वाक्याची वारंवार आठवण होते. तें वाक्य प्रथम मीं हिंदु असतां फ्रिचर्च वियालयांत दाक्तर मरे मिचल साहेबांच्या वर्गांत माझ्या कानीं पडलें. त्याचा मला कधीं विसर पडला नाहीं, इतकेंच नाहीं तर देवदयेनें तें माझ्या अनुभवासही आलें. तें येणेंप्रमाणें:—"The grace of God in the heart of man, is a tender plant in a strange unkindly soil; and therfore cannot well prosper and grow, without much care and pains, and that of a skilful hand, and which hath the art of cherishing it." एथें अणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे कीं, हाच टीकाग्रंथ टेलर साहेबांपासून मला बक्षीस मिळाला. त्याचा मी एकांतीं वाचण्यांत व शाब्बाथ दिवसाच्या कुटुंबांतील भक्तींत अद्याप उपयोग करीत आहें.

तेथील कालेजांत विद्याभ्यास करीत असलेल्या त्यांच्या एका पौत्रानें आपलें अंत:करण प्रभूला अर्पिल्याचें त्यांस पत्र आलें, तें त्यांनीं मला मोठ्या आनंदानें वाचून दाखविलें व देवाची उपकारस्तुति केली. मुंबईच्या हायकोर्टाचे जज्ज आनरेबल जस्टिस बर्डऊड हेच ते तरुण गृहस्थ होत. तेव्हांपासून ते ख्रिस्ती आचरणानें "आपला तारणारा देव याच्या उपदेशास शोभवीत आहेत;" हें लिहिण्यास मला आनंद वाटतो.* टेलर साहेबांच्या घरीं असतां एकदां मीं कांहींसा आजारी झालों, तेव्हां त्यांनीं अत्यंत ममतापूर्वक माझी शुश्रूषा केली, आणि मजकरितां फार कळकळीनें देवाची प्रार्थना केली. विशेष काय सांगावें, माझ्या प्रिय मातापितरांस दूर राहिल्यानें जें मला दु:ख झालें होतें, त्याबद्दल ह्या ईश्वराच्या सेवकांनीं मला बहुत सुख देऊन माझें समाधान केलें; रेव० बेनन साहेब हे माझे पूर्वीं शाळागुरु होते. त्यांस व त्यांच्या सन्मान्य पत्नीस मीं ख्रिस्ती झाल्यावरून फार संतोष झाला. तेही मजवर फार लोभ करीत. टेलर साहेबांचें ममतेचें वर्त्तन माझ्या वडिलांच्या दिसण्यांत आलें नाहीं असें नाहीं, ते मला भेटावयास आले ह्मणजे त्यांसही कधीं कधीं भेटत; माझी प्रकृति त्यांच्या एथें राहून सुधारली याविषयीं त्यांनीं एकदां मला बोलूनही दाखविलें.

**ख्रिस्ती बांधवांचा सहवास.**

बेळगांवीं जे माझे स्वदेशीय ख्रिस्ती भाऊ होते त्यांच्या सहवासाकडून माझें बहुत हित झालें. ज्यांच्या ठायीं ख्रिस्ती बंधुप्रीति वसत होती अशांच्या संगतीचा मला पहिल्यापासून लाभ झाला, ही मी ईश्वराची मोठी दया समजतों. तेणेंकरून ख्रिस्ताकरितां ज्यांस आईबापें, बंधुबहिणी, घरदार सोडावें लागतें त्यांस ख्रिस्त आपल्या वचनाप्रमाणें ह्या सर्व गोष्टी कोणत्या रूपानें परत देतो, हें मला समजूं लागलें. ह्या भावांनींही प्रभूकरितां संसाराची हानि सोशिली असून ते केवढ्या समाधानवृत्तीनें व एकीनें राहात व लोकांमध्यें

*जस्टिस बर्डऊड यांचे वडील जनरल बर्डऊड यांस मी बेळगांवच्या मिशनस्कुलांत असतां ओळखीत होतों, तेव्हां ते क्यापटन होते. त्यांनीं एकदां मला आपल्या नांवाचा अर्थ सांगितल्याची मला आठवण आहे. तेही टेलर साहेबांप्रमाणें धार्मिक असून हिंदु लोकांचे हितचिंतक होते.

त्यांच्या ख्रिस्ती वर्तनाचा कसा प्रकाश पडत होता हें मीं पाहिलें. अशांपैकीं मिस्तर शिवलिंगापा तटपटी, मि० अजगरणी शिवलिंगापा, मि० जान महंतापा,* मि० जेम्स शांतापा व मि० पौल सिद्धलिंगापा हे होते.

---

*वरील मजकूर लिहून गेल्यावर रेव०जान महंतापा हे मरण पावले. ही शोककारक गोष्ट होण्यापूर्वीं तीन महिने ते आजारी असतां मुंबईस येऊन आपली कन्या डाक्तर गुरुबाई व जामात मि० सुमंतराव ( स्वर्गवासी रेव० विष्णु भास्कर करमरकर यांचे चिरंजीव ) यांच्या एथें उतरले होते. त्यांस मी हें पुस्तक लिहीत आहें असें पूर्वींच समजलें होतें, आणखी त्याविषयीं माझ्यापासून ऐकल्यावर फार संतोष झाला; आणि जी त्यासाठीं कांहीं विशेष माहिती पाहिजे होती ती त्यांनीं तेथें असतांच बेळगांवच्या लंडन मिशनाच्या दप्तरांतून मागवून दिली. त्यांच्या ह्या शेवटच्या भेटीपासून मला बहुत पारमार्थिक लाभ झाला. त्यांचें मन प्रभूच्या येथील कामांत फार गुंतलें होतें, व ते प्रभूच्या गौरवांत जाण्यालाही तयार झाले होते असें मला दिसून आलें. ( वर सांगितलेल्या भावांपैकीं बाकी चौघेजणही आतां प्रभूपाशीं गेले आहेत )

# प्रकरण २०.

## माझें मुंबईस परत येणें.

बाप्तिस्मा झाल्यानंतर माझ्या मनांत ईश्वरविद्येचा व इतर विद्येचा विशेष अभ्यास करण्याचें होतें, परंतु बेळगांवांतील मिशन स्कुलांत तितकें शिक्षण मिळण्याची सोय नव्हती, ह्मणून मीं परत मुंबईस जाण्याचा बेत केला, व तो माझ्या वडिलांस व टेलर साहेबांस कळविला. वडिलांच्या मनांत मीं तेथेंच राहावें असें होतें, परंतु माझा उद्देश जाणून त्यांनीं शेवटीं आपलें अनुमोदन दिलें. माझ्या प्रिय आईचें मत असें होतें कीं, जें झालें तें झालें, परंतु आतां माझ्या नजरेपुढें ऐस ह्मणजे आह्मांस सुख वाटेल. परंतु ह्या समजुतीप्रमाणें मी चाललों असतों तर मला व तिलाही कांहीं लाभ झाला नसता. रोज रोज मला पाहून ती दुःख करीत असे, व तेथें राहण्यानें मला पुढें जो उद्योग करायाचा होता त्याच्या सिद्धतेस व्यत्यय आला असता. असो. बेळगांव सोडण्याचे अगोदर कांहीं दिवस घरीं येऊन राहिलों; मला एक वेगळी खोली दिली होती. मुंबईस जाण्याची सर्व तयारी माझ्या प्रिय आईबापांनीं केली. बरोबर एक स्वयंपाकी व एक गडी दिला. वेंगुर्ल्यापर्यंत घरची दमणी गाडी दिली आणि वाटखर्चास म्हणून पन्नास रु० दिले. टेलर साहेबांनीं पंचवीस रु० दिले. ह्या पित्यासमान देवाच्या वृद्ध व प्रेमळ पुरुषाची शेवटची भेट घेतेवेळीं त्यानें मला एकांतीं नेऊन मजकरितां परमेश्वराची फार मोठ्या आस्थेनें दीर्घ प्रार्थना केली, आणि मला पोटाशीं धरून ढळढळां रडले. याप्रमाणें त्यांचा व मातेसमान ममताळु मिसेस टेलर मडमसाहेब यांचा व काका काकी यांसमान मिस्तर बेनन व मिसेस बेनन यांचा व सर्व खिस्ती भावांबहिणींचा निरोप घेऊन घरीं आलों; आणि तेथून वेंगुर्ल्याच्या वाटेनें मुंबईस जाण्याकरितां ता० २० नवेंबर १८५४ रोजीं निघालों. मला पोंचविण्याकरित

प्रिय मातापितरें सर्व लेंकरांबाळांसुद्धां गांवाच्या बाहेर वरींच दूर आलीं. आणि जेव्हां मीं त्यांस परत जाण्याविषयीं विनंती केली, तेव्हां सर्वांनीं मिळून परत घरीं येण्याविषयीं मला फार आग्रह केला. माझ्या बेतास अनुमोदन दिल्यावर व वाटेची इतकी सर्व तयारी केल्यावर पुनः अशा ठिकाणीं मला परत नेण्याविषयीं इतका आग्रह कां व्हावा हें मला समजेना. बरोबर जीं चाकरमाणसें होतीं तीं देखील मला तसेंच ह्मणूं लागलीं, व सर्वांनीं मुलां-सारिखा एकच टाहो घेतला कीं परत घरीं चल. याप्रमाणें सुमारें अर्धा तास मार्गावर खोटी झाली. वाटेनें जाणारे लोकही माझ्या गाडीभोंवतीं मिळाले. हा मोठा परीक्षेचा व आणीबाणीचा प्रसंग होता, परंतु देवानें त्या वेळीं मला शक्ति दिली, तेणेंकरून माझा निश्चय ढळला नाहीं. मी त्यावेळीं उघड रीतीनें सर्वांकरितां प्रार्थना करून व सर्वांचा निरोप घेऊन निघालों.

मार्गांत स्वयंपाक करून घालण्याकरितां जो कुडाळदेसकर ब्राह्मण होता त्याला मीं आत्मिक अन्नाविषयीं सांगावें व देवाचें शास्त्र वाचून दाखवून प्रार्थना करावी. वेंगुर्ल्यास पोंचल्यावर आगबोटीला अवकाश असल्यामुळें तीन दिवस राहणें पडलें, त्या अवकाशांत ह्मणजे नवेंबराच्या २ ऱ्या तार-खेस मुंबईस जें महावादळ झालें त्यावर कांहीं विचार लिहिले, ते ता० १ दि० च्या ज्ञानोदयांत छापले आहेत.

आगबोटीवर चढल्यावर तेथें कोणी ओळखीचें नसतां देवानें माझें सहाय केलें, तें असें कीं, उतारू लोकांत मलबाराकडील एक पारशी व्यापारी होता, त्यानें मीं कोण कोठून आलों अशी विचारपूस करणें सुरू केलें. त्याच्या प्रश्नांस उत्तर देत असतां मला वाटलें कीं, मी ख्रिस्ती आहें असें ह्याला समजल्यावर हा माझी थट्टा करील व पुनः माझ्याशीं बोलणार नाहीं, परंतु त्यानें तसें न करितां मजशीं फार स्नेहाचें वर्तन केलें. तो व त्याचा मोठा मुलगा, व त्याजवळ असलेले कित्येक मलबारी रो० का० व्यापारी यांनीं मला नित्य सकाळीं व सायंकाळीं आपल्याबरोबर जेवायास बोलवावें ! व त्या गृहस्थाच्या मुलानें तर फारच भाऊपणा दाखविला. त्यांच्या उपका-राची फेड करायास माझ्यापाशीं कांहीं नव्हतें. ते जेवणाचे पैसे घेणारे तर

नव्हतेच; तेव्हां मला प्रिय आईनें दिलेली जी मोठी फराळाची पिशवी होती ती सगळी मीं त्यांस दिली. मुंबईच्या बंदरांत उतरल्यावर त्या बापलेकांनीं मला आपल्या घरीं येण्याविषयीं फार आग्रह केला, परंतु माझें जाणें झालें नाहीं. त्या सफरींत "परमेश्वर माझा मेंढपाळ आहे, मला उणें पडणार नाहीं, माझ्या शत्रूच्या देखतां मजपुढें तूं मेज मांडतोस" अशी एका प्राचीन भक्ताच्या अनुभवाची प्रचीती मला पुन: आली.

मुंबईतील मित्रांकडून आगतस्वागत.

मुंबईस येऊन पोंचल्यावर रेव० दाक्तर उइलसन, रेव० राबर्ट निसबिट, रेव० धनजीभाई नवरोजी, रेव० नारायण शेषाद्री यांनीं व इतर ख्रिस्ती भावाबहिणींनीं माझें प्रेमपुरस्सर आगतस्वागत केलें.* प्रथम कांहीं महिने रेव० नारायण शेषाद्रि यांच्या घरीं राहिलों. यांचा माझा पूर्वसंबंध गुरुशिष्याचा होता, आतां त्यास धर्मबंधूचा जोडला. मुंबईत प्रथमच ह्या बंधूच्या घरीं मला जागा मिळाली ही फार मोठ्या लाभाची गोष्ट झाली; त्यांनीं व त्यांची प्रिय पत्नि यांनीं माझा सुखदु:खांत घरच्या प्रमाणें संभाळ केला, कोणत्याही गोष्टीचें मला उणें पडूं दिलें नाहीं. माझ्या वडिलांस देखील मी एथें राहिल्यावरून फार

---

* ज्या दिवशीं मी आगबोटीवरून उतरलों तो आदित्यवार होता. मी आल्याची वातमी निसबिट साहेबांस कळल्यावरोबर त्यांनीं मला एक चिठी पाठविली ती येणेंप्रमाणें:—

Girgaum, 19 Novr. 1854.

My Dear Baba,

With much joy and thankfulness, I welcome you to Bombay. May our intercourse be abundantly blessed and greatly profitable to you and to us.

Since hearing of your arrival I have been preparing to preach, and I go to service at the jail; else I should have come to see you.

Yours in much affection,

R. Nesbit.

ह्या चिठींतील मजकुराचा सारांश असा आहे कीं, 'तुमच्या येण्याकडून मला मोठा आनंद झाला व त्याबद्दल मी देवाचे उपकार मानितों. तुमचें आमच्यामध्यें राहणें आशीर्वादित व परस्परांस लाभदायक होवो.' इ०

बरें वाटलें. एथें मला दैहिक अन्नाखेरीज उत्तम आत्मिक अन्न व ख्रिस्ती वर्त्तनाचा कित्ता मिळूं लागला.*

---

* हें पुस्तक अर्धें अधिक छापून झाल्यावर प्रिय बहीण मिसेस नारायण (सयीबाई) पुणें मुक्कामीं निवर्त्तली. (ता० ३०अक० १८८७) ह्या दुःखाच्या प्रसंगीं ईश्वरी सूत्रानें मी तेथें होतों, व ह्या बहिणीच्या प्रिय नातलगांबरोबर तिच्या दुखण्यांत तिचा परामर्ष घेण्याचा व अल्पस्वल्प सेवा करण्याचा मला प्रसंग मिळाला ह्मणून देवाचे उपकार मानितों. मी ख्रिस्ती झाल्यापासून ह्या भगिनीनें मजवर बहुत उपकार अनेक स्थळीं व अनेक प्रसंगीं केले; माझ्या पहिल्या ख्रिस्ती लग्नांत माझें पुष्कळ सहाय केलें. ह्या सर्वांची फेड प्रभु त्या दिवशीं (२ ति० ४:८) करील. हें पुस्तक विशेष आवडीनें वाचतील अशी ज्यांविषयीं माझी आशा आहे त्यांतून तीन मित्र ईश्वरानें ह्याची प्रसिद्धी होण्यापूर्वींच आपल्यापाशीं नेले. त्यांपैकीं दोघांच्या मरणाची सूचना यांत आलीच आहे. तिसऱ्याची या पुस्तकांतील गोष्टींशीं संबंध नसल्यामुळें लिहितां आली नाहीं, तरी ह्या स्थळीं त्यांचें नांव स्मरणार्थ घातलें पाहिजे. ते मित्र अहमदनगर एथील अमेरिकन मिशनांतील **रेव० रामकृष्ण विनायक मोडक** हे होत. हे प्रिय बंधु बहुत दिवस आजारी होते. त्यांस भेटण्याच्या हेतूनें ज्या दिवशीं मी नगरास गेलों त्याच्या पूर्व दिवशीं ते सर्व दुःखांतून सुटून प्रभूपाशीं गौरवांत गेले होते. त्यांनीं मरणकाळीं आपल्या प्रिय मुलांस जो बोध केला तो सांगून हें टिपण पुरें करितोंः—ते ह्मणाले, ‘विश्वासांत राहा,’ मिळून राहा,’ ह्या चार शब्दांत चार शुभवर्त्तमानाच्या बोधाचें सार आहे.

# प्रकरण २१.

## मी ख्रिस्ती झाल्यानंतरचें माझ्या वडिलांचें व इतरांचें मजशीं वर्त्तन.

बहुत लोकांची अशी समजूत आहे कीं, कोणी हिंदु ख्रिस्ती झाला ह्मणजे तो आपल्या आप्तांपासून अगदीं वेगळा होतो. ते त्यांशीं संबंध ठेवीत नाहींत, व तोही त्यांची पर्वा करीत नाहीं. ही समजूत सर्व प्रकारें खरी नाहीं. कोणी कोणी आपल्या ख्रिस्ती झालेल्या नातलगांशीं कांहीं काळ राग धरून निष्ठुरतेनें वागतात खरे, परंतु पुढें त्यांचा राग शांत होतो. ते आपल्या मनाची अशी समजूत करितात कीं त्याच्या दैवांत जें होतें तें झालें, आतां हा कोठें तरी सुखी असो. परंतु यापेक्षांही उत्तम विचार करणारे सुज्ञ जन आहेत, ते ह्मणतात कीं, आमच्या ह्या नातलगानें कांहीं चोरी लबाडी करून आमची अबरू गमाविली नाहीं; त्याच्या मनाला जो धर्म आवडला तो त्यानें पत्करिला, आमच्या मध्यें संसार सोडून गोसावी बैरागी होत नाहींत काय, तर त्याला आतां छळून काय उपयोग? अशा विचारानें ते आपल्या मनाचें समाधान करून त्याच्याशीं सुज्ञतेनें वागूं लागतात.

वडिलांचें वर्त्तन.

माझे सुज्ञ व प्रिय वडील मजशीं अशाच विचारानें वागूं लागले. ते आपल्या कागदोपत्रीं मला "चिरंजीव" व "मिस्तर" असें लिहीत, व जेव्हां मला पाळकाची दीक्षा मिळाली, तेव्हां रेव. असें लिहूं लागले. त्या पदवीचा त्यांस मोठा अभिमान वाटत असे. मी ख्रिस्ती झाल्यावर बेळगांवीं दोनदां त्यांस भेटायास गेलों, तेव्हां जरी वेगळ्या घरांत राहत असें, तरी दोन्ही वेळां त्यांनीं आपल्या खर्चानें घर भाड्यानें घेऊन दिलें होतें, त्यांच्या एथें कोणीही नवीन व थोर गृहस्थ भेटायास आले असतां त्यांस माझ्याविषयीं सांगायास लाजत नसत; व त्यांस माझ्या बिन्हाडीं आणून भेटवीत, अथवा मला आपल्या घरीं बोलावून घेत. एकदां त्यांनीं श्रीमंत कुरुंदवाडकर द्वय बंधु यांजपाशीं माझी

गोष्ट काढली, व त्यांस भेटायास जाण्यास मला सांगितलें व त्याप्रमाणें मी गेलों. तसेंच घरांत कोणी मूल वगैरे आजारी पडलें असतां मी त्याकरितां त्यांच्या जवळ प्रार्थना करण्याची व घरच्या मनुष्यांस शास्त्र वाचून दाखविण्याची परवानगी मागितली असतां कांहीं आडवें न घेतां ती त्यांनीं द्यावी. याप्रमाणें मीं कित्येक वेळां केलें. माझ्या सांगण्यावरून त्यांनीं भूत, पिशाच, मंत्र, पंचाक्षरी इत्यादिकांवर विश्वास ठेवण्याचें हळु हळु सोडून दिलें. एकदां माझ्या एका बहिणीस कांहीं भूतबाधा झाली असें समजून ते माझ्याकडे आले, आणि कोणी पंचाक्षरी आणिला होता, परंतु त्याजपासून कांहीं झालें नाहीं असें सांगून बैबलांत भूतांविषयीं काय सांगितलें आहे असें विचारूं लागले. तेव्हां ख्रिस्ती शास्त्रांत भूतांची उत्पत्ति कशी सांगितली आहे, व सैतान कोण व मनुष्यांस तो कसा छळतो इ० मी सांगितल्यावर, प्रभु येशू ख्रिस्त मनुष्याच्या अंगांतून भूतें कशीं घालवीत असे, त्याला मंत्र, छांछू उतारे वगैरे कांहीं करावे लागत नसत; परंतु केवळ त्याच्या शब्दाच्या सामर्थ्यानें भूत त्याचें ऐकून जात असे याविषयीं नव्या करारांतील एक गोष्ट वाचून दाखविली; तेव्हां ते ह्मणाले कीं तो तर ईश्वरी अवतार होता, त्याला छांछूची गरज नव्हती.

**घटस्फोटाचा नाकार.**

मी ख्रिस्ती झाल्यावर माझ्या वडिलांस माझा घटस्फोट करायास कोणी सुचविलें, परंतु त्यांनीं ती गोष्ट अगदीं कबूल केली नाहीं. तसें करणें ह्मणजे मला मेल्याप्रमाणें मानणें असें होतें, व पुढें माझें तोंड पाहणें अथवा माझ्याशीं बोलणें व कोणत्याही प्रकारचा संबंध राखणें हें हिंदुधर्माप्रमाणें त्यांस उचित नव्हतें. परंतु माझ्या विचारी व सुज्ञ वडिलांनीं तिकडे अगदीं लक्ष्य दिलें नाहीं. ते माझ्या धर्मसंबंधी मनोभावनांचा मान राखीत व त्यांस दुखवूं नये ह्मणून जपत. एकदां त्यांच्या संगतीं मी बेळगांवाहून पुण्यास येत असतां मार्गांत दोन शाब्बाथ (आदितवार) पडले, त्या दिवशीं त्यांनीं माझ्या करितां मुक्काम केला; आणि भाड्याच्या गाडीवाल्यांस त्या दिवसांचा भत्ता दिला. मार्गांत दोनप्रहरीं जेथें आह्मीं उतरावें तेथें मी एखाद्या झाडाखालीं बसून शास्त्र वाचून प्रार्थना करीत असें, ती होईपर्यंत स्वयंपाक तयार झाला असला तरी ते मला भोजनास हाक मारीत नसत. आईनें हाक मारिली असतां "त्याची प्रार्थना होऊं दे" असें त्यांनीं ह्मणावें. त्याप्रमाणेंच

आदितवारीं मला कांहीं संसाराचें काम करण्याविषयीं सांगत नसत अथवा घरीं येऊन संसारसंबंधी गोष्टी बोलत नसत.

माझ्या खिस्ती लग्नास सहाय.

माझ्या पहिल्या खिस्ती लग्नाच्या वेळीं वडिलांनीं सहायार्थ शंभर रु० दिले. ज्या तरुण सुशील खिस्ती मुलीशीं मी लग्न करणार होतों तिच्याविषयीं त्यांस कळविल्यावर त्यांनीं जें आनंदप्रदर्शक पत्र पाठविलें त्यांत असें लिहिलें कीं, 'जास्ती रकम दिली असती परंतु एक हजार रु० च्यावर जास्त रकम नुकतीच व्यापारांत गुंतविली आहे ह्मणून देववत नाहीं.' त्याच पत्रांत माझ्या पूर्वीच्या हिंदु बायकोची, कारण पडल्यास अन्नवस्त्राची सोयी करून देण्याची इच्छा दर्शविली. "तिच्या खर्चाविषयीं आह्मांकडे मर्जीनुरूप राहील तर चार मनुष्यांबरोबर तिला अन्नवस्त्र श्रीपरमेश्वराचे कृपेनें आमच्यापासून देववेल तें देण्यास अंतरणार नाहीं."(ता० १८ जुलै १८६०.) याप्रमाणें शेवटपर्यंत माझ्या वडिलांनीं मजवर प्रीति करून मजशीं परम स्तुत्य वर्त्तन ठेविलें. मींही त्यांच्याशीं आपलीं खिस्ती कर्त्तव्यें करण्याविषयीं यथाशक्ति झटलों. मीं खिस्ती झाल्यानंतर त्यांजवर दुष्ट लोकांच्या कुंवटाळामुळें तीन महा संकटें आलीं त्यांत त्यांचें सहाय केलें, व देवानें कृपा करून त्यांतून त्यांस पार पाडलें; तेणेंकरून त्यांस मीं भावार्थी खिस्ती आहें याविषयीं व विशेषेंकरून खिस्ती लोकांचा देव प्रार्थना ऐकणारा देव आहे या गोष्टीचें चांगलें प्रमाण व उदाहरण मिळालें. मी खिस्ती झाल्यावर आमच्या घरांतील वाऱ्यांचें बंड व जोशादिकांचें थोतांड बरेंच कमी झालें, व माझ्या कानावर त्यासंबंधीं कांहीं गोष्टी आल्या ह्मणजे मीं निषेधात्मक जीं पत्रें पाठवावीं त्यांवरून बराच सुपरिणाम होई.

माझे सन्मान्य काकाजी.

पूर्वीच्या हकीकतीवरून वाचकांस स्मरत असेल कीं, माझे चुलते मजवर आरंभीं बरेच रागावले होते, परंतु त्यांचा राग पुढें अगदीं शांत झाला. माझें खिस्ती लग्न झाल्यावर मीं पुण्यास राहिलों असतां तेही तेथेंच होते, तेव्हां ते माझ्या घरीं येत जात इतकेंच नाहीं, तर एकदां (ता० १९ जून १८६४) त्यांनीं मला सहकुटुंब आपल्या घरीं बोलावून मेवामिठाई, हारतुरे, अत्तरगुलाब, पानसुपारी वगैरे देऊन मी कुटुंबवत्सल झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला. त्या

प्रसंगीं त्यांनीं आपले कित्येक इष्टमित्रांसही बोलाविलें होतें, त्यांपैकीं त्यांचे व माझे प्रिय आप्त व सुमित्र, डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांच्या हपिसांतील रा० रा० गोपाळ रावजी मुळे ह्यांसही आमंत्रण केलें होतें. ते जेव्हां आबेसिनीयाच्या स्वारीबरोबर पे हपिसाच्या संबंधानें गेले, तेव्हां त्यांनीं आपला पगार माझ्या नांवावर लिहून देऊन घरची व्यवस्था पाहण्याचें मजकडे सोंपलें होतें. याप्रमाणें त्यांनीं शेवटपर्यंत मजवर लोभ ठेविला. ते १८८४ च्या फेब्रुवारींत मुंबईस मरण पावले, त्या वेळीं मी सिंहस्थाची यात्रा पाहण्याकरितां व उपदेश करण्याकरितां नाशिक, त्रिंबक, येथें गेलों होतों, तेव्हां त्यांनीं आपल्या दुखण्यांत माझी आठवण करून माझ्या भेटीची इच्छा दर्शविली. ते वारल्यावर केवळ दुसऱ्याच दिवशीं मीं मुंबईस परत आलों.

**माझीं इतर नातलगें.**

बेळगांवाहून मुंबईस आल्यावर तेथें राहत असलेल्या माझ्या दोघी बहिणींची मला बहुत दिवस भेट झाली नाहीं. त्यांचे भ्रतार व सासरचीं दुसरीं मनुष्यें मजवर फार रुसलीं होतीं. पुढें त्यांनीं मला आपल्या घरीं येण्याची परवानगी दिली, परंतु शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या लज्जेमुळें रात्रीं यावें ह्मणून सांगितलें. असें कित्येक दिवस चालल्यावर मला दिवसां येण्याची मोकळीक मिळाली. मग हळूहळू घरचीं माणसें माझ्या बिऱ्हाडीं येऊं लागलीं. नंतर सणावारीं कांहीं मिष्टान्न पाठवूं लागलीं, तेंही प्रथम बिनकल्हईच्या भांड्यांत, मग कल्हयीचीं भांडीं येऊं लागलीं. नंतर मीं त्यांच्या घरीं प्यायास पाणी मागितलें असतां प्रथम ग्लासांत, मग धातूच्या पात्रांत देऊं लागले. कांहीं वर्षांनीं पुण्याहून मी सहकुटुंब मुंबईस आलों, तेव्हां कित्येक नातलगांनीं आह्मांस मोठें जेवण पाठविलें, कित्येकांनीं मुलांस घरीं नेऊन मेवामिठाई दिली; कित्येकांनीं आपल्या घरीं जेवायास बोलाविलें. अशी उत्तरोत्तर दयालोभाची वृद्धि होत गेली, आणि परमेश्वराच्या कृपेचा अधिकाधिक अनुभव येत चालला.

**जातिबांधवांची वागणूक.**

मुंबईस आल्यावर कांसार लोकांतून कोणी बरेच दिवस मजशीं बोलत नसत. मला पाहून नजरेनें धिःकारीत, कोणी दुःखाची मुद्रा धारण करीत, कोणी टकमकां पाहून आश्चर्य करीत उभे राहात; कोणी कांहीं दुःखाचे किंवा धिःकाराचे उद्गार काढून चालते होत. कित्येकांस पाहून मलाच भय वाटावें, परंतु

खरें मित्रत्व दाखविणारा असा केवळ सर्व मुंबईंतील कांसार जातींत एकच गृहस्थ त्यावेळीं होता, त्याचें नांव रा० रा० रावजी मेघःश्याम साळवे. हे रावजी शेट चांदीचें काम करीत असत. त्यांची मोठमोठ्या पारशी, वाणी वगैरे लोकांमध्यें फार गिऱ्हाइकी व पत होती. ह्या मित्रानें मात्र माझा पूर्वीचा स्नेह तोडला नाहीं. त्यांच्या घरीं गेलों ह्मणजे हिंदु रीतीप्रमाणें माझें आदरातिथ्य करावें. त्यांचें हें वर्त्तन पाहून त्याच्या घरचीं व दुकानांतलीं माणसेंही माझा मान ठेवीत. त्यानें माझ्या बिऱ्हाडीं येऊन पुष्कळ वेळ ख्रिस्ती बुकें वाचत बसावें; आणि धर्मसंबंधी चर्चा करावी. त्याला हिंदु धर्माची माहिती बरीच होती, प्राकृत गीता वगैरे तोंडपाठ येत होती. जोंपर्यंत मला आपल्या एका बहिणीच्या घरीं जाण्याची मोकळीक नव्हती, तोंपर्यंत ह्यानें तिला आपल्या घरीं बोलावून आणून मला भेटवावें. ते वारल्यावर त्यांच्या घरचीं मनुष्यें मजवर तसाच लोभ करीत आहेत.*

---

*एका मनुष्याच्या सुज्ञ वर्त्तनाची छाप किती जणांवर बसते व ती किती काळ राहते ह्याचें उदाहरण रा० रावजी शेट यांच्या गोष्टींत मिळतें. ते १८८० सालीं मुंबईंत निवर्तले. त्यांच्या मरणाचें वर्त्तमान मला कोणी कळविलें नाहीं, पण ते आजारी आहेत असें ऐकतांच मी त्यांच्या समाचारास गेलों, तों तेथें त्यांच्या मरणाच्या अकराव्या दिवसाचे विधीस त्यांचे ज्ञातिगृहस्थ मिळाले असून भोजन उरकून पानसुपारी वांटणें चाललें होतें. अशा प्रसंगीं मला तेथें उभें राहणें बरें वाटलें नाहीं, परंतु मृताच्या बंधूनें मला अत्याग्रह करून त्या मंडळींत प्रमुखस्थानीं नेऊन बसविलें व विडा दिला. जातीच्या आचाराप्रमाणें पाहिलें असतां असें करणें योग्य नव्हतें. परंतु त्यावेळीं स्नेहानें जातीला जिंकिलें. यांत विशेष आश्चर्याची गोष्ट ही होती कीं, त्या दुःखी कुटुंबांत नवीन सुधारणुकीनें एकही पाऊल टाकिलें नव्हतें. ज्यांच्या घरीं ही सुधारणूकबाई रात्रंदिवस पाणी भरते अशांतून बहुतेकांच्या उंबऱ्याच्या आंत नेटिव ख्रिस्तीचें पाऊल पडलें असतां त्यांस या, बसा असें म्हणायास देखील जनलज्जेमुळें धैर्य होत नाहीं! कित्येक सुधारलेल्यांचे पुढारी ख्रिस्ती लोकांबरोबर मार्गांत चालण्यासही लाजतात, असें माझ्या अनुभवास आलें आहे.

माझ्या देशबांधवांमध्यें जे माझे स्नेही होते त्यांतून बहुतेकांनीं पूर्ववतच माझ्याशीं स्नेह ठेविला, त्यांत विशेषेंकरून जे शाळामित्र व सहाध्यायी होते त्यांनीं कांहीं अंतर पडूं दिलें नाहीं. त्या सर्वांचीं नांवें एथें देतां येत नाहींत; परंतु दोघांचीं ह्मणजे युनिवर्सिटी हपिसांतील रावसाहेब गणपतराव मोरोबा पितळे व रा० रा० जनार्दन रामचंद्रजी यांचीं नांवें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. रा० जनार्दनजी हे केवळ स्नेह ठेवतात इतकेंच नाहीं तर मित्रत्वाच्या नात्यानें व निर्लोभ बुद्धीनें बहुत प्रकारचें सहाय करितात. (हे दोघेही मित्र आतां परलोकवासी झाले आहेत.)

इतर हिंदु व सुधारलेले मित्र.

आतां ह्या पुस्तकाची समाप्ति केली पाहिजे. हें केवळ मनोरंजनार्थ अथवा तीस चाळीस वर्षांमागें महाराष्ट्र देशांत सुधारणूक व विद्या हीं कशीं वाढत गेलीं यांविषयीं माहिती करून देण्यास ह्मणून लिहिलें नाहीं; तर याचा मुख्य उद्देश व यावरून घेण्याजोगा बोध यांतील "सिंहावलोकन" नांवाच्या दोन प्रकरणांत (प्र० ९ व १५) विस्तारानें दर्शविला आहे, तर ज्यानें मला **गाढ अंधकारांतून आपल्या आश्चर्यकारक प्रकाशांत** बोलाविलें (१ पेत्र २:९.) त्याची मी नम्रतेनें व अनन्यभावानें स्तुति करितों, मजसंगतीं माझे प्रिय ख्रिस्ती बंधुही करितील यांत संशय नाहीं.

प्रिय हिंदु बांधवहो, ही गोष्ट वाचून तुह्माला कसें वाटतें? ख्रिस्ती धर्मांत मनुष्याला पापापासून वळवून ईश्वराकडे नेण्याचें सामर्थ्य आहे किंवा नाहीं? ह्या प्रश्नाचें उत्तर मिळविण्यास तुह्माला या माझ्या गोष्टीपासून पुष्कळ सामग्री मिळेल. तुह्मांमधून ज्यांची ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेविषयीं खातरी झाली असून ज्यांनीं आपलें अंतःकरण प्रभूला अर्पिलें नाहीं त्यांनींही ह्या अनुभविक गोष्टीपासून बोध घ्यावा. प्रभु ख्रिस्ताला सर्वोपरी स्वीकारिल्यावांचून मनाला कधीं खरी शांति प्राप्त होत नाहीं, जे त्याला अनन्यभावें शरण जातात त्यांस तो कधीं अंतर देत नाहीं. "**जो कोणी मजकडे येतो त्याला मी घालविणारच नाहीं,**" असें त्याचें सत्य व आश्वासनदायक वचन आहे. ह्या दोन्हीं गोष्टींचीं प्रमाणें ह्या पुस्तकांत जागोजाग सांपडतील. त्यांचें मनन करून तुह्मी निःपक्षपाती न्यायाधिशाप्रमाणें आपली खातरी करून घ्यावी, व तदनुसार आपलें वर्त्तन पालटावें.

आतां कोणी कदाचित हें समग्र पुस्तक वाचूनही मला असें विचारतील कीं, तुह्माला इतका व्यवसाय करून काय लाभ झाला? तर त्यांस ३३ वर्षांच्या अनुभवावरून मी सत्य सांगतों कीं, मला मोठे लाभ झाले; ते असे कीं, तारण ह्मणजे पापाची क्षमा, नवीन अंतःकरण ह्मणजे पाप जिंकण्यास, सदाचरणानें चालण्यास व देवाची सेवा करण्यास शक्ति, आणि मरणानंतर सत्सुख प्राप्तीची ह्मणजे अखंड ईश्वरोपभोगाची सजीव आशा हीं मिळालीं आहेत.

# ईश्वरस्तव.

परमेश्वराला स्तवा, परमेश्वराच्या सेवकांनो, स्तवन करा, परमेश्वराच्या नामाची प्रशंसा करा. आतांपासून सर्वकाळपर्यंत परमेश्वराचें नांव सुवंदित असो. सूर्याच्या उगवतेपासून त्याच्या मावळतेपर्यंत परमेश्वराचें नाम स्तवायाचें आहे. सर्व लोकांवर परमेश्वर उंच आहे, आणि त्याचें ऐश्वर्य आकाशावरतीं आहे. परमेश्वर जो आमचा देव उंच स्थानांत राहतो त्यासारखा कोण आहे? जो आकाश व पृथ्वी यांस पाहण्यास आपलें मन लावतो तो. तो दीनास धुळींतून उठवितो, दारिद्र्यास उकिरड्यावरून उचलितो, थोर जनांमध्यें, आपल्या लोकांतल्या श्रेष्ठ जनांमध्यें त्याला बसवायाला परमेश्वराला स्तवा. (गीत ११३.)

हे परमेश्वरा, तूं माझा देव आहेस, तुला मी थोर मानीन, तुझ्या नामाला स्तवीन, कारण त्वां आश्चर्यकर्मैं केलीं आहेत, तुझे पुरातन संकल्प विश्वासू व सत्य आहेत. (यशा. २५:१.)

देव जो आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताकडून आह्मास जय देतो, त्याची उपकारस्तुति असो. (१ कर. १५:५७.)

# पुरवणी.

## अंक १. ( पृ० १५२ पहा. )

### ज्ञानप्रकाशकर्त्ते यांस.

भरतखंडांत इंग्रज लोकांचें राज्य झाल्यापासून व विद्या व सुशिक्षा वाढल्यापासून अलीकडल्या नवीन तरुण हिंदु विद्वज्जनसमूहांत बहुत प्रकारचे फेरफार होऊं लागले आहेत. त्यांच्या वाडवडिलांच्या समजुती, चाली, इत्यादि अंधपरंपरागत अज्ञानाचा तीव्र नाश होत चालला आहे. आपल्या देशाची ही अत्यावस्था होण्यास काय कारणें झालीं, याचा सत्य शोध व त्यांची सुधारणा करण्याविषयीं युक्त जे उपाय यांचा विचार करण्याकरितां चहूंकडे हेतुपूर्वक उद्योग चालला आहे, व त्यांस मार्ग दाखविण्याकरितां प्रभाकर, ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश हे आपले दिवे प्रज्वलित करीत आहेत. या सर्वांच्या योगानें चांगला उजेड पडून बहुतेकांस आपल्या वडिलांच्या आडवाटा दिसून ते राजमार्गावर येऊं लागले आहेत. परंतु महाराज! पुढें ते कोणत्या स्थानाप्रत जातील हें कोणास माहीत नाहीं; ह्मणजे त्यांस आपण कोणत्या शेवटच्या ठिकाणीं जाऊन चिरकाल राहूं ही आशा नाहीं. हें कसें ह्मणाल तर ऐका.

विद्येच्या योगानें बहुतेक हिंदूंचा विश्वास स्वधर्मावरून उडत चालला आहे, व उडाला ह्मटलें तरी चिंता नाहीं. मूर्तिपूजेचा व जातिभेदाचा बहुतेकांस त्रास व द्वेष वाटतो. रामकृष्ण इत्यादि अवतार हे मानवी राजे होते असें प्रसिद्धपणें बोलूं लागले आहेतच, मग त्यांस हिंदू धर्मांतील कसें ह्मणावें? कित्येकांनीं तर ख्रिस्ती मत स्वीकारलेंच आहे. मला वाटतें कीं हें त्यांनीं बरें केलें. कारण कीं आतां जे हिंदु धर्म किंवा ख्रिस्ती धर्म किंवा कोणतेंही मत कबूल करीत नाहींत, त्यांची गति कशी काय होईल हें मला समजत नाहीं. त्यांस त्यांची विद्या, सुशिक्षा, नीति, सदाचरण, हीं सर्व विषवत् झालीं आहेत. त्यांतून कित्येक असें ह्मणतात कीं, एक ईश्वर आहे, त्याचें भजन करावें ह्मणजे झालें. कोणी ह्मणतात कीं, खावें, प्यावें, खुशाल मौजा माराव्या व मरण येईल तेव्हां मरावें ह्मणजे झालें. असे नाना प्रका-

र्चे मार्ग त्यांस दिसूं लागले आहेत; याचें कारण मला वाटतें कीं, आपल्या मिश्रवर्ण दिव्यांच्या ज्योतीकडे आहे. आपल्या ज्ञानप्रकाश दीपाच्या ज्योतीचा रंग निराळाच, व ज्ञानोदयाचाहि चमत्कारिक, प्रभाकराचा तर एक तऱ्हेचाच, व ज्ञानप्रसारकाचाहि त्यापेक्षां विलक्षण. या सर्वांपासून अनेक प्रकारचीं किरणें उत्पन्न होऊन जे राजमार्गावर चालतात त्यांस त्या विचित्र किरणांच्या योगानें पुष्कळ रस्त्यांचा भास होतो व ते त्यांवर चालूं इच्छितात, परंतु शेवटीं कोणतेही वाटेस लागत नाहींत. कारण कीं पुढें त्यांस त्या किरणांचा प्रकाश न मिळतां ते अंधारांत भटकूं लागतात. महाराज, आपणांतून ज्ञानोदयाचा उजेड त्याच्या मार्गांत चालणाऱ्यांस आजपर्यंत बराच पोंहोचत आहे. पण आपणाकडून या वाटसरांस अर्ध्याच मार्गाची बिदागी होते. पुढें त्यांस उपाशीं मरावें लागतें. यांत माझा भावार्थ इतकाच कीं, आपल्या पत्रद्वारें आजपर्यंत येथील लोकांची या पृथ्वीवरील व्यवहार कर्त्तव्यापुरती बरीच सुधारणूक होत आहे. परंतु परलोकीं जी त्यांची अविनाशी वस्ती आहे तेथें जाण्याविषयीं त्यांस मार्गाची कांहींच सामुग्री किंवा दाखला मिळत नाहीं. तर पुढें त्यांनीं कोणता विचार करावा याविषयीं मोठें गूढ येऊन पडलें आहे.

कोणी ह्मणतात कीं, सृष्टिजन्य ईश्वरीज्ञानाचे उजेडानेंच आह्मी दिव्य नगराचा पंथ शेवटपर्यंत क्रमूं. तर त्यांस मी असें विचारितों कीं, त्या नगराचें वर्णन तुह्मांस त्या उजेडाचे योगानें कसें प्राप्त होईल? तुह्मांस तिकडील वर्त्तमान कोणीं सांगितलें आहे, व तुमच्याजवळ तेथील राजास दाखविण्यास काय दस्तऐवज आहे? व असला तरी तो तुह्मांस कोणीं दिला? व तेथें त्या देणाराची ओळख व वजन आहे कीं काय? किंवा दुसरा विचार असा उत्पन्न होतो कीं, मरणानंतर मनुष्याची अवस्था कोणत्या प्रकारची होईल, हें सृष्टिजन्य ईश्वरी ज्ञानावरून कळत नाहीं. कोणी ह्मणतात कीं, मनुष्यास अनेक जन्म प्राप्त होतात, कोणी ह्मणतात कीं मनुष्यास एकच जन्म आहे, कोणी ह्मणतात मनुष्याचा आत्मा हा वायु आहे, तो शरीरांतून गेला ह्मणजे वाऱ्यांत वारा मिळून जातो. दुसरें असें कीं, मनुष्य पापी आहे: व ईश्वर परम पवित्र आहे त्यास पाप अगदीं सोसत नाहीं. तर त्याजवळ पापी मनुष्य कसा जाईल? जर ईश्वराचे दयेवर भरंवसा ठेवावा तर त्याच्या न्यायास बाध येतो. सर्व लोक पाप करून देवा आह्मांवर

दया कर, असें ह्मणतील. तिसरें असें कीं, आपण स्वतः पुण्य करून तरावें तर आपलें पाप अपार आहे, तें जाण्यास आपल्याकडून अनंत पुण्य होत नाहीं. याप्रमाणें सृष्टिज्ञानावरून या प्रश्नांचीं उत्तरें मिळत नाहींत. आणि पाहिलें असतां या मुख्य सिद्धांतांची मनुष्यमात्रास गरज आहे, आणि यांचा निवाडा झाला पाहिजे. यास्तव जे कोणी वर सांगितलेल्या पंथांचे सुज्ञ विद्वान् असतील त्यांस माझी विनययुक्त प्रार्थना आहे कीं, त्यांनीं आपल्या आत्म्याचें तारण करण्याकरितां कोणते मार्ग शोधून काढिले असतील तर ते जर जगप्रसिद्ध करितील तर बहुतांवर त्यांचे उपकार होतील.

मुक्काम मुंबई,<br>तारीख १ फेब्रुआरी;<br>१८५१.

तुमचा मित्र,<br>सत्य ईश्वरोक्त शास्त्रशोधक,<br>फ्रिचर्च शाळेंतील विद्यार्थी.

## अंक २. (पृष्ठ १६५ पहा.)

## ठाकुरद्वार एथील व्याख्यानांचा मासला.

विनंती विशेष, ता० १२ दिसेंबर रविवार या रोजीं ठाकुरद्वार येथें कृष्णशास्त्री साठे यांनीं हिंदुधर्मावर भाषण केलें, त्यांतील सारांश आपणाकडे पाठविला आहे, तो आपल्या वाचणारांकरितां छापून प्रसिद्ध करावा, अशी माझी प्रार्थना आहे.

प्रायश्चित्त नऊ प्रकारचें आहे. त्यांतून पहिला प्रकार मागच्या सभेंत सांगितला. आतां दुसरा प्रकार. क्षोभ येण्यास दोन कारणें असतात, "तटस्थ विधया" ह्मणजे एकानें दुसऱ्यास मारिलें असतां तिसऱ्यास राग येणें हें एक, व दुसरें "स्वोद्देश विधया" ह्मणजे आपणासच दुसऱ्यानें मारिलें असतां राग येणें. यांतून पहिल्या प्रकाराचे पोटीं अपूर्ण गोष्टी, व दुसऱ्याचे पोटीं विरुद्ध आचरणें हीं पातकें आहेत.

चौथ्या प्रकारचें प्रायश्चित्त. यांत असें आहे कीं जें आपण प्रायश्चित्त घेतों त्याचा कांहीं तरी सारखा संबंध पाहिजे. जसें, स्नान वगैरे यांचा संबंध असा आहे कीं, स्नानानें जसा शरीराचा मळ जातो, तसा आंतील मळ आपण टाकून द्यावा, हें दाखविण्याचें चिन्ह. परंतु कित्येक दोषास योग्य प्रायश्चित्त पाहिजे, व कांहीं दोष क्षमा, प्रार्थना यांहींकरून जातात. गोमूत्र गोमय हीं लीन झाल्याचीं चिन्हें आहेत. जसें लढाईत शरणागत मनुष्य आपले हात बांधून घेतो, त्याप्रमाणें हे पदार्थ भक्षण केल्यानें पापाचा त्रास घेतला असें दाखविलें जातें. पाखांडी लोक बुद्ध्या एखाद्यास ठकविण्याकरितां प्रथम एक मार्ग दाखवितात, नंतर आंत मतलब दुसरा ठेवितात. बाह्यात्कारें रस्ता दाखवितात तो असा; ते ह्मणतात कीं, स्नान केल्यानें मनाचा मळ कोठून जातो? एकूण स्नान करूं नये असें ते ह्मणत नाहींत. आणि आह्मी तरी कोठें ह्मणतों कीं बाहेरच्या धुण्यानें आंतील मळ जातो? सोवळें दोन प्रकारचें आहे. "मृज्जलतो बाह्ये, अंतरे शुद्धभावतः" ह्मणजे मृत्तिकादिकेंकरून बाहेरची शुद्धि करावी व अंतर्यामीं शुद्ध भाव ठेवावा. काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ हे धैर्य, शांति तृप्ति इत्यादिकांहीं जिकावे. तर यावरून ह्या प्रायश्चित्ताचें खंडण होत नाहीं. आतां पाखांडी लोक पहिल्यानें जो मार्ग सांगतात तो सोडून आपला मतलब साधतात तो येणेंप्रमाणें. बाप असला ह्मणजे आईची गरज नाहीं. अशा प्रकारचें सांगतात. गलब-

तास दोन बाजू असाव्या तर यांचें सांगणें एक बाजू असावी, अशा प्रकारचें आहे. परंतु आमच्या मतें दोन्ही गोष्टी कराव्या असें आहे.

पाखांडी लोक आणखी असें ह्मणतात कीं, आह्मी हिंदु लोक प्रार्थना करीत नाहीं. परंतु आह्मी सर्व कर्में मंत्र ह्मणून करितों. मग त्यांत प्रार्थना नाहीं कीं काय? पाहा! आमच्या स्नानाचे मंत्रांत असें आहे कीं, "जळांत राहणारा जो देव तो आमचें पावन करो." संध्येचे वेळीं मार्जन करितांना आह्मी असें ह्मणतों कीं, कायिक, वाचिक, मानसिक हें पातक इंद्र, वरुण, अग्नि हे क्षमा करोत. इंद्र वगैरे हे कोण? हे देवच आहेत. अणखी आह्मी असें ह्मणतों कीं पाण्यांत जो वास करितो तो आमचे दोष क्षमा करो, खाणें पिणें, अपहार इ० दोष मुक्त होऊन आह्मां पातक्यांस मोक्षप्राप्ति होवो.

पाखांडी लोकांच्याही पुस्तकांत स्नान केल्यानें विटाळ, पातक जातें असें सांगितलें आहे. हें नव्या करारांत ख्रिस्तानें सांगितलें आहे. माथ्थी-लिखित शुभवर्त्तमान. अध्याय १० ओवी १४. "आणि जर कोणी तुह्मांस स्वीकारीत नाहीं, आणि तुमच्या गोष्टी ऐकत नाहीं, तर त्या घरां-तून किंवा नगरांतून निघतांना तुह्मी आपल्या पायांची धूळ झाडून टाका." दुसरें, त्याच पुस्तकाच्या २७ व्या अध्यायाचे २४ व्या ओवींत अशी गोष्ट आहे कीं, "पिलातसानें पाणी घेऊन समुदायापुढें आपले हात धुतले आणि ह्मटलें या नीतिमानाच्या रक्ताविषयीं मी निर्दोषी आहें." या उदाह-रणांवरून असें सिद्ध होतें कीं धूळ झाडली व हात धुतले ह्मणजे पापाचा मळ जातो. आणि आह्मीही तसेंच करितों. पिलातसानें हात धुतल्यानें त्याजकडे पाप नाहीं, लोकांकडेस पाप. असें या पुस्तकांत सांगितलें असतां हे पाखांडी लोक डोळ्यावर पडदे ओढून बोलतात. हात धुण्यानें दोष गेला तर आह्मांस बाजारांत विटाळ होतो ह्मणून आह्मी घरीं येऊन हात पाय धुतल्यास किंवा स्नान केल्यास काय चिंता आहे? मार्कसलिखित पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, ( अ० ७ ओ० २–५ ) "परोशी आणि कित्येक शास्त्री यरूशलेमापासून येऊन त्याजवळ मिळाले. तेव्हां त्यांनीं त्याच्या शिष्यांतील कितीएकांस अशुद्ध हातांनीं ह्मणजे न धुतलेल्या हातांनीं भाकरी खातां पाहून दोष ठेविला. कारण कीं परोशी आणि सर्व यहुदी वडिलांचा सांप्रदाय धरून हात वारंवार धुतल्यावांचून खात नाहींत. आणि चव्हाट्यांतून आले असतां, स्नान केल्यावांचून खात नाहींत; आणि

प्याले, घागरी, तांब्याचीं भांडीं, पलंग यांची जलशुद्धि असले बहुत दुसरे नियम त्यांनीं धरिले आहेत." यावरून परोशांनीं आणि शास्त्र्यांनीं त्याला विचारिलें कीं, "तुझे शिष्य वडिलांच्या सांप्रदायाप्रमाणें चालत नाहींत, तर न धुतलेल्या हातांनीं अन्न खातात असें काय ह्मणून करितात?" त्याचें उत्तर खिस्तानें दिलें त्यांत हे नियम करूं नका असें तो ह्मणाला नाहीं, तो म्हणाला कीं, ओंठानें व अंतःकरणानेंही प्रार्थना करावी.* योहानानें लिहिलेल्या पुस्तकांत १३ व्या अध्यायाचे तिसरे ओवींत असें आहे कीं, येशूनें आपल्या शिष्यांचे पाय धुतले. ती ओवी ही आहे. "आणि जेवण होत आहे इतक्यांत बापानें सर्व आपल्या हातीं दिलें आहे आणि आपण देवापासून आलों आणि देवाकडे जातों, हें जाणून येशू भोजनावरून उठला आणि त्याने आपलीं वस्त्रें काढून ठेविलीं; व रुमाल घेऊन कमरेस बांधिला," मोठें वस्त्र मळेल ह्मणून पाहा केवढा लोभी! ( हें ऐकून लोक हसूं लागले. ) "नंतर तो गंगाळांत पाणी ओतून शिष्यांचे पाय धुऊं लागला, आणि कमरेस बांधलेल्या रुमालानें ते पुसूं लागला. मग तो शिमोन पेत्रसाजवळ आला, तेव्हां तो त्याला ह्मणतो, हे प्रभू, तूं माझे पाय धुतोस कीं काय? येशूनें त्याला असें उत्तर केलें कीं, जें मीं करितों तें तूं आतां जाणत नाहीं पुढें जाणसील. पेत्रस त्याला ह्मणतो, तूं माझे पाय कधींही धुणार नाहींस; येशूनें त्याला उत्तर दिलें, जर म्यां तुला धुतलें नाहीं तर माझी तुझी संगत होणार नाहीं; शिमोन पेत्रस त्याला ह्मणतो, हे प्रभू, नुसते माझे पाय धुऊं नको, हात व डोकेंही धू, येशूनें त्याला ह्मटलें, ज्याचे स्नान झालें, त्यानें पाय मात्र धुतले पाहिजेत, तो तर सर्वांगीं शुद्ध आहे, आणि तुह्मी शुद्ध आहां तर सर्वच नाहीं. आपल्याला कोण परस्वाधीन करणार हें त्याला ठाऊक होतें, यास्तव तुह्मी सर्वच शुद्ध नाहीं असें तो बोलला." ही केवळ तोंडची किंवा लाक्षणिक गोष्ट नाहीं, वास्तविक लिहिली आहे. यावरून स्नान हें पातक जाण्याचें चिन्ह होय.

परंतु हे पाद्री ठक आहेत. यांस हीं वाक्यें ठाऊक नाहींत, पण तसेंही ह्मणवत नाहीं. त्यांचा यावर पोटाचा धंदा चालतो, त्यापेक्षां ठाऊक असून ते लोकांस सांगत नाहींत, छपवून ठेवितात. ते ह्मणतात कीं, चोरी करूं

* एथें शास्त्री यांनीं येशूचें उत्तर सर्व वाचून दाखविलें नाहीं. तसें केलें असतें तर त्यांच्या मताचें स्वमुखानेंच खंडण झालें असतें. परंतु आमच्या वाचणारांस ही प्रार्थना आहे कीं त्यांनीं येशूचें सर्व उत्तर वाचून पाहावें. तें मार्कसानें लिहिलेल्या शुभवर्तमानाच्या ७ व्या अध्यायांत ६–२३ ओवीपर्यंत आहे.

नका अशी ईश्वराज्ञा आहे, परंतु बैबलांतील वाक्यें लपवून ठेवणें ही चोरी नव्हे काय? आमच्या शास्त्रांत गंगास्नान करावें असें सांगितलें आहे ह्मणून दोष देण्यास हे पाद्री सिद्ध होतात, परंतु त्यांच्या शास्त्रांत पुण्यप्राप्तीकरितां यार्देन नदींत बाप्तिस्मा घ्यावा ह्मणजे पवित्र आत्मा प्राप्त होऊन उद्धार होतो, असें जें आहे तें लोकांस कां दाखवित नाहींत?

ज्ञानोदयकर्ते महाराज, याप्रमाणें अणखी शास्त्री यांचें पुष्कळ भाषण लिहिणें आहे, परंतु त्याचा विस्तार फार होईल ह्मणून म्यां संक्षेपानें सांगितलें. आतां यावर विचार करून सर्व गोष्टींचें खंडन वादानें नव्हे परंतु प्रमाणपूर्वक करायासही स्थलसंकोचामुळें माझ्यानें विशेष लिहवत नाहीं, यास्तव शास्त्री यांस ख्रिस्ती धर्माविषयीं चांगली माहिती नसतां ते बुद्ध्या आपल्या डोळ्यावर पटळ घेऊन त्यांतील कित्येक गोष्टींचा खोटा अर्थ करून दाखवितात. त्याविषयीं एक दोन उदाहरणांनीं त्यांची समजूत करितों व त्यांच्या मतावर कांहीं प्रश्न विचारणें आहेत तेही लिहितों.

१. येशूनें आपल्या शिष्यांस पायाची धूळ झाडून टाका असें सांगितलें, यावरून त्यांचें पाप जाण्याचा उपाय त्यानें सांगितला असें शास्त्री ह्मणाले, हें त्यांचें अज्ञान आहे. त्याचा अर्थ असा कीं, पूर्वींचे यहूदी लोक मूर्त्तिपूजकांच्या देशांतील मृत्तिकाही अशुद्ध मानीत, त्या चालीस अनुलक्षून येशूनें आपल्या शिष्यांस असें सांगितलें.

२. पिलातसानें हात धुतल्याची गोष्ट शास्त्री यांनीं आपल्या धर्मास अनुकूल आहे असें पाहून तिजवरून सिद्ध केलें कीं ख्रिस्ती शास्त्रांतही मार्जन केल्यानें पाप जातें असें आहे. परंतु अशी आज्ञा किंवा नियम त्या शास्त्रांत नाहीं अशी सर्वांनीं पक्की खातरी बाळगावी. पिलातस हा यहूदी किंवा ख्रिस्ती होता असें नाहीं, व त्यानें जें केलें तसें ख्रिस्ती लोकांनीं करावें असें कोठें सांगितलें आहे? जी गोष्ट झाली ती प्रामाणिकपणानें लिहिली आहे, व पिलातस निर्दोषी होता असें ग्रंथकर्त्यांनीं आपलें मत कोठें दाखविलें आहे?

३. येशूनें शिष्यांचे पाय धुतले ह्मणून त्यावरून धुण्यानें पाप जातें असें सिद्ध होत नाहीं. हें येशूच्याच वाक्यावरून स्पष्ट दिसून येतें. तो ह्मणाला कीं, जसें म्यां तुह्मांस केलें तसें तुह्मींही करावें ह्मणून म्यां तुह्मांस उदाहरण दिलें आहे. यांत तुमचें पाप गेलें असें कोठें आहे? प्रीति व नम्रता यांचें लक्षण दाखविण्यास हें कृत्य केलें असतां शास्त्री यांनीं डोळ्यावर पडदे

घेऊन आपल्या ऐकणाऱ्यांस फसविण्याकरितां असा अर्थाचा अनर्थ करावा हें उचित आहे काय ?

४. शास्त्री यांनीं पाद्री लोकांवर ठकबाजीचा मिथ्या आरोप आणिला आहे, व ते लोक आपल्या शास्त्रांतील असलीं वाक्यें दुसऱ्यांस सांगत नाहींत ह्मणून ते मतलबी आहेत असें ह्मणाले, यास उत्तर. जर ख्रिस्ती धर्म लोकांनीं समजूं नये व बैबल वाचून न पाहतां पाद्री जें सांगतील त्यावरच विश्वास ठेवावा असें असतें तर आज १८० भाषांमध्यें तें शास्त्र छापून प्रसिद्ध झालें नसतें, व लोकांस तें वाचण्याची जसी मोकळीक आहे तसी न मिळती तर हा दोष उलटा हिंदु धर्माधिकाऱ्यांवरच लागू होतो, अनुष्ठानाचे मंत्र ज्यांत व्यर्थ बडबड आहे ते व वेदशास्त्रें वगैरे धर्मपुस्तकें लोकांस कां मोकळेपणानें वाचायास सांपडत नाहींत ? संस्कृत ग्रंथांचें भाषांतर करून कां सर्वत्र प्रसिद्ध करीत नाहींत ? याचें कारण हेंच कीं, तसें केल्यानें भटांची सर्व लबाडी उघडी होईल व त्यांचा पोट भरण्याचा धंदा बुडून जाईल, व सांप्रत तसेंच होत चाललें आहे.

शास्त्री यांस प्रश्न.—तुह्मी ह्मणतां कीं स्नानादिक हीं पापाचा मळ गेला असें दाखविण्याचीं चिन्हें आहेत. बरें हें मी मान्य करितों. तर खरोखर पाप कशानें जातें ? शेण खाल्ल्यानें किंवा भटांच्या पायांचें तीर्थ घेतल्यानें ? शुचिर्भूत राखण्यासच जर सोंवळें करावें तर परिटाकडील धुतलेलीं शुभ्र वस्त्रें परिधान केल्यानें शरीर निर्मळ राहत नाहीं कीं काय ? धाबळी व मुकटा हीं चार दिवस धुतलेलीं नसलीं तरी सोंवळ्यास चालतात हें कसें ? सोंवळें वस्त्र नेसून जर एकाद्या चिंधीवर पाय पडला तर तें सर्व सोंवळें ओंवळें होतें; याचा अर्थ काय ? यांत कोणीं दोष केला ! चिंधीनें, किंवा स्वच्छ वस्त्र नेसणारानें किंवा ज्या ग्रंथांत अशा निरर्थक खटपटी लिहिल्या आहेत त्याच्या कर्त्यानें ? शुद्धपणा व अशुद्धपणा पदार्थांच्या ठायीं आहे, किंवा मनुष्यांच्या अंतःकरणांत आहे ? घाणेरे व हेंदरे जरी पदार्थ असले तरी त्यांच्या ठायीं दोष आहे कीं काय ? व त्यांस स्पर्श झाला असतां त्यांपासून विटाळ होतो काय ! तेणेंकरून मन विटाळतें किंवा शरीर मात्र अमंगळ होतें ? या प्रश्नांचीं सप्रमाण उत्तरें शास्त्री यांनीं द्यावीं. हे विनंती.

ता० १६ दिसेंबर<br>सन १८५२,<br>मु० मुंबई.

ठाकुरद्वाराच्या सभेस जाणारा.

## अंक ३.

पृ० १७७ यांत परमहंस मंडळीच्या शाखा पुणें, अहमदनगर इ० ठिकाणीं होत्या असें सांगितलें आहे. नगरच्या शाखेंतील कित्येक तरुण गृहस्थ पुढें ख्रिस्ती झाले, त्यांपैकीं एकानें त्या मंडळीची थोडी हकीकत माझ्या विनंतीवरून लिहून दिली ती येणेंप्रमाणें:—

सुमारें ३५ वर्षांमागें अहमदनगरास परमहंस मंडळीची एक शाखा स्थापित झाली होती. तिचे पुढारी रा० ब० दादोबा पांडुरंग व मि० वासुदेव भिकाजी करमरकर हे होते. त्यांमध्यें मीही एक होतों. आह्मांतून बहुतेक तेथील सरकारी इंग्लिश शाळेचे विद्यार्थी असून इंग्लिश विद्याभ्यासाच्या योगानें स्वधर्मावरून आमचा विश्वास अगदीं उडाला होता. त्या मंडळीच्या सभासदांनीं कोणतीं मतें धरावीं याविषयीं कांहीं लेख किंवा ग्रंथ तयार केलेला नव्हता; परंतु जातिभेद पाळूं नये, मूर्तिपूजा करूं नये, पुनर्विवाह करणें, स्त्रियांस विद्या देणें, महार मांगादि नीच जातीच्या लोकांमध्यें विद्येचा प्रसार करणें, इत्यादि गोष्टींविषयीं प्रयत्न करणें हें आपलें कर्त्तव्य आहे असें सर्व सभासद समजत होते. एखाद्या नवीन मनुष्यास त्या मंडळींत प्रवेश करावयाचा असला तर त्याला (हातावर पाणी ओतून) एक प्रकारचा जलसंस्कार करायाला लावावा अशी रीत होती. त्यानंतर मंडळींत पारशी, मुसलमान, आदीकरून जे सभासद होते त्यांकरवीं मटन वगैरे पदार्थ तयार करवून एखाद्या गुप्त ठिकाणीं सर्व मंडळीचें भोजन होत असे. त्या प्रसंगीं नवीन सभासदानें मंडळीबरोबर भोजन करून जातिभेद मोडल्याचें प्रमाण पटविलें ह्मणजे तो पक्का परमहंस बनला असें समजलें जात होतें. आह्मी शाळेंत असतां विलायतेकडील प्रख्यात नास्तिक टाम पेन व वालटेर यांच्या ग्रंथांतील कांहीं नास्तिक मताचे निवडक उतारे छापून पुणें, मुंबईकडील सुधारलेल्या मंडळीनें आह्माकडे पाठविले होते; व पुण्याकडील प्रोफेसर ग्रीन यांचे कित्येक शिष्यांनीं या सृष्टीचा कर्ता ह्मणून कोणी नाहीं व नीतिसंबंधी नेम हे समाजाच्या बंदोबस्ताकरितां मात्र पाळिले पाहिजेत

इत्यादि विषयांवर आह्मास एकांतीं बोध केला होता, तरी तेणेंकरून नास्तिक मताच्या वरल्या पायरीवर आह्मी चढलों नव्हतों, परंतु सृष्टीचा कर्ता परमेश्वर आहे आणि त्यानें कोणतेंही शास्त्र दिलें नसून आपलीं सर्व कर्तव्यें समजण्यास आपला सदसद्विवेक पुरे आहे असें आह्मी समजत होतों. त्याप्रमाणें आह्मी आठवड्यांतून एकदां गांवाबाहेर कोठेंतरी एकांत स्थळीं परमेश्वराच्या प्रार्थनेसाठीं एकत्र मिळत होतों. परंतु आमच्या पुढाऱ्यांस या गोष्टीचें विशेष अगत्य वाटत नव्हतें ह्मणून ते त्या प्रसंगीं आह्मासंगतीं कधीं मिळत नसत. आह्मास इंग्लिश भाषेंत ख्रिस्ती लोकांनीं छापलेलें एक प्रार्थनांचें पुस्तक सांपडलें होतें तें घेऊन त्यांत आह्मीं फेरफार केला. ह्मणजे त्यांत ख्रिस्ताचें नांव व दुसऱ्या ज्या गोष्टी आमच्या मताविरुद्ध होत्या त्या आह्मीं खोडल्या आणि प्रत्येक प्रार्थनेच्या मंडळींत आह्मापैकीं एकजण त्या पुस्तकाच्या एक दोन प्रार्थना वाचीत असे व बाकीचे सभासद मस्तक लववून किंवा नेत्र झांकून त्यांकडे लक्ष लावीत असत. तसेच प्रत्येक सभासद पाळीपाळीनें पूर्वी नेमलेल्या विषयावर एक निबंध लिहून आणून वाचीत असे; आणि त्याचें वाचन झाल्यावर कधीं कधीं वादविवादही होत असे. एका प्रसंगीं सर्व धर्मशास्त्रांत कांहीं तरी व्यंगें आहेत या विषयावर आह्मापैकीं एकानें निबंध लिहून आणिला होता; त्याची आठवण मला आजपर्यंत आहे. त्याचें वाचन झाल्यावर कांहीं बोलणें झालें. त्यांत एक गोष्ट अशी निघाली होती कीं, आपल्या मंडळीचीं मतें व त्यांतील सभासदांच्या वागणुकीकरितां कांहीं निबंध हीं दाखविण्याकरितां एखादें पुस्तक छापून प्रसिद्ध करावें. तेव्हां एकानें अशी शंका काढली कीं, शास्त्र मानणाऱ्या लोकांवर जसें शास्त्राचें वजन पडतें तसें लोकांवर या ग्रंथाचें वजन पडणार नाहीं, आणि या कारणामुळें त्यांत सतत फेरफार होत जातील.

या मंडळीचीं सर्व कामें व विचार फार गुप्त ठेवण्यास आह्मी प्रयत्न करीत होतों, तरी कांहीं दिवसांनीं त्या गोष्टी फुटून लोकांमध्यें चर्चा होऊं लागली; आणि आमचे इष्ट मित्र आह्मांस त्यांविषयीं प्रश्न करूं लागले. तेव्हां आमचीं मतें त्यांस समजूं नयेत ह्मणून त्यांस आह्मीं नेहमीं उडवा-

उडवीचीं उत्तरें द्यावीं. असा प्रकार जेव्हां होऊं लागला तेव्हां कित्येकांच्या मनांत असे विचार आले कीं जोंपर्यंत आपणास आपलीं मतें प्रसिद्धपणें अंगीकारून चालण्याचें धैर्य होत नाहीं व वारंवार लबाडी करण्याचे प्रसंग येतात तोंपर्यंत प्रार्थना करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. यास्तव त्या वेळेपासून प्रार्थनेस मिळण्याविषयीं बहुतेकांच्या मनांत उदासीनता उत्पन्न होऊन त्या कामांत पूर्वीप्रमाणें उत्तेजन राहिलें नाहीं. अशा गोंधळामध्यें आह्मी पडलों असतां सत्य मार्गाचें ज्ञान प्राप्त करून घेण्याचे कित्येक उत्तम योग परमेश्वरानें घडवून आणिले ह्मणून आह्मी त्याचे उपकार मानितों.

अमेरिकन मिशन, सातारा. **कासम महंमदजी.**

## अंक ४. ( पृ० ३०१ पाहा ).

## मला धर्मांतर करण्याचें कारण.

धूमकेतूचे कर्त्ते यांस.

विनंती विशेष, जो कोणी एखादें काम करितो त्यानें तें करण्याचें कारण सांगण्यास सर्वदा सिद्ध असलें पाहिजे. आणि ज्यास आपल्या वर्तणुकीचें कारण दाखवितां येत नाहीं त्यास लोक वेडा किंवा मूर्ख मानितात. हा विचार जसा प्रापंचिक गोष्टीस लागू आहे, तसाच परमार्थसंबंधी गोष्टीसहि लावितां येतो. स्थलांतर करणाऱ्या मनुष्यास जसें आपल्या क्रियेचें कारण दाखविलें पाहिजे तसेंच मतांतर करणारासहि आपल्या कर्माचें कारण सांगितलें पाहिजे. मग तें कारण खरें किंवा खोटें याचा लोकांनीं सुविचारेंकरून निर्णय करावा, तोंपर्यंत कोणत्याहि कामावर दोष देणें अगर त्याची प्रशंसा करणें हें योग्य नव्हे. हा विचार मनांत आणून मी आपल्या वडिलांचा धर्म कां सोडिला व ख्रिस्ती मताचा अंगीकार कां केला याचीं कांहीं कारणें आपल्या एतद्देशीय बांधवांस कळवूं इच्छितों. धूमकेतूकर्त्ते महाराज, धर्मसंबंधी विचाराची मनास स्वतंत्रता असण्याविषयींची जशी मोठमोठ्या विद्वान् व उदार मनाचे पुरुषांची संमति आहे, तशी आपलीहि आहे हें जाणून आपणाकडेस हें पत्र पाठविलें आहे. इतर लोकांस जसे आपल्या मनांतील विचार प्रगट करण्याचा हक्क आहे तसाच मलाही असावा. तशांत मीं हें पत्र कोणास दूषण देण्यास अथवा कोणाशीं वाद वाढविण्यास लिहितों असें नाहीं; केवळ माझ्या सांप्रतच्या वर्त्तणुकीचीं कारणें मात्र लोकांस समजावीं हा माझा मुख्य हेतु आहे.

२. या देशांत सुविद्येची व सुज्ञानाची जसजसी अभिवृद्धि होत जाईल तसतसा अविद्येचा व अज्ञानाचा ऱ्हास होईल. सांप्रतकाळीं या प्रकारच्या रूपांतराचा प्रारंभ या पश्चिम भरतखंडांत झाला आहे. पश्चिम द्वीपस्थ ज्ञानसूर्याच्या तीव्र किरणांपुढें अज्ञानरूप वर्फ वितळत चाललें आहे. ज्या ज्या ठिकाणीं युरोपियन विद्या शिकवितात त्या त्या ठिकाणीं तरुण, विद्यार्थ्यांचीं मनें सुधारूं लागलीं आहेत. कित्येक ह्मणतात कीं, मिशनेरी शाळेमध्यें धर्म शिकवितात ह्मणून मुलांचीं मनें फिरतात; तर सरकारी शाळा, जेथें धर्माचा लवलेशहि नाहीं त्यांतील मोठमोठ्या विद्या शिकून नामांकित

झालेले जे सुज्ञ त्यांचीहि स्वधर्मावरून श्रद्धा उडते. प्राचीन ऋषिप्रणीत ग्रंथांत लिहिलेल्या बहुतेक गोष्टी त्यांस अविश्वसनीय वाटतात ह्मणून ते ग्रंथ सुधारावे या हेतूनें ते वारंवार वर्त्तमानपत्रद्वारें स्वमत प्रदर्शित करितात, व जिकडे तिकडे गुप्त किंवा प्रसिद्ध सभा स्थापून बहुत विचार व वादविवाद करितात. अशा प्रकारच्या बहुत पत्र लिहिणारांपैकीं दोन महाप्रसिद्ध उदाहरणें लोकांच्या आठवणींत असतीलच. स्वतः प्रयत्न करणाऱ्या हिंदूंपैकीं पत्रांत पत्र लिहिणारा लोकहितवादी व मंडळ्यांपैकीं परमहंस मंडळी या उभयतांनीं स्वधर्मरूप वृक्षाचीं मुळें तरुणांच्या मनांतून जेवढीं खणून काढिलीं व तो पडायाजोगा केला तेवढीं दुसऱ्या कोणत्याच हिंदूनें काढलीं नसतील. आतां हीं साहस कर्मे कोणीं केलीं असें कोणीं विचारलें असतां ज्यास खऱ्या गोष्टी अवगत आहेत तो असें उत्तर देईल कीं, या कृत्याचे मुख्य पुरस्कर्त्ते सरकारी शाळेंतीलच होते.

३. याप्रमाणें जेथें धर्मसंबंधी गोष्टी कानीं पडत नाहींत तेथील विद्यार्थ्यांचीं मनें सत्य शोधण्यास व असत्याच्या बंधनांतून मुक्त होण्यास जागृत होऊन प्रयत्न करूं लागलीं, तर जेथें विद्येची इमारत धर्मरूप खडकावर बांधण्याचा मूळ उद्देश आहे व त्या इमारतीच्या सर्व भिंतींचा प्रत्येक दगड धर्मरूप मसाल्याच्या चुन्यानें घट्ट बसविण्यास जे प्रयत्न करितात व ज्या इमारतीचे दरवाजे व खिडक्या यांचे अडसर व कडीकोयंडे धर्मरूप धातूचे केले आहेत, तेथील विद्यार्थ्यांचीं मनें विचार करूं लागतील यांत काय आश्चर्य आहे? आतां विचाराच्या प्रकारांत उत्तमानुत्तम असे भेद आहेत. पण सर्वांचा रोख आपल्या लोकांचें धर्मसंबंधी, विचारसंबंधी, व विद्यसंबंधी जें वास्तविक अज्ञान असेल त्याचा विध्वंस करण्याकडेस आहे यांत संशय नाहीं.

४. आतां या पक्षांतील विचार करणाऱ्यांमध्यें एक मोठा भेद आहे, त्याजकडेस वाचणारांनीं विशेष लक्ष दिलें पाहिजे. तो भेद असा कीं, सरकारी शाळेंतील सुधारणूक करणारे स्वदेशीय लोकांस केवळ विद्येचें ज्ञान करून देण्यास मात्र प्रयत्न करितात. आणि यद्यपि त्यांच्या मनांतून त्यांचा प्रचलित धर्म बुडविण्याचा हेतु नसला तथापि त्यांस त्या विद्येचा स्पर्श होऊं लागला ह्मणजे तो आपणच तळास जाऊं लागतो. परंतु नंतर त्यांच्या मनाची तृप्ति होण्याजोगें देण्यास सदरहू सुधारणाऱ्यांपाशीं कांहीं नसतें. विद्या

व ज्ञान यांपासून (कदाचित्) बुद्धि तृप्त होईल, पण बिचारें अंतःकरणाची धर्म नसल्यामुळें उपासमार होऊं लागते, हें मी आपल्या पदरचें सांगतों असें नाहीं. मोठमोठे सुज्ञ व ज्ञानी पुरुषांचें मत हेंच आहे. त्याच्या उदाहरणार्थ दूर जाणें नलगे. आपल्या सुधारणुकेचे पुढारी प्रभाकरकर्ते, ज्ञानप्रकाशकर्ते व ज्ञानोदयकर्ते यांनीं आपले अभिप्राय वारंवार याचप्रमाणें प्रगट केले आहेत. मजपाशीं या वेळीं जर त्यांचे मागले लेख असते तर त्यांचा उतारा एथें लोकांच्या समजुतीसाठीं दिला असता. आणि इतकेंच नाहीं तर वृद्ध व धार्मिक हिंदूंचेंहि मत असेंच आहे. धर्मविरहित विद्या व ज्ञान लोकांच्या नीतीस व आचरणास बाधक होतें हें एक मोठें तत्व त्यांस पक्कें माहीत आहे; परंतु दुसऱ्या पक्षांतील सुधारणूक करणाऱ्यांचा क्रम असा नाहीं. ते विद्या व धर्म हीं दोन्ही एकाच समयीं सांगतात तेणेंकरून जर जुनी इमारत कोसळली तर तिच्या ठिकाणीं दुसऱ्या नवीन व सुंदर मंदिराचा पाया घातला जातो.

५. अणखी एक मोठा भेद पूर्वोक्त द्वय पक्षांतील विचारी लोकांत असा आहे कीं, त्यांतून एका पक्षाचे आपल्या विचाराप्रमाणें आचार करून दाखवितात व. दुसऱ्या पक्षाचे केवळ विचार करण्यानेंच तृप्त होतात. आणि जर त्यांनीं आपला आचार चालविला तर तो फार गोप्य ठेवितात. पहिल्या पक्षांतही असे बहुत आहेत, परंतु त्यांतून आजपर्यंत जितके धैर्यानें प्रसिद्धपणें वागूं लागले तितके दुसऱ्या पक्षांतून निघाले नाहींत, व पश्चिम भरतखंडांत तर किंबहुना एकही मिळणें दुर्लभ पडेल. पाहिलें असतां कित्येक गोष्टी दोन्ही पक्षांत सारख्याच आहेत, आणि त्या मानिल्यामुळें दोघांसही त्यांचें आचरण करणें अवश्य आहे. त्या गोष्टी येणेंप्रमाणें:—मूर्तिपूजा न करणें, ब्राह्मणास भूदेव न मानणें; सोंवळ्या ओंवळ्याचा भेद न राखणें, विधवांचा पुनर्विवाह करणें, लहानपणीं मुलांचें लग्न न करणें, जातिभेद न मानणें, इत्यादि. असें असून त्यांतून कोणतीही गोष्ट आजपर्यंत कोणी आचरून लोकांस आपल्या वर्त्तणुकीचें उदाहरण दाखविलें नाहीं. परंतु विचारेंकरून पाहिलें असतां ज्याविषयीं आपली खातरी झाली आहे, जें आचरण केलें असतां आपल्या पुष्कळ बोलण्यापेक्षां व लिहिण्यापेक्षां लोकांच्या मनावर विशेष ठसा उठतो व त्यांचा विचार जागृत होतो तें आचरण केलें पाहिजेच, हें एक आपलें कर्त्तव्यच होय, असें जाणावें. तसें न करितां सर्व

गोष्टी तोंडानें केवळ बोलत राहिलें असतां आपलें मन आपल्यास रात्रंदिवस टोंचणी देतें व लोकहि आपल्या मतास अवमानितात.

६. हा वरील गोष्टीचा विचार खरा व सर्वमान्य आहे. तर मी माझ्या पक्षांतील लोकांप्रमाणें माझ्या मनाच्या सांगणीवरून वर्त्तणूक केली यांत कोणतेही निःपक्षपाती व विचारशील पुरुष मला दूषण ठेवणार नाहींत.

परंतु या विचारेंकरून उत्पन्न झालेलें कारण केवळ साधारण होय, व तें देश, काळ यांच्या स्थितीवरून उपस्थित झालें. तर मला ख्रिस्ती धर्म आचरण्याचीं दुसरीं स्वतंत्र व सबळ कारणें अनेक आहेत. तीं सर्व पत्रविस्तारभयास्तव व आपल्या पत्रांत धर्मसंबंधी वादविवाद उत्पन्न न व्हावा यास्तव सांगतां येत नाहींत. तथापि ज्या उद्देशानें व ज्या नियमाप्रमाणें आजपर्यंत धूमकेतु पत्र चालत आलें आहे त्यास अनुसरूनच मी त्यांतील कांहीं कारणें व माझ्या धर्मसंबंधी मताचें मुळापासून वृत्त संक्षेपानें लिहितों.

७. प्रथम मी इतर हिंदूंच्या मुलांप्रमाणें सुमारें चवदा पंधरा वर्षांचा होईपर्यंत मूर्त्तिपूजक व धर्मसंबंधी गोष्टीविषयीं अज्ञान असा होतों. मला पाप, पुण्य, स्वर्ग, नरक, आत्म्याचें अमरपण, ईश्वराचे नीतिसंबंधी गुण, इत्यादि मोठ्या अगत्याच्या गोष्टी अगदीं माहीत नव्हत्या, व जरी एकादे वेळीं त्यांतून कांहीं म्यां ऐकिल्या असतील तरी त्यांजकडेस मीं कधीं लक्ष दिलें नाहीं. हिंदु धर्माची माहिती ह्मणावी तर ब्राह्मण, शेणवी या दोन जातींखेरीज इतरांस त्यांपैकीं जें समजण्याजोगें असतें तें मला बरेंच अवगत होतें. पुराण, कीर्तनश्रवण मीं पुष्कळ केलें. रामविजय, हरिविजय, भक्तिविजय, पांडवप्रताप, इत्यादिक प्राकृत ग्रंथ मीं बहुत वेळां वाचले; याप्रमाणें माझी हिंदु धर्मावर मोठी निष्ठा होती.

परंतु पुढें कांहीं दिवसांनीं माझा कित्येक गोष्टींवरून विश्वास उडूं लागला ह्मणजे भूतबाधा, मंत्र, जादू, मुहूर्त, शकुन इत्यादि खोटीं आहेत असें वाटूं लागलें.

९. त्यानंतर मूर्त्तिपूजेविरुद्ध प्रमाणें माझ्या कानीं पडूं लागलीं व मूर्त्तींचें खोटेपण उत्तरोत्तर लक्षांत येऊं लागलें. तेव्हां मी वेदांत सांगितलेल्या धर्मावर विश्वासणारा आहें असें मानून आपली समजूत करीत असें, कारण वेदामध्यें मूर्त्तिपूजेचा निषेध आहे व जातिभेद सांगितला नाहीं इतकें मात्र मीं ऐकिलें होतें.

१०. परंतु पुढें लवकरच माझा शोध व विचार विशेष वाढून व वेदाच्या कांहीं भागांचें इंग्लिश भाषांतर वाचावयास मिळाल्यावरून त्याविषयीं मला संशय वाटूं लागला. कारण ईश्वराच्या गुणास विरुद्ध अशा गोष्टी त्यांत दिसून आल्या.

११. माझ्या मनाची अशी स्थिती झाल्यावर मला कांहीं चैन पडेनासें झालें ह्मणून मीं आपला मनःकल्पित धर्म चालवावा असा निश्चय करून ईश्वरी शास्त्र मनुष्यास मिळालें नाहीं असें मत कांहीं दिवसपर्यंत बाळगिलें.

१२. तदनंतर मला परमहंस मंडळीची माहिती झाली, व तेथील सर्व प्रकार लक्षांत आला, परंतु तेथेंही माझ्या अमर आत्म्यास तृप्त करण्याजोगी वस्तु प्राप्त झाली नाहीं, मरणोत्तर सुखांत चिरकाल राहण्याची निश्चयपूर्वक आशा मला तेथें मिळाली नाहीं. आणि त्या मंडळीचा नियम आहे कीं, त्यांत येणाराचें धर्मसंबंधी मत कसेंही असो, परंतु मंडळीचे ऐहिक सुधारणुकेसंबंधी मतांस जो मान्य होईल त्यानें तींत यावें; तेव्हां अर्थातच तिजकडेस मजविषयीं कांहीं दोष नाहीं.

१३. इतकी माझ्या मनाची उलटापालट होत असतां मीं नित्य ख्रिस्ती शास्त्राचा अभ्यास चालविला होता. त्याविषयीं जीं प्रमाणें आहेत तींही पाहिलीं व त्यांविरुद्ध युरोपांतील नास्तिक लोकांनीं लिहिलेलीं मतें वाचून त्यांवर जीं उत्तरें पूर्वपक्षी लोकांनीं दिलीं तींहि अवलोकन केलीं. ख्रिस्ती मतखंडणाचीं जीं पुस्तकें वाचिलीं त्यांचीं नांवें, टामस पेन याचें पुस्तक, फ्रिथिंकर्स म्याघझीन, क्रिटिकल रिव्यु, वोलनी, गीबन, ह्यूम इ० चीं पुस्तकें व मुंबईतील एका पारशानें केलेलें पुस्तक.

१४. या प्रकारचा शोध चालवीत असतां ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेविषयीं माझ्या बुद्धीची खातरी झाली, परंतु अंतःकरणास त्याचा लवकर संस्कार होईना, यामुळें त्याचा प्रसिद्धपणें स्वीकार करण्यास मला बाप्तिस्म्यासंबंधीं पुष्कळ अडचणी दिसूं लागल्या. परंतु ईश्वरी कृपेनें त्या धर्माची माझ्या अंतःकरणावर सुमारें दोन अडीच वर्षांपासून प्रेरणा होऊं लागली, व अशा स्थितींत राहून मरण प्राप्त झालें असतां ईश्वराच्या न्यायासनापुढें उभें राहतांना आपली रदबदली करणारा त्या वेळीं आपणास नाकारील या शास्त्रलेखाचें भय वारंवार वाटूं लागलें. मला संसारसंबंधी सुखांत उणें होतें असें नाहीं, परंतु रात्रंदिवस मनाची तळमळ जाईना. शेवटीं परमेश्वरानेंच कृपा

करून जो धर्म मी अंतःकरणानें गुप्तांत आचरीत होतों, तो प्रसिद्धपणें आचरण्यास शक्ति व धैर्य दिलें. यांत मीं कांहीं विशेष केलें नाहीं, जें माझें कर्त्तव्य होतें तेंच केलें. आतां ईश्वर मला स्थिर राखो व ईश्वराच्याच पवित्र नामास सर्व मान व वैभव सर्वदा असो.

१५. आतां माझ्या स्वदेशी लोकांनीं असें समजूं नये कीं, मीं आपला धर्म पालटला ह्मणून त्यांजवरील प्रीति पालटली; मी इंग्रज झालों नाहीं, किंवा माझ्या मनांतून स्वदेशाभिमान गेला नाहीं. माझ्या मनांत स्वदेशप्रीति वाढत जाईल. माझ्या हातून होईल तितकें मी आपल्या लोकांचें कल्याण करण्यास झटेन; व जे स्वधर्मांत राहूनहि स्वदेशीय लोकांचें कल्याणार्थ प्रयत्न करीत आहेत त्यांचा मी मित्र असा राहीन, व त्यांचें काम सफल व्हावें ह्मणून मी ईश्वरापाशीं प्रार्थना करीन.

१६. आतां माझे प्रियमित्र व बंधुजन ज्यांस प्रकाश प्राप्त झाला आहे, त्यांस माझी मनःपूर्वक विनंती आहे कीं त्यांनीं तो झांकून ठेवूं नये, तर डोंगरावर पेटलेल्या अग्नीप्रमाणें त्याची प्रभा सर्वत्र पडूं द्यावी. आणखी त्यांनीं असें समजावें कीं "रात्र वहुत होऊन गेली, सूर्य उदयाचलास येत आहे. तर आपण अंधकाराचीं कर्मे टाकून द्यावीं, आणि प्रकाशाचें कवच धारण करावें."

मुक्काम बेळगांव,
ता० १७ आ० १८५४.
बाबा पदमनजी.

---

## हिंदुपत्रांतील उतारे.

"गेल्या आठवड्यांत अशी दाट बातमी जिकडे तिकडे उठली होती व ती खरी असें आह्मांस एका उत्कृष्ट आधारावरून समजलें आहे कीं, राजश्री ह्मणतां येत नाहीं, सबब मिस्तर बाबा पदमनजी यांनीं बेळगांवास रेवरेंड टेलर यांजपासून खिस्ती धर्माचा अनुग्रह घेऊन ते आतां स्वर्गपंथाच्या दिशेस लागले; अलिकडच्या मराठी लिहिणारांत बाबा पदनजी मोठे प्रख्यात होते व त्यांस इंग्रजीचेंहि बरें ज्ञान होतें."—वर्त्तमानदीपिका.

"बाबा पदमनजी कांसार राहणार मुंबई यांहीं गेल्या २०वे तारखेस ख्रिस्ती धर्म बेळगांवास स्वीकारिला, हें वृत्त वर्त्तमानपत्रांत छापून प्रसिद्ध झालेंच आहे; परंतु आह्मांस एका आमच्या मित्रास घरगुती पत्र आलें त्यावरून असें समजतें कीं, सदरहू गृहस्थानें आपल्या बायकोस समागमें नेण्याविषयीं पुष्कळ यत्न केला परंतु तिनें त्यांच्या गोष्टीस मान्य केलें नाहीं. बाबा पदमनजी हे इंग्रजी शिकलेले आहेत. परंतु यांचा कल पुष्कळ दिवसांपासून ख्रिस्ती धर्माकडेसच असे. त्यानें स्त्रीविद्याभ्यासनिबंध, सणांविषयीं निबंध, व्यभिचारनिषेधक बोध आदिकरून पुस्तकें मराठींत केलीं आहेत. त्यांत बैबलांतलीं वाक्यें घेतलीं आहेत. श्रुतिस्मृतीसारखीं गौरवून लिहिलीं आहेत, त्यावरूनच त्यांची श्रद्धा त्या धर्मावर आहे असें स्पष्ट दिसतें. धूमकेतूंत बाबा पदमनजीचे स्वदस्तुरचे लांबलचक पत्रांत ख्रिस्ती धर्म राजीखुशीनें व अक्कलहुशारीनें कसा त्यांनीं स्वीकारिला हें वृत्त आहे. सर्व मनुष्यांस आपापल्यापरी शाहाणपणाचा ताठा असतोच. आणि हा क्रम दीर्घ काळापासून चालत आला आहे, तेव्हां बाबा पदमनजीनें लिहिलें त्याचा मोठा हर्ष मानावा असें नाहीं, परंतु आपण जें करितों तेंच लोकांनीं आचारावें हें बोलणें बरीक उपहासास्पद होय.—(ज्ञानप्रकाश.)

## अंक ५. पत्रें.

### (१) मिलिटरी बोर्डास अर्ज व त्याचें उत्तर. (प्र० ८ पाहा.)

To the Military Board.

*Bombay.*

Sirs,

With due respect and humble submission I most humbly beg to be pardoned for the liberty I have taken for troubling your Hon'ble Board with the following lines of my case, in the hope that you will kindly take them into consideration and comply with my request.

That my father Pudmon Manickjee resides at Aden, where he holds a situation of a Surveyor and Builder in the Executive Engineer's Office.

That about four months ago I left Aden and had been to Belgaum for some private business. I have lately received a letter from my father informing me that my mother is delivered of a child and consequently wanting me to take my grand-mother there at Aden to take care of my mother as she is without the assistance of a female.

I therefore most humbly beg that your Hon'ble Board will be kind enough to grant a free passage for two persons ( myself and my grand-mother ) in the H. C. steamer to proceed.

I beg to remain, Sirs,
Your most obedient and humble servant,
Baba Padamanji.

---

*Bombay, 2nd April* 1849.

No. 2327 of 1849.

Public Works.

To Baba Padmanji,

In reply to your Petition dated the 2nd instant I am directed by the Military Board to acquaint you that had the application for a free passage to Aden for your grand-mother and yourself come from your father, they would have been disposed to entertain it favourably and to have given it support, but in the absence of the assurance that the Surveyor wishes to have his family sent to him, they are precluded from taking any steps in the matter.

By order.
(Signed.) Charles D. Mylne, Capt.,
Act. Secy. Mily. Board.

Bombay Military Board Office,
10th April, 1849.

---

( २ ) रेव० आर्. दब्ल्यु. ह्यूम साहेब यांनीं स्थापिलेल्या अंमलवर्जक सभेच्या संबंधानें मला लिहिलेल्या पत्रांतील उतारे. ( पृ. १६१ पहा. )

*Byculla, 5th April,* 1852.

MY DEAR SIR,

I wrote to you yesterday regarding your taking a part in the Temperance Meeting on Monday evening next, but perhaps the note did not reach you.

I asked you to speak on the subject of Opium in the Marathi country, but subsequently met with Dr. Bhau Daji who expressed a readiness to speak on the effects of Opium among the Natives—particularly among infants and children. And as a medical man, this would seem naturally to fall to him.

Would you not therefore speak on the sentiments of the respectable Natives regarding the licensed Dramshops? Add the *licensed* opium shops also if you please and give any statistics that you may have regarding either.

Indeed you will be free to speak what you can think most suitable, though in issuing the notice I wish to mention a distinct subject.

Yours very sincerely,
R. W. HUME.

*Byculla, 6th November* 1852

MY DEAR SIR,

What would you say to a public meeting on the subject of Intemperance—all to be in Marathi? Would many attend? And would some of the influential Natives come forward to speak? Perhaps you might stir up several to appoint a meeting and to take the whole management of it into their own hands. I daily grieve over the ruin caused by strong drink and should rejoice to see the Natives act.

Yours very sincerely,
R. W. HUME.

MY DEAR SIR,

Please accept of the accompanying copy or the Temp. Repository. The subject is one in which the young men of India, who seek the good of their country, should feel a deep interest. If intoxicating drinks cause three-fourths of the crimes, poverty, and degradation of such countries as Great Britain, what would be their effects here, when all classes shall feel at liberty to drink?

Cau yon not write a good letter or two on the subject for the *Prabhakar* or the *Dnyan Prakash?*

Believe me,
Yours very sincerely,
R. W. Hume.

( ह्या सद्गृहस्थांनीं मी मुंबई सोडून बेळगांवीं जातेवेळीं ( पृ० २६८ पाहा. ) मला एक अतिउत्तम बोधकारक पत्र लिहिलें होतें, परंतु तें आतां मजपाशीं नाहीं ह्मणून फार दुःख वाटतें. )

---

## (३) रेव० दाक्तर मिचल साहेब यांस माझीं दोन पत्रें; व त्यांचीं उत्तरें.

( पत्र १ लें. पृ० २२० पहा. )

*26th September*, 1852.

Reverend Sir,

I received your favour of the 14th inst. and was very glad to read it, as it was from the pen of one whom the Lord has been gracious to spare for us. May he add many years to your life and make you his instrument in saving many souls.

Your letter was very pleasing to me. Your remarks and counsels are true and impressive. I cannot but agree with them. You ask me to reply your letter and. I doubt not you expect from me to hear about my religious views and sentiments. I therefore write a brief but faithful account of what intimately connects with my soul.

In the first place I acknowledge my great fault of still remaining in heathenism after being convinced of the truth. I am almost ashamed to state the reasons of this. I am not yet prepared to withstand and to suffer the persecutions and trials and difficulties which a true believer in Christ has to do in India, when he confesses his Master before his countrymen. O may He grant me the boldness of Luther at Worms! May He give me his spirit and encourage me to say, "Here I stand upon God's word!" I admit that it is nothing in comparison with the sufferings of Christ who even died for our sins.

It is true that the love of my parents and family sometimes prevails upon me and makes me forget my resolution, but again the burden of my sins and the fear of the sinner's doom in after life trouble me. Thus there is a constant struggle going on in my mind with the desires of this life and with the hopes of a future one. My mind is seldom at peace with itself. I am disappointed of my own righteousness. My

promises to myself are in vain. I need a mighty Saviour, I need a guide to direct me, to help me, and to take me safely through the wilderness of this world of sin and sorrow in which I am lost. My guilty conscience terrifies me to offer up prayers to the throne of a Holy God. I pray him in the name of One whom I have found in the writings of the Prophets of old, and in those of the Evangelists. Yet He is not my friend, he appears to me as a Judge severely rebuking me for my past sins and for the present ones in which I still live.

Now Sir, this is the true state of my mind at the present time. I hope you will believe me in this, it is neither exaggerated nor invented to please you.

But all this is *within* me, none but God and myself know it. I shall now tell you how am I without in my actions as well as in my conversation with my friends and relations.

I make no " Pooja " of the idols that are in my house. I perform no " Sandhya " but instead of which I pray to my Creator and ask his blessing. I often speak to my friends on the necessity of a divine revelation and of a true religion.

( पुढील भागाचा उतारा केलेला नाहीं. )

( २ )

( पत्र २. प्र. १६ पाहा. )

*Belgaum, 11th May,* 1854.

It is nearly—months since I had the pleasure of writing to you. I hope I am not given up by you as a lost creature. I promised you to write soon after my father's arrival in Bombay; but I am sorry to say, that matters were so unsettled, and I was placed in such a critical position, that I could not give you any thing as final and decisive. Never was so trying and gloomy a time in the history of my past life than that which intervened between the arrival of my father in Bombay and my departure with him to Belgaum. And I thank God that I was all the while supported by the most effectual and invaluable counsel I received from my affectionate masters, the Revd. Messrs. Nesbit and Narayan.

The state of my mind was of the most singular character, and I cannot now look back to it but with mingled feelings of intense sorrow and joy. I was troubled with and agitated by every kind of feeling with regard to my spiritual safety. There was God at my right hand and the world at my left. The former I regarded as my Judge and Ruler; I

could not deny Him before man, without incurring His displeasure and ruining my soul. The latter I hated as destroyer of my inward peace and as alienating me from my God. Every hour of my existence was a burden to me, I could neither go against the dictates of my conscience, nor attend to the allurements of the world.

During my father's stay with me, I was treated with the utmost kindness, not a single work was assigned to me, neither a word spoken to me against my principles and opinions. On the other hand discussions on the subject of religion were encouraged and approved of, most of the orthodox doctrines of Hinduism condemned, and a liking to Christianity was manifested by my father. What was the course I was to follow? I could not discern the devices of the devil from the sincere and pure motives, which may have given rise to this course of couduct. My father laid conditions before me. He said that he would keep me in Bombay and himself remain as a pensioner, incurring a loss of 120 Rs. per mensem. Or that he would take me to Belgaum, where he will have time to learn from me the doctrines of Christianity. I did not consent to either of these terms, but as he expressed his desire of knowing the Truth and embracing it if convinced of it, I was not well prepared to answer him at the time. He moreover said that he was ignorant of Hinduism, and as far as he knew it he now thinks it a priestly craft devised by the Brahmins to fill their bellies; and he sincerely hoped that God may make me an humble instrument in his hand to show him the True Way. (पुढील मजकुराचा उतारा राहिला नाहीं) (ह्या पत्रांची भाषा जशी मुळी होती तशीच ठेविली आहे, तींत कांहीं फेरफार केला नाहीं.)

---

## डाक्तर मरे मिचल साहेबांचें पत्र.

### (प्र० १५, १६.)

*Poona*, 1st *Feb.*, 1854.

MY DEAR BABA,

I have read with the deepest interest what you say of the present state of your feelings. I am truly sorry that your father has not yet arrived in Bombay. If your coming out and being separate is dependent on the arrival of your father, I deeply deplore the delay,—for it increases your suffering, and it imperils, I fear, your soul. I do not think, my dear Baba, that you can delay professing Christ much longer even though your father do not come to Bombay at all.

I do most deeply feel for you. Perhaps only he who has passed through similar struggles can fully understand your difficulties and

sufferings; but I can plainly see that you are in great distress. May He who best can, comfort you, guide you, strengthen you! When you ask His direction and assistance does He remain silent, dear Baba? is there no *whisper* in the heart, saying "I will never fail thee nor forsake thee"?

May the Lord Jesus Christ give you so clear a view of His own glory and grace that you shall feel sweetly, irresistibly drawn to Him as your All in all! *Then*, dear Baba, the struggle ends,—when the total surrender of yourself is made to Him, peace will come,—*His* peace—the very peace of Heaven. So long as you do not make the total surrender there is a fight—a tempest—in your heart. When Jesus takes full possession of your soul He says to the warring waves, "Peace, be still,"—and lo! there is a great calm.

The only question I cannot answer, is this: *Why* should poor Baba be tossed by this fierce tempest *so long*? Why is he not amongst us as a brother, rejoicing in his Redeemer,—walking peacefully in the ways of righteousness—and aiding to pluck (अक्षरें गेलीं आहेत.) tell me, dear Baba that you are compelled to wait till your father come. May the Lord bring him speedily! May He give you courage, fidelity, patience! May He soften your father's heart and direct his will.

I think I shall write to you in a few days; but write to me without waiting for my letter. . . . My kindest regards to all the teachers and students.

Ever affectionately
Yours,
J. M. Mitchell.

---

## (४) दाक्तर विलसन साहेबांचीं तीन पत्रें.

### (प्र० १६, १७ पाहा.)

### (१)

*Bombay*, 8*th August*, 1854.

My Dear Young Friend,

The papers forwarded by Mr. Taylor, I received an hour ago; and Messrs. Nesbit and Narayan have perused them as well as myself. We all feel an affectionate and prayerful interest in your case, and commend you to the grace and keeping of the loving and faithful Saviour. We are united, too, in our judgment of what, with the help of God, you should immediately do, that is "Come out and be separate." You cannot be too

soon in the visible fold of Christ, having, we trust, already entered that which is invisible. You will be able to preach more advantageously to your parents from Christian than from equivocal grounds. Your public profession of the truth will mitigate their efforts to retain you. It will be blessed to give peace to your own soul. There can be no peace while we do not fully follow the Lord. If there were, we should often secure ourselves in that which is wrong. Don't be afraid of them who can kill the body and after that have no more that they can do. The grace of Christ is sufficient for you. As your day is, so will you find your strength to be. I can testify this from blessed experience.

It will be well for you, we think, to go to Mr. Taylor, even before your father returns, and to have baptism consummated before you are subjected to renewed trials connected with him. We shall be just as happy to hear that Mr. Taylor has baptized you as if we had done it ourselves. We are all one in Christ; and it is *his* glory only that we should seek. May the Lord give you the fresh baptism of the Spirit along with that of water. When you are baptized, think of that blood of sprinkling which removes the stains of guilt, and that cleansing of the Spirit through which the moral pollution of our natures is washed away. May the joy of the Lord be your strength, when you stand forth as a soldier of the Cross. I write this in a great hurry, not to lose a single post. I shall (D. V.) write again on Thursday (to-morrow is my lecture day.).

With constant prayer for you and yours,

I am, my dear young friend,
Yours affectionately in the Lord,
JOHN WILSON.

( २ )

*Bombay*, 10*th August*, 1854.

I wrote to you a few hurried lines on Tuesday; and those which I send you to-day must be of the same quality, for I don't feel very well.

I hope divine grace will enable you to act on your resolution of being immediately baptized, and that by our dear old friend, Mr. Taylor. Decision, humanly speaking, will be of more use to yourself and family than any thing else. Profession must be the fruit of true faith. "Whosoever shall confess me before men, him will I confess before my Father in heaven," says Christ. "If thou shalt confess with thy mouth the Lord Jesus and shall believe in thine heart that God hath raised him from the dead, thou shalt be saved," says his servant in his name. "He that believeth and is baptized, the same shall be saved." Though baptism

itself does not save, it is a fruit of that obedience which a saved-man should bear, as the symbol or act of his public profession, when he has not been baptized in his *youth*. I give you a few lines of WELCOME, which I composed a few days ago :—

Welcome, welcome, Indian youth,
To the Christian fold;
Our hearts with joy thy faith now see,
Thy courage true behold.

Thy strength is not from lowly earth,
But from heaven on high;
The word and Spirit of the Lord
To thee are very nigh.

The Saviour called thee from afar
And sent his glorious light,
Which hath dispersed from thy soul
The darkness of the night.

For Him thou hast rejected all
Thy gods and idols vain;
But having him thou hast enough,
For thy eternal gain.

He is thy Father, Brother, Friend,
Thy Prophet, Priest, and King;
Thy Lamb, Redeemer and Lord,
Whose praise 'tis joy to sing.

To thee He hath revealed His grace,
His favor and his love;
To thee a title He has given,
To all the joys above.

That all through his Cross you have
And it will never fail;
That title's sure when your whole works
Can naught at all avail.

You hold it by a living trust
Which in his promise rests;
A trust which moveth all your powers
To follo whis behests.

To God, the Lord, we thee commit,
Who is your all in all;
May he uphold you by his power,
So that you may not fall.

May he conduct you through this life,
Giving the victory sure;
May he be yours with fulness great,
Now and for evermore.

These are my thanksgivings and prayers in your behalf.

( ३ )

*Bombay*, 1*st September*, 1854.

My Dear Baba,

I hope both my notes reached you; and that you will be able to write to me very soon. We should be glad to learn that your baptism has taken place, if it has not already occurred. May the Lord be with you and pour out his Spirit upon you in connexion with that solemn and interesting event. Your letter to the *Dhumketu* was very interesting. Much is said about you here; but the natives admit your sincerity and capacity of judgment, I am glad to say that many youths in our Institution approve of your proceedings. May grace be given to them to imitate your example. I hope other members of your family will soon join you. Full Christian obedience on our part is the most effective argument with all our friends.

We expect soon to have some baptisms here.

We constantly pray for you.

Mrs. Wilson joins me in kindest regards; and I am, my dear Baba,

Affectionately Yours,

John Wilson.

---

## ( ५ ) रेव० नारायण शेषाद्री यांचीं दोन पत्रें.

( १ )

*Bombay, Chowpati, 10th August*, 1854.

My Dear Baba,

It is now some time since I received two very kind and interesting letters, and is it not too bad of me not to have acknowledged them as yet? I know you will not attribute this long, and I believe, very culpable silence to indifference or coldness toward you. Believe me I have never forgiven myself this act of delinquency in my friendly dealings with you. Yesterday I had a hearing of the deeply interesting

correspondence between yourself and Mr. Apaya and of your letters to Mr. Taylor, and that has produced in me a mingled feeling of joy and sorrow. I am very glad that you have resolved to embrace the Lord Jesus and leave all consequences to God. As Mr. Nesbit went on reading your letters I was quite overcome because you have had no one to give you comfort and consolation in your present deplorable state. Having gone through the same fiery trials that you are called upon in the good providence of God, to go through, I can now well sympathize with you. All that I can advise is to go on persevering in the manner you have hitherto done, and I am sure the gracious Lord will bring you out of all your difficulties and grant you the victory you so much long for. In the end your conversion will, I am convinced, have a most salutary effect upon your father and mother and the other members of your family.

It is very gratifying to hear that you feel your own inability to do anything of yourself. It is when we feel our weakness that God makes us strong. Remember what the great Apostle of the Gentiles says, " When I am weak then am I strong. I can do all things through Christ which strengtheneth me. " You say in one of your letters that you have no strength to stand on your legs. Well, whenever you are in that state look to Christ to strengthen you. Do you remember in what state Luther was the night previous to his appearance at the diet of Worms? Remember the remarkable prayer he offered on that occasion. And what do you think it was that made him come off so victoriously in the presence of that august assembly? It was nothing else but that firm reliance which he had on the promises of God. Lay hold on those promises and you will be able to remove mountains. Yours friends in Bombay are praying for you and your dear brother, and I hope the Lord will answer them in his own good time.

I think you needlessly distress yourself about your temporal wants. The dear brethren at Belgaum will, I am sure, do anything for you with much pleasure. I think immediately after your baptism you should set out for Bombay and we are all with outstretched arms ready to receive you now as a brother beloved. Mr. Nesbit, as he told you before, will be most ready to accommodate you in his house, and that will be of great advantage to you, for then you can attend all his classes at home and be present at the family worship, which, I am sure, you will consider as the greatest intellectual and spiritual treat you can ever have. However I shall write to you to-morrow fully about this and other matters, for I am determined to redeem my character and make

up for my past negligence. If my writing has any effect in soothing your troubled spirit I shall deem it no ordinary gratification. You will excuse me for having written this letter so hurriedly and incoherently. There have been so many interruptions since I commenced to write it. It is now my school time, and I must run to the F. Boarding School and thence to the Institution. Please remember me very kindly to your brother and assure him of my deep sympathy and love to you both. My dear wife desires me to send her kindest regards to you both.

Yours affectionately,

N. SHESHADRI.

*Bombay, Chowpati,* 11*th August,* 1854.

MY DEAR BABA,

My yesterday's letter was so hurriedly written that I was obliged to promise to write you again to-day. I hope the Lord has by this time made your path of duty quite plain before you. Indeed you seem to know it very well. All that you now need is strength from on high to follow out the plain dictates of your conscience and the word of God; and if you wait on God in earnest prayer and supplication that will be granted to you. He will grant you as much strength and courage as you need. Dear friend, remember you have a very soft and tender disposition, and, although it is a great blessing to have such a disposition still you must be aware that that blessing may be abused as every other blessing. And you will need no sublunary strength of mind to overcome the tears and lamentations of those near and dear to you. I think the harrowing and heart-rending scenes that take place whenever a young man renounces the faith of his ancestors and embraces the Lord Jesus in the presence of all, are nearly as exact as the fiery trials of the early Christians regarding whom you have read so much. Take care, do not then give way before the strength of natural affection. Let the new man, and not the old, have victory over you. Remember Perpetua and Felicitas of Carthage and Cyril of Cæsarea. Both my beloved wife and myself have been praying for you. You will do well, you remember the trials and mental sufferings of Luther. It is good sometimes to be as bold as the great Reformer of Germany and Scotland were, although the world may count them as obstinate, stern, and overbearing, &c. Chalmers used to say in all matter of conscience we must not give in so much as a hairs breadth. Is not this a noble sentiment? He acted on this principle and showed its strength to his

astonished—at the memorable Disruption of 1843. I trust you will be able to achieve similar deeds of Christian heroism and prove yourself greater than Alexander or Cæsar or Bonaparte.

I remain,
Yours affectionately,
NARAYAN SHESHADRI.

---

## ( ६ ) रेव० जे० टेलर साहेब यांचें पत्र.
## ( प्र० १६ पाहा. )

MY DEAR YOUNG FRIEND,

Your communication which was put in my hands yesterday evening at the Chapel I read afterwards with very great interest. I do indeed rejoice at the indications afforded that God in his great mercy has begun a good work in your soul and I sincerely trust it will prove a work of salvation to more members than one in your family, especially may He open the eyes of your father's understanding to perceive the precious truths of the Gospel of God's full grace through Jesus Christ, who alone is the way, the truth, and the life, and through whom alone can any sinner find acceptance with God and be made a partaker of eternal life. And may He not only apprehend what is true and have strength given to him to receive the same with faith and love in his heart and have grace imparted boldly with yourself—your brother and your wife openly to profess the same without fear or shame, and join yourselves with those who worship the living and true God and who believe in His Son Jesus Christ who came into the world to save us from our sins, to cleanse us from all unrighteousness, to purify and make us holy, to fit us for His service on earth, and to deliver us from the condemnation and misery of hell, and make us meet for the enjoyment of everlasting happiness in his kingdom of glory in heaven by His grace through the teaching of His holy word and powerful influence of His holy Spirit, whose work in our hearts alone can make us new creatures, sincere believers, and consistent Christians.

My dear friend, I shall be very happy to have some personal intercourse with you before any decided steps are taken as to the best course for you to pursue. Should your father be induced to join you it will be a great thing. Then there will not be many difficulties to encounter and contend with. Well, let us both wait on God in fervent prayer and humble hope that some great good will result by the present agitation produced in your mind, not only as it respects yourself and the

members of your family, but to many around you who are in ignorance regarding the things which make for their peace, such as will give joy, in heaven among the holy angels and on earth among God's people, the followers of the Lamb of God who taketh away the sin of the world those who are true Christians.

( याच्या पुढील मजकुराचें पान गहाळ झालें. )

---

## अंक ६.

## एका सन्मान्य मित्राचें पत्र.

*Boodhwar Peit, Poona,* 16*th March,* 1887.

My Dear Mr. Baba Saheb,

I had to indent very largely on my memory for the following information which you require from me as regards the Paramhaunsa Mandali with which we both of us were connected.

You were attending Dr. Wilson's School and I was in the Robert Money Institution. We both of us were favourably disposed towards Christianity and our Hindu friends—most of whom were very bitterly opposed towards the Christian religion, did not approve of our conduct. They thought that if we ultimately embraced the Christian faith—the religion of the rulers of the land—we would cease loving our country and all that was great and good in the land, and instead of taking any interest in the welfare of our motherland we would be completely denationalized and love every thing that is English. They were no doubt labouring under misapprehensions. A man by embracing the Christian religion truly and sincerely loves his native land and does every thing to promote her best interests, temporal and spiritual.

Bhicoba Luxumon and Succaram Luxumon, the two brothers of Bhandari caste, the former of whom was employed as a teacher in the Marathi school connected with the Church Missionary Society and the latter who was educated in the Robert Money Institution and subsequently employed as teacher in the same school, were using their best endeavours to convince me that the Bible was full of absurdities, errors and immoralities. As I used to take infinite delight in reading books written by the most celebrated infidel writers of England and Europe, as well as those written in defence of the Christian religion, these two brothers did not succeed in converting me to their views. Both of these brothers were members of the Paramhaunsa Mandali. They in conjunction with Luxumon Shastri Hullbay, Succaram Shastri who was subsequently employed in the Marathi department of the Bombay Custom House, Bal Bhaskar Sintray who was employed in the

Translator's Department of the Appellate Side of the then Supreme Court of Judicature, and Muddon Shreecrustna, Judge of the Small Causes Court, who subsequently recanted and became an orthodox Hindu and disciple of Dev Mamlutdar, undertook the work of persuading men to join the Paramhaunsa Mandali which had already been established. If my memory does not fail me, it was in 1850 that this Mandali was started. The prime movers, Rao Bahadur Ramchander Balcrushna, Duffterdar to Mr. Spooner, Commissioner of Customs, Dr. Atmaram Pandurung, the President of the Bombay Prarthana Samaj and Rao Bahadur Dadoba Pandurung, had under them the above named persons who went about in collecting members. Bhau Mahajan who started the Marathi weekly paper, the *Prabhakur*, never attended the meetings of the Mandali for want of moral courage, but he was its staunch advocate and sympathised with the objects the Mandali had in view. The objects were the introduction of Re-marriages of widows amongst those classes of the Hindus who were not allowed to remarry the widows, the abolition of the system of caste, and the worship of one God, the Supreme Governor and Ruler of the universe. The meetings always commenced with prayers and ended with prayers. These prayers were composed in the Marathi language. When a new member was about to be admitted he was first tried by one or two members at a particular place appointed for the occasion by their eating together bread purchased from a Portuguese bakery. The chief men were then informed that Mr. So and So had broken his caste and was willing to become a member of the Mandali. When the Mandali approved of the proposal made to them the candidate was presented at the next meeting, when questions were put to him with reference to the object of the Mandali mentioned above. When he gave his unqualified assent water was poured in his hand and he was told to throw it on the ground, which was a token of his having broken caste and other religious prejudices. To test the sincerity of the new comer, bread was cut into slices and all the members partook of the same. The blessing of God was invoked on the candidate that He should bless him and inspire him with courage to continue faithful to the Paramhaunsa Mandali. Bhicoba Luxumon officiated on such occasions.

Bal Bhaskar Sintray and Muddon Shreecrustna began to pay constant visits to my house and sound me on the subject. They tried to become very familiar with me. I could not at first fathom their motives, but I subsequently learnt that their object was that I should join the

Paramhaunsa Mandali. As I had no faith in the Hindu system of caste and in the Hindu religion, I easily yielded to them, and without any hesitation joined the Mandali.

During the time that we were connected with the Paramhaunsa Mandali till the abolition of the same, we invariably argued about the necessity of particular system of religion, on which the Mandali should be founded. Most of the members said that each one should follow his own religious convictions. We said, that we should have an authoritative Divine Revelation to guide us both in time and eternity. If there was a God and if there was a hereafter, it was but right and just that we should know his will. As reason and nature around us could not exactly tell us what the will of God was—though they tell us of God's power and wisdom, and how we should offer up our prayers which will be acceptable to him—we should have something like a mariner's compass to guide us in this world, by which we should be able to fight successfully with the numerous evils in the world. We further maintained in the midst of scorn and scoffs that authoritative revelation of the will of God was contained in the Bible of the Christians. We were laughed at by some and treated with contempt by many for agitating questions of this nature. Mr. Moroba Vinoba agreed with us, so far as the importance of having some kind of religion for the basis of the Sabha was concerned. He also maintained that Christianity was superior to all the existing religions, but he failed to see that the Christian religion was the infallible record of God's revelation to man. We proved a great bore to them, and we were subsequently quite dissatisfied when we both of us saw that they showed systematic and stolid indifference towards the all-important subject of religion, which should have formed the fundamental basis of the Paramhaunsa Mandali.

I do not know exactly who betrayed the secret of the Society. Some members of the Purbhu community, I believe, spread some reports as to what they eat and as to who the enlisted members of the Sabha are. People began making minute enquiries. This disheartened most of the members, and the attendance gradually thinned, and ultimately the Sabha became a thing of the past. Just about the time the secret of the society was betrayed, it was rumoured in our meetings that Dr. Bhau Dajee and Bhau Russol's Dadajee were about to join the Sabha, but when the Sabha was given up, they could not join.

I do not remember having seen a MS. book written by Mr. Dadoba Pandurang.

Dadoba Pandurang and Bhau Mahajan never attended the meetings.

When we were quite dissatisfied with the working of the Paramhaunsa Mandali, we hired a room in which yourself, myself and Mr. Moroba Vinoba used to meet together and hold conversations on the subject of religion, and especially on the subject of Christianity. In our meetings of the society called Satya Shodhak Mandali, after we left the Paramhaunsa Mandali I distinctly remember that we approached the foot of the throne of our heavenly King, and fervently and incessantly prayed that He might open the eyes of our understanding, and inspire us with courage to make a good confession before all men of our faith in Christ as Divine Mediator between God and man. In answer to our prayers, you at once took up the cross and embraced Christianity, and have now become a happy man.

Please excuse me for the delay.

Yours sincerely
NARAYAN RAGHUNATH NAVALKAR.

---

## अंक ७.

## माझ्या बाप्तिस्म्याची हकीकत.

### १ (लंडन मिशनाच्या दप्तरांतून घेतलेली.)

Baba Padmanjee, a young man who has highly distinguished himself among the educated natives of the Bombay Presidency, and the author of several little works. He commenced his English studies in our English Institution. He attracted my attention " says Mr. Beynon," when but a boy, by the diligence and zeal with which he pursued his studies. After leaving Belgaum he entered the Elphinstone College, Bombay, where he continued for about a year. He then joined the Institution of the Free Church of Scotland, where he continued for some years, and became one of the most industrious and successful students. He arrived here with his parents in April last. We found him in a very interesting state of mind in reference to the interest of his own soul. He, however, hesitated as to his duty in making an open avowal of his faith in Christ on account of his wife and parents. Shortly afterwards circumstances which occurred in his family, in connection with a sermon which he heard from the parable of the marriage supper, on Sabbath evening in the Mission Chapel decided him. He was baptized on the 3rd of September before a large congregation of Europeans and Natives.

His own countrymen, he addressed at the time in Marathi. The substance of the address we insert, as it will show the state of his mind and his earnest longings for the salvation of his countrymen.

MY DEAR FRIENDS AND COUNTRYMEN,

It is not my desire that you should go home without being benefited by the scene which you have witnessed this evening. Silver and gold have I none, but such as I have, I give unto you. It is my earnest desire that you should go home reflecting upon what you have seen and heard. My time is limited and I cannot say much.

You all know that I became a Christian. What do the people say about me? The whole of their clamours may be resolved into three charges against me. 1. They say that I have renounced my religion and embraced another. 2. That I am polluted and defiled, and have become an outcaste. 3 That I have left my parents. All these things are highly sinful in their opinion.

Now my friends, if you will but consider these things rightly you will find that the accusations are groundless. In the first place I beg to inform you about renouncing my own religion. There is no such thing as *my* religion and *your* religion. There is but one religion established by God. All others are no religion at all. They are merely human inventions; they did not exist in the beginning and their existence now does not prove that they are true. It is therefore the duty of every man to examine the religion in which he was born, and to embrace that which he finds to be the true. He does not renounce his own religion, on the contrary he abandons that which was not his own and embraces that which should properly have been his own, and which he as a rational and moral being ought to possess. I have no time to demonstrate the truth of Christianity, or to compare it with the different systems of mankind. But let us touch upon the leading features of that system you profess to follow, and compare it with Christianity.

"The character of the incarnations of the Deity mentioned in the Hindu sacred books is so vile and unholy that it would debase even man. How can it honour God? Perhaps you will say that the Vedas give a true representation of the Divine character. I refer you to an article lately published in the *Dhom-ketoo* (comet), one of the leading native newspapers in Bombay. The learned editor, who is a Hindu, says that the Vedas contain conflicting opinions and doctrines. They uphold pantheism and atheism, and the whole is but a mass of

confusion and meaningless absurdities. But this is not all. Suppose you want to become a follower of the Vedas, a Brahma Dnyani (one who has the knowledge of Brahma), you must divest yourself of all feeling, you must not observe any difference between right and wrong, what is holy and unholy; you must regard all things as equal. How can such a man live in society? He is utterly unfit for the performance of any duty. Can this be the character of a religion given by God? Do you think that a holy and merciful God would appoint such a religion for mankind? Christianity is not so. It reveals God as a being perfectly holy, just and good, that he hates sin and punishes sinful men.

"The second accusation is that I am polluted. But what is pollution? It does not consist in eating this thing and that thing. God has made all things for our use. The true defilement of man does not consist in what entereth into a man, but in that which cometh out of the heart, which are evil thoughts, adulteries, fornication, murders, pride, covetousness, and the like. This is the true definition of defilement, and according to this all Hindus and Brahmins should be considered as polluted. I leave this to your consideration.

"The third fault you find with me is that I am separated from my family. But this charge recoils upon Hinduism. It is the cruel and wicked system of caste which does all this. There is nothing in Hinduism calculated to persuade and convince its apostates and bring them back. Hatred, enmity, revenge, persecution and revilings are the only means it uses towards those that forsake it, not to convince them of the truth of its doctrines, but rather to make them abhor it. The Hindu Shastras look upon one who has broken his caste as a dead man, they enjoin the performance of his obsequies. In their sight he forfeits the right of his property, and what is worse than all his natural relationships with the members of his own family are dissolved. He is no more the son of his parents, the husband of his wife, the father of his child or the brother of his sister. How wicked and cruel and unjust is such legislation, and it professes to come from God! It is true that Christianity demands separation, and separation even from our parents. But mark the difference! We are to forsake our parents when they come between us and God, when their commands are against God's holy law. God is our heavenly Father, and is infinitely greater than our earthly parents. It is, therefore, just and right to leave father and mother for God's sake. But a Christian does not hate his parents. He loves them more than before, he prays

for their conversion, honours them as his parents, and obeys them in all their commands which are consistent with the word of God and the path of duty. I am very thankful to say that my parents have not strictly obeyed the cruel laws of the Shastras. They have been mild in their treatment of me. I have been permitted to visit them, and to partake of food in their house (in a separate apartment); and what has influenced them to such a course of conduct? Not Hinduism. They have pursued a different course. It is, I believe more or less on account of the knowledge of the truth I have been able to communicate to my father during the last two years.

"My friends, I earnestly beg of you to think of your friends. Our life is short and uncertain. The next day or hour may not be ours. Sooner or later we must all appear before the judgment seat of Christ. We cannot of ourselves work out our own salvation, for we are continully sinning. How can sweet water issue from a fountain of salt water? Christ has wrought out a righteousness for us all. He came to this world to die for us, and to satisfy the demands of God's justice. If you believed in him, you will not only receive a full pardon of your sins, but a suitable disposition to walk righteously, a new heart to love holiness. No other religion makes these excellent provisions for us. Hinduism speaks of pardon, but knows nothing of purity, nor has it any power to impart it. A thief may be pardoned but still his propensity of stealing remains the same, and he is still called a thief. He requires a change of his nature to make him an honest man. Christianity comes forward to effect this change in your heart; receive it and you will be happy here and hereafter."

---

## २ ( फ्रि. च. मि. च्या रिपोर्टातून कलकत्ता आबजरवर पत्रांत घेतलेली हकीकत. )

### CONVERSIONS IN THE FREE CHURCH OF SCOTLAND'S MISSION IN BOMBAY IN 1854.—NATIVE CHURCH.

The annual meeting of the Bombay Auxiliary Missionary Society of the Free Church of Scotland was held on the 19th December. The proceedings were of a very interesting character. From the Report of the missionaries, communicated on the occasion by Dr. Wilson, we make the following extract; deferring other portions of it till another opportunity.

In connexion with this station, six individuals have been admitted into the Native Church during the past year.

The fourth addition to the Church is Mr. Baba Padmanji, one of the most distinguished and successful students and monitors who have entered the Educational Institution since its first formation. This young native gentleman, now in the twenty-third year of his age, after obtaining considerable instruction at the Government Marathi school at Belgaum, entered the English school at that place under the care of the Rev. Messrs. Taylor and Beynon of the London Missionary Society, at which he remained for about four years, acquiring the elements of English reading and of Christian and general knowledge and during which, at his own house, he perused various tracts and portions of the Scriptures, though not unfrequently with marked feelings of hostility to their contents. In 1847, he came to Bombay for the completion and perfecting, of his education, according to the views of his father, employed in the higher native department of the engineer service of Government. In the first instance he entered the Elphinstone Institution, at which he remained for about a year, when, after residing about eight months with his father at Aden, he joined the Free General Assembly's Institution in August, 1849. At this time he was, as he states, a firm believer in the Hindu religion. From the higher classes of the School Division he soon passed into the College Division of the Institution. He prosecuted his studies with great zeal and interest, attracted the attention of all his teachers, both European and Native, by his attention, candour, and success in the acquisition of knowledge. The lectures and meetings of the mission, and services of the Church, he also regularly attended. His respect for the Bible increased with his knowledge of its contents and his study of the Christian evidences and doctrines. He began, in the first instance, to doubt the stability, and afterwards clearly to perceive the instability of the foundations of popular Hinduism, with the literature of which he was well acquainted. When drawn by the force of conscience from this the current system of belief, he was hopeful that a refuge might still be left for him in the ancient Védas or philosophical Vedánta; but expositions of their contents in periodicals and lectures and class-rooms, and the perusal of translations of some of their most important portions, convinced him that these remarkable writings, instead of having God as their author and salvation as their end, bear the most unequivocal marks of a fallible paternity, and are only the embodiments of the grossest religious error. The writings of European infidels were put into his hands by an acquaintance aware of his religious anxiety; but a perusal of them gave him no satisfaction. His intimate know-

ledge of the Bible enabled him to see that these works deal most unfairly with the contents of the sacred writings; and his study of the Evidences of Christianity enabled him, through the Spirit of truth and holiness, to repel their arguments and insinuations. Three Marathi pamphlets of great excellence were published by him,—two of which appeared through the Bombay Tract and Book Society,—evidently written on principles congenial with the Bible. He became anxious about his relation to God as a sinner needing the pardon of his transgressions and the renewal and sanctification of his soul. The Gospel offer, with his trust in that Saviour whom it reveals, imparted to him the Gospel hope. He became a Christian in conviction and feeling and the habit of his life. His duty of confessing Christ before men was gradually perceived by him in its imperative form. Yet, desirous of bringing his relatives with himself into the Christian Church, he paused at its portal calling them both by word and letter to follow him. Last hot season he left Bombay with his father, and joined his family at Belgaum. His feelings in regard to its members ranged between hope and fear. He had long disused heathenish ceremonies, and a call by those around him to resort to them on a particular occasion, showed him the danger of his position, as stopping short of his full profession of faith in the only living and true God and Jesus Christ whom he has sent. He enjoyed the kindest advice and sympathy of the missionaries at Belgaum. He found an endeared home in the family of the venerable Mr. Taylor. He opened a correspondence with us his teachers in Bombay. We advised his immediate entrance into the visible Church; and, after listening to an excellent discourse by Mr. Beynon, and witnessing a good confession before many witnesses by deed and word, he was baptized by Mr. Taylor on the 3rd September last. He has since returned to Bombay, where he has resumed his duties in the Institution, to our great delight and satisfaction. We cherish the hope that, by his rare literary attainments and devotedness to the service of God, he may be an eminent instrument of showing forth the praises of God in this benighted land.

From "The Calcutta Christian Observer."
Vol. xxiv, No. 274, March, 1855.

# पुरवणी.

## ख्रिस्तविलीन रे. बाबा पदमनजी, मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचे जनक.

### ( रे. नारायण वामन टिळक यांजकडून. )

देवाची समक्षता आणि **त्याचें** सामर्थ्य अबाधितपणें व्यक्त करणारें चरित्र जिचें आहे, अशी व्यक्ति जगांत होऊन जाणें हा केवळ देवाचाच अनुग्रह समजला पाहिजे. ज्या देशांत, ज्या समाजांत अशी व्यक्ति झाली, तो समाज धन्य होय.

मनुष्याला सर्व गोष्टी समजतील, पण ईश्वराचें प्रेम आणि त्याचें सामर्थ्य साक्षात्कारावांचून समजायाचें नाहीं. नुसत्या ज्ञानाला, नुसत्या तर्काला हें अगम्य आहे. **देवानेंच** अवतार घेतला, **त्यानें** स्वतः आपल्या प्रेमाचा, आपल्या सामर्थ्याचा साक्षात्कार जगाला दाखविला, तेव्हांपासून मात्र जगाला देव कसा आहे हें कांहींसें कळूं लागलें. पौल, पेत्र, स्तेफन आदिकरून महात्म्यांनीं ईश्वराचा अनुग्रह ह्मणजे काय हें आपल्या चरित्रावरून साक्षात् जगाला दाखविलें, तेव्हां खिस्ती महामंडळाची उभारणी झाली. आकाश व पृथ्वी टळून जाईल, पण देवाचें वचन टळणार नाहीं, ह्या वाक्याचा साक्षात्कार जगाला पटवून देणारे किती तरी संतमहंत व मार्टर होऊन गेले, तेव्हां त्या महामंडळाचा इतका विस्तार झाला. विद्या, तर्क, वक्तृत्व इत्यादि गुणांच्या बळावर जगाला देव जवळ करून देणारे पाहिजे तितके मिळतील, आणि ते नुसत्या ह्या गुणांच्या बळावर जितपत काम होण्यासारखें आहे, तितपत तें करितील, पण ज्यांचीं चरित्रें मनुष्याला साक्षात् ईश्वरापुढें नेऊन उभा करीत आहेत, असे महात्मे रत्नांसारखे दुर्मिळ होत. असल्या महात्म्यांचीं चरित्रें सर्वदा स्मरणीय, सर्वथा अनुकरणीय होत.

प्रस्तुत पुस्तक ज्यानें लिहिलें आहे त्या महात्म्याचें चरित्र असेंच आहे. ह्या पुस्तकाला इंग्रजींत "आत्मचरित्र" व मराठींत नुसतें चरित्र ह्मटलें आहे. पण ह्याच्या नांवाप्रमाणें हा "**अरुणोदय**" आहे, सूर्योदय

नाहीं. रात्रीचा अंधार कमी कमी होत जावा, दिशा थोडथोड्या उजळूं लागाव्या व त्यांतच अरुणानें उदित होऊन आतां सूर्योदय होईल असें जगाला जाहीर करावें, तसेंच ह्या **अरुणोदयानें** केलें आहे. रे. बाबा पद्मनची यांचें जन्म १८३१ च्या मे महिन्यांत झालें, तेंव्हांपासून ता० ३ सप्तेंबर १८५४ या रोजीं त्यांचा बाप्तिस्मा झाला, तोंपर्यंतची हकीकत त्यांनीं ह्या सर्वांगसुंदर ग्रंथांत वर्णिलेली आहे. ह्यापुढची ह्मणजे प्रभु येशू ख्रिस्ताच्या ठायीं त्यांचें पुनर्जन्म झाल्यानंतरची हकीगत ह्यांत दिलेली नाहीं, दिली असती, तर अर्थात् त्यांनीं ह्या ग्रंथाला अरुणोदय न ह्मणतां अरुणोदय व सूर्योदय असें ह्मटलें असतें. आपल्या इहलोकींच्या जिण्यांत देवाच्या आत्म्यानें सारा अंधकार दूर करून अरुणोदय कसा होऊं दिला हें बाबासाहेबांनीं इतकें उत्तम रीतीनें सांगितलें आहे, कीं आतां ह्यापुढें झालेल्या सूर्योदयाचें वर्णन त्यांचें त्यांनीं न करितां इतर कोणीं तरी करणें ह्मणजे बरेंच धाडसाचें काम आहे, आणि ह्मणूनच आह्मी तें करण्याचा निदान आज तरी प्रयत्न करीत नाहीं. आज आह्मी त्या अत्यंत उज्वल, अत्यंत हितकर सूर्योदयाचें नुसतें दिग्दर्शन करणार आहों; म्हणजे "हा पाहा तो सूर्य !" इतकेंच ह्मणून स्वस्थ बसणार आहों. ह्या निरभ्र आकाशांत झालेल्या सूर्योदयाचें दैदीप्यमान स्वरूप बाबासाहेबांच्या "अनुभवसंग्रह भाग १ व भाग २" ह्या पुस्तकांतून बरेंच दृष्टीस पडतें.

असो, अरुणोदय ह्मणजे बाबासाहेबांच्या धर्मान्तराची स्वतः त्यांनींच लिहिलेली सविस्तर हकीगत. ही हकीगत वाचीत असतांना ज्या कित्येक गोष्टींनीं मन तल्लीन होऊन जातें, त्यांतली पहिली, अगदीं अग्रगण्य गोष्ट हीच दिसून येते, कीं त्यांचें मन पहिल्यापासून सत्यप्रिय व श्रद्धालु असून बुद्धिमत्तेनें आणि विद्वत्तेनें त्यांच्या आंगच्या ह्या गुणांना अधिकाधिक उद्दीप्त मात्र केलें आहे. ख्रिस्ती होतांना किंवा ख्रिस्ती झाल्यावर त्यांना भीति, संशय, जनलज्जा, आपण जगांतल्या सुखांस अंतरलों ह्याबद्दल विषाद यांचा विटाळ क्षणमात्र होत नाहीं! इतकेंच नाहीं, तर आपण केलें हें अगदीं योग्य केलें, ह्यांतच आपलें इहपरत्र कल्याण होणारें आहे, व हेंच आपल्या सर्व आप्तांनीं व मित्रांनीं करावें अशी त्यांस उत्कंठा उत्पन्न होते. बेळगांवाहून निघतांना ते आपल्या आईबापांना लिहितात, कीं:—

"मी आतां आपणापासून दूर जाण्याचा वेळ आला आहे. अशा प्रसंगीं आपणास मीं चार गोष्टी सादर केल्या असतां आपण त्या कृपा करून मान्य कराल यांत संशय नाहीं.

"मजविषयीं आजपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडून आल्या, त्यांविषयीं जर आरंभापासून विचार केला, तर त्या सर्वांत **देवाचा** हात आहे व ती **देवाची** करणी होती, असें आपणास दिसून येईल, हा विचार फार लांब न वाढवितां मी थोडक्यांत सांगतों. आपल्या पोटीं **देवानें** मला जन्म देऊन माझें लहानपणापासून संरक्षण करण्यास आपणास शक्ति व साधनें दिलीं; व मी जेव्हां वयानें वाढत गेलों, व ज्या समयीं माझ्या गुणांचा, लक्षणांचा माझ्या मनांत पाया घातला जावा, त्या समयीं **देवानें** आपणास असअशा ठिकाणीं फिरविलें व अशा स्थितींत ठेविलें, कीं मला तेणेंकरून वाईट व दुर्गुणी मुलांची संगति लागण्याचा प्रसंग आणिला नाहीं, व मी यासाठीं **देवाचे** व आपले आभार मानतों, कीं लहानपणापासून माझ्या मनाचा कल दुर्व्यसनाकडे लागला नाहीं. तर ह्या गोष्टींत ईश्वराचा हात होता असें अवश्य मानिलें पाहिजे. आपल्या घरीं नाच, बैठकी व जुगार इत्यादि पूर्वी पुष्कळ चालत असत, आणि त्या वेळीं जर **देवानें** मला रक्षिलें नसतें, तर मी ह्यांतून कसा निभावतों?

"पुढें माझें मन धर्माकडेस लावण्याचेंहि **देवानेंच** आपल्याकडूनच काम करविलें. हिंदुधर्माचीं पुस्तकें हरिविजय इत्यादि प्राकृत ग्रंथ वाचण्याचा व संस्कृत शिकण्याचा अभ्यास करण्यास जेव्हां आपण मला हरदासांची ओळख वगैरे करून दिली, तेव्हां **देवानें** ज्या कामाकरितां पुढें माझें मन तयार करण्याचा बेत योजिला होता, त्या प्रकारास मी लागलों. मी केवढ्या भक्तीनें हिंदु धर्मग्रंथ वाचावे व कथा ऐकण्यास मीं किती आवडीनें नेहमीं जावें, हें आपणांस माहीतच असेल. प्राकृत ग्रंथ मीं किती वेळां घरांत वाचून दाखविले आहेत. ह्याप्रमाणें पुढें खोट्यापासून खऱ्याची परीक्षा करण्यास **देव** मला तयार करून ठेवीत होता. तर या गोष्टींत ही **देवाची** करणी पाहिली पाहिजे.

"नंतर मी इंग्रजी शाळेंत जाऊं लागल्यावर तेथें पाद्री साहेब (हेच टेलर साहेब) देवाची प्रार्थना कशी करितात, ती करून दाखविण्यास आपण मला घरीं सांगावें व म्हणावें, कीं सुकटणकराचा मुलगा हुबेहूब

तसें ध्यान धरून तुझ्यापेक्षां चांगली करितो. या सर्व गोष्टी जरी लहान दिसल्या, तरी त्यांच्या द्वारें **देवच** माझ्या अन्तःकरणांत माझ्या लहानपणापासून बीज पेरीत होता, आणि जरी तें मातीबरोबर मिसळल्याप्रमाणें दिसलें, तरी पुढें तें उगवायाचें होतें. आपण सांगितल्यावरून मी, घरांत कोणीं नसलें, ह्मणजे माझ्या फर्स्ट् रीडिंग बुकाच्या शेवटीं लिहिलेल्या लहान प्रार्थना, मेजावर तें पुस्तक टेवून, टेलरसाहेबांच्या बोलण्याप्रमाणें ह्मणायास लागावें. या प्रकारें माझ्या मनाचा कल **देवानें** आपल्याकडेस फिरविण्यास माझ्या लहानपणापासूनच आरंभ केला होता. आतां आणखी पुढलीं पुष्कळ उदाहरणें सांगावीं तर विस्तार होतो. सारांश, जें काम **भगवंतानें** मोहरीच्या दाण्याप्रमाणें पूर्वी लहानसें आरंभिलें होतें, त्याचा वृक्ष होईपर्यंत तें **त्यानेंच** आपल्या नेमलेल्या काळीं पूर्णतेस नेलें. मी जर स्वतः माझ्या बळावर हें करूं जातों, तर तें कधीं न होतें. आज तीन वर्षांपासून मी हा विचार करीत होतों, पण मला किती अडचणी दिसून येत. माझ्या मनाचा अविश्वास, लज्जा, लोकांचें भय, निंदेचें भय, छळणुकीचें भय, पैशाचा लोभ, स्वस्थपणानें व निष्काळजीनें खाण्यापिण्यास मिळतें त्या सुखाची आवड, आपणास दुःख देऊं नये, आपणास मजकरितां लोकांत हसतील ही भीति, अशीं अनेक कारणें व अनेक अडचणी माझ्या डोळ्यांपुढें नित्य उभ्या असत. तर मी निश्चयपूर्वक व सत्य सत्य आपणांस सांगतों, कीं **देवाकडून** मला विश्वास, धैर्य व शक्ति मिळाल्याशिवाय माझ्यानें हें काम करवलें नाहीं. माझ्या विद्यागुरूचें शिकविणें व सांगणें ह्यावरून जर मीं हें केलें असतें, तर तें केव्हांच झालें असतें, परंतु त्यांतून मला केवळ एकानें मात्र प्रसिद्धपणें ख्रिस्ती होण्याविषयीं सांगावें, परंतु माझ्या मनाची स्थिति अशी होती, कीं मीं त्या उपदेशकाची भेट घेण्यासहि चुकवाचुकव करावी, व त्यांच्या गोष्टी ऐकण्याची नावड दाखवावी. हा क्रम मीं, तो व मी एकत्र होतों तोंपर्यंत चालविला; आणि आतां पाहा, कीं ज्या वेळीं व ज्या ठिकाणीं कोणी पहिला मित्र व उपदेशक व मसलत देणारा नव्हता, व आपणास वाटलें असेल, कीं येथें मी निर्भय आहें, व मलाहि वाटलें कीं आतां चांगली संधि येणें कठीण, अशा ठिकाणीं **देवानें** आपल्या अद्भुत करणीनें मला

आपल्यापाशीं घेतलें, तर ह्याविषयीं आपण खेद न मानावा. **देव** आपलें कार्य कोणकोणत्या साधनांनीं सिद्धीस नेतो, ह्याचा आपणांस शोध लागत नाहीं. तो जें करितो तें मनुष्याच्या बऱ्याकरितांच करितो.

माझ्या जाण्यापासून आपल्या कुटुंबांत आतां अव्यवस्था दिसून येते खरी, पण आपण **देवा**वर भरंवसा ठेवावा. **तो** कधींहि वाईट करणार नाहीं. ज्यांनीं **त्या**चा आसरा धरिला, ज्यांनीं **त्या**च्या आशेवरून व **त्याच्या**साठीं इतकें सोसून सर्वांचा त्याग केला, व त्यांत दुसऱ्यांचेंहि अनहित झालेंसें दिसतें, तरी त्या सर्वांचा **कर्ता** कोण आहे? जेव्हां **परात्पर भगवान्**, सर्वांचा **धनी** व सर्वांचा **नियंता** सांगतो, कीं तूं अशा मार्गानें चाल, तेव्हां त्याचा परिणाम काय होईल हा विचार न पाहतां, आपणास तसें चाललें पाहिजे. जसा वैद्य रोग्यास अमकेंच औषध खा व अमकेंच पथ्य कर ह्मणून सांगतो व तो वैद्य सर्वोत्कृष्ट, जाणता व कुशल व प्रामाणिक व दयावंत व ममताळू आहे अशी आपली खातरी आहे, तर तें औषध कितीहि कडू व कंटाळवाणें, व तें पथ्य कितीहि कठीण व अरुचकर असलें, तरी घेतलें पाहिजे, त्याप्रमाणेंच जर **देव** सांगतो, कीं माझ्यासाठीं आईबाप, बायको, घरदार सर्व सोड; आणि **देव** अत्यंत ज्ञानी, न्यायी, परमदयाळू व आपलें सर्वस्वीं कल्याण करणारा व पूर्ण प्रीतीचा आहे, असा जर आपला विश्वास आहे, तर तें करणें अवश्य आहे. (आतां इतकेंच, कीं हें सांगणें **देवाचें** आहे, असा प्रथम प्रमाणपूर्वक खरेपणा समजून खातरी झाली पाहिजे, मग त्याचा शेवट कसा काय करण्याचा तो **देवा**कडेस, त्याची काळजी **त्यास**, त्याचा अभिमान **त्यास**, आपण **त्यास** ह्मणावें, कीं हे **भगवान्**, **तुझ्या** पवित्र आज्ञेप्रमाणें मीं वर्तणूक केली, आतां सर्व गोष्टींची व्यवस्था **तुज**कडेस."

ह्या गोष्टी आपण आपल्या कुटुंबाकडेस लावून पाहाव्या. नुकताच बाप्तिस्मा पावून स्वजाति, स्वकुल, व धर्मान्तर ह्मणजे देशान्तर समजणाऱ्या आमच्या हजारों स्वदेशबांधवांच्या समजुतीप्रमाणें स्वदेश ह्यांना मुकून बसलेल्या तरुणानें आपल्या मातापितरांस लिहिलेलें हें पत्र वाचलें, ह्मणजे त्या तरुणाच्या सत्यप्रियतेचें, ईश्वरावरच्या श्रद्धेचें, नीतिधैर्याचें, आणि नम्रपणाचें जितकें वर्णन करावें तितकें थोडें आहे असेंच ह्मणावें लागतें नाहीं का? असला सत्पुत्र ख्रिस्ती झाला, तरी आपल्या मातापितरांना सत्पुत्रच वाटला तर

नवल नाहीं. बाबासाहेबांच्या मातापितरांचें त्यांच्यावरचें प्रेम तीं जगांत होतीं तोंपावेतों होतें तसेंच होतें, ह्याचें इंगित हेंच आहे. तीं बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ती झालीं नाहींत, तरी त्यांच्या पुत्राच्या ख्रिस्तीपणाचा परिणाम त्यांच्या मनांवर घडल्यावांचून राहिला असेल असें म्हणवत नाहीं. ह्याच पत्रावरून आणखी एक विधान करितां येतें, तें हें कीं ह्या तरुणाची अन्तर्दृष्टि ईश्वराच्या दयेला केवळ वर्तमान काळापुरतीच करून ठेवीत नाहीं, तर तिला त्रिकालव्यापिनी समजून, आपल्या स्वताच्या बाल्यावस्थे-पासून पुढें शेवटपर्यंत व त्याच्याहिपलीकडे तिची व्यापकता पाहत आहे! ह्या दयेच्या व्याप्तीपुढें त्या श्रद्धान्वित दृष्टीला अल्प आणि अनल्प हा भेद दिसत नाहीं; प्रत्येक गोष्टींत मग ती लहान असो व मोठी असो, तिला ईश्वरी योजना दिसत आहे. आह्मीच काय? सारें ख्रिस्ती किंवा ख्रिस्तीतर जग बाबासाहेबांना मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचे जनक समजत आहे, पण ह्या महात्म्याचें माहात्म्य ह्या ग्रंथकर्तृत्वांत नाहीं; तें आहे, तें ह्याचा ईश्व-राशीं जो हनोखाप्रमाणें निरंतर संयोग होता, त्यांत आहे. अशनीं, पानीं, शयनीं, ध्यानीं, मनीं, स्वप्नीं, जनीं, विजनीं त्याला ईश्वर दिसत आहे. आणि **तो** माझा बाप आणि मी **त्याचें** लेंकरूं ही भावना नव्हे, हें नातें सदैव अनुभवून ह्याचा साक्षात्कार तो तुह्मा आह्माला पटवून देत आहे, हीच त्याच्या चरित्राची खरी मौज, खरी महती, खरी उपयुक्तता होय.

ख्रिस्ती झाल्यानंतर लौकरच बाबासाहेब पुण्यास गेले. तेथें ते सुमारें सोळा वर्षें राहिले. पुण्यासच त्यांचें पहिलें ख्रिस्ती-लग्न झालें. त्यांनीं प्रस्तुत पुस्तकांत आपल्या पूर्वधर्मांतल्या पत्नीची सविस्तर हकीकत दिली आहे (पृष्ठ २१७–२२३ पाहा). ह्या अज्ञान, पराधीनबुद्धि पत्नीचें स्वपतीवर निःसीम प्रेम होतें, तिच्या पतीनेंहि तिनें आपणाकडे यावें ह्मणून शक्य तितके प्रयत्न केले. पण स्त्रियांचें दैवत पति असें ह्मणणाऱ्या तिच्याच आप्तांनीं तिला आपल्या दैवताकडे जाऊं दिलें नाहीं, व शेवटीं सहा वर्षांनीं ह्मणजे १८६० मध्यें ती त्या दैवताला सदाची मुकली! गरीब गाय बिचारी! वैधव्याचा अर्थ हिंदु लोकांत काय होतो, आणि त्यामुळें हिंदु स्त्रियांना कसें अशरण दुःख सोसावें लागतें, ह्याची कल्पना ज्यांना ज्यांना असेल, त्यांनाच ह्या गाईच्या मनाच्या स्थितीचा तर्क करितां येईल. बाबासाहेबांचें ख्रिस्ती लग्न झाल्यावर

१८६२ सालीं शेवटीं आईबापांच्या सक्त पाहऱ्यांतून सुटून ती त्यांच्याकडे येते, व त्यांना तिचा स्वीकार करतां येत नाहीं! साऱ्या अरुणोदयांत वाचणाऱ्याचे डोळे खळकन् भरून येण्यासारखें स्थळ जर कोठें असलें, तर हें आहे. स्वपत्नीची हकीगत सांगून झाल्यावर बाबासाहेब, ख्रिस्ती झालेल्या तरुणांच्या श्वशुरादि आप्तांना थोडासा बोध करीत आहेत आणि तो योग्य आहे. पण आम्हांला वाटतें, ह्या हकीगतीवरून ख्रिस्ती तरुणांनींहि बोध घेण्यासारखा आहे; तो हाच, कीं त्यांनीं आपण आपल्या पत्नीच्या ठिकाणीं आहों असें कल्पून वागावें.

पुण्यास असतांना त्यांनीं बराच काळपावेतों फ्रीचर्च मिशनच्या शाळेंत शिक्षकाचें काम केलें. हें काम करीत असतांनाच त्यांनीं मेजर क्यांडीच्या इंग्रजी मराठी कोशाचा संक्षेप केला. ह्या कामाला उद्देशून ते ह्मणत आहेत—"जें काम माझ्या हातून होत आहे तें केवळ मला आश्चर्यकारक वाटतें, एवढेंच नव्हे तर जणूं काय तें अद्भुत कृत्यच आहे असें मी समजतों. दररोज मला पुष्कळ श्रम करावे लागतात, मी फार अशक्त आहें, इंग्रेजीचें माझें ज्ञान फार कोतें आहे, गुणदोषांची परीक्षा करण्याची मला फार थोडी शक्ति आहे, माझी विचारशक्ति फार अशक्त आहे, अशा प्रकारची दुर्बलता व कमतरता असून मी हें काम चालवीत आहें, मला ह्या कामांत कोणा मनुष्याचा आश्रय नाहीं, सर्व कांहीं मला एकट्यालाच करावें लागतें, कोणी मला साह्य करीत नाहीं, कोणी मसलत देत नाहीं; असें असतांहि ह्या कामाचें पाऊल पुढें पुढें पडत आहे, असें कां? ह्याबद्दल गर्व बाळगण्याचें कांहीं कारण आहे कीं काय? नाहीं; तर उलट नम्र होण्याचें पुष्कळ कारण आहे. आणि "परमेश्वर माझा मेंढपाळ आहे, मला उणें पडणार नाहीं" हीच माझ्या कार्यसिद्धीची किल्ली होय." केवढा दीर्घोद्योग हा! आणि त्याला अत्यंत रमणीय करून दाखविणारी नम्रता! आणि ह्या दोन्हींला आधारभूत असा ईश्वरावरचा विश्वास! आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण ईश्वराला वाहून बसलेला हा सद्भक्त ह्या कोशाचें काम करीत असतां वर्तमानपत्रांना लेख लिहीत होता, धर्मसमीक्षकांबरोबर धर्मचर्चा करीत होता, व्याधिग्रस्तांच्या, मोहांत सांपडलेल्यांच्या, दुःखितांच्या भेटी घेत होता, व आपलें मुख्य काम ह्मणजे अत्यंत श्रमाचें असें शिक्षकाचें काम झटून करीत होता! राक्षसी प्रकृतीनें

नव्हे, तर सदिच्छा, पूर्ण विश्वास, नियमितपणा ह्या गुणांनीं त्याला इतका कार्यक्षम केलें यांत संशय नाहीं. हें कोशाचें काम चालू असतां बाबासाहेबांचे आणखी कोणकोणते व्यवहार चालू होते हें १८६१ सालच्या त्यांच्याच रोजनिशींतून घेतलेल्या एका दिवसाच्या कार्यक्रमावरून लक्षांत येण्यासारखें आहे. तो कार्यक्रम हा.—(१) कोशाचें संशोधन सुमारें तीन तास, (२) ख्रिश्चयन् व्हर्नाक्युलर लिटरेच्युअर सोसायटीकरितां तिसऱ्या पुस्तकाचें भाषान्तर करणें, (३) हाय व्हर्नाक्युलर स्कूलच्या हिंदु शिक्षकांना शास्त्र शिकविणें, (४) आणखी एका रोमन क्याथलिक मुलाला शास्त्र शिकविणें, (५) स्वतः देवाच्या वचनाचा अभ्यास करणें, (६) तोच अभ्यास पुन्हा सायंकाळीं माझ्या प्रिय पत्नीबरोबर इंग्रजी शास्त्रावरून करणें. याशिवाय कार्यक्रमांत नमूद केले नाहींत असे शुभवर्तमान सांगण्याचे जितके प्रसंग आले, तितके ह्या भगवद्भक्तानें ह्याच दिवशीं साधून घेतले आहेत, ते निराळेच !

१८६७ सालीं बाबासाहेबांची, पुणें येथील फ्रीचर्च मिशनाच्या मंडळीचे पाळक ह्मणून दीक्षा झाली. ह्या प्रसंगाच्या गांभीर्याला अनुलक्षून बाबासाहेब ह्मणतात, "१८६७च्या एप्रिल महिन्याच्या ७व्या तारखेस माझी दीक्षा झाली. या प्रसंगीं मुंबईचे डा० विल्सन अध्यक्षस्थानीं होते. रे० नारायण शेषाद्री, रे० स्टादर्ट, रे० मॅक्फर्सन्, रे० राबर्ट अँङ्गस, रे० मि. स्मॉल, आणि रे० एम्. रॉस ह्यांनीं दीक्षेच्या कार्यक्रमांत भाग घेतला. युरोपिअन् आणि हिंदी ख्रिस्ती लोक बरेच जमले. हा प्रसंग फार गंभीरपणाचा व मनोवेधक झाला. आमच्यामध्यें प्रभु उभा आहे असें मला वाटलें.

" देवानें ही गोष्ट मोठ्या अद्भुत रीतीनें घडवून आणली. मी १८६६ मध्यें अहमदनगरास होतों तेव्हां ही गोष्ट माझ्या ध्यानीं मनीं नव्हती. येथें येऊन मि. मॅक्फर्सन् यांना पाळकाच्या कामांत मदत करायाचें मला बोलावणें झालें, तेव्हां देखील माझ्या मनाला हा विचार कधीं शिवला नाहीं; आणि जेव्हां दीक्षेपूर्वीच्या माझ्या परीक्षा जितक्या लौकर घेतां येतील तितक्या घ्याव्या, अशी मुंबईच्या प्रेस्बिटरीला विनंति करण्याचें ठरलें, तेव्हां मला वाटलें, कीं ज्याला ह्या कामाचें शिक्षण मिळा-

लेलें नाहीं त्याच्या दीक्षेला जनरल असेंब्लीचा रुकार मिळायाला बरींच वर्षे लागतील. पण मनुष्याचे मार्ग निराळे आणि ईश्वराचे मार्ग निराळे असतात. ईश्वर आपणाला कोणत्या कामासाठीं पसंत करितो हें समजेपर्यंत वाट पाहावी हा माझा पक्का विचार, माझी अशक्त प्रकृति, ह्या कामाकरितां लागणाऱ्या योग्यतेचा माझ्या ठायीं बहुतेक अभावच, माझ्या प्रिय पत्नीची पुण्यास स्थायिक होण्याबद्दल नाखुशी, ह्या गोष्टी आड असतां—माझें अन्तःकरण किंवा ज्या लोकांचा मी पाळक होणार त्यांचीं अन्तःकरणें उत्तेजित नसतां, **ईश्वरानें** आपला हेतु अति विलक्षण रीतीनें सिद्धीस नेला. **देवानें** ज्या रीतीनें माझा बाप्तिस्मा घडवून आणिला, आणि आतां **त्यानें** ज्या रीतीनें माझी दीक्षा घडवून आणिली, त्या दोन्ही रीतींमध्यें बरेंच साम्य आहे. माझ्या बाप्तिस्म्याच्या खालोखाल माझ्या धार्मिक जिण्यांतला महत्वाचा प्रसंग ह्मणजे हा दीक्षेचाच होय. आपल्या बापाचें घर सोडण्याचें सामर्थ्य मला नव्हतें, मी घाबरून गेलों होतों. माझ्या मनाची चलबिचल होत होती, मी भ्याड बनलों होतों. पुन्हा परत गेलोंच तरी मूर्तिपूजक राहून जायाचें नाहीं, अशा इरायानें मी त्या आदित्यवारीं आपल्या बापाचेंघर सोडून निघालों खरा तरी उपासना आटपल्याबरोबर मी तुमच्या घरीं येतों हें जें वचन मी रे० जे. टेलर ह्यांस दिलें होतें तें खरें करण्याचें धैर्य मला होईना. जर त्यांनीं होऊन मला "येतोसना" ह्मटलें नसतें, तर बहुतकरून मी तसाच परत घरीं गेलों असतों, आणि त्या एका रात्रींत माझ्या चित्तवृत्तींत कोणता फरक पडला असता हें कोण सांगेल? परंतु प्रभूनें मला "हो" ह्मणण्याचें सामर्थ्य दिलें. मी काय ह्मणतों ह्याचें ज्ञान मला नव्हतें. ह्या माझ्या हो ह्मणण्याचे परिणाम काय होतील, याच्या योगानें माझ्या जीवाच्या कसकशा परीक्षा होतील, कोणकोणतीं विघ्नें येऊन माझ्यापुढें उभीं राहतील, मला किती त्रास होईल, माझा कसा छळ होईल, असले विचार माझ्या मनाला शिवले सुद्धां नाहींत. आत्म्याचा वरद हस्त त्या प्रसंगीं पूर्णपणें माझ्यावर होता, त्याची सत्ता माझ्यावर इतकी पूर्णपणें बसली होती, कीं त्या सुशील मिशनरीच्या घरीं मी बगींत बसून जायाला निघालों तेव्हां मला वाटलें, कीं मी बगींत

बसलों नाहीं, तर हा सपक्ष देवदूतच मला त्या माझ्या सन्मान्य धर्मपित्याच्या घरीं सुरक्षितपणें नेऊन पोंहचवीत आहे.

प्रस्तुत प्रसंगींहि देवानें ह्याच प्रकाराची पुनरावृत्ति केली. त्या दीक्षेच्या बाबतींत माझें अंग मुळींच नव्हतें. बहुतेक साऱ्या गोष्टी माझ्या वाटच्या इतरांनींच केल्या. मला बोलावणें झालें आणि मीं हो ह्मटलें, इतकेंच काय तें मीं केलें. मीं इतकेंच उत्तर दिलें, कीं "पुष्कळ प्रार्थना करून व विचार करून मी हें आमंत्रण मान्य करितों." पण खरें पाहिलें असतां मला प्रार्थनेला आणि विचाराला तरी कितीसा काळ मिळाला ? ह्या विषयासंबंधानें मीं जर पुष्कळ प्रार्थना केली असली, पुष्कळ विचार केला असला, तर जळत्या झुडपाजवळ ईश्वरासमोर इस्त्राएलाच्या भावी धुरंधराच्या शब्दांप्रमाणेंच माझे अन्तःकरणांतले शब्द असले पाहिजेत."

पाळकाचें काम बाबासाहेबांनीं फार दिवस केलें नाहीं. शिक्षक, उपदेशक, पाळक इत्यादि भिन्न भिन्न कामें त्यांच्या हातून व्हावीं व एकंदर ख्रिस्ती सेवेचें स्वरूप अनुभवानें त्यांच्या मनांत चांगलें ठसावें ह्या हेतूनें मात्र ईश्वरानें त्यांची ह्या कामावर कांहीं काळपावेतों योजना केली असें दिसतें. देवाच्या मनांत त्यांना मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचा जनक बनवायाचें होतें. ही पदवी ज्याला द्यावयाची, त्याला ख्रिस्ती सेवेच्या सर्व अंगांचा अनुभव पाहिजे ह्मणून देवानें त्यांच्या हातून पांच सहा वर्षें मंडळीची सेवा करविली. आपली पाळकाच्या कामावर दीक्षा झाली ही ईश्वरीयोजना होय असें त्यांना वाटलें तें चुकीचें नव्हतें, व पुढें त्यानेंच त्यांना हें काम सोडण्याची बुद्धि दिली असें ह्मणणें हेंहि चुकीचें नाहीं. १८७३ या वर्षी बाबासाहेबांनीं मंडळीच्या कामाचा राजीनामा दिला व देवानें आपल्या हातांत लेखणी दिली आहे हें पक्कें ओळखून ते अप्रतिहतपणें तिचा उपयोग करूं लागले. ह्या पूर्वींच त्यांचा लिहिण्याचा उपक्रम झाला होता. इंग्रजी–मराठी शब्दकोश, मराठी–इंग्रजी शब्दकोश हीं जंगी कामें ह्यापूर्वींच पार पडलीं होतीं. क्रिश्र्चन लिटरेच्युअर सोसायटीकरितां, ट्रॅक्ट सोसायटीकरितां, व केवळ आपली हौस ह्मणून त्यांनीं कित्येक लहान लहान पुस्तकें लिहिलीं होतीं. त्यांची एकच कादंबरी "यमुनापर्यटन" ही तर १८५६–५७ सालींच बाहेर पडली होती. "ऐक्यवर्धकपत्रिका", "सत्यदीपिका" मंडळीचें काम करीत असतांनाच

त्यांनीं काढल्या होत्या. तरी पण इतर कामें त्यांच्या लेखणीच्या आड येतच होतीं. तीं सारीं १८७३ सालीं ईश्वरानें दूर केलीं!

१८७२ सालीं बाबासाहेबांची ख्रिस्ती पत्नी सेराबाई ह्या निवर्तल्या. पाळकाचें काम सोडून देण्याला त्यांना जीं कारणें झालीं, त्यांत ह्या गोष्टीला पहिली जागा दिली पाहिजे. घरांतली दगदग सोसून, सारा दिवस धर्मसंबंधी किंवा वाङ्मयासंबंधी गहन विचार करीत राहणें, व हें ओझें कमी! ह्मणून मंडळीच्या योगक्षेमाची काळजी वाहणें! इतकें सारें करण्यासारखी त्यांची प्रकृति सुदृढ नव्हती, आणि असें असून त्यांनीं हा भार वाहिला असता, तर त्यांची गत एक ना धड भाराभर चिंध्या अशांतली झाली असती. शिवाय अपत्नीक मनुष्य कितीही चांगला असला, तरी त्याला पाळकाचें कर्तव्य पूर्णपणें करण्यास अनेक अडचणी येतातच. सारांश, त्यांनीं पाळकाचें काम सोडलें हें योग्यच केलें. असें करण्यांत त्यांनीं **ईश्वराच्या** योजनेला मान दिला. ह्या सुशील, धार्मिक पत्नीचें त्यांना पाळकाच्या कामांत किती आणि कसें साह्य होत असेल, ह्याचा कांहींसा तर्क पुढें दिलेल्या त्यांच्या उद्गारांवरून करितां येईलः—"हे **देवा**, ह्या जगांत जो माझ्या जिवाचा आधार होता तो तूं काढून घेतलास, घराला जी आधारभूत मेढ व शक्ति होती ती तूं काढलीस, माझ्या प्रिय सेरावांचून घर किती शून्य व लेंकरें किती केविलवाणीं दिसतात! तिच्या सहवासांत मीं हीं बारा वर्षे किती सुखानें घालविलीं. **आमच्या लग्नाची बोलाचाली होत असतां तुझी इच्छा जाणण्याकरितां तुझ्या प्रार्थना आम्हीं कशा केल्या हें तुला ठाऊक आहे.** ज्या वेळीं आह्मीं **तुझें** शास्त्र वाचून मनन करीत असूं तेव्हां किती गोड वाटत होतें, तो किती सुखाचा काळ होता! आणि आमचें लग्न झाल्यावर तूं आह्मांस बहुत आशीर्वाद दिलेस. **धर्मबुद्धीनें व भक्तिभावानें जो आमचा संबंध जडला,** त्याचा आह्मांस कधीं पस्तावा झाला नाहीं. बहुत अरिष्टांपासून त्वां आम्हांस रक्षिलेंस. **तूं आमचें सहाय, मार्गदर्शक, प्रकाश व जीवन होतास. दुःखांत तूं आमचें सुलभ सहाय व सुखांत तूं आमचा आनंद होतास.** आतां हे **प्रभू, तूं** तिला आपल्याजवळ घेतलें आहेस, बहुत दिवसांच्या कठीण दुःखभोगानें **तूं** तिला वर नेण्याकरितां तयार केलेंस, ती मोठी

शरीरयातना भोगीत असतां 'हें सर्व माझ्या बऱ्याकरितां आहे, आणि देव मला पवित्र करीत आहे आणि जेव्हां पवित्रीकरणाचें काम पुरें होईल तेव्हां ही परीक्षा पुरी होईल !" ह्या अवतरणावरून काय दिसतें ? जसा पति धार्मिक, श्रद्धाळु, निरंतर ईश्वराच्या समक्षतेंत राहणारा होता, तशीच ही पत्नी नव्हती का ? आणि हिच्या हातून ह्या पाळकाचें अर्धें ओझें दूर होत नसेल का ? ह्या अवतरणांतलीं मोठ्या अक्षरांनीं छापलेलीं वाक्यें ज्यांना लग्न करायाचें आहे त्या ख्रिस्ती स्त्रीपुरुषांनीं जरूर वाचावीं व ध्यानांत ठेवावीं.

बाबासाहेबांनीं इतरांसंबंधानें आपलीं कर्तव्यें देवाला स्मरून पूर्णपणें करण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या खासगी आणि लौकिक जिण्यांत इतरांना पहिलें स्थल देण्यांत येत असे, तरी बाबू कालीचरण बानर्जी ह्यांच्या ह्मणण्याप्रमाणें ते स्वभावानें महर्षि होते. ते स्वभावतः अन्तर्दृष्टि होते; बाहेरचीं कामें करीत असले तरी त्यांचें सारें लक्ष स्वताच्या आत्म्याकडे असे, त्यांचे अनुभवसंग्रह वाचले असतां हें सहज लक्षांत येईल, कीं त्यांचें इतकें लोकोपयोगी ख्रिस्ती जिणें आत्मगत विचारावर अवलंबून होतें. मिशनरीचें, पाळकाचें, उपदेशकाचें किंवा शिक्षकाचें काम करीत असतां, त्या कामाच्या भरांत स्वताच्या आत्मिक स्थितीचा विसर पडण्याचा बराच संभव असतो. हें कांहींच नाहीं, पण बाबासाहेबांच्या चरित्राचें कितीहि बारकाईनें अवलोकन केलें, तरी त्यांना स्वताच्या आत्मिक स्थितीचा विसर क्षणमात्र पडल्याचें कोठें दिसून येत नाहीं. १८६२ पासून १८७३ पर्यंतचा त्यांचा काळ अनेक प्रकारचीं कार्यें करितांना गेला. ह्या अवधींत त्यांच्या खांद्यावर पुण्याच्या मंडळीचें अवजड जूं होतें, त्यांनीं इतक्या परिश्रमांनीं तयार केलेल्या शब्दकोशांच्या छपाईच्या कर्जाचा बोजा ते आपल्या शिरावर घेऊन बसले होते, ह्याशिवाय निरनिराळ्या प्रकारची ग्रंथरचना करण्यांत त्यांचें मनें गुंतलेलें होतें व त्या मनाला एकामागून एक प्रापंचिक चिंता ग्रस्त करीत होत्या; ह्याप्रमाणें अनेक कार्यांनीं आणि अनेक चिंतांनीं काहूर केल्यामुळें किती लोकांचे जीव वारा पिऊन देवापासून दूर दूर भडकले आहेत ! पण बाबासाहेबांचें तसें झालें नाहीं. आतां आपलें तसें होतें, असें वाटलें पुरे कीं ते लागलेच संबोधन पावत. कारण, त्यांना मधून मधून आत्म-

परीक्षण करण्याची सवय होती. एकदां ह्याप्रमाणें आत्मपरीक्षण करीत असतां ते ह्मणत आहेत, "माझी आत्मिक स्थिति कशी आहे ! मी अंधारांत चालत आहें, देवानें आपला मुखप्रकाश मजपासून लपविला आहे. मी यंत्राप्रमाणें झालों आहें. मी शास्त्र वाचतों, प्रार्थना करतों, उपदेश करतों, परंतु तें सर्व ओंठाचें काम आहे. त्याचा माझ्या अंतःकरणाला कांहीं स्पर्श होत नाहीं. जसा बेशुद्ध मनुष्य रस्त्यांत चालतो तसा मी आहें." "ज्यांस न्यायीपणाची भूक व तहान लागली आहे ते धन्य, कारण कीं ते तृप्त होतील."

१८७१ सालीं पुण्यास इन्फ्लुएंझा ज्वराची सांथ येऊन खिस्ती मंडळींत बरेच लोक आजारी पडले. त्या प्रसंगीं ह्या लोकांच्या ह्या भक्तिशील, प्रेमळ पाळकानें एकान्तांत त्यांच्याकरितां केलेल्या प्रार्थनांतून एक प्रार्थना आपल्या रोजनिशींत लिहून ठेविली आहे, ती इतकी विचारणीय, इतकी हृदयद्रावक आहे, कीं ती येथें दिल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. ती प्रार्थना ही:–"हे देवा, आह्मांवर दया कर, व न्याय करीत असतांना दया आठीव. तूं न्यायी आहेस व आह्मी तुझ्या दृष्टींत अन्यायी आहों. आह्मीं अपराध केला आहे आणि आमच्या पापाकडून तुला राग आणिला आहे. आमचा आळस, स्वार्थीपणा, आमचीं भांडणें, आमचा गर्व, आमची जगाची आवड, परमार्थाविषयीं आमची शिथिलता, ह्या सर्वांचा विचार केला असतां आमचा सत्यनाश झाला नाहीं हेंच मोठें आश्चर्य आहे. हे प्रभू, मी आपलीं पापें पदरीं घेतों, मी तुझें लेंकरूं, मंडळीचा पाळक, कुटुंबांत नवरा व बाप, लोकांचा भाऊ, मित्र व शेजारी ह्या सर्व नात्यांनीं माझीं पापें झालीं आहेत, आणि जीं कर्तव्यें मीं करावयाचीं सोडिलीं, तीं सर्व कबूल करितों. मला नम्र, पवित्र, उद्योगी, दयाळू, विचारवंत व ज्ञानी असें कर, आमच्या रोगी लेंकरांवरहि दया करून त्यांस बरें कर. ह्या ऋतूंत जे तुझे लोक रोगी आहेत, त्यांस निरोगी कर व त्यांच्याजवळ ऐस. त्यांस पारमार्थिक बुद्धि दे. प्रभु येशू आपल्या लोकांस जी शांति देतो तिचा ते उपभोग घेवोत. ते एकमेकांच्या अपराधांची क्षमा करून प्रीतीनें व एकचित्तानें राहोत. त्यांच्यामध्यें जो मळ आहे तो काढून टाक आणि त्यांचीं अन्तःकरणें शुद्ध कर; ह्या संकटांतून त्यांस

सर्व प्रकारचीं सत्कर्मे करायास सिद्ध कर. माझा सदा वंद्य तारणारा प्रभु येशू ह्याच्या नांवामुळें ही प्रार्थना ऐक."

पाळकपणाचें काम सोडल्यावर नऊ वर्षे बाबासाहेब केवळ लेखणीच्या बळावर स्वतंत्रपणें आपलें आणि आपल्या कुटुंबाचें चालवीत होते. ह्या काळांत त्यांना अनेक वेळां अडचणींत पडावें लागलें. तथापि त्याच अडचणी त्यांच्या आत्मिक वाढीला कारणीभूत झाल्या. द्रव्यसंपादन, द्रव्याचा व्यय व ऋण यांसंबंधानें ते आपले अनुभव हे असे लिहून ठेवीत आहेत:—"द्रव्यसंपादनार्थ मीं मोठ्या असोशीनें यत्न केला नाहीं. माझ्या प्राप्तीचा आरंभ फार थोडा असून ती हळू हळू वाढत गेली. तथापि ज्यास धनवान् ह्मणतात, त्यांच्या वर्गांत मी बसलों नाहीं. जेव्हां मला कुटुंब नव्हतें, तेव्हां **देवानें** मला चरितार्थापुरतें द्रव्य दिलें, आणि जेव्हां मी कुटुंबवत्सल झालों, तेव्हांहि **त्यानें** मला कांहीं उणें पडूं दिलें नाहीं. **प्रभूची** सेवा करण्याकरितां जो मार्ग मीं अवलंबिला होता, तो सोडून बहुत धनप्राप्तीचा मार्ग स्वीकारण्याविषयीं मला प्रसंग व मोह प्राप्त झाले. तथापि त्यांस वश झालों नाहीं, आणि तेणेंकरून माझें कांहीं विशेष अनहित झालें असें नाहीं. कधीं कधीं मला पैशाची तूट येई खरी, तरी कर्ज न काढण्याचा जो मीं सुनिश्चय केला होता, त्याप्रमाणें चालण्यास **देवानें** मला शक्ति दिली; असेंच बहुत वर्षांपासून मीं दुसऱ्यापाशीं याचना करण्याचेंहि सोडून देऊन सर्व भार **प्रभूवर** टाकण्याचा निर्धार केला व त्याप्रमाणें मला **प्रभूच्या** कृपेचा अनुभव होत गेला. **त्यानें** फार चमत्कारिक रीतीनें माझ्या व माझ्या कुटुंबाच्या गरजा पुरविल्या; मागितल्यावांचून माझ्या मित्रांनीं मला वारंवार साह्य केलें.

"द्रव्यसंचयाविषयीं मीं एक नेम धरिला होता कीं, आपल्या नित्य, नैमित्तिक कर्तव्यांसंबंधी खर्च करून जें कांहीं उरेल तें मात्र संचयास टाकावें.

"द्रव्यसंचय करण्यापेक्षां त्याचा सद्व्यय करण्यांत व ज्याचें मी कांहीं लागत असें तें देण्यांत मला विशेष आनंद वाटत असे.

"गरिबींत असणें हें पाप आहे अथवा श्रीमंत लोकांवर **ईश्वराची** विशेष दया आहे असें मी कधीं समजत नसें. जेव्हां मी गरिबींत असें तेव्हां **प्रभु येशूच्या** स्थितीची मला आठवण होई. **तो** धनवान् असून आह्मांकरितां गरीब झाला; आणि जेव्हां माझ्यापाशीं चार पैसे असत तेव्हां

"नीच होणें हें मला कळलें, आणि पुष्कळ असणेंहि मला कळलें. हरएक प्रसंगीं व सर्वांमध्यें तृप्त असण्यास व भुकेला असण्यास आणि समृद्ध होण्यास असा मी पूर्ण शिकलों," हा जो पौलसाचा अनुभव तो माझाहि अनुभव आहे असें वाटून मला आनंद होई, मी ख्रिस्ती झाल्यानंतर मला ाठा पगार व बढतीची जागा मिळेल असें माझ्या कित्येक ख्रिस्ती व ख्रिस्ती मित्रांस व नातलगांस वाटे व त्याविषयीं ते मला बोलूनहि दाखवीत. परंतु त्यावरून माझ्या ठायीं तसा विचार आला नाहीं. एकंदरीनें पगाराच्या व धनिकपणाच्या संबंधानें पाहिलें असतां संसाराच्या गोष्टींत देखील "रम्य ठिकाणीं मला विभाग पडला आहे" असें मला वाटावें.

"डामडौल दाखविण्याकरितां व नांवलौकिक मिळविण्याकरितां व अब्रू राखण्याकरितां व ऐषआरामाकरितां कर्ज काढणें ह्यांत पाप आहे असें मला वाटूं लागलें, तसेंच आपल्या शक्तीपलीकडे खर्च करून काढलेलें कर्ज देण्यास सामर्थ्य नसून ऋणकरी होणें ह्यांतहि पाप आहे अशी माझी समजूत झाली, आणि पुढें असा अनुभव आला कीं अगत्याच्या कामासाठीं कर्ज न काढतां ईश्वरावर भरंवसा ठेवल्यानें ईश्वर साह्य करितो.

"मला अडचणीच्या वेळीं दुसऱ्यापाशीं याचना करण्याचीहि संवय होती, तिजपासूनहि ईश्वरकृपेनें मी मुक्त झालों इतकेंच नाहीं, तर अशा प्रकारचें सहाय दुसऱ्यास करण्यास मला शक्ति मिळाली." वाढता संसार, वाढती महागाई, **प्रभूची** सेवा सोडून इतर प्रामाणिकपणाच्या मार्गांनीं द्रव्य संपादन करण्याचें अंगीं पूर्ण सामर्थ्य, इतक्या गोष्टी हजर असतां गरिबींतच आनंद मानून **प्रभूची** सेवा करणारे असे महात्मे आजकाल कितीसे सांपडतील? आणि त्यांत पुन्हा "जो तुजपाशीं उसनें मागतो त्याला पाठमोरा होऊं नको" ह्या **प्रभु**वाक्याला मान देऊन घस सोसणारे कितीसे निघतील? (अनुभवसंग्रह भाग १, पृष्ठ ९, परिच्छेद २ पाहा).

रे. बाबा पदमनजी म्हणजे मराठी ख्रिस्ती सारस्वताचे जनक होत. त्यांच्या हातून बनलेलीं मराठी पुस्तकें वजा केलीं, तर आज मराठी ख्रिस्ती वाङ्मय असून नसल्यासारखें होईल. ख्रिस्ती महामंडलाच्या इतिहासाकडे पाहिलें असतां, आपणास सहज दिसून येतें, कीं आपल्या राज्याच्या विशिष्ट सेवेकरितां परमेश्वरानें वेळोवेळीं विशिष्ट व्यक्ति उभ्या केल्या आहेत. ह्यांतलीच बाबासाहेब ही एक व्यक्ति होय. ह्या व्यक्तीकडे

देवानें सोंपविलेलें विशिष्ट कार्य ह्मणजे मराठी ख्रिस्ती वाङ्मय. ह्या कार्या-करितां देवानेंच त्यांस निवडिलें होतें असें ह्मणण्यास पहिला आधार त्यांच्या कामाचें परिमाण व प्रतिभा यांचा. त्यांनीं एकट्यांनीं लिहिलेलीं लहान मोठीं पुस्तकें शंभरांवर आहेत! ह्यांत त्यांच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झा-लेल्या लेखांचा समावेश केला तर हें वाङ्मय कसें एखाद्या डोंगरासारखें दिसूं लागतें! ह्या वाङ्मयाच्या ठायीं प्रतिभाहि तशीच विलक्षण आहे. त्यांचा "अरुणोदय," "अनुभवसंग्रह," "ज्ञाननीतिबोधसंग्रह," व "हिंदु धर्माचें स्वरूप" ह्या ग्रंथांचें मनापासून परिशीलन करणारा मनुष्य ख्रि-स्ताचा झाल्यावांचून राहणार नाहीं. मग तो बाप्तिस्मा घेवो किंवा जन-भीतीस्तव गुप्तपणें ख्रिस्तभक्त राहो. त्यांच्या लेखांनीं ज्यांचें लक्ष प्रभु ये-शूकडे लागलें व पुढें जे ख्रिस्ती झाले, असे शेंकडों लोक आहेत! ह्यांपैकीं एकाचें ख्रिस्ती होण्यापूर्वीं त्यांना एक पत्र गेलें होतें, तें वाचण्यासारखें आहे. ह्या पत्राविषयीं बाबासाहेब ह्मणतात "कांहीं दिवसांमागें एका अनोळखी विद्वान् पंडिताकडून मला पत्र आलें; त्यांत असें लिहिलें होतें कीं, त्यानें माझें अरुणोदय पुस्तक व दुसरीं पुस्तकें वाचिलीं. त्यांविषयीं त्यानें असें दर्शविलें आहे कीं, ह्या पुस्तकांत शब्दलालित्य किंवा अलंकार किंवा शास्त्र-दृष्ट्या कोणता विशेष गुण नसूनहि मला हीं शेंकडों वेळां पुनःपुन्हा वा-चावीं असें वाटलें. ह्यांत खरा कळवळा, खरी भक्ति, साधेपणा व निरी-च्छता आहे. आपलें आत्मचरित्र मी सहाव्या खेपेस वाचीत आहें." हा गृ-हस्थ ता० १० फेब्रुवारी १८९५ रोजीं ह्मणजे हें पत्र लिहिल्यानंतर अकरा म-हिन्यांनीं मुंबईस बाप्तिस्मा घेऊन प्रसिद्धपणें ख्रिस्तशिष्य झाला. ईश्वरी योजने-वांचून व **ईश्वरी** कृपेवांचून एखाद्या अद्वितीय पंडिताच्याहि लेखणींत इतकी प्रतिभा असणें शक्य नाहीं. बाबासाहेबांचे ग्रंथ वाचीत असतां त्यांच्या स्वताच्या अनेक गुणांच्या फार पलीकडे, म्हणजे त्यांच्या हातांत लेखणी देणाऱ्या परमेश्वराकडे वाचकाचें लक्ष गेल्यावांचून राहत नाहीं. हीच त्यांच्या निवडणुकीची पहिली मोठी साक्ष होय.

दुसरी साक्ष ही, कीं त्यांना लिहिण्याची इतकी हौस असूनहि त्यांनीं "**देवा**, मला हेंच काम दे," असें **देवा**जवळ कधीं मागितलें नाहीं. ट्राक्ट सोसायटी व बायबल सोसायटी ह्या संस्थांकडून त्यांना हें काम मिळालें त्याला उद्देशून तेच ह्मणत आहेत, कीं:—"मला काम मिळावें

णून मीं दोन दिवसांमागें देवाची प्रार्थना केली; परंतु तें को-
ून मिळेल हें मला अगदीं ठाऊक नव्हतें. त्याच दिवशीं संध्याकाळीं ट्राक्ट सोसायटी व बैबलसोसायटी ह्यांच्या दोन सेक्रेटरींकडून मला कामाविषयीं दुसंयुक्त पत्र आलें. हें काम मीं पत्करावें किंवा नाहीं याविषयीं हे **प्रभू**, तूं मला वाट दाखीव." ह्यावरून उघड होत नाहीं का, कीं त्यांनीं हें काम पत्करण्यांत आपली इच्छा एके बाजूला ठेवून **ईश्वराच्या** इच्छेला मान दिला असें ?

१८७७ मध्यें बाबासाहेबांनीं बायबल सोसायटीच्या आणि ट्राक्ट सोसायटीच्या संपादकाचें काम पत्करिलें. पहिल्या संस्थेकरितां त्यांचें काम मराठी बायबल किंवा त्याचे भाग छापण्यांत येत असतां त्यांचीं प्रुफें पाहणें व छपाईचें काम व्यवस्थित करून घेणें हें होतें. ह्याशिवाय सध्या आपल्याला विषयानुक्रमानें मथळे दिलेलें मराठी बायबल मिळतें, तें त्यांनींच तयार केलें आहे. ह्या सोसायटीची एक ट्रान्स्लेशन्‌कमिटी आहे, तिचेहि हे एक मेंबर होते. त्यांनीं हें काम इतकें मन लावून केलें, त्यांत त्यांना इतकें यश आलें, कीं थोड्या वर्षांपूर्वीं त्यांच्या ध्यानीं मनीं नसतां, अगर कोणी फारशी शिफारस केली नसतां, ब्रिटिश ॲण्ड् फारेन बायबल सोसायटीनें त्यांना आपल्या कमिटीचे आनररी फारेन मेंबर करून त्यांचा बहुमान केला. ह्या प्रसंगाला अनुलक्षून ते म्हणत आहेत, "मी पूर्ण कृतज्ञताबुद्धीनें **प्रभूचें** चांगुलपण नमूद करून ठेवितों. **त्यानें** जें काम मला दिलें, तें करायाला मला सामर्थ्य पुरविलें. हें काम करीत असतां मला माझ्या उजव्या हाताप्रमाणें होणारी माझी प्रिय कन्या एस्तेर, हिला **त्यानें** सुरक्षित ठेविलें आहे, म्हणून मी **त्याचे** उपकार मानतों. **जुन्या कराराचें** संशोधन करण्याच्या कामीं आह्मीं दोघांनीं फार परिश्रम केले आहेत. आमची परिस्थिति इतकी प्रतिकूल आहे, तरी आह्मांला हें काम आनंददायीच वाटत आलें आहे." बाबासाहेबांचें तिसरें कुटुंब १८९० च्या आगस्ट महिन्यांत परलोकवासी झालें, तेव्हांपासून त्यांना तळहातावरच्या फोडाप्रमाणें जपणारी, त्यांची दृष्टि मंद झाली असतां त्यांना मूर्तिमंत दृष्टीच्या ठिकाणीं होऊन त्यांच्या हातून शेवटच्या दिवसापर्यंत शास्त्रसंशोधनाचें, ग्रंथरचनेचें व इतर लेख लिहिण्याचें काम करून घेणारी, त्यांची खरी, खरी, खरी आधारयष्टि त्यांची कन्या मिस एस्तर

पद्मनजी ही झाली. हिनें आपल्या ऐहिक पित्याची जी एकनिष्ठ सेवा केली आहे तिचें खरें स्वरूप, खरें मोल हिचा व आपला सर्वांचा स्वर्गीय **पिता** मात्र करायाला समर्थ आहे !

बाबासाहेबांनीं बायबल सोसायटीच्या व ट्रॅक्ट सोसायटीच्या एडिटरचें काम २५ वर्षें केलें. १९०२ सालच्या जून महिन्यांत त्यांना ह्या संस्थांकडून पेनशन देण्यांत आलें. ह्या वेळेस त्यांचें वय ७१ वर्षांचें होतें, शिवाय त्यांची दृष्टि अत्यंत दुर्बल झाली होती. अशा प्रसंगीं त्यांनीं केलेली सेवा ध्यानांत आणून ह्या दोन संस्थांनीं त्यांना निश्चित विश्रान्ति मिळावी ह्मणून जी ही योजना केली, ती योग्यच केली. बाबासाहेब स्वतः ह्या योजनेविषयीं काय ह्मणत आहेत हें आपण पाहूं या. ते म्हणतात, "बैबल सोसायटीनें जून महिन्यापासून मला पेनशन देण्याचें ठरविलें, ह्या वेतनांत ट्राक्ट सोसैटीची कांहीं भर आहे. शिवाय बैबलसोसायटीस जेव्हां कारण पडेल तेव्हां रिविजन कमेटींत मला बोलावणें होईल, त्याबद्दल मला कांहीं मिळणार अशी व्यवस्था केली आहे. आतां माझें वय ७१ वर्षांचें आहे. ह्या वयांत थोडक्यांसच पेनशन मिळतें व ह्मणजे थोडेच लोक इतकें वय होईपर्यंत पगारी चाकरी करितात. **परमेश्वरानें** मजवर दया करून मला एथवर आणून पोंचविलें ह्मणून **त्याचे** उपकार मानितों. **त्याची** सेवा करण्याची माझी लायकी नाहीं; **त्यानें** मला ममतेनें वागवून घेतलें. **त्याचें** नाम सुवंदित असो. मी द्रव्यसंग्रहाकरितां झटलों नाहीं, जें कांहीं अल्प द्रव्य माझ्यापाशीं आहे तें **त्याचेंच** आहे, त्याचा मी दुरुपयोग करणार नाहीं, **त्याला** माझ्या सर्व गरजा व अडचणी ठाऊक आहेत; सर्व कांहीं **तो** पुरवील. वृद्धापकाळांत **मी** तुला सोडणार नाहीं, असें **त्याचें** वचन **त्याच्या** भक्तांस आहे; मी **त्याचा** भक्त आहें. मीं अन्य देवाची सेवा केली नाहीं. जेव्हांपासून मला **प्रभु येशू** गुरु भेटला तेव्हांपासून **परमेश्वर** जो **यहोवा देव त्याचीच** सेवा त्या प्रिय **सद्गुरूच्या** द्वारें मी करीत आहें; तेणेंकरून मला सुख, शांति व समाधान आहे. ह्या ४८ वर्षांत बहुत दुःखें व अनेक संकटें मजवर आलीं, तरी प्रिय **प्रभूनें** मला संभाळिलें, आतां माझें ऐहिक आयुष्य संपण्याची वेळ जसजशी जवळ येत आहे तसतशी मला अनंतकालिक आयुष्याची आशा

ह्म चालली आहे. मी **प्रभूजवळ** जाण्यास उत्कंठित आहें, तरी एथेंही ृ **त्याची** सेवा करण्याची माझी इच्छा आहे. ह्या देशांत **त्याची** मंडळी ावी, **त्याच्या** राज्याचा प्रसार व्हावा, ह्या कामीं माझ्यानें जेवढें कर- ाल तेवढें करण्यास मी झटत जाईन. ह्यांतच माझ्या प्रिय देशाचें खरें कल्याण आहे, अशी माझी पूर्ण खात्री आहे."

अक्षरशः खरें! बाबासाहेबांनीं देहविसर्जन करीपर्यंत केवळ हीच ाशसेवा केली. ते एकनिष्ठ स्वाराज्यसैनिक होते. त्यांच्या लेखणीनें जें कार्य केलें आहे, पेनशन मिळाल्यावर, वृद्धापकाळीं, सारा देह शिथिल झाला असतां, दृष्टि निरुपयोगी झाली असतां, जें कार्य केलें आहे तें सुद्धां ाश्चर्य वाटण्यासारखें, हा मराठी ख्रिस्ती वाङ्मयाचा जनक, ह्या वाङ्म- ाची सेवा करीत असतां वारला नाहीं! देहातीत होऊन स्वर्गवासी झाला. एकेचाळिसाव्या गीताच्या पहिल्या वाक्याचें संशोधन करीत असतां ह्याचें देहविसर्जन झालें, ह्मणजे इहलोक सोडीत असतांना त्याचें ंतःकरण ख्रिस्ती बंधुप्रेमानें निर्भर झालेलें होतें, त्याची लेखणी देवाची ा करीत होती!

असल्या सत्पुरुषाच्या चरित्रावरून किती तरी महत्वाचा बोध घेण्यासा- खा आहे. हिंदू होते तेव्हां किंवा पुढें ख्रिस्ती झाल्यावर हा ईश्वरभक्त ुरा पुरा सत्यानुयायी होता. आपणांस जें खरें दिसतें तें प्रत्यक्ष प्राणां- ाक्षां अधिक मानून चालायाचें हा ह्याचा कृतसंकल्प असे. बाबासाहे- बांच्या चरित्राचा वरवर अभ्यास करा किंवा अगदीं सूक्ष्म दृष्टीनें करा, ते "बोले तैसा चाले। त्याचीं वंदावीं पाउलें" ह्या दुर्मिळ वर्गांतले होते हें कबूल करावें लागतेंच. त्यांची धर्मश्रद्धा, **ईश्वरावरचा** लेंकरासारखा भाव, त्यांना येणारा असत्याचा, दांभिकपणाचा त्वेष, त्यांचें ख्रिस्ती बंधुप्रेम. त्यांची स्वाराज्यसेवेची उत्कंठा इत्यादि गुण अशांतले होते, कीं ते त्यांच्या शत्रूंना सुद्धां कबूल करावे लागत व शेवटपर्यंत कबूल करावे लागतील.

ते गेले, ता. २९ आगस्ट १९०६ रोजीं **प्रभूमध्यें** विलीन झाले, तरी ते हयातच आहेत! त्यांच्या सहवासानें, उपदेशानें किंवा त्यांच्या विजयशालिनी लेखणीच्या प्रभावानें ख्रिस्ती झालेले व ख्रिस्ती झालेल्यांचे

आत्मिक रीत्या परिशुद्ध झालेले लोक थोडे नाहींत, हीं सारीं त्यांचीं चालतीं बोलतीं स्मारकें आहेत; आणि त्यांच्या लेखणीनें पसरून दिलेला वाङ्मयाचा सागर! ह्याला तर निरंतर भरतीच येत राहणार! ज्या **पर-मेश्वरानें** आपल्या हिंदी खिस्ती मंडळीच्या अभिवृद्धीकरितां हें नररत्न निवडून घेतलें, त्याचें नाम सुवंदित असो.

नारायण वामन टिळक.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा

REFBK-0000422